# महाभारत

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे

## खंड१ : आदिपर्व



# महाभारत

## खंड १ : आदिपर्व

अशोक कोठारे

ई साहित्य प्रतिष्ठान

# महाभारत

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे
ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

ई साहित्य प्रतिष्ठान
G1102, Eternity, Eleventh floor
Eastern Express Highway. Thane, 400604
**www.esahity.com**
**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशन :६ फ़ेब्रुवारी २०१८

- अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळया परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बऱ्याचवेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आतापर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना ते गद्यात केले आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना मुद्दाम प्राचीन (Archaic) भाषा वापरतात परंतु माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत पंचवीस खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यात मूळ आदिपर्वाचे पांच खंड केले आहेत, त्यातील हा पहिला खंड आपण आता वाचणार अहात.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणाऱ्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्याआधीची असती तर त्याचा उल्लेख त्याकाळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य

विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्यानंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील  गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, अशोक सम्राटाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे

महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असत. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्या मते, हाच उद्देश वाचकांनी डोळयासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये. कारण तो धार्मिक ग्रंथ नाही. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता वगैरे. ते

सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहे म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल – ashokkothare@gmail.com

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

ashokkothare@gmail.com

You are invited to visit my other blogs

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/

for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

You may visit blog, Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/

for intelligent discussions.

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

# -महाभारत आदिपर्व खंड पहिला -

## प्रस्तावना

आदिपर्वाची थोडक्यात माहिती - आदिपर्व हे महाभारतातील पहिले पुस्तक आहे. आदिपर्वाच्या एका आवृत्तीत १९ भाग आणि २३६ अध्याय आहेत इतर आवृत्तीत २२५ अध्याय आहेत. आदिपर्वात उग्रश्रव सौतीने जमलेल्या ऋषींस नैमिष वनात सांगितले जे पूर्वी जनमेजयाने आरंभलेल्या सर्पसत्रात वैशंपायनने तक्षिलात सांगितले होते. त्यामध्ये महाभारतातील इतर अठरा भागातील कथाभागाचा सारांश दिला आहे. त्यात भरत व भृगुवंशांची माहिती दिली आहे. त्याच्या मुख्य भागात कुरु राज्याच्या  राजपुत्रांचे जन्म व धृतराष्ट्राने पांडवांवर काय आरोप केले त्याचा वृतांत आहे. *महाभारतात वंश हा शब्द घराणे ह्या अर्थी वापरला जातो हे लक्षात घ्यावे.*

१. अनुक्रमणिका पर्व – सौती वनात ऋषींना भेटतो. ते ऋषी त्याच्या तोंडून महाभारत ऐकण्याची इच्छा दाखवतात. ह्या पर्वात महाभारत ग्रंथाचे महत्व सांगितले आहे. त्याशिवाय माणसाच्या स्वभावाचा अभ्यास व तो कां झाला पाहिजे ते सांगितले आहे.

२. संग्रह पर्व – महाभारतातील  अठरा भागांचा सारांश आहे.

३. पौश्य पर्व – जनमेजय, आरुनी, उतंक, पौश्य आणि तपस्वी धौम्य ह्याच्या कथा.

४. पौलोमा पर्व – भार्गव वंशातील लोक व रुरू ह्याच्या कथा. च्यवन व पौलोमाच्या कथा.

५. अष्टीक पर्व – समुद्र मंथनातून जग निर्मितीची महाभारतातील संकल्पना दिली आहे. धर्माची संकल्पना, बंधन व मुक्ति ह्याची चर्चा आहे. नागांबद्दलची गोष्ट दिली आहे. जनमेजय सर्व नाग यज्ञात बळी देऊन मारून टाकण्याचा संकल्प सोडतो. शेवटी नागांना व सर्व प्राणिमात्रांना अहिंसेच्या तत्त्वानुसार संरक्षण मिळते. अष्टीकच्या जन्माची कथा आहे.

६. आदिवंशावतरण पर्व – ह्यात पांडव व कुरु राजपुत्रांची माहिती, सत्यवती, कर्ण, वासुदेव व आणिमंदव्य ह्याची कथा सांगितली आहे. त्यात ब्रह्माला विनंती केली आहे किं, त्यांने जगातील गोंधळ संपवण्यासाठी अवतार घ्यावा.

७. संभव पर्व – जगात जीवन व देव ह्याचे संबंध सांगितले आहेत. द्रोण, क्रोना व इतर तपस्व्यांची माहिती दिली आहे. दुष्यंत व शकुंतला ह्यांचे प्रेम प्रकरण, भरताचा जन्म, शकुंतला दुष्यंताकडे जाते व  तेथे तो प्रथम तिचा अव्हेर करतो त्यानंतर आठवण आल्यावर माफी मागतो व भरताला स्वीकारतो, भरत राजपुत्र होतो. देवयानी, पुरु, यदु आणि पौरव वंशाची माहिती आहे. पांडव भावंडे वनात कशी माघार घेतात व धृतराष्ट्र त्यांच्यावर

आरोप करतो, हे सांगितले आहे. कुंतीचा स्वयंवर, माद्रीचे लग्न, विदूर कसा पांडव व कौरवांत समन्वय आणण्याचा प्रयत्न करतो ते दिले आहे.

८. लक्षागृह-दाह पर्व – कणिक, धृतराष्ट्राचा प्रधान त्याला सल्ला देतो. त्यात राजाने राज्य कसे करावे त्याबद्दल सांगतो. कपट कारस्थान राजकारणात, युद्धात कसे उपयोगाचे असते ते तो त्याला शिकवतो. कोल्हा, वाघ, उंदीर, मुंगुस आणि हरण ह्याच्या रुपककथांतून, प्रधान कणिक दाखवून देतो किं, राजाने आपल्या कमजोरीवर जास्त लक्ष न देता, शत्रुच्या कमजोरीवर जास्त लक्ष दिले पाहिजे. खोट्या दोस्तीचा हवाला देऊन क्रौर्याने शत्रुचा कसा पाडाव करावा ते त्यांने शिकवले. त्यानुसार धृतराष्ट्र पांडवांसाठी वनात एक ज्वालाग्राही पदार्थापासून घर बनवतो व त्यात त्यांना गोड बोलून रहाण्यास सांगतो. उद्देश असा किं, त्यात जेव्हां ते घर पेटेल तेव्हां ते सर्व जळून जातील. विदूर जो सदाचारी होता तो सांगतो किं, कणिकाच्या सल्ल्याने हे घर बनवले आहे म्हणजे त्यात कांहीं काळेबेरे आहे व पांडवांना तो सावध करतो. पांडव त्या सल्ल्यानुसार त्या घरातून भुयार करून त्या द्वारा, जेव्हां ते घर पेट घेते तेव्हां निघून जातात. म्हणून वाचतात. धृतराष्ट्र मात्र असें समजतो किं, पांडव मेले.

९. हिडिंब वध पर्व – लक्षागृहातून वाचल्यावर पांडव भटकत रहातात. त्यात भीम व हिडींबा राक्षिशिणीचे प्रेम व विवाह. त्या प्रेमापोटी ती स्वताच्या भावांस विरोध करते. भीम व हिडिंबाच्या भावाचे युद्ध, त्यात

भिमाच्या अचाट ताकदीचे दर्शन, भीम व हिडिंबा ह्यांना एक मुलगा होतो त्याचे नांव घटोत्कच.

१०. बकासूर वध पर्व – पांडवांचे एकाचक्र मधील जीवन, भीम आणखीन एका राक्षसास, बकासूरास मारतो. कारण त्यांने एकाचक्र मधील लोकांना फार त्रास दिला होता. महाभारताची नाईका, द्रौपदीचा जन्म पवित्र अग्नीतून होतो. पांडव जीवंत असावेत अशी वार्ता सर्वत्र पसरते.

११. चैत्ररथ पर्व – पांडव पांचाल देशाकडे निघतात. तापती, विश्वामित्र व वसिष्ठ ह्यांच्या कथा. भृगुवंशाचा छळ व नाश ह्याची माहिती.

१२. स्वयंवर पर्व – पांडव पांचाल देशात येतात. द्रौपदीचा स्वयंवर होतो. त्यासाठी पांडव गुप्तवेशात येतात. अर्जुन व भीम स्वयंवरात द्रोपदीला जिंकतात. तिचा विवाह पांचही पांडवांशी होतो. तेथे कृष्ण गुप्त वेशातील पांडवांना ओळखतो.

१३. वैवाहीक पर्व – द्रोपदीला आनंद होतो किं, पांडव जिवंत आहेत. ती तो विवाह आनंदाने मान्य करते.

१४. विदूर गमन पर्व – विदूर कपटी कौरव आणि निष्कपटी पांडव ह्यांच्यात समेट करण्याचा प्रयत्न करतो. ह्या पर्वात कर्ण, भिष्म, द्रोण व विदूर ह्याचे युक्तिवाद दिले आहेत.

१५. राज्यलाभ पर्व – पांडव हस्तिनापुरास कृष्णाच्या कृपेने येतात. नगराची पुन्हा रचना करतात. सुंद, उपसुंद आणि नारद ह्याची कथा.

१६. अर्जुन धर्माचे उल्लंघन करतो. तो स्वेच्छेने निघून जातो. तो उलुपीशी विवाह करतो. अप्सरांना सोडवतो. अशा कथांतून अर्जुनाचे सामर्थ्य दाखवले आहे. अर्जुन व कृष्ण चांगले मित्र होतात. अर्जुन द्वारकेला जाऊन कृष्णाबरोबर राहू लागतो.

१७. सुभद्रा हरण पर्व – अर्जुन सुभद्रेच्या प्रेमात पडतो व नंतर तिच्याशी म्हणजे, कृष्णाच्या बहिणीशी विवाह करतो. त्यामुळे वृष्णि (बलराम) चिडतो व अर्जुनाशी युद्धास निघतो. कृष्ण त्याला त्यापासून अडवतो.

१८. हरण हरीका पर्व – अर्जुन सुभद्रेबरोबर परत येतो. ते लग्न करतात. त्यांना अभिमन्यु नांवाचा मुलगा होतो. द्रौपदीच्या पांच मुलांची माहिती दिली आहे.

१९. खांडव दाह पर्व – युधिष्ठीर राजगादीवर बसतो. चांगला राजा कसा असावा त्यावर चर्चा आहे. वरूण, अग्नी व इंद्र ह्यांच्या गोष्टी. कृष्ण (अच्युत) व अर्जुन आदिशक्तिंशी लढतात व त्यांचे एकत्रित सामर्थ्य दाखवतात.

## - आदिपर्व कथानक प्रारंभ–

## - भाग पहिला -

ॐ, नर व नारायण अशा आदरणीय पुरुषांस नमन करून, तसेंच सरस्वती देवीचे स्मरण करून जय शब्दाचा उच्चार करून लोमहर्षनाचा मुलगा उग्रश्रव, मुळ पुरुष, सुत म्हणून, आडनांव सौती आहे, ज्याला पुराणांचे चांगले ज्ञान आहे, असा तो एके दिवशी नैमिष अरण्यात जमलेल्या व आपापल्या आसनांवर बसलेल्या सर्व ऋषीमुनींना नम्रभावांने लवून नमस्कार करतो. त्यात बारा वर्षाचे तप केलेल्या शौनक कुलपती ऋषीचा समावेश होता. ते सर्व ऋषीमुनीसुद्धा त्याला आदरपूर्वक अभिवादन करतात व त्याचे कुशल मंगल विचारतात. त्या नंतर पुन्हा सर्व जण आपापल्या आसनांवर बसतात. लोमहर्षनाचा मुलगा उग्रश्रवसुद्धा त्याच्या आसनावर बसतो. सर्व कांही व्यवस्थित आहे हे पाहिल्यावर एक ऋषी त्याला विचारतो, "आपण कोठून आला आहात, कमला सारखे डोळे असलेला तू आजवर तुझा काळ कसा व्यतीत केलास ते सविस्तार सांग"?

बोलण्यात हुशार असलेला सौती, त्यांना समाधान होईल अशी समर्पक उत्तरे देतो. पुढे तो सांगतो, कृष्ण-द्वैपायनानी रचलेल्या महाभारत नांवाच्या रचनेचे वाचन वैशंपायनाने जनमेजयाच्या सर्प यज्ञाच्या वेळी

राजपुत्र परिक्षिताच्या उपस्थितीत केले, त्यातील पवित्र व अजब अशा कथा ऐकून तसेंच, विविध पवित्र स्थळांची वर्णने ऐकून माझ्या मनात त्या सर्वांबद्दल कुतुहल उत्पन्न झाले व म्हणून मी बरेच देशाटन केले. त्यात ब्राह्मणांनी पुजलेले व समंतपंचक म्हणून ओळखले जाणारे कुरुक्षेत्र जेथे, कुरु व पांडव ह्यांचे युद्ध झाले ते सुद्धा पाहिले, ज्याचे वर्णन महाभारतात केले गेलेले आहे. हे सर्व केल्यानंतर मी तुम्हाला भेटत आहे. अहो द्विजांनो, मी आता त्या पुराणातील पवित्र कथा ज्यांत अध्यात्म व प्रपंच अशा सर्वात उपयोगी असणारे शहाणपण आहे, जे मनुष्य जातीस मार्गदर्शन करण्यासाठी सांगितले आहे ते सांगणार आहे. त्यावर सर्व ऋषी प्रतिसाद देतात व बोलतात, ही पुराणे जी ऋषी कृष्ण-द्वैपायनाने महाभारताच्या रुपात देव व ब्रम्हर्षी अशा दोघांना सांगितली व जी वेदाचे सार आहेत, ज्यात अनेक शास्त्रांचा अभ्यास आहे. असे महाभारत आम्ही तुझ्या कडून ऐकण्यास उत्सुक आहोत. आम्हाला माहीत आहे किं, ते प्रथम वैशंपायनाने व्यासांच्या सांगण्यावरून जनमेजयाच्या सर्पयज्ञाच्या प्रसंगी गाईले होते.

सौती त्यावर ईशान देवांस (महादेव) वाकून नमस्कार करतो. ईशान देव जो सर्व पुजतात, ज्याला सर्व अर्ध्य देतात, जो अतिशुद्ध आहे, जो माणसाला समजता येतो व नाहीसुद्धा समजत असा विलक्षण आहे, जो सर्वांचा निर्माता आहे, जो पुरातन, अनंत आहे, ज्याला कांहीं विष्णू संबोधितात. जो पूर्णस्वरूप असा हरी आहे, जो सर्वज्ञानाचा उगम आहे, जो चर व अचरांमध्ये आहे, ज्याचे स्थान त्रिलोकांच्या (स्वर्ग, पृथ्वी व पाताळ)

बाहेर आहे. त्याला स्मरून मी व्यासांनी सांगितलेले बोलतो. कांही भाट ह्याचे आधीपासून वाचन करीत आहेत. ह्या पुराणाचा सर्वत्र प्रचार होईल. कारण, हे सर्वज्ञानाचे भांडार आहे, जे जगातील तीन गुणांचा (सत्त्व, रजस् व तमस्) गाभा आहे. द्विज ह्याचा अभ्यास करीत आहेत. आणि ज्यात सुंदर असे काव्य आणि वाङमय आहे.

सौती पुढे सांगतो, "जेव्हां जगात पूर्णपणे अंधक्कार होता, अशावेळी एक विशाल अंड जे सर्व जीवसृष्टीचे मूळ आहे, ते त्या अंधक्कारातून उत्पन्न झाले. ज्याचे नांव होते महादिव्य. ही गोष्ट युगाच्या प्रारंभी झाली. ज्यात ब्रह्माचा, अद्वितीय ज्याचे वर्णन करता येणार नाही, असा प्रकाश आहे. ज्याच्यातून असलेले व नसलेले असें सर्व उत्पन्न होत असते. त्यानंतर त्यातून पितामह ब्रह्म अर्थात, प्रजापती व सुरगुरू आणि स्थानु उत्पन्न झाले. त्यानंतर त्या अंड्यातून बाहेर आले आणखीन एकवीस प्रजापती त्यांची नांवे आहेत, मनु, वसिष्ठ व परमेश्थी, दहा प्रचेता, दक्ष, आणि दक्षाचे सात मुलगे. त्या नंतर त्या अंड्यातून बाहेर आले अद्वितीय सामर्थ्य असलेला माणूस ज्याला सगळे ऋषी विश्र्वदेव म्हणून ओळखतात. त्यानंतर आले आदित्य, वसू व जुळे अश्र्विनी कुमार, यक्ष, साध्ये, पिशाच्चे, गुह्यक आणि पितर. त्यानंतर अनेक ब्रह्मर्षी जे त्यांच्या महान गुणांसाठी ख्यातनाम आहेत ते आले. अशारितीने त्यांच्या प्रभेने स्वर्ग, आकाश, काळ ज्यातून दिवस व रात्री, मांस, मोसम, पक्ष (पंधरवडे) असे तयार झाले. अशा रितीने आज आपल्याला माहीत असलेली

सजीव व निर्जीव दृष्यसृष्टी उत्पन्न झाली व माहीत नसलेली अदृष्य सृष्टी सुद्धा उत्पन्न झाली".

ही सृष्टी ह्या युगाच्या अंती पुन्हा एकत्र होऊन त्यांचे विविध रुपं हरवतील व त्या विशाल अंड्यात रुपांतरीत होतील. त्यानंतर जेव्हां दुसरे युग सुरू होण्याची वेळ येईल तेव्हां पुन्हा त्या विशाल अंड्यातून पुन्हा नवीन सृष्टी जिचे गुण कदाचित् वेगळे असतील ती उत्पन्न होईल. हे असे अनंत काळ एका मागोमाग एक असें सतत होत आहे व एकाद्या चक्राप्रमाणे हे होत आहे.

देवांची संख्या ३६,३३३ आहे. दिवाचे (विवस्वानाचे) मुलगे आहेत, बृहद्भानु, चक्षु, आत्मविभवसू, सवित, रिचिक, अर्क, भानु, आसवह, मह्य आणि रवी. त्यांत मह्य हा सर्वात लहान होता. त्याचा मुलगा देवव्रत. त्याचा मुलगा सुव्रत, ह्याला तीन मुलगे झाले, त्यांची नांवे अशी, दसज्योती, शतज्योती व सहस्रज्योती. त्या सर्वांना असंख्य मुले झाली. त्यांच्या पासून कुरु, यदु, ययाति, इक्ष्वाकू व भरत वंश (घराणी) सुरु झाले. त्यांतून अनेक राजर्षी जन्मले. हे सगळे ह्या पृथ्वीवर निरनिराळया ठिकाणी वस्ती करून राहीले. त्यांनी वेद, योग, विज्ञान, धर्म, अर्थ, काम व इतर विषयांचा अभ्यास केला. त्यांतून माणसांने कसे जगावे त्यांचे नियम तयार झाले. माणसाच्या इतिहासाचा अभ्यास श्रृतींनी सांभाळून ठेवला. ते सगळे ज्ञान व्यासॠषींनी महाभारत ह्या रचनेतून सर्वांसाठी लिहून ठेवले आहे. हे ज्ञान विस्तृत व संक्षिप्त असें दोनही प्रकारे त्यांनी लोकांसाठी करून ठेवले आहे. ज्याला ज्या प्रकारे ते घ्यावयाचे आहे त्यांने त्या प्रकारे ते घ्यावे असें आहे. कांहीं प्रथम मंत्र

पठण करून मग वाचतात तर कांहीं ते गोष्टीरुपात वाचणे पसंत करतात. कांहीं सगळे वाचतात तर कांहीं त्यांच्या गरजेपुरतेच वाचतात. कांहीं ते मुखोद्गत करतात तर कांहीं फक्त त्यातील नितीबोध लक्षात ठेवतात.

सत्यवतीच्या मुलांने तपस्या व अभ्यास करून वेदांचा अर्थ समजून घेतला. त्यानंतर त्यांने ही (महाभारत) रचना केली. रचना पूर्ण झाल्यावर त्या ऋषी पराशराच्या मुलाने, कृष्ण-द्वैपायन व्यासांनी, हे ज्ञान लोकांपर्यंत कसे पोहोचवावयाचे त्याचा चिंतेत होता, ते पाहून सर्वज्ञ ब्रह्मदेवांने त्याला भेटण्याचे ठरवले व जेथे व्यासमुनी होते तेथे ते गेले. व्यासांभोवती इतर मुनीजन जमलेले होते. ब्रह्मदेव आलेले पाहून ते सर्वजण त्यांचे स्वागत करण्यासाठी पुढे सरसावले. ब्रह्मदेवासांठी आसन तयार केले गेले व त्यांना बसण्याची विनंती झाली. त्यानंतर व्यासमुनी त्या ब्रह्मदेव, अर्थात् हिरण्यगर्भ जेथे बसलेले आहेत त्या आसनाभोवती एक चक्कर मारून (प्रदक्षणा करून) उभे राहिले. त्यावर हिरण्यगर्भ म्हणाले, हे मुनीवर, मी परमेश्थि तुला आसनावर बसण्याची विनंती करतो. त्यानंतर व्यासमुनी मोठ्या आदरपूर्वक परमेश्थिस सांगतात,

"मी हे काव्य माझ्या कल्पनेतून रचले आहे ज्यात वेदाचे ज्ञान आणि इतर आवश्यक ज्ञान जे उपनिषदांत व इतरत्र पसरलेल्या अवस्थेत आहे ते ह्यात गोष्टीरुपांने पुराणकथांच्या स्वरुपात असें दिले आहे किं, आज, काल व उद्या अशा सर्व समयी उपयोगी येईल. जीवनातील नाश, भय, आजार, असणे

व नसणे, विविध विचारप्रवाह, जीवनाचे अनेक प्रकार, चारही वर्णांची कर्तव्ये, वैराग्य, संन्यास, प्रपंच इत्यादि गोष्टी तसेंच, चार युगाची माहिती, ऋग्, साम, यजु हे वेद आणि आत्म्याचे अध्यात्म व जीवाचे अध्यात्म असें विविध विषय विविध कथांतून सांगितले आहेत. न्याय शास्त्र, शरीरशास्त्र, रोगांचे शास्त्र, इतर जिवांबद्दलची दयाबुद्धि ह्यांचासुद्धा परामर्श घेतला आहे". तसेंच यात्रेची ठिकाणे, इतर तीर्थक्षेत्रे, पवित्र नद्या, पर्वत, समुद्र, महत्वाची वने, नगरे, राष्ट्रे, भाषा, कल्प, लोकांच्या विविध चालीरीती, असे जे, जे विषय माणसास ज्ञात होणे जरुरीचे आहे ते सर्व त्यात घेतलेले आहेत. असें पुस्तक कोणी दुसरा कदाचित् लिहील, असें हे आहे". एवढे बोलून व्यासमुनी थांबले.

त्यावर ब्रह्मदेव बोलतात, "हे व्यासमुनी, मी तुझ्या दिव्य अशा ज्ञानाचा ह्या सगळया आदरणीय मुनीवरांच्या समक्ष आदर करतो. तू ह्या रचने द्वारा विश्वाचे सत्य लोकांना समजावे म्हणून प्रथमच सांगितले आहेस. तू ह्याला काव्य म्हणतो आहेस तेव्हां ते काव्य म्हणूनच भविष्यात ओळखले जाईल. तुझ्यासारखा प्रतिभावान कवी होणार नाही. जसें तीन आश्रम (ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम व संन्यासाश्रम) वेगवेगळे असतात तरी गृहस्थाश्रम श्रेष्ठ असतो तसेंच तू सर्व कवींमध्ये श्रेष्ठ असशील". त्यानंतर हिरण्यगर्भ सांगतात, "माझ्यामते, ह्या रचनेचे लिखाण श्री गणेश ह्यांनाच सुपुर्द केले पाहिजे कारण, तोंच असे काव्य व्यवस्थितपणे लिहू शकेल".

त्यानंतर सौती पुढे सांगतो, ब्रह्मदेव असे व्यासमुनीस बोलून आपल्या निजस्थानी निघून जातात. त्यानंतर व्यास गणेशाचे स्मरण करू लागतात. गणेश, जो विघ्नहर्ता आहे, जो इच्छापूर्ती करण्यासाठी ख्यातनाम आहे, व्यासाच्या पुढे येतो. व्यास त्याला आदरपूर्वकपणे प्रणाम करतात व त्याला बसण्याची विनंती करतात. त्यानंतर व्यासमुनी त्याला विनंती करतात किं, "अहो गणांच्या चालका, तू माझ्या ह्या (भारत) रचनेचे लिखाण करण्यास तयार होशिल कां? मी माझ्या कल्पनेतून रचले असून व जे मी आता पुन्हा सांगणार आहे. ही विनंती ऐकून, परमपुज्य असें गणेश त्याला म्हणतात, "तू जर किंचितही न थांबता हे सांगणार असशील तरच मी ते लिहीण्यास तयार आहे".

त्यावर व्यासमुनी बोलतात, "जर मी विचार करण्यासाठी थांबलो तर तू लिहीण्याचे थांबव". अशारितीने ठरल्यानंतर श्री गणेश लिहीण्यास सज्ज होतात. ॐ उच्चारून गणेश लिहीण्यास सुरुवात करतात. गणेशास लिहीण्यास त्रास व्हावा व त्या द्वारा आपल्याला काव्य रचण्यास अवधी मिळावा म्हणून व्यास मुद्दामच क्लिष्ट शब्दरचना असलेली काव्य पंक्ति तयार करून (महा)भारत सांगण्यास सुरुवात करतात.

सौती पुढे सांगतो, मी त्यातील आठ हजार आणि आठशे पंक्ति आठवतो, शुक (व्यासाचा मुलगा) व संजयसुद्धा त्या पंक्ति जाणतात. अजब

परंतु, अर्थपूर्ण अशा त्या समजण्यास सर्वज्ञानी गणेशालासुद्धा अवघड होत्या. तरी व्यासऋषी मात्र त्या झपाट्याने बोलत होते.

डोळयात काजळ घातल्याने जसें डोळे स्वच्छ होतात व सर्व गोष्टी स्पष्टपणे दिसू लागतात तसें ह्या महाभारताच्या वाचनाने अज्ञानरुपी अंधार पार निघून जातो व जीवनातील विविध छटा ज्या ह्यात सांगितल्या आहेत त्यात धर्म, फायदा-तोटा, सुख-दुःख, मोक्ष व मर्यादा तत्त्व ह्याची माहिती, माणसाचे अज्ञान घालवण्यास उपयोगी येते. पुर्णिमेचा चंद्र त्याच्या मंद प्रकाशाने जसें कमळाच्या पाकळया उमलण्यास मदत करतो, तसें ह्या पुराणकथा माणसाच्या शहाणपणात सावकाशपणे वाढ करण्यास मदत करतात. पुराणांतून जो गतकर्माचा इतिहास दाखवला जातो त्यातून मागे केलेल्या चुकांची कल्पना येते व माणूस सावध होत असतो. त्यामुळे ह्या जगाच्या व्यवहाराची चांगली जाण माणसाला प्राप्त होते असें हे महाभारत वाचण्याचे फायदे आहेत.

महाभारत हा समजा एक वृक्ष आहे, तर त्यातील आदिपर्व त्याचे सारांश बीज आहे. इतर पर्वांची तुलना, पौलोम व अष्टीके त्याची मुळं आहेत. संभव त्या वृक्षाचे खोड आहे. सभा व अरण्य ही नवीन पालवी आहेत. त्यातील अरणी ही ह्यांना जोडणारी विणकामाची सुई आहे. विराट व उद्योग हे गाभा आहेत. भिष्म शाखा आहे, द्रोण पांने आहेत, काम फुलं आहेत, सल्य त्यांचा सुगंध आहे, स्त्री व ऐशिक त्या वृक्षाच्या सावली सारखे आहेत. शांति हे त्याचे फळ आहे, अश्वमेध हा भाग त्या वृक्षातील रस आहे, आश्रमवासिका

ही जागा आहे जेथे हा वृक्ष उभा आहे. मुसळ हे वेदाचे ज्ञान आहे, असा हा महाभारत वृक्ष माणसाच्या मनात येणारे गोंधळ व गैरसमज रुपी ढगे अडवतो. म्हणून, महाभारत सर्वांना जगण्याचा अर्थ शिकवतो. एवढे सांगून पुढे सौती म्हणतो, "आता मी तुम्हाला सांगतो किं, ह्या महाभारत रुपी वृक्षापासून काय आणखीन किती चवदार फळे मिळतात. म्हणून कोण्याही माणसांने हा महाभारत वृक्ष नष्ट करू नये".

नंतर सौती महाभारतातील कथानक सांगण्यास सुरुवात करतो.

"त्याचे असें झाले किं, गंगापुत्र भिष्माच्या विनंती वरून कृष्ण-द्वैपायन, अर्थात् व्यास, विचित्र वीर्य राजाच्या दोन बायकांपासून तीन तेजस्वी दिसणाऱ्या मुलांचा पिता होतो. त्या राजपुत्रांची नांवे धृतराष्ट्र, पंडु व विदूर अशी होती. त्यानंतर व्यास त्याच्या तपस्येसाठी आपल्या घरी निघून जातो. हे तीन पुत्र त्याचा जीवन प्रवास संपवल्यावर (म्हणजे ते मेल्यावर) एकदा जेव्हां जनमेजय राजा व अनेक विद्वान ब्राह्मण व्यासाना विनंती करतात किं, त्याने महाभारत वाचावे तेव्हां तो त्याचा शिष्य वैशंपायनाला त्या लोकांना महाभारत सांगण्याची आज्ञा करतो. जनमेजय राजाकडे जो सर्प यज्ञ होऊ घातला होता त्यात जो मधला वेळ असे तेव्हा वैशंपायन व त्याचे सहकारी सदस्य मिळून हे महाभारत गाऊ लागले.

ह्या महाभारत रचनेत औरू घराण्याचे औदात्य, गांधारचे पावित्र्य, विदूराचे शहाणपण, कुंतीचा निर्मळपणा, त्याशिवाय व्यासांनी वासुदेवाची

(कृष्ण) दैविकता, पंडुच्या पांचही मुलांचा चांगुलपणा (दैवी संपदा) आणि त्याच बरोबर धृतराष्ट्राच्या मुलांचे दुर्गुण (असुरी संपदा) अगदी योग्यरीत्या दर्शविलेले आहेत.

व्यासांनी ह्या महाभारत ग्रंथाची रचना केली त्यात प्रथम फक्त २४ हजार कडवी होती त्या भागास "भारत", असे म्हणतात. त्यानंतर आणखीन एकशेपन्नास कडवी त्यात घातली. हे सर्व त्यांने प्रथम स्वताच्या मुलांस, शुकास शिकवली. त्यानंतर त्यांने हे महाकाव्य इतर योग्य शिष्यांना शिकवले. त्यानंतर व्यासांनी आणखीन साठलक्ष कडवी त्यात घातली. त्यातील तीस लाख कडवी देवलोकात प्रसिद्ध झाली. पंधरालाख कडवी पितरांत प्रसिद्ध झाली. चौदालाख गंधर्वांत, एक लाख माणसात प्रसिद्ध झाली. देवांसाठी नारदाने ती गायिली. देवलाने पितरांसाठी व शुकांने इतर म्हणजे, राक्षस, यक्ष ह्यांच्यासाठी गायिली. माणसांसाठी मात्र व्यासऋषींच्या शिष्याने, वैशंपायनाने गायिली. वैशंपायन हे वेद जाणणाऱ्या पहिल्या कांहीं मोजक्या ऋषींपैकी एक आहेत. आणि आता मी सौती, ती वैशंपायनाने गायिलेली कडवी पुन्हा तुमच्यां पुढे गाणार आहे.

पांडवात युधिष्टीर हा एकाद्या मोठ्या वृक्षासारखा आहे जो धर्म (कर्तव्य ह्या अर्थी) व सद्‌गुणांचे मूर्तिमंत रूप आहे. अर्जून त्या वृक्षाचे खोड, भीम त्याच्या प्रमुख फांद्या आणि माद्रीची दोन मुले, नकुल व सहदेव हे त्या वृक्षाची पाने, फुले व फळे आहेत.

पंडुने त्याच्या चतुराई व ताकदीने अनेक देश पादाक्रांत केले. त्यानंतर तो मुनीजनांत जाऊन राहू लागला. तो तेथे त्या मुनीजनांसाठी मृगया करीत असतांना एकदा दुर्दैवाने तो एका हरणांस तो हरीण त्याच्या मादीसह समागम करीत असतांना मारतो. त्यावेळी मरता मरता तो हरीण पंडुला शाप देतो किं, पंडुसुद्धा त्याच्या पत्नीसह समागम करू शकणार नाही. त्या शापामुळे पंडुच्या स्त्रीया पुत्र प्राप्तिसाठी इतर देवांसह समागम करण्यास उद्युक्त झाल्या. त्यासाठी त्या स्त्रीयांनी धर्म, वायू व शुक्र असें देव निवडले आणि माद्रीने आश्विनीकुमार निवडले. ह्या व्यवस्थेनुसार त्यांना संतति झाली व ती यथावकाश त्यांच्या मातांच्या निगराणीत मोठी होत गेली. गुरूगृही ते महान तपस्वी अशा मुनीजनांच्या आश्रमात वाढत होते व त्यांच्या बरोबर धृतराष्ट्राची मुलेसुद्धा मोठी होत होती. गुरूगृही त्यांना व त्यांच्या चुलत भावांना त्यांचे गुरू मुनीवर म्हणाले किं, तुम्ही सर्व जण एकमेकांचे बंधू आहात व तसेंच पुढे तुम्ही राहिले पाहिजे.

गुरूगृही जेव्हां पांडवांचा परिचय पंडुची मुले असा केला गेला तेव्हां त्यांना ते खटकले. परंतु, इतर सर्व आश्रमवासी मात्र आनंदी झाले व मोठ्याने ओरडून त्यांचे स्वागत केले होते. तरीसुद्धा कांहीं पुटपुटले किं, पंडु तर अक्षम आहे मग हे कसे असा प्रश्न विचारू लागले. दुसरे कांहीं तक्रार करून बोलले, किं, जर ते पंडुचे नसतील तर त्यांना पंडुची मुलं समजणे कितपत श्रेयस्कर आहे. अशा शंकाकुशंका धृतराष्ट्र्ची मुलं अर्थात् कौरव जरी करीत होते तरी इतर त्यांचे स्वागत पंडुची मुलं म्हणूनच करीत होते. असें

सांगतात कीं, तो त्यांच्या स्वागताचा जल्लोश एवढा होता किं, त्याचा आवाज स्वर्गापर्यंत पोहोचला. सुगंधी फुलांनी त्यांचे जे स्वागत केले गेले ते व इतर कौतुकाच्या गोष्टी ज्या झाल्या त्या कांहीं केल्या धृतराष्ट्राच्या मुलांना आवडल्या नाहीत व तेव्हां पासूनच त्यांच्या मनात पांडवांबद्दल कायमची अढी उत्पन्न झाली व ते त्या पांच जणांचा द्वेष करू लागले.

पांडवानी नित्य नियमानुसार सर्व वेद व इतर आवश्यक शास्त्रांचा अभ्यास पूर्ण केला. इतर सर्व आश्रमवासी त्यांचे स्वागतच करीत होते. कोणीही त्यांच्या जन्माच्या कारणांवरून त्यांचा कधीही अपमान केला नाही. शिक्षण संपल्यावर हे पांच पांडव राज्यकारभारात लक्ष घालून काम करू लागतात. राजघराण्यातील प्रमुख मंडळी, युधिष्ठराच्या पवित्र वागणूकीने, अर्जुनाच्या शौर्याने व कुंतीच्या, वडिलधाऱ्यांशी असलेल्या नम्र वागणूकीने तसेंच नकुल व सहदेवाच्या नम्रपणांमुळे नेहमी खुष असत.

कांहीं काळांने एका स्वयंवराच्या प्रसंगी अर्जुन कुमारी कृष्णा ह्या राजकन्येस इतर राजांना एका अति अवघड अशा तिरंदाजीच्या परीक्षेत हरवून जिंकतो, व ह्या प्रसंगानंतर त्याचे सर्वत्र एक विशेष तिरंदाज व एक उत्तम योद्धा म्हणून आदरपूर्वक कौतुक होऊ लागते. तो सूर्या प्रमाणे युद्ध प्रसंगी तेजस्वी वाटे व त्याच्या कडे इतर योद्धे पाहू शकत नसत. विविध युद्धांत त्यांने आजुबाजुच्या सर्वच राजांना हरवल्यामुळे त्याचा मोठा भाऊ, युधिष्ठीर असे ठरवतो किं, आता राजसूय यज्ञ करण्याची वेळ आली आहे.

त्याच सुमाराम युधिष्ठीर सर्व आमात्यांच्या सल्ल्याने मगध देशाच्या अति बलवान व क्रूर राजा, जरासंध व चैत्य ह्याना मारण्यासाठी भीम व अर्जुनांस पाठवतो. ते त्याला मारून मगध देशातील जनतेला संरक्षण देतात. हे यश प्राप्त झाल्यामुळे त्यांचा आत्मविश्र्वास वाढतो व ते राजसूय यज्ञाच्या तयारीला लागतात. त्या यज्ञामुळे त्याच्या सामर्थ्यात मोठी वाढ होणार असते. त्या यज्ञाला त्यांचा चुलत भाऊ, दुर्योधन हजर होतो व त्यांचे, पांडवांचे अफाट वैभव, ज्यात मायासुराने बांधलेला अफाट वाडा व त्यातील वैभव संपन्न चिजा बघून भयंकर द्वेषाने भडकून जातो व पांडवांचा कशातरी प्रकारे नाश करण्याचा निश्र्चय करतो, त्यात त्याला त्याची सर्व नव्याण्णव भावंडे सहाय्य करण्यास सामिल होतात. त्यात भर म्हणून किं काय, भीम एका प्रसंगी दुर्योधनाची चेष्टा करून आणखीन त्याच्या द्वेषाची आग भडकवतो.

धृतराष्ट्राला त्याच्या मुलाच्या दुर्गूणांची जाणीव असते तरीसुद्धा केवळ पुत्रप्रेमापोटी तो त्याला पांडवांबरोबर द्युत खेळण्याची परवानगी देतो. पांडवांचा मित्र, वासुदेव अर्थात् कृष्ण, जेव्हा ते समजतो तेव्हां तो त्यातील कपट कारस्थान ओळखतो परंतु, हे विधीलिखीत आहे असें समजून पुढे काय होते ते पहात रहातो. पांडव व कौरव ह्यातील भेद मिटावा म्हणून विदूर, भिष्म, द्रोण, आणि कृप हे बरेच प्रयत्न करतात पण त्याना तो वाद मिटवता येत नाही. अखेरीस युद्ध होते व त्यात क्षत्रिय, क्षत्रियांस मारून टाकतात. त्यात पांडवांचा विजय होते, ती वार्ता ऐकून कौरवांचा पिता धृतराष्ट्र व्यथीत अंतःकरणाने आठवतो, त्याचा पुत्र दुर्योधन, कर्ण व शकूनी ह्याच्या वल्गना

आणि संजयास सांगतो, अरे, संजया, आता मी जे बोलणार आहे ते ऐकून तू माझा तिरस्कार करशील. तू सर्व शास्त्रात वाकबगार आहेस, बुद्धिमान व व्यावहारिक शहाणपणात तरबेज आहेस. मी प्रामाणिकपणे तुला सांगतो मला हे युद्ध अजिबात नको होते, माझ्या घराण्याचा नाश पहाण्यात मला यत्किचीतही आनंद वाटला नाही. मी कधीही माझी मुलं व पांडुची मुलं ह्यांत फरक केला नाही. मला जाणीव होती किं, माझी मुलं दुर्व्यसनी झाली आहेत व ते माझा, मी आंधळा व वृद्ध झालेला असल्यामुळे, द्वेष करतात हे सुद्धा मला माहीत होते. तरीसुद्धा केवळ पितृत्वाच्या मायेमुळे मी हे सर्व सहन करीत होतो. त्या मायेमुळे मी दुर्योधनाच्या सर्व वाईट कारवायांकडे दुर्लक्ष करीत राहीलो. कारण, त्या राजसूय यज्ञाच्या वेळी भिमाने जो दुर्योधनाचा अपमान केला तो मला सहन झाला नव्हता. जेव्हा त्याला, दुर्योधनाला व मला कळले किं, तो कधीही युद्धात व इतर प्रयोजनांतून पांडवांना हरवू शकणार नाही तेव्हां मी त्याला माझ्या सासरच्या, गांधारच्या नरेशाचा, शकुनीचा द्युताच्या माध्यमांने कपट कारस्थान करण्याचा सल्ला मानण्यास परवानगी दिली. त्या पुढे काय झाले ते तू जाणतोसच.

ऐक संजया, ते सगळे झाले हे माझ्या नंतर लक्षात आले. जेव्हां मी तुला ते सांगितले तेव्हां तू तुझ्या दिव्य दृष्टीने पुन्हा पाहिलेस. जेव्हां मी ऐकले किं, अर्जुनाने धनुष्याने नेम धरून अवघड लक्ष्य साध्य केले व सुकुमार राजकन्या कृष्णाला जमलेल्या सर्व इतर राजपुत्रांसमक्ष वरले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले

किं, मधू घराण्यातील राजकन्या व श्रीकृष्णाची बहीण सुभद्रा अर्जुनाने विवाह करून द्वारकेतून पळवून नेली व तिचे दोन भाऊ, वृष्णि (श्रीकृष्ण व बलराम) त्याचे मित्र म्हणून इंद्रप्रस्थात आले आहेत. तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मी समजलो किं, अर्जुनाने त्याच्या दिव्य अस्त्रांने देवेंद्र इंद्राने सुरु केलेला पाऊस थांबवून अग्नी देवाच्या आहारी खांडव वन जाऊ दिले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत.

अहो संजय, जेव्हां मला समजले किं, पांचही पांडव त्यांच्या आईसह लक्षागृहातून सहीसलामत सुटले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मी ऐकले किं, पांचाल राजकन्या पांडवांनी जिंकली व ती त्यांची पत्नी झाली व पांचाल नरेश पांडवांना सामील झाला आहे तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, क्षत्रियांमध्ये श्रेष्ठ व मगध नरेश जरासंध भिमांने मल्लयुद्धात मारले, तेव्हां, मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, पांडवांनी आपल्या सामर्थ्याने सभोवारची अनेक राज्ये जिंकून राजसूय यज्ञ करण्याचे ठरवले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मी ऐकले किं, भर दरबारात द्रौपदीला अर्धनग्न अवस्थेत ओढून आणले गेले व त्या वेळी ती आक्रोश करीत होती व त्या प्रकाराला संतापून विरोध करीत होती, जणू काय

तीला कोणी त्राता राहिलेला नाही तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत.

जेव्हां मी ऐकले किं, पापी दुःशासन द्रौपदीच्या अंगावरील उरलेले एकमेव वस्त्रसुद्धा ओढून काढत असतां तिच्या अंगावरून भलेमोठे लुगडे ज्याला कांहीं अंत नाही असें येऊ लागले तो चमत्कार समजल्यावर मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, सुबलाकडून द्युतात युधिष्ठर हरल्यावर व त्यांने त्यामुळे त्याचे राज्यसुद्धा घालवल्यावर सुद्धा त्याचे पांडव बंधू त्याच्या बरोबर ठामपणे होते ते समजल्यावर मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, सर्वस्व घालवल्यानंतर सर्व पांच पांडव विनातक्रार आपल्या मोठ्या भावासह जंगलात अनेक त्रास सहन करीत रहाण्यास गेले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, त्या रानात रहाणारे तपस्वी ब्राह्मण व त्यांचे स्नातक पांडवांशी मोठ्या आदरांने वागत आहेत तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, अर्जुनाने द्वंद्वात प्रत्यक्ष त्रियिबकांस (महादेवास) हरवले व त्याला प्रसंन्न करून त्याच्या कडून पशुपत अस्त्र मिळवले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, सद्गुणी व न्यायी असा अर्जुन स्वर्गात जाऊन तेथील विद्या प्रत्यक्ष इंद्राकडून शिकून तयार झाला आहे तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, अर्जुनाने कलकेय व पौलोम ह्यांना हरवून असे आशिर्वाद प्राप्त केले किं,

तो अखंड विजयीच रहाणार तेव्हा मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, शत्रूंचा विनाश करणारा असा अर्जुन इंद्राच्या स्वर्गात जाऊन त्यांने तेथे गोंधळ घालणाऱ्या असूरांचा नाश केला व इंद्राकडून शाबासकी मिळवली तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, भीम व इतर पांडव त्यांच्या मातेसह वैश्रवनात पोहोचले जेथे कोणीही जाऊ शकत नाही तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, माझी मुलं कर्णाबरोबर धोषयात्रेला गेले असतांना त्यांना गंधर्वांनी पकडून बंदी केले व ते समजल्यावर पांडवांनी गंधर्वांना हरवून त्यांना मुक्त केले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, न्याय देवता धर्म यक्षाचे रुप घेऊन युधिष्ठीरास प्रश्न विचारतो व त्याची युधिष्ठीर समर्पक उत्तरे देतो तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, माझ्या मुलांना विराटाकडे पांडव द्रौपदीसह रहात असतांना त्यांना ओळखता आले नाही तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, माझे श्रेष्ठ सेनानी अर्जुनाकडून एकट्याच्या सामर्थ्याने हरवले गेले, जेव्हा हे पांडव विराटाकडे रहात होते, तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, मधू कुळातील वासुदेव ज्यांनी एका पावलात सर्व पृथ्वी ओलांडली तो पांडवांचा समर्थक व पाठीराखा आहे तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, मत्स्य

देशाच्या राजांने त्याची गुणी कन्या उत्तरा अर्जुनास लग्नात दिली तेव्हा मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, द्युतात हरलेला व सर्वकांहीं घालवलेल्या युधिष्ठीरांनी सात अक्षौहीणी सैन्य उभे केले आहे तेव्हा मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां नारदांनी सांगितले कीं, अर्जुन व कृष्ण नर नारायण आहेत व त्याने त्या दोघांना ब्रह्मस्थळी पाहिले आहे तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, भगवान श्री कृष्णांने आरंभिलेली, कौरव व पांडव ह्याच्यात समेट करण्यासाठी अशी, शिष्टाई कौरवांनी स्वीकारली नाही तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, कर्ण व दुर्योधनानी श्री कृष्णाला अटक करण्याचा प्रयत्न केला असतां श्री कृष्णांने त्यांना त्याच्यात विश्र्वदर्शन केले तेव्हा मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. युद्धाच्या आधी जेव्हां कुंती अर्जुनाच्या रथाजवळ उभी राहून रडू लागली तेव्हां श्री कृष्णांनी तिचे सांत्वन केले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, वासुदेव व भिष्म, शंतनुचा मुलगा, हे पांडवांचे सल्लागार झाले आहेत व भारद्वाजाचा मुलगा द्रोण ह्यांने पांडवांना आशिर्वाद दिले आहेत तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, कर्णाने भिष्माला सांगितले किं, जर तू कौरवांच्या बाजूनी लढणार असशिल तर मी लढणार नाही व कौरवांच्या सैन्यातून तो निघून गेला तेव्हां मी समजलो किं, माझे

पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, वासुदेव, अर्जुन आणि महाशक्तिमान  गांडीव एकत्र आले आहेत तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, जसा अर्जुन उदास होऊन रथातून उतरून खाली आला व त्याला श्री कृष्णाने विश्वरुप दर्शन घडवले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, जो भिष्म हजारो क्षत्रियांचा संहार युद्धभूमीवर करतो, त्याने ह्या युद्धात एकाही पांडवास मारले नाही तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, पांडवाना स्वतः युद्धात विजय कसा मिळवावा व तेंच तंत्र ह्या युद्धात पांडवांनी अमलात आणले आहे तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, अर्जुनाने शिखंडीचा पाठी राहून भिष्मावर हल्ला केला व त्याला जखमी केले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, उत्शमक वंशाचा र्हास करणारा महाप्रतापी भिष्म शरीरावर असंख्या जखमा घेऊन बाणांच्या बिछाईतीवर झोपला आहे तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, वायू, इंद्र आणि सूर्य पांडवांचे मित्र म्हणून कुंतीपुत्रांच्या बरोबर आहेत व गिधाडे त्यांच्या साठी कौरवांच्या सैन्यावर धाडी घालत आहे तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां महान योद्धा द्रोण एकाही पांडवांस जाणीवपूर्वकपणे मारत नाही असे समजले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, अर्जुनांस

मारण्यासाठी नेमलेले महारथ संसप्तक सर्वच्या सर्व एकट्या अर्जुनांने मारून टाकले आहेत तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, कौरवांची अभेद्य व्युहरचना सुभद्राच्या मुलांनी एकट्यानी भेदली व तो त्यात शिरला तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, अर्जुनास न हरवणारी कौरव सेना अभिमन्यूस मारल्यावर एकच जल्लोष करून आनंद व्यक्त करू लागली तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, अभिमन्यूस मारल्या नंतर त्या हर्षाने अंध झालेल्या कौरवातील सैंधवास क्रोधीत होऊन अर्जुन ओरडून आव्हान देतो तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, अभिमन्यूच्या वधाचा वचपा काढण्यासाठी अर्जुन सैंधवाला स्वतः मारण्याची प्रतिज्ञा घेतो तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, अर्जुनाचे घोडे थकल्या नंतर पाणी पिऊन पुन्हा रथास जोडून घेण्यास तत्पर झाले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, जोवर अर्जुनाचे घोडे पाणी पित होते तोवर अर्जुन त्यांने मारलेले योद्धे मोजत होता तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, वृष्नी वंशातील योद्धा, युयुधन, द्रोणाचार्यांच्या सैन्यास हत्तींच्या कळपाच्या मदतीने गोंधळात टाकून श्रीकृष्ण व अर्जुनांच्या कडे विश्रांतीसाठी जातो तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, महायोद्धा कर्ण भिमाला तो चांगला अडकलेला

असतांना न मारता केवळ अपमान करून व बाणाने फक्त टोचून सोडून देतो तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, द्रोणाचार्य, कृतवर्मा, कृप आणि द्रोणाचार्यांचा मुलगा तसेंच मद्र देशाचा राजा शाल्य अशा सर्वांनी मिळून सैंधवाला ठार मारले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, इंद्राने कर्णास दिलेले शक्ति अस्त्र, श्री कृष्णाच्या कारस्थानामुळे राक्षस पुत्र घटोत्कचावर कर्णाला वापरावे लागते जे अस्त्र त्याला अर्जुनाला मारण्यासाठी वापरावयाचे असते तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, युद्धाचे नितीनियम मोडून धृष्टद्युम्न द्रोणाला त्याच्या रथात ते एकटे असतांना मारतो व त्यावर आनंद दाखवतो तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, माद्रीपुत्र नकुल एकटा, द्रोणाचार्यांचा पुत्र, अश्ववत्थामाशी बरोबरीने लढतो व त्याच्या भोवती आपल्या रथाने रिंगण घालतो तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. द्रोणाचार्यांच्या वधानंतर त्याचा मुलगा द्रोणाचार्यांचे अस्त्र, नारायण, पांडवांविरुद्ध चुकीच्या रीतीने वापरतो तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, दुःशासनाला मारून त्याचे रक्त भीम सर्वांसमक्ष पितो व त्याला कोणीही विरोध करू शकत नाही तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. देवांनासुद्धा समजणार नाही अशा ह्या भावंडांच्या युद्धात, जेव्हां मला समजले किं, कर्णाला अर्जुनाने ठार मारले आहे तेव्हां मी समजलो किं, माझे

पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, न्यायाने वागणारा युधिष्ठीर मोठ्या पराक्रमाने अश्वत्थामा, दुःशासन आणि कृतवर्मा ह्याना यमसदनात पाठवतो तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, मद्र देशाचा राजा जो श्री कृष्णाशी लढण्या इतका पराक्रमी होता त्याला युधिष्ठीरांने मारले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, कौरव पांडव वादाचा मूळ सूत्रधार व जादू विद्येचा ज्ञाता, असा सुवाल, सहदेवाकडून मारला गेला तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, कौरवांचा मुख्य दुर्योधन युद्धाच्या कष्टांने थकून हतबल असा, एका तलावातील पाण्यात झोपला आहे व त्याचा रथसुद्धा त्याच्याजवळ नाही तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. पांडव श्री कृष्णासह त्या तलावाकडे जातात व त्या माझ्या हतबल झालेल्या मुलास घालून पाडून बोलतात परंतू, दुर्योधन असहाय असा गुपचुप रहातो, असे जेव्हां मला समजले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, दुर्योधनाला घेरून चहुबाजूनी हल्ला करून गदेच्या माराने अगदी युद्धनितीच्या विरूद्ध अशारितीने मारून टाकले व तेसुद्धा श्री कृष्णाच्या सल्ल्याने झाले. तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हां मला समजले किं, अश्वत्थामाने पांचाल व द्रौपदीच्या सर्व मुलांस ते झोपलेले असतांना मारले व एक भयावह कर्म केले तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना

हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, भीम अश्र्वत्थामाचा पाठलाग करीत असतांना तो, अश्र्वत्थामा ऐशिका नांवाचे गर्भ नष्ट करणारे अस्त्र वापरून उत्तरेच्या पोटातील गर्भाला इजा करतो तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, अर्जुन अश्र्वत्थामाचा पाठलाग करीत असतांना अश्र्वत्थामा ब्रह्मास्त्र अर्जुनावर फेकतो ते अर्जुन दुसरे अस्त्र ज्याच्यावर "सस्ती" असे कोरले होते ते वापरून निष्प्रभ करतो त्यामुळे अश्र्वत्थामाच्या कपाळातील मणी निखळून पडतो तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत. जेव्हा मला समजले किं, विराट कन्या उत्तराच्या गर्भावर अश्र्वत्थामाच्या अस्त्रामुळे इजा झाल्या कारणांने द्वैपायन आणि श्री कृष्ण त्याला शाप देतात तेव्हां मी समजलो किं, माझे पुत्र पांडवांना हरवू शकणार नाहीत.

"अरेरे, बिचारी गांधारी आपली मुलं, नातवंड, मायबाप, भावंड आणि इतर नातेवाईक असें सर्व मारले गेल्यामुळे, अतिशय दुःखी झाली होती व हे सर्व पांडवांच्यामुळे झाले होते. आता त्यांना कोणीही प्रतिस्पर्धी उरला नव्हता.

"अरेरे, मला समजले किं, ह्या भयंकर युद्धानंतर फक्त दहा जण जिवंत राहीले आहेत. तीन कौरवांचे व पांडवांचे सात. बाकी अक्षौहिणी क्षत्रिय मारले गेले होते. माझ्या भोवती अंधक्कार पसरला आहे. मी बेशुद्ध पडतोय कीं, काय अशी माझी अवस्था झाली आहे. ही परिस्थिती मला खायला उठली आहे. अरे, सुत्रा, माझे मन विषण्ण झाले आहे.

एवढे सांगून पुढे सौती सांगतो, धृतराष्ट्र अशारितीने शोक करीत स्वताच्या नशिबास दोष देत रहातो. तो स्वताचा संयम हरवून बसतो. थोड्या वेळानंतर तो स्वताला सावरतो व संजयास बोलतो, "अरे संजया, हे सर्व झाल्यानंतर मी माझ्या जीवाचा त्वरित अंत करू इच्छितोय. ह्या जीवनातून मला यत्किंचितही सूख मिळेल असें दिसत नाही".

सौती नंतर सांगतो, "गवलगण, अर्थात् संजय, त्या दुःखाने हवालदिल झालेल्या राजास, जो दुःखाने कळवळलेला व चिडलेल्या सापासारखा फुत्कार टाकत रडत होता, सांगतो, अहो राजर्षी, तुम्हाला माहीत असेलच किं, ह्या आधीसुद्धा अनेक राजे अशारितीने पराक्रम करीत निघून गेले आहेत, त्यात उल्लेख करण्या सारखे, ज्यांचा विचार व्यास व नारदांनी केला आहे. उत्तम गुणांनी परिपूर्ण असें व स्वर्गीय शास्त्रांनी युक्त असें व भारतवर्षास ललामभूत असें, ज्यांनी त्यांच्या पराक्रमाने जग जिंकले होते असें, व ज्यांनी अनेक यज्ञ करून ब्रह्माची पुजा केली असें सर्वच अशारितीने शेवटी काळाच्या ओघात नाहीसे झाले आहेत. त्यासाठी ही विधीरचना समजून आपण शांत व्हावे.

शैव, महारथी, श्रींजय, सुहोत्र, रतिदेव, काक्षीवंत, मोठे वैभव प्राप्त केलेले वल्हीक, दमन, शर्याति, अजित, नळ, विश्वामित्र ज्यांनी अनेकांचा नाश केला असें, अम्वरिष, मरुत्त, मनु, ईक्ष्वाकू, गय, भरत व राम दशरथाची मुलं, ससविंदू, भगिरथ, कृतवीर्य, मोठ्या नशिबाचा जनमेजय, ययाति, जो

त्याच्या सत्कर्मासाठी ख्यातनाम आहे असे, ज्यांना नेहमीच स्वर्गीय शक्तिंचे सहकर्य प्राप्त होत होते, ज्यांनी अनेक यज्ञ करून पृथ्वीचे कल्याण केले आहे असें, ह्या चोवीस राजांचा उल्लेख कौतुकानी नारदानी शैव राजाच्या सांत्वनासाठी केला होता जेव्हां त्याची सर्व मुलं मारली गेली होती. त्याशिवाय, ह्यांच्या आधीसुद्धा अनेक बलाढ्य, गुणवान, पुण्यवान राजे असेंच मेले आहेत. त्यांत पुरु, कुरु, यदु, सुर, विश्वगस्व, अनुह, युवनस्व, काकुतस्थ, विक्रांत, रघू, विजय, वितिहोत्र, अंग, भव, स्वेत, आणि वृपद्गुरू, उसिनर, शत-रथ, कंक, दुलिदुह, द्रुम, दंभोद्भव, पर, सागर, संकृति, निमि, अजेय, पर्षू, पुंड्र, शंभू, महापवित्र देवव्रत, देवाहुय, सुप्रतिका, ब्रुहद्दरथ, महत्सह, विनितात्मा, शुक्रतू आणि नळ जे अलौकीक होते. त्याशिवाय, निशाद, सत्यव्रत, शांताभय, सुमित्र, महान सेनानी सुबल, जानुजंघ, अणरण्य, अर्क, प्रियंभृत, शुचिव्रत, बालबंधू, निर्मारिद्द, केतुशृंग, ब्रृहद्बाल, धृष्तकेतू, दृपदकेतू, निरामय, अभिक्षित, छपाल, धुर्ति, कृतबंधू, धृदिशुद्धी, महापुराण, संभव्य, प्रत्यांग, पराह व श्रुति. हे आणि असें हजारो राजे लढायांमुळे आपली सर्व सुखं घालवून युद्धात मेले आहेत. त्यांच्या अनेक चांगल्या कृत्यांचा आणि गुणांचा विशेष उल्लेख अनेक ग्रंथांतून इतिहासात झालेला आहे. अनेक भाट कवी त्यांचे गुणगान करीत असतात. अनेक उत्तम गुण असले तरी ते शेवटी काळाच्या उदरात विरून गेले आहेत. मृत्यू कोणालाही टाळता येत नाही हे राजन् (धृतराष्ट्राला उद्देशून), आपण हे समजून आपला शोक आवरता घ्यावा. ह्या उलट तुमची मुलं दुर्बुद्धीने प्रेरीत होऊन पापकृत्ये करण्यास प्रवृत्त झालेली

होती तर त्याचा अशारितीने नाश झाला तर त्यात काय आश्र्चर्य व दुःख वाटावे"?

"तुम्ही सर्व शास्त्रांत पारंगत आहात, तुम्ही बुद्धिमान, शहाणे आहात, शास्त्रार्थ समजून तुम्ही स्वताला सांभाळले पाहिजे. म्हणून तुम्ही तुमच्या मुलांचा शोक करणे श्रेयस्कर ठरत नाही. कारण जे घडले ते टाळता येण्यासारखे नव्हते. कोणीही काळाला आव्हान देऊन जगू शकत नाही. आपले असणे व नसणे काळाच्या कार्यक्रमावर निर्भर असते. काळ सर्व निर्माण करतो व मारून टाकतो. काळच आग लावतो व ती विझवतो सुद्धा. जेव्हा सर्व झोपलेले असतात तेव्हां काळ मात्र जागा असतो कारण काळ कधीही झोपत नाही. काळावर मात करता येत नाही. कोणी काळाची चाकें उलटी फिरवू शकत नाही. ह्यासाठी आपण आपली बुद्धि जागृत ठेवून हे नियतिचे नियम समजून स्वताला सावरावे, हे राजन". असे संजय समजावण्याचा प्रयत्न करतो.

अशारितीने गवालगणाचा मुलगा, संजय दुःखाने चूर झालेल्या राजा धृतराष्ट्रास समजावण्याचा प्रयास करीत रहातो. त्या सांत्वनामुळे राजास थोडा आराम मिळतो. असें सौती सांगतो.

ह्या सत्य कथांचा आधार घेऊन द्वैपायन व्यासानी ही भारत नांवाची पवित्र रचना लिहून प्रसिद्ध केली. भारत वाचणे हे एक पवित्र कार्य आहे. असें म्हणतात किं, जो श्रद्धेने थोडेतरी वाचेल त्याची सर्व पापं धुतली

जातील. असें देव, देवर्षी आणि ब्रम्हर्षी सांगतात. तसेंच यक्ष व उरग (नाग) सुद्धा समजतात. ह्यामध्ये वासुदेवाची सहा लक्षणे सांगितली आहेत. ह्यात अध्यात्मज्ञान म्हणून, श्री कृष्णाची लीला सांगितली आहे ज्याप्रमाणे तो कसा खरा, न्यायी, स्वयंप्रकाशमान, ज्याच्या अलौकीक सामर्थ्यामुळे तो अनंत ब्रह्म स्वरुप, परमात्मा, ज्याची दैवी करणी ज्याबद्दल सर्व ज्ञानी नेहमी सांगतात, जो असूनही नसल्यासारखा व नसूनही असल्यासारखा आहे, जो आहे व नाहीसुद्धा, ज्यातून उत्पत्ति व विकास, जन्म व मृत्यू, पुनर्जन्म ह्या क्रिया होत असतात. ज्याच्या अलौकीक सामर्थ्यामुळे पंच महाभूत अस्तित्वात आली. त्याचा उल्लेख सांख्य पुरुष म्हणून करतात. ज्याला अदृष्य समजतात व आदियति अंतर्मुख होऊन ज्याच्या वर ध्यान आणि तपस्या करतात. श्रद्धावंत माणसे, भक्ति, पावित्र्य, सदैव सदाचारी असे जीवन जगणारे, सर्व पापांपासून मुक्त होतात.

जे (महा)भारत श्रद्धापूर्वक हे ऐकतात ते कधीही अडचणीत सांपडत नाहीत. संध्याकाळी जो ह्याचे वाचन करील त्यानी त्या दिवशी केलेले पाप धुतले जाईल. (महा)भारताचा आदिपर्व हा भाग म्हणजे पूर्ण ग्रंथाचे सार व म्हणून अमृतासमान आहे. आदिपर्व हे दह्यात जसें लोणी, द्विपादात ब्रह्म, आणि वेदात अरण्यके, औषधांत अमृत तसें आहे. सर्व पात्रात (पाणी साठवण्याचे) समुद्र, चतुष्पादात गाय, असें आदिपर्व (महा)भारतात आहे. इतिहासात हा अद्वितीय ग्रंथ (महा)भारत आहे. ह्याच्या थोड्यातरी भागाचे

वाचन श्राद्धाच्या समई केले तर सर्व पितर कायमचे संतुष्ट होतील. (महा)भारत ह्या पुराणाचा मुख्य उद्देश वेदाचा अर्थ सोपा करून सांगण्याचाच आहे. हा जणू कृष्ण-द्वैपायन व्यासांनी लिहीलेला वेदच आहे असें समजावे. ह्याची महती अशी सांगतात किं, ह्याच्या वाचनाने अर्भकाच्या हत्येच्या पापापासून मुक्ति मिळते. हे आदिपर्व वाचण्याने सर्व (महा)भारत वाचल्याचे पूण्य मिळते. परंतु, जे ह्याचे नित्य वाचन करतील त्यांना दीर्घायुष्य व मृत्यूनंतर स्वर्गात जागा मिळेल. पूर्वीच्या काळी, चार वेद एका बाजूस व (महा)भारत दुसऱ्या बाजूस असे तोलल्यास (महा)भारत त्या चार वेदांच्या पेक्षा जास्त भारी समजले जाई.

वेदांतील गुढ गोष्टींमुळे त्यानासुद्धा महाभारत असें पूर्वी संबोधले जाई. तीच गोष्ट ह्या व्यासांनी केलेल्या रचनेची आहे. म्हणून ह्यालासुद्धा कांहीं लोक महाभारत असेंच म्हणतात. जो ह्यातील कथा त्यांच्यातील मतितार्थासह समजून वाचतो तो पापमुक्त होईल. तप निष्पाप असते, अभ्यास निरुपद्रवी असतो तसेंच सर्व लोकांसाठी वेदातील आज्ञा निरुपद्रवी असतात, मेहनत करून अर्थार्जन करणे निरुपद्रवी असते, परंतु, जेव्हां ह्यासर्व गोष्टी करतांना चुकीच्या मार्गाचा वापर होतो तेव्हां ते पापास कारणीभूत होते.

## - आदिपर्व भाग दुसरा –

ऋषी सौतीला (सुताचा मुलगा म्हणून सौती) विनंती करतात, अरे सुतपुत्रा आम्हाला तू ज्या समंतपंचकाचा उल्लेख सुरुवातीस केलास त्याबद्दलची सविस्तर माहिती कृपया सांग.

त्यावर सौती सांगतो, ऐका ऋषीवर्य, तुम्ही सर्वोत्तम पुरुष आहात, म्हणून तुम्हाला मी आता ह्या समंतपंचकाची माहिती सांगतो. त्रेता व द्वापार युगांच्या मध्य काळात जमदाग्नी ऋषीचा मुलगा, (पर्षु)राम सर्व क्षत्रियात श्रेष्ठ असा पण चुकीच्या सांगण्यावरून रागांने इतर क्षत्रिय वंशांचा नाश करण्यास प्रवृत्त होतो. रागाच्या भरात एकट्याने तो त्या क्षत्रिय कुळांचा विध्वंस करतो. तेथे त्या लोकांच्या रक्तमुळे लाल रक्ताचे पांच तलावच जणू तयार होतात. त्या जागेचे नांव समंतपंचक असें होते. तो इतका रागावलेला होता किं, त्याच रक्ताचे अर्ध्य देऊन त्यांने त्याच्या पितरांचे श्राद्ध केले. तलावांचे पाणी रक्तांमुळे तांबडे झाले होते. त्या माणसाच्या रक्ताच्या अर्ध्याने त्याचा एक पूर्वज, रिचीक, प्रथम येतो व त्याला सांगतो, अरे रामा, तुझे कल्याण हो, तू भृगु वंशाचा आहेस व तुझ्या शौर्यावर आम्ही तुझे पूर्वज संतुष्ट आहोत. तेव्हा आता तुला काय आशिर्वाद पाहिजे ते सांग.

त्यावर आता शांत झालेल्या (परशू)रामाने सांगितले किं, रागाच्या भरात हे जे ह्या क्षत्रियांचा संहार करण्याचे घोर पाप झाले आहे त्यापासून

माझी मुक्ति करावी. त्याच बरोबर ज्या ह्या पांच सरोवरात त्यांचे रक्त सांडले आहे ते सर्व तीर्थक्षेत्रे होवोत.

त्यावर त्याचे पितर म्हणाले, तथास्तु. परंतु तुला पूर्णपणे शांत व्हावे लागेल. अशारितीने शिघ्रकोपी असणे तुझ्या सारख्या सामर्थ्यवान माणसास शोभत नाही. कोणीही कांहीही सांगितले किं, त्यावर पुढचा मागचा कांहीही विचार न करता असें रागावणे आणि त्यानुसार असे घोर कर्म करणे तुझ्या सारख्या तपस्व्यास शोभत नाही. अशारितीने त्या पांच सरोवरांच्या मधील प्रदेशाचे नांव समंतपंचक असें झाले व त्याचप्रमाणे, इतर प्रदेशांनासुद्धा नांवे असावीत असे ठरले. म्हणजे त्या प्रदेशांचा उल्लेख करणे सोपे जाईल. अशी नांवे ठरवतांना त्या प्रदेशाचा विशेष काय ते पाहून त्यावरून त्या प्रदेशाचे नांव ठेवावे असेसुद्धा ठरले.

कालांतराने, द्वापार व त्रेतायुगांच्या मध्ये ह्याच समंतपंचकाच्या देशात पांडव व कौरव ह्यांचे अठरा अक्षौहीणी सैन्य ह्यात घोर लढाई झाली, जशा ह्या दोन सेना ह्या प्रदेशात आल्या तसें त्यातील सर्व सैनिक आपोआप मृत झाले. असा ह्या प्रदेशाचा लौकिक झाला आहे. म्हणून हा प्रदेश पवित्र असूनही अघोरीसुद्धा आहे हे त्रिखंडात सर्वजण समजले. त्याचा वृतांत ह्या भारत रचनेत आला आहे.

अहो सौती, सुताच्या मुला, ऋषी विचारू लागले, अरे, अक्षौहीणी सैन्य म्हणजे किती ते समजावून सांग. एवढ्या मोठ्या सैन्यात किती घोडदळ,

किती पायदळ, किती अंबाऱ्या (हत्तीसेनी) किती रथ असल्या म्हणजे अक्षौहीणी सैन्य होते ते सांग. त्यावर सौती सांगतो, ऐका सैन्याची परिभाषा, एक रथ, एक हत्ती, पांच पायदळ (चालणारे सैनिक) आणि तीन घोडेस्वार एवढ्याच्या तुकडीस एक पट्टी म्हणतात. तीन पट्टी मिळून एक सेनामुख, तीन सेनामुखांचा एक गुल्म, तीन गुल्मांचा एक गण, तीन गणांचा एक वहिनी, तीन वहिनींचा एक प्रितन, तीन प्रितनांचा एक चमू, तीन चमूंचा एक अनिकीणी, आणि दहा अनिकीणी मिळून होते एक अक्षौहीणी. अहो ऋषीवर गणित करणाऱ्यांनी मोजून सांगितले कि, एका अक्षौहीणी सैन्यात २१,८७० एवढे रथ असतात, त्याप्रमाणे इतर ठरतात. राऊत (पायी सैनिक) १०९३५०, घोडे ६५६१०, एवढे एका अक्षौहीणी सैन्यात असतात. त्यावरून अठरा अक्षौहीणी सैन्यात किती असतील ते तुम्ही समजून घ्या. एवढे सैन्य त्या दोघाचे मिळून होते. काळाने ह्या सर्वांचा अशारितीने डाव साधला व त्या सर्वांना यमसदनास पाठवले. त्याला कौरव कारणीभूत होते. भिष्माने शस्त्र व अस्त्र निवडली होती, द्रोणांनी कौरव सेनेचे नेतृत्व पांच दिवस केले. कर्णाने दोन दिवस केले, शल्याने अर्धा दिवस नेतृत्व केले. त्यानंतरचा अर्धा दिवस दुर्योधन व भीम ह्यांच्यातील गदायुद्ध चालले व हा भयंकर संग्राम आटोपला. तरीसुद्धा त्यानंतरच्या रात्री अश्र्वत्थामा व कृपाचार्य ह्यांनी मिळून युधिष्ठीराची सेना ते झोपलेले असतांना ठार मारली.

अहो शौनक, हे भारत सांगण्याचे काम तुमच्या यज्ञाच्या काळात होत आहे, जे आधी जनमेजय राजाच्या यज्ञ प्रसंगी वैशंपायन ह्या व्यासांच्या शिष्याने केले होते.

हा ग्रंथ अनेक पर्वांत (भागात) विभागलेला आहे. त्यांची रचना अशी, सुरुवातीला पौष्य, पौलोम व अष्टीक सांगितले आहेत व त्यांत विविध राजांच्या पराक्रमाच्या कथा सांगितल्या आहेत. त्या भागांत वैशिष्टपूर्ण शैलीत त्याकाळातील विविध चालीरीती, कर्मकाड ह्यांची माहिती दिली आहे जी ज्ञानी लोक मानतात. ह्यात अंतिम ज्ञानासाठी जे वैराग्य आवश्यक असते त्याबद्दल लिहीले आहे. स्वताला ओळखणे, जीवनाला समजणे, अशासाठी जे ज्ञान पाहिजे ते इतिहासाच्या रुपात दिले आहे. त्या जाणीवांतून शेवटी ब्रह्मज्ञान मिळवण्याचे शास्त्र शिकवले आहे. जसे आपले शरीर पायांवर उभे असते तसे ह्या जगात होणाऱ्या साऱ्या कथा ह्या महाभारतातील कथांशी निगडीत आहेत. चांगल्या धन्याची सेवा करण्यात जसा नोकरांस आनंद वाटतो तसेंच सर्व विद्वानाना महाभारत आवडतो. वेदांतील शब्दात ज्ञानाच्या अनेक शाखांचा अंतर्भाव असतो व त्यासाठी शब्दातील स्वर व व्यंजनात जास्त भर असतो तर महाभारतात शहाणपणाच्या अभिव्यक्तिला महत्व दिले आहे. अहो ऋषींनो, आता मी तुम्हाला (महा)भारतातील विविध पर्वांत दिलेल्या इतिहासाचा संक्षिप्त परिचय करतो.

पहिले पहिले पर्व अनुक्रमणिका, त्यातील उपभाग असें आहेत. संग्रह, पौष्य, पौलोम, अष्टीक, आदिवन्सवतरण, संभव, लक्षागृहदाह,

हिडीबवध, बकासूरवध, चित्ररथ, स्वयंवर, वैवाहीकी, विदूरागमन, राज्यलाभ, अर्जुन वनवास व सुभद्रा हरण, हरण-हरिका व खांदववन दाह, मयासूर दर्शन, सभा, मंत्र, जरासंध वध, दिग्विजय, राजसुयक यज्ञ, अर्घ्यविहरण, शिशूपाल वध, द्युत, अनुद्युत, आरण्यक, किमीरवध, अर्जुनविगमन, किरीट ह्यात अर्जुन व महादेव किरीटरुपात ह्यांचे द्वंद्व वर्णिले आहे. त्यानंतर इंद्रलोक विगमन, नलोपाख्यान, शेवटी तिर्थयात्रा, त्यानंतर जटासूर वध, यक्षयुद्ध, निवात कवच युद्ध, अजगर, मार्कंडेय भेट, द्रौपदी-सत्यभामा भेट, घोषयात्रा, मृगस्वप्न, बृहदारण्यक कथा, ऐंद्रद्रुम्न. त्यानंतर द्रौपदीहरण, जयद्रथाची सुटका, सावित्रीची कथा, श्रीरामाची कथा. त्यानंतर कुंडल हरण, अरण्य, वैराट, त्यानंतर पांडवांचे अज्ञातवासातून बाहेर येणे, किचक वध, विराटाचे कौरवांकडून हरण, त्यानंतर उद्योग पर्व सुरु होते. त्यात अभिमन्यूचे विराटाच्या कन्येशी लग्न, संजयागमन, प्रजागर म्हणजे धृतराष्ट्राची अस्वस्थता, सनत्सुजात, यानसिद्धी, श्री कृष्णाचे आगमन, मताली व गलव ह्याची कथा, सावित्री, वामदेव ह्यांच्या कथा, जमादग्न्य व शोडसराजिका, श्री कृष्णाचे दरबारात आगमन व विदूलपुत्रशासन, त्यानंतर शेताची कथा व सैन्याची तयारी, कामाचे भांडण, सैन्याची कूच, सैन्यातील रथ व अतिरथांची मोजणी, उलुकाचे आग लावणे ज्यामुळे पांडव चिडतात, राजकन्या अंबेची कथा, भिष्माची सरसेनापति म्हणून नेमणूक, त्यानंतर तटस्थ जंबू देशाची, बेटांची व्यवस्था, श्री कृष्ण भगवद्गीता सांगतात, भिष्माचा मृत्यू, द्रोण सरसेनापति होतात, संस्पतकांचा नाश, अभिमन्यूचा

मृत्यू, जयद्रथाला मारण्याची अर्जुनाची प्रतिज्ञा, जयद्रथाचा मृत्यू, घटोत्कचाचा मृत्यू, द्रोणांचा मृत्यू, नारायण अस्त्राचा चुकीचा उपयोग, त्यानंतर काम व शल्यांचा मृत्यू, त्यानंतर सरोवरात विसर्जनाचा प्रसंग, शेवटी भीम व दुर्योधन गदाद्वंद्व, त्यानंतर येतात सारस्वत, पवित्र तिर्थक्षेत्रांची माहिती, वंशावळ, कौरवांचे समर्थन करण्यासाठी सप्तिक पांडवांना युद्धाबद्दल दोष देतो, त्यानंतर भयावह घटनांची ऐशिका. त्यानंतर जलप्रदान विधी, म्हणजे, पाण्याचे अर्ध्य मृतांच्या पितरांना करणे. विधवा स्त्रीयांचे आक्रोश करून रडणे, त्यानंतर श्राद्धविधी, म्हणजे प्रेतविधी कौरवांच्या मृतांसाठी. त्यानंतर राक्षस चार्वाकाचा वध, ज्याने ब्राह्मणाचा वेश करून युधिष्ठीराला फसवले होते. त्यानंतर युधिष्ठीराचा राज्याभिषेक येतो. त्यानतर गृहप्रविभाग आहे. त्यानंतर शांतिपर्व येते. त्यानंतर राजधर्मानुसारण, त्यानंतर अपधर्माची चर्चा होते. त्यानंतर मोक्षधर्माची चर्चा होते. त्यानंतर शुकप्रश्न, ब्रह्मप्रश्नानुशासन, दुर्वासाचे मुळ काय ते सांगितले आहे. मायासुराशी वाद, अनुशासनिका, त्यानंतर भिष्माचे स्वर्गारोहण, अश्वमेध यज्ञ, त्यानंतर सर्वांचे पापविमोचन, त्यानंतर अनुगीता, ज्यात अध्यात्मिक तत्त्वज्ञानाची चर्चा केली आहे. त्यानंतर आश्रमवास, त्यानंतर मृतपुत्रांचे दर्शन, नारदाचे आगमन, त्यानंतर मौसला ज्यात भयंकर व क्रूर कृत्याचा पाढा वाचला आहे. त्यानंतर महाप्रस्थान ज्यात सर्व पांडव स्वर्गात जातात. त्यानंतर पुराण म्हणून खिलवंश, त्यात विष्णू पुराण, त्यात कृष्णाच्या लिलांचे वर्णन आहे. कंसाचा वध, भविष्यपर्व आहे ज्यात पृथ्वीवर भविष्यात

होणाऱ्या घटनांचे भाकित आहे. महात्मा व्यासांनी अशी शंभर पर्व लिहीली त्याची आता फक्त यादी दिली आहे. त्यांचे अठरा भाग केले आहेत. ते सौतीने निमिषारण्यात ऋषींना ऐकवले.

## - आदिपर्व भाग तिसरा –

## (पौष्य पर्व)

सौती सांगतो, जनमेजय, परिक्षिताचा मुलगा जो त्याच्या भावंडांबरोबर कुरुक्षेत्री होत असलेल्या यज्ञास हजर झाला होता, त्याची भावंडे, श्रृत्सेन, उग्रसेन, आणि भीमसेन तेथे बसली असतांना देवलोकातील सरमा कुत्रीचे पिलू तेथे येते. जनमेजयाच्या भावंडांनी त्याला हुसकवल्यामुळे चिडून ते पिलू रडत रडत त्याच्या आईकडे जाते. ती सरमा कुत्री तिच्या पिलास रडतांना पाहून विचारते, "कां रडतो आहेस"? "कोणी तुला त्रास दिला"? त्यावर ते पिलू सांगते, जनमेजयाच्या भावंडांनी मला मारले. ते ऐकून सरमा म्हणते, तू त्यांना कांही त्रास दिला असशिल. त्यावर ते पिलू सांगते किं, मी यज्ञात ठेवलेल्या लोण्यास तोंड लावले नव्हते. एवढेच नाही तर मी तेथे ढूमकूनसुद्धा पाहिलेले नव्हते. ते ऐकून सरमा कुत्री यज्ञाच्या जागी जाऊन जनमेजयाला रागावून बोलते, माझ्या पिलांने यज्ञातील लोणी पाहिलेसुद्धा नसतांना तुझ्या लोकांनी त्याला मारले हे योग्य झालेले नाही. त्यावर तिच्याकडे कोणीही लक्ष देत नाहीत. हे पाहून सरमा कुत्री त्याला शाप देते किं, ज्याआर्थी तुझ्या भावंडांनी विनाकारण माझ्या पिलाला मारले त्या आर्थी तुझ्यावर सुद्धा पुढे अनपेक्षितपणे कांही गंडांतर येईल व तू त्यात अडकशील.

सरमा कुत्रीची ती शाप वाणी ऐकून जनमेजय काळजीत पडतो व तो यज्ञ संपवल्यावर तो हस्तिनापुरी आल्यावर त्या शापातून मुक्ति मिळवण्यासाठी कोणी योग्य पुरोहित मिळतो कां ते शोधू लागतो.

सौती पुढे सांगतो, एक दिवस जनमेजय शिकारीस जातांना वनांत एक कुटी पहातो. तेथे एक ऋषी, श्रृतश्रव जो आपल्या मुलासह, सोमश्रव बरोबर रहात होता. दोघेही आपल्या घोर तपस्येत गुंतलेले असे होते. जनमेजयाला वाटते त्या ऋषीच्या मुलांस शापमुक्तिसाठी पुरोहित म्हणून नेमावे. त्या उद्देशाने जनमेजय त्या ऋषीच्या कुटीकडे जातो. ऋषी श्रृतश्रवाला नम्रतापूर्वक प्रणाम करून तो त्याची इच्छा श्रृतश्रवास सांगतो. ते ऐकून ऋषी सांगतो किं, हे राजा, हा माझा मुलगा महान तपस्वी असून मला तो एका सर्पिणीपासून झाला आहे. श्रृतश्रव पुढे सांगतो, त्याचे तपसामर्थ्य त्या मुलाला अवगत आहेच त्याशिवाय त्याच्या स्वतःच्या तपसामर्थ्याने तो इतका प्रबळ झाला आहे किं, महादेवाने दिलेल्या शापाव्यतिरीक्त इतर कोणीही दिलेल्या शापापासून कोणालाही मुक्ती देऊ शकतो. परंतु, हे राजा माझ्या मुलाला एक विचित्र छंद आहे तो असा किं, जर कोणी ब्राह्मणांनी कांही त्याच्याकडे मागितले तर ते तो त्याला देऊन टाकतो. जर तुला ते मान्य असेल तर तू त्याला तुझा पुरोहित म्हणून घेऊन जाऊ शकतोस. जनमेजय ती अट मान्य करतो व त्याला पुरोहित म्हणून स्वीकारतो.

हस्तिनापुराला आल्यावर तो त्याचा भावंडांना सांगतो किं, सोमश्रव आपले गुरु आहेत व म्हणून जे हा पुरोहित मागील ते त्याला कांहीं

प्रश्न न विचारता द्यावयाचे. त्याप्रमाणे त्याची भावंडे वागतात. तेवढे सांगून राजा तक्षशिलावर चाल करून जातो व तो प्रदेश जिंकून तेथील कारभार सुधारतो.

त्याच सुमारास एक तपस्वी ऋषी, आयुद-दुम्न आपल्या आश्रमात आपल्या शिष्यांसह ज्ञानसंपदा करीत असतो. त्याकडे उपमन्यू, आरुणी व वेद अशी नांवे असलेले तीन शिष्य असतात. एके दिवशी आयुद-दुम्न त्याच्या एका शिष्यास, आरुणीला शेतातील फुटलेल्या बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याचे काम सांगितले. हा शिष्य, आरुणी पांचाल देशाचा होता. गुरुच्या आदेशाचे पालन करण्यासाठी शेताकडे जातो. बरीच मेहनत करूनही तो बंधाऱ्यातील खिंडार दुरुस्त करू शकत नाही. तेव्हां असें ठरवतो किं, स्वतः त्या खिंडारात बसून वाहणारे पाणी थांबवावे. त्या प्रमाणे तो त्या खिंडारात बसतो व वाहणारे पाणी थांबवतो. बराच वेळ आरुणी परत न आल्यामुळे तो दुसऱ्या शिष्यांस विचारतो, "अरे, मुलांनो आरुणी कोठे गेला"? ते सांगतात किं, "तात, तुम्हीच तर त्याला शेतावर बंधारा दुरुस्त करण्यासाठी पाठवलं आहे".

आयुद-दुम्न त्यांना आरुणीला पहाण्यासाठी आपण सर्व जाऊया असें सांगतो व ते सगळे शेतावर जातात, आरुणीला हांका मारत फिरतात. त्यांच्या हांका ऐकून आरुणी त्यांना ओ देतो व खिडारा बाहेर येऊन त्यांच्यापुढे येतो. आरुणी गुरु आयुद-दुम्नला सांगतो किं, बधारा दुरुस्त करता न आल्यामुळे शेवटी तुमच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी मी स्वताला खिंडारात अडकवून घेतले होते म्हणून आश्रमात येऊ शकलो नाही.

खिडारातून बाहेर आल्यामुळे पुनः पाणी वाहू लागले त्या बद्दल त्याला वाईट वाटत होते. ह्या आरुणीच्या आज्ञाधारकपणामुळे आयुद-दुम्न आरुणीवर प्रसन्न झाले व त्याला काय आशिर्वाद पाहिजे तो मांग, असे बोलले. गुरुची आज्ञा पालन करण्यासाठी तो खिंडारातून बाहेर आला व त्यामुळे पाणी वाहून गेले म्हणून आयुद-दुम्नने आरुणीला नांव दिले, उद्दलक. पुढे तो ह्याच नांवाने ओळखला जाऊ लागला. ऋषी बोलले, तू माझी आज्ञा पालन करण्यासाठी पाण्यात बसलास व कष्ट सहन केलेस म्हणून मी तुला आशिर्वाद देतो किं, तुझे कल्याण होईल, सर्व वेदाचे ज्ञान तुला प्राप्त होईल व सर्व धर्मशास्त्रात तू पारंगत होशिल. त्यानंतर आरुणी अर्थात् उद्दलक शिक्षण पूर्ण करून त्याच्या पांचाल गांवी गेला.

आयुद-दुम्नच्या दुसऱ्या शिष्याचे नांव, उपमन्यू होते. आयुद-दुम्नाने त्याला आश्रमाच्या खिल्लाराची देखभाल करण्याचे काम सांगितले. त्या प्रमाणे, तो खिल्लार सांभाळण्याचे काम करू लागला. दिवसभर त्यांची राखण केल्यावर तो त्यांना घेऊन आश्रमी आला व आयुद-दुम्नासमोर उभा राहीला. त्याची उत्तम प्रकृती पाहून दुम्न त्याला विचारतो, "उपमन्यू तु आज तुझा चरितार्थ (खाणे पिणे)कसा केलास, कारण तू आज फारच पुष्ट दिसतो आहेस"? उपमन्यू सांगतो, "तात, मी भिक्षा मागून ते केले". त्यावर दुम्न त्या आठवण करून देतो किं, जे भिक्षेत मिळाले ते तू प्रथम मला दिले पाहिजेस हे तू विसरलास कां? त्यावर उपमन्यू पुनः भिक मागून आणतो व ती गुरुला देतो. दुसऱ्या दिवशी तसेंच होते व पुनः दुम्न त्याला तोंच प्रश्न विचारतो व

त्याला उपमन्यू तेंच उत्तर देतो. उपमन्यूची दिवसेंदिवस सुधारत असलेली तब्यत पाहून दुम्र पुन्हा तोंच प्रश्न विचारतो व उपमन्यू तेंच उत्तर देत असतो. शेवटी दुम्र मुद्द्याला हात घालतो व उपमन्यूस विचारतो किं, "अरे उपमन्यू मी तुझी सर्व भीक काढून घेत असतांना तुझा चरितार्थ कसा काय चालतो ते तू सांग. वस्तुतः तू कृष व्हावयास पाहिजे पण तसें कांहीही झालेले दिसत नाही म्हणजे तू काय खातोस दिवसाभरात ते सांग. त्यांने सांगितले किं तो दुसऱ्यांदा भीक मागून त्यावर गुजराण करतो. ते ऐकून दुम्र त्याला दोष देतात किं, असे पुन्हा भीक मागणे नियमाविरुद्ध आहे व त्यांने तसें न करण्याचे आश्वावासन दिले. त्यानंतर पुन्हा तो खिल्लार दिवसभर चारून आला व दुम्रापुढे उभा राहिला. तो तरीसुद्धा चांगला धष्टपुष्ट होता तेव्हां दुम्राने पुनः त्याला तोंच प्रश्न विचारला तेव्हां उपमन्यू बोलला, त्याने खिल्लारातील गाईचे दूध घेतले. त्यावर दुम्र त्याला सांगतात किं, तो असे त्यांच्या परवानगीशिवाय करू शकत नाही. त्यानंतर पुन्हा तो खिल्लार घेऊन दिवसभर चारून आला व दुम्रापुढे उभा राहिला तर तो तसांच पुष्ट दिसत होता. ते पाहून दुम्र त्याला विचारतात, तू भीक मागत नाहीस, गाईचे दुध पित नाहीस मग असा पुष्ट कसा राहतोस? उपमन्यू म्हणाला मी वासराच्या तोंडाभोवती जमणारा दुधाचा फेस चाटून खाल्ला. त्यावर दुम्र त्याला सांगतात किं तो फेस चाटण्यासाठी तू माझी परवानगी घेतली नव्हती व म्हणून ते गैर कृत्य झाले. दुसऱ्या दिवशी पुनः तो खिल्लार चरण्यासाठी नेतो. त्या दिवशी त्याला भूक लागते तेव्हा तो भुकेने व्याकुळ होतो पण उपमन्यू गुरुशी प्रामाणिक असल्यामुळे भिक मागत नाही, दुध पित नाही व

वासरांच्या तोंडातून वाहणारा फेससुद्धा चाटत नाही. शेवटी न राहून तो वनातील रुईचा झाडपाला खाऊन भूक भागवण्याचा प्रयत्न करतो. त्या पाल्यातील विषारी द्रव्यामुळे त्याचे डोळे जातात व तो कांहीं पाहू शकत नाही. चाचपडत चालू लागतो व कांही दिसत नसल्यामुळे तो एका खड्ड्यात पडतो. रात्र झाली तरी उपमन्यू आश्रमात परतला नाही म्हणून दुम्र त्याची चौकशी करतात तेव्हां त्याला समजते किं, उपमन्यू अजून वनातून परतला नाही. खिल्लार त्यांच्या सवयीमुळे आश्रमाच्या गोठ्यात आली होती. दुम्र इतर शिष्याला, वेदला सांगतात किं, चल, आपण उपमन्यूला शोधण्यासाठी निघूया. तसें ते दोघे वनात उपमन्यूला शोधण्यासाठी त्याला मोठ्याने हांका मारत ते फिरू लागतात. त्याच्या हांका ऐकून खड्ड्यात पडलेला उपमन्यू ओरडून सांगतो किं, तो खड्ड्यात पडलेला आहे. त्या खड्ड्यातून उपमन्यूला ते बाहेर काढतात व विचारतात, हे कसें झाले? त्यावर उपमन्यू सांगतो किं, त्याला भूक लागली परंतु, गुरुच्या आदेशाप्रमाणे कांहीही खाणे शक्य नसल्यामुळे तो झाडपाला खातो व त्या पाल्यातील विषारी द्रव्यामुळे असेल कदाचित् तो आंधळा झाला व खड्ड्यात पडला. ते ऐकून आयुद-दुम्र त्यावर संतुष्ट होतात व बोलतात किं, अरे उपमन्यू तू अश्विनीकुमारांचा धावा कर म्हणजे ते तुला तुझे डोळे परत देतील. वेदातील अश्विनीकुमारांच्या स्तुतीची कवने तो बोलू लागतो.

"विश्वाच्या उत्पत्ती आधीपासून असलेले तुम्ही, ज्यांनी पंचमहाभूते निर्मिली, कृपया माझ्यावर कृपादृष्टी करा. तुमच्या बद्दल जे ऐकले,

त्याप्रमाणे, ध्यानसाधना करून मी समजलो किं, तुम्ही अनादिअनंत आहात. तुम्ही ह्या विश्वाचे चालक आहात, तुम्ही त्रिदोषमुक्त आहात, तुम्ही अतुलनीय आहात, तुम्ही सर्व जिवनमात्रांत अंगिभूत आहात, तुम्ही सर्व विश्र्वाला व्यापणारा सोनेरी गरुडच आहात, तुम्ही विश्र्वाचा सारांश आहात, तुम्ही पूर्णतया निर्दोष आहात, तुम्ही अक्षय आहात, तुम्ही कधीही कोणावर अन्याय करीत नाही, तुम्ही हा निसर्ग निर्मून त्यातून रात्र व दिवस तयार केले आहेत, त्या काळया व पांढऱ्या (दिवस व रात्र) धाग्यांनी दोन भाग ह्या जगाचे असें केले किं एकांत देव व दुसऱ्यात पितर राहू शकतात. तुम्ही जीवरुपी पक्षी काळाच्या पंज्यात अडकले आहेत त्यांना मुक्त करता व त्यांना चिरंतर सुखाचा अनुभव देता. ज्ञानेंद्रियांच्या भ्रामक जाणीवांतून तुम्ही आत्म्यास मुक्त करता. जीवाला मूर्तरुप तुम्ही देता, वर्षाच्या तिनशे साठ दिवसरुपी गाई पासून एक वासरु तुम्ही जन्माला घालता ते वासरु सर्व जीवांचा कारक व मारक आहे. सत्य शोधणारे त्या वासराच्या मदतीने खरे ज्ञानरुपी दुध ओढून घेतात. असे तुम्ही महान आश्विनीकुमार, ज्यांनी ते वासरु निर्माण केले. वर्षरुपी मध्य असलेल्या चक्रातील सातशेवीस आंस जे दिवस व रात्र आहेत, त्या चक्राच्या परिघावर बारा मांस तुम्ही बसवले आहेत, असें हे चक्र जे नित्य भ्रम निर्माण करते पण नष्ट होत नाही. हे चक्र सर्व प्राणिमात्रांस पकडून ठेवते मग ते ह्या (दृष्य) जगातील असोत अथवा त्या (अदृष्य) जगातील असोत. अहो अश्विनी कुमार, अशा चक्राला तुम्ही गतिमय केले आहे. त्याला सगळे कालचक्र असें संबोधतात. त्यात तुम्ही सहा मोसम

रचले आहेत. बारा महिने व त्याप्रमाणे बारा नक्षत्रे त्याभोवती फिरत आहेत. अशा ह्या चक्रातून सर्व जीवांच्या आशा आकांक्षा पल्लवित होतात. तुम्ही जी ह्या कालचक्राची आदिदेवता आहात म्हणून मी आपल्याला विनंती करतो किं, मला माझ्या ह्या आपत्ती परिस्थितीतून बाहेर काढा. अहो अश्विनी कुमार, तुम्ही ह्या पंचमहाभूतांचे मूळ आहात, तुम्हीच सर्व सुखाचे मूळ आहात, मला ह्यातून मुक्त करा. मला माहीत आहे किं, जरी तुम्ही परब्रह्म असला तरी ह्या जगातील सुख व दुःख तुम्ही तुमच्या वैश्विक इंद्रियांनी अनुभवत असता.

सुरुवातीला विश्व निर्मितीच्या वेळी दहा दिशा ठरवल्या. त्यात सूर्य, तारे आले, आणि सर्व ऋषी त्यांच्या हालचालीनुसार आपल्या विधी करू लागले. त्यातून ते विविध फळे मिळवू लागले. तीन रंग (लाल, पिवळा व नीळा) उत्पन्न करून त्या द्वारा सर्व सृष्टी तुम्ही दृग्गोचर केली आहे. त्यामुळे देव व माणूस आपली कामं करू लागली. त्यातून सर्व जीवांचे जीवन घडत आहे".

"अहो अश्विनी कुमार, मी तुमचा आदर करतो, मी तुम्ही उत्पन्न केलेल्या आकाशाचे सुद्धा कौतुक करतो. तुम्ही सर्व कर्मफलांचे नियंत्रक आहात ज्यातून देवांचीसुद्धा सुटका होत नाही. तुम्ही स्वतः मात्र सर्व कर्मफलांपासून मुक्त आहात".

"तुम्ही सर्वांचे पालक आहात, स्त्रिया व पुरुष जसें खाद्य खातात त्याचे जीवयुक्त विविध रसांत व रक्तांत रुपांतर होते. लहान बालक त्याच्या

आईचे दुध चोखते व त्यातून त्या अर्भकाची वाढ होते. अशा अद्भूत सामर्थ्य असलेल्या अश्विनी कुमारांनो मला माझी गेलेली दृष्टी द्या व मला वाचवा".

अशी प्रार्थना ऐकून अश्विनीकुमार प्रकट होतात व सांगतात, आम्ही संतुष्ट झालो आहोत. ही भाकरी  आम्ही देतो ती तू खा. त्यावर उपमन्यू सांगतो मी तुमचा आभारी आहे कारण तुम्हाला केलेली प्रार्थना कधीही व्यर्थ जात नाही हे मी जाणून आहे परंतु, मी माझ्या गुरुला ही भाकर प्रथम देण्यास बांधील आहे. त्यावर आश्विनीकुमार त्याला सांगतात किं, आम्ही तुझ्या गुरुला अशी एक भाकर दिली होती ती त्याने त्याच्या गुरुला न देताच खाल्ली होती. हे ऐकून उपमन्यू म्हणाला ते कांहीं असो मी मात्र तसे करणार नाही. हे त्याचे त्याच्या गुरुवरील भक्ती दाखवणारे उद्गार ऐकून आश्विनीकुमार त्यावर अधिक संतुष्ट होऊन त्याला त्याची गेलेली दृष्टी देतात. आणि आशिर्वाद देतात किं, तुझ्या गुरुचे दांत लोखंडासारखे काळे आहेत पण आमच्या कृपेमुळे तुझे दांत सोन्यासारखे तेजस्वी चमकतील. ते पुढे आणखीन आशिर्वाद देतात किं, तुझे भविष्य उत्कर्षपूर्ण असेल.

आश्विनीकुमारांच्या आशिर्वादामुळे उपमन्यूला दृष्टी प्राप्त होते. आयुद-दुम्नाला तो भेटतो व त्याला दृष्टी आल्याचे सांगतो. ते पाहून आयुद-दुम्नाला सुद्धा फार आनंद होतो. ते त्याला सांगतात, उपमन्यू, आश्विनीकुमारांनी दिलेल्या आशिर्वादाप्रमाणे तुझी प्रगती होईल व तुझा पुढील आयुष्यात उत्कर्ष होईल. सर्व वेद तुझ्यात चमकतील, धर्मशास्त्र तुला सदैव अवगत असेल.

अशारितीने उपमन्यू त्याच्या परिक्षेत उत्तीर्ण होतो. आता तिसरा व शेवटचा शिष्य, वेदाची पाळी असते. आयुद-दुम्न त्याला बोलवतात. अरे वेदा, माझ्या बाळा, थोडा काळ आश्रमात काम कर व माझी सेवा कर त्यामुळे तुझा फायदा होईल. आधीपासून वेदने आयुद-दुम्नच्या घरात सेवा मनापासून केलेली असते. एका शब्दाने तक्रार न करतां त्यांने सर्व त्रास सहन केलेला असतो. त्या सेवेमुळे गुरु आयुद-दुम्न पूर्णपणे संतुष्ट झालेले असतात व ती सेवा हींच त्याची परीक्षा असते. गुरुने वेदला पुरेल इतके ज्ञान दिलेले आहे त्यामुळे त्याचे उर्वरित आयुष्य समृद्ध होणारच. त्यानंतर आयुद-दुम्नची परवानगी घेऊन वेद आश्रम सोडतो, व आपल्या गृहस्थाश्रमास आरंभ करतो. तेथे तो त्याचे स्वताचे गुरुकुल सुरु करतो. त्याला तीन शिष्य मिळतात. वेद त्याचा अनुभव लक्षात घेतां त्याच्या शिष्यांना त्याच्या गुरु सारखा त्रास देत नाही. त्यामुळे त्याचे शिष्य आनंदात त्यांचा आभ्यास पूर्ण करतात. कांहीं काळांने जनमेजय व पौष्य जे दोघेही क्षत्रिय परंपरेचे होते, वेदच्या आश्रमात येतात. ते वेदला त्याचे पुरोहित म्हणून नेमतात.

कांहीं यज्ञविधीच्या निमित्ताने वेद बाहेर निघतांना त्याचा एक शिष्य उतंक, ह्याला तो त्याच्या घराचा  प्रमुख नेमतो. त्याला सांगतो, जे कांहीं आवश्यक आहे ते  सर्व तू कोठल्याही प्रकारे दुर्लक्ष न करतां करावयाचे आहे. अशारितीने आज्ञा देऊन तो कामाप्रित्यर्थ निघून जातो. उतंक त्याच्या गुरुने दिलेली आज्ञा प्रमाण मानून त्या घराचे काळजी घेऊ लागते. एक दिवस वेदची पत्नी त्याला बोलते, "अरे उतंका, मुला, मी तुझ्यावर काय कृपा करू?

तू माझी सेवा चांगली केली आहेस. म्हणून आता आपली मैत्री चांगली झाली आहे". त्या गुरुच्या घरातील बायका त्याला सांगतात कीं, तुझ्या गुरुची पत्नी संभोगासाठी उत्सुक आहे तेव्हां तू तिची ती इच्छा पूर्ण करावीस. त्यावर उतंक त्यांना सांगतो, ते योग्य होणार नाही. यथावकाश वेद घरी परततो, त्याला सर्व वृतांत समजतो त्यावर वेद उतंकावर अतिखूष होतो. त्याला बोलावून विचारतो, "बोल, उतंका मी तुला काय देऊ"? "तू माझी खूप सेवा केलेली आहेस". आता तुझा अभ्याससुद्धा पूर्ण झाला आहे व म्हणून आपण आता मित्र होवू शकतो. मी तुला जाण्याची परवानगी देत आहे. तू बाहेरच्या जगात जाऊन तुझे इप्सित पूर्ण करावेस. हे ऐकून उतंक बोलतो, कृपया जरा मला एक गोष्ट करुद्या, कारण असें सांगितले आहे किं, जो अयोग्य गोष्ट शिकवतो, आणि जो ती शिकतो, त्यापैकी एकजण मरतो किंवा त्यांच्यात वैर उत्पन्न होते. ज्याअर्थी तुम्ही मला जाण्याची परवानगी दिली आहे त्याअर्थी मी तुम्हाला कांहीं भेट देऊ इच्छितो. त्यावर वेद त्याला सांगतो किं, जर तुझी अशीच इच्छा आहे तर तू तुझ्या गुरुच्या पत्नीस भेटून तिला काय पाहिजे ते विचारून तसे कर म्हणजे मला माझी भेट मिळाली असें समजेन. उतंक त्याच्या गुरुपत्नीस भेटतो व तिला सांगतो ते सर्व व तिला काय त्याने द्यावे म्हणजे ती संतुष्ट होईल ते सांगावे. असें केल्यानंतरच मी गुरुच्या ऋणातून मुक्त होईन.

हे उतंकाचे उद्गार ऐकून गुरुपत्नी त्याला सांगते, असें असेल तर, पौष्य राजाच्या घरी जाऊन त्याच्या पट्टराणींने कानात घातलेले कर्णकुडी

घेऊन ये. तुला हे सर्व चार दिवसात करावयांस पाहिजे कारण लवकरच माझ्या घरी ब्राह्मणांचे भोजन होणार आहे त्यावेळी मला ती कर्णकुडी घालावयाची आहेत. जर तू हे करू शकलास तर तू तुझ्या आयुष्यात यशस्वी होशिल. उतंक ती आज्ञा घेऊन ताबडतोब निघतो. उतंक पौष्य राजाच्या कडे जात असतांना वाटेत त्याला एक विचित्र व भल्यामोठ्या आकाराचा वृषभ दिसतो ज्याच्यावर एक कुबड असलेला माणूस स्वार असतो. तो स्वार उतंकाला हांक मारून सांगतो किं, अरे उतंका तू माझ्या बैलाचा मूत व विष्टा खा, कारण तुझ्या गुरुनेसुद्धा ते केले होते. त्यावर तसें करतो. त्यानंतर उभ्या उभ्याच तोंड व हात धुवून तेथून निघतो व तेथून पौष्यराजाकडे प्रस्थान करतो.

राजाच्या घरी पोहोचल्यावर तो राजाला भेटून आपल्या येण्यामागील उद्देश सांगतो. त्यावर राजा पौष्य त्याला सांगतो किं, तो राणीवासात जाऊन राणीला भेटून त्याची इच्छा तिला सांगून पाहू शकतो. त्या प्रमाणे, उतंक राणीवासात प्रवेश करतो व राणीला शोधण्याचा प्रयत्न करतो. परंतु, त्याला राणी कोठेही सापडत नाही. बराच वेळ तपासूनही ती दिसत नसल्याने उतंक राजाकडे पुन्हा जाऊन त्याची असमर्थता त्याला सांगतो. ते ऐकून पौष्य राजा उतंकला सांगतो किं, त्याची राणी अशुद्ध असलेल्याला दिसत नाही म्हणून तू अशुद्ध आहेस त्यासाठी तुला प्रथम शुद्ध व्हावे लागेल. राजा उतंकला आठवण करण्यास सांगतो तेव्हा उतंकला आठवते किं, त्याने त्या बैलाचे शेण व मूत पिऊन त्यानंतर तोंडसुद्धा उभ्या उभ्याच धुतले होते. अशा क्रियेने खरी शुद्धी होत नाही. <u>त्यानंतर उतंक ती</u>

चूक सुधारण्यासाठी पूर्वेकडे तोंड राहील असा बसून हात मनगटा पर्यंत व तोंड चुळा घेऊन धुतो. त्यानंतर थोडे पाणी आवाज न करतां चांखतो. त्यानंतर चेहरा दोनदा धुतो, तोंडाची सर्व रंध्रे म्हणजे कान, नांक, डोळे साफ करतो. त्यानंतर हात व पाय पुनः धुतो अशारितीने शुचिर्भूत होऊन (इस्लाम धर्मात हांच विधी शुद्धतेसाठी सांगितलेला आहे त्याला ते ऊजू असें म्हणतात. इस्लाम मधील शिरीयाचे नियम मनुस्मृतीनुसार आहेत.) उतंक पुन्हा राणीवसात जातो. आता त्याला पौष्याची राणी दिसते. तिला आदरपूर्वक प्रणाम करून उतंक तिला त्याच्या येण्यामागील उद्देश सांगतो.

राणी उतंकच्या एकंदर वागण्यामुळे संतुष्ट होऊन त्याला सांगते किं, त्याच्या गुरुपत्नीसाठी ती तिचे कर्णकुडी देण्यास तयार आहे. असें बोलून ती तिच्या कानांतील कर्णकुडी काढून उतंकला देते. राणी उतंकला सावध करते किं, अरे उतंका एक गोष्ट लक्षात असुदे कीं, ही कर्णकुडी तक्षकाला (सर्पांचा राजा) अतिप्रिय आहेत. म्हणून तू ती फार काळजीपूर्वकपणे सांभाळून ठेव नाहीतर तो ती तुझ्याकडून काढून घेईल. त्यावर उतंक तिला आश्वासन देतो किं, कांहीं काळजी करू नये कारण त्याच्या मंत्रसामर्थ्यामुळे तक्षक त्याच्या वाटेला जाणार नाही. अशारितीने ती कर्णकुडी घेऊन उतंक पौष्य राजाचा निरोप घेण्यासाठी त्याला भेटतो. राजाला त्याच्या आदरपूर्वक वागणूकीसाठी व इतर सहायासाठी उतंक त्याचे आभार मानतो. त्यावर राजा पौष्य उतंकाला सांगतो, 'उत्तम दान मिळावयास कालावधी लागतो. तू एक उत्तमरित्या प्रशिक्षित असां ब्राह्मण आहेस तेव्हां मी तुझ्या हातून श्राद्ध करू

इच्छितो. त्यासाठी तयार हो'. त्यावर उतंक त्याला सांगतो, 'हो, राजे, मी तयार होतो. त्यासाठी आवश्यक गोष्टींची तयारी करावी'. तशी सर्व व्यवस्था राजा करतो. उतंकासाठी जे जेवण वाढले जाते त्यात उतंकाला एक केस आढळला. त्याशिवाय ते जेवण गरम  नव्हते. त्यावरून उतंक समजतो किं, ते जेवण अशुद्ध आहे. तो राजाला विचारतो, 'राजे, तुम्ही मला अयोग्य जेवण देता हे चांगले नाही'. ते ऐकून राजा रागावतो व उतंकास शाप देतो, किं, तू मी दिलेल्या जेवणास अशुद्ध म्हणतोस हे अयोग्य करतोस म्हणून तू निःसंतान रहाशिल'. ते ऐकून उतंक संतापतो व राजाला जेवण तपासावयास सांगतो व रागाने बोलतो किं, जर मी जे बोलतो ते खरे आहे हे सिद्ध झाले तर हे राजन् तू आंधळा होशिल असा त्याला शाप देतो. राजा पौष्य, जेवण तपासतो व समजतो किं, उतंक बरोबर बोलत होता. जेवणात ते बनवणाऱ्या बाईचे केस पडलेले होते. त्याशिवाय ते थंड सुद्धा होते. तो ते पाहून ओशाळतो व ऋषी उतंकाची क्षमा मागू लागतो. राजा पौष्य हात जोडून उतंकाकडे विनवणी करतो, 'ऋषी उतंक, कृपया मला माफ करा व आपला शाप मागे घ्या'. ऋषी उतंक बोलतो, हे राजन्, माझा शाप मी मागे घेऊ शकत नाही परंतु, त्याचा काळ मी कमी करतो व त्यामुळे तू थोड्याच काळासाठी अंध रहाशिल. त्यानंतर उतंक पौष्यास त्याचा शाप मागे घेण्यास सांगतो. राजा त्याला सांगतो किं, हे ऋषी उतंका, मी माझा शाप मागे घेण्यास असमर्थ आहे तरी तुझे हृदय लोण्यासारखे मऊ आहे कारण तू ऋषी आहेस. तुमचा क्रोध त्वरित कमी होतो परंतु, मी क्षत्रिय असल्यामुळे माझा राग तसा लवकर थंड झालेला

नाही. म्हणून तू तसांच त्या शापासह जावे. त्यावर उतंक म्हणाला तुमचा शाप अयोग्य होता कारण, तो चुकीच्या समजावर होता म्हणून तो शाप काम करणार नाही. जर मी खोटे बोललो असतो तर तुमचा शाप काम करू शकला असता. असें बोलून ऋषी उतंक राजाचा निरोप घेऊन व राणीने दिलेली कर्णकुडी घेऊन तेथून निघाला.

तसा जात असतांना उतंक पहातो किं, एक नागडा भिकारी त्याच्याकडे येत आहे. विशेष असें किं, तो भिकारी कधी दिसत होता तर कधी अदृष्य होत होता. तसें होत असतांना उतंकला तहान लागते म्हणून तो पाणी शोधण्यासाठी ती कर्णकुडी जमिनीवर ठेवून इतरत्र जातो. ते होत असतांना तो भिकारी चटकन तेथे येऊन ती कर्णकुडी घेऊन पळून जातो. येथे उतंक त्याचा विधी उरकून व पाण्याचे अर्ध्य देऊन मग गुरु व आराध्य देवतेस नमन करून येतो व पहातो कीं, त्या भिकाऱ्यांने ती कर्णकुडी चोरून तो पळाला आहे. बराच वेळ त्याचा पाठलाग केल्यावर शेवटी उतंक त्या भिकाऱ्यास पकडतो. त्याबरोबर तो भिकारी त्याचे खरे रुप धारण करतो. तो तक्षक होता. त्याच्या सर्परुपामुळे उतंक आश्चर्यचकीत झाला व त्याच्या त्या संभ्रमावस्थेचा गैरफायदा घेऊन तक्षक जवळच्या मोठ्या बिळात शिरतो. तक्षक अशारितीने उतंकला फसवून त्या बिळातून त्याच्या स्वताच्या घरी, सर्पलोकी पळून जातो.

उतंकला पौष्याच्या राणीचे शब्द आठवतात व तो सर्व प्रकार समजतो. तक्षकाचा पाठलाग करण्यासाठी तो एक काठी घेऊन त्या बिळाला

आणखीन खोदून मोठे करीत आत घुसतो पण तो त्यात विशेष प्रगती करू शकत नाही. ते सर्व इंद्र पहात असतो. त्याला उतंकाची दया येते व तो त्याचा खास मदतनीस वज्र (विजेचा लखलखाट) ह्याला त्याच्या मदतीसाठी पाठवतो. वज्र त्या काठीत शिरतो व त्यामुळे ते बिळ मोठे होते. खूप आंत गेल्यावर त्याला अफाट पसरलेला सर्पलोक दिसतो. शेकडो प्रचंड महाल व सुंदर वाडे तो पहातो. अनेक कमानी व दरवाजे असलेली खेळाची मैदाने, करमणूकीचे सज्जे असें सर्व पाहून उतंक अचंबित होतो. उत्फुर्तपणे तो तक्षकाची स्तुति करणारे श्लोक बोलतो.

"अहो सापांनो, तुम्ही ऐरावताची जनता, जे लढाईत अफाट शौर्य गाजवतात, जे वीजेच्या लखलखाटासारखी शस्त्रे फेकतात, अनेक प्रकारचे आभूषणे घालतात, गंगेच्या उत्तर किनाऱ्यावर तुम्हा नागांची मोठी वस्ती आहे. तेथे असलेले साप त्याचा प्रमुख ऐरावत ह्याच्या भोवती हजारोंच्या संख्येने फिरत असतात. जेव्हां दशरथ, ऐरावताचा भाऊ बाहेर फिरावयास निघतो तेव्हां त्याच्या बरोबर अठ्ठावीस हजार आठ, नाग त्याच्या पासून अंतर राखून अदबीने सोबतीला असतात. मी अशा सर्व सापांचे कौतुक करतो. पुढे उतंक त्या सर्पांच्या सर्व म्होरक्यांची स्तुति करतो व म्हणतो, तक्षक जो सुरुवातीला कुरुक्षेत्री व खांडववनात रहात असें, तक्षक व अश्वसेन जे इक्षुमति नदीच्या काठी रहात असतं, अशा सर्वांचा मी चाहता आहे. तसेंच श्रुतसेन जो तक्षकाचा धाकटा भाऊ आहे, जो महाद्युम्न नांवाच्या पवित्र

ठिकाणी रहातो अशा उद्देशाने किं, कधीतरी त्याला सापांचा राजा होण्याची संधी मिळेल".

ब्राह्मण ऋषी अशारितीने सापांची व त्यांच्या म्होरक्यांची स्तुति करतो पण व्यर्थ. त्याला कोणीही ती कर्णकुडी आणून देत नाही. त्यामुळे उतंक विचार करू लागला. आपली सर्व स्तुती व्यर्थ गेली त्याचा त्याला त्रास झाला. त्या विचारात तो असतांना त्याला एका बाजूला दोन बायका एका मागावर वस्त्र तयार करीत होत्या असें दिसते. त्यात पांढरे व काळे धागे वापरले जात होते. त्यांच्या बाजूला एक चाक होते त्याला बारा आंस होते. ते चाक सहा मुलं फिरवित होती. त्याने तेथे एक पुरुष एका रुबाबदार घोड्यावर होता, ते पाहून उतंक त्यांना उद्देशून बोलू लागला,

"हे चाक ज्याचा परिघ बारा समान भागात विभागला आहे, ते चाक सहा मुलंरुपी मोसम सतत फिरवत आहेत. तेथे बसलेल्या सुंदरी रात्र व दिवसाच्या धाग्यांनी काळाचे वस्त्र विणत आहेत, त्या पुरुषाकडे पाहून उतंक म्हणतो, अरे, वज्रा, ढगाच्या गडगडाटात व विजेच्या लखलखाटा तू वृत्र व नमुची ह्यांना हरवणारा आहेस, जो कृष्ण वस्त्र परिधान करतो व सत्य आणि असत्य ह्यांचा निवाडा करतो, जो खोल समुद्रातून आलेल्या घोड्यावर स्वार होतो, जे घोडे प्रत्यक्ष अग्नीचेच रुप आहेत, तुम्हाला माझे त्रिवार नमन असो". असें म्हणून उतंक त्या पुरुषास पुरंदर असें पुकारून नमस्कार करतो.

ते ऐकून तो पुरुष, पुरंदर, त्याला बोलतो, "हे उतंका, मी तुझ्या स्तुतीने प्रसन्न झालो आहे. मी तुझ्यासाठी काय केले तर तू समाधान पावशील"?

त्यावर उतंक त्याला सांगतो, "हे इंद्रा, हे नाग माझ्या आवाक्यात येतील असे कांही कर".

त्यावर तो पुरुष उतंकास सांगतो किं, त्याने ह्या माझ्या घोड्याला जोरात फुंकर मारावी. त्या प्रमाणे उतंक त्या घोड्याला जोरांने फुंकर मारतो, त्याबरोबर त्या घोड्याच्या शरीरातील सर्व छिद्रांतून जोरांनी अग्नीच्या ज्वाळा बाहेर येतात व सर्व नागलोकांत पसरतात. त्यांच्या उष्णतेमुळे त्रस्त होऊन अखेरीस तक्षक त्याच्या वाड्यातून बाहेर येतो व त्या चोरलेल्या कर्णकुडी उतंकास परत करतो. उतंक त्या घेतो.

उतंकास त्याच्या गुरुच्या पत्नीची आठवण येते कारण कीं, चार दिवस झालेले असतात व तो तिचा त्या व्रताचा दिवस असतो. उतंक मनातल्या मनात विचार करतो, मी इतक्या लांबून माझ्या गुरुमातेच्या कडे कसे वेळीच पोहोचणार?

त्याच्या मनातील विचार इंद्रास जणूकाय समजले अशाप्रकारे तो त्याला सांगतो, "अरे उतंका, तू ह्या घोड्यावर बैस, म्हणजे क्षणात तो तुला तुझ्या गुरुच्या घरी नेऊन सोडेल. त्याप्रमाणे, उतंक त्या वारुवर बसतो व क्षणार्धात तो त्याच्या गुरुच्या घरी जातो. तेथे त्याची गुरुपत्नी नुकतेच स्नान

करून तिचे केंस विंचरीत असते. ती विचार करीत असते किं, उतंक कांही तिच्या इच्छेची पूर्तता करू शकणार नाही.

ती असें विचार करीत असतांनाच उतंक तिच्या खोली बाहेर येतो व तिला बाहेरूनच अभिवादन करून ती कर्णकुडी तिला देतो. ती पाहून गुरुपत्नी त्याच्यावर संतुष्ट होऊन म्हणते, "तू उतंका, फारच निष्पाप आहेस, मला वाटत होते किं, तू माझी इच्छा पूर्ण करू शकणार नाहीस व माझ्या शापास पात्र ठरशिल परंतु, तू ती पूर्ण केली आहेस. तुझे कोटकल्याण होवो". त्यानंतर उतंक त्याच्या गुरुस भेटतो.

वेद, उतंकाचा गुरु, त्याला क्षेमकुशल विचारतो व म्हणतो. "तू इतके दिवस कोठे गेला होतास? मला सांगशिल कां"?

ते ऐकून उतंक त्याच्या गुरुस त्याच्या प्रवासात घडलेल्या सर्व घटनांच्या बद्दल विचारतो.

तो सांगतो किं, त्याच्या प्रवासात त्याला तक्षक भेटतो व ती कर्णकुडी चोरतो. त्या आधी त्याला एक माणूस भल्यामोठ्या बैलावर बसलेला असा भेटतो. त्या माणसांने उतंकाला त्या बैलाचे शेण खावयास सांगितले व तसें उतंकाने केल्याचे सांगितले कारण त्या माणसांने उतंकला सांगितले होते किं, उतंकच्या गुरुनेसुद्धा ते शेण खाल्ले आहे. त्यानंतर दोन सुंदरी कापड काळ्या व पाढऱ्या धाग्यांनी विणत होत्या ते सांगतो. त्यानंतर जी सहा मुलं ते बारा आंसांचे चाक फिरवतांना दिसतात ते सांगतो. त्याला

जो पुरुष व त्याच्या बरोबर मोठा घोडा दिसतो ते सांगतो. असें सर्व सांगितल्यावर उतंक ते कोण होते त्याबद्दल विचारतो.

उतंकाचे गुरु त्याला सांगतात किं, तो माणूस इंद्र व तो भलामोठा बैल ऐरावत होते. ते शेण म्हणजे अमृत होते, त्या सुंदरी धाता व विधाता होत्या. काळे व पांढरे धागे दिवस व रात्री होत्या. जो पुरुष घोड्याबरोबर होता तो पावसाची देवता, अर्थात्, पर्जन्य देव व ते चाक कालचक्र होते व त्याचे आंस वर्ष व सहा मुलं मोसम होते. हे सर्व माझे चांगले मित्र असल्याने त्यांनी तुला सर्व मदत केली व तू तक्षकाकडून ती कुंडलं आणू शकलास.

हे उतंका तू तुझ्या शेवटच्या परिक्षेत उत्तीर्ण झाला आहेस व आता तू तुझ्या उर्वरीत आयुष्यासाठी जाऊ शकतोस. तुझे कल्याण होईल.

उतंक गुरुची आज्ञा घेऊन रागातच निघतो कारण, त्याला तक्षकाचा फार राग आलेला असतो. तो तक्षकाला चागला धडा शिकवण्याचे ठरवूनच तेथून हस्तिनापुरी निघतो. उतंक तेथे जनमेजयाच्या पदरी रहाण्याचे ठरवतो. त्याच सुमारास राजा जनमेजय तक्षिला जिंकून आलेला असतो.

उतंक जनमेजय राजा त्याच्या दरबारी आमात्यांच्या मध्ये बसलेला पहातो. उतंक पुढे होऊन जनमेजयाला त्याचे आशिर्वाद सादरप्रणाम करून पुढे सुचक शब्दांत विनंति करतो, "हे राजा, जनमेजया, तूम्ही सर्व राजांत उत्तम आहात, असें असतांना तुम्ही महत्वाचे काम राहून गेले असतांना येथे वेळ व्यर्थ कसा घालवता आहात"?

एवढे सांगून पुढे सौती सांगतो, राजा जनमेजय त्या पाहुण्या ब्राह्मण, उतंकास समजावतो, "हे ब्राह्मणा, मी माझ्या प्रजेची फार काळजीपूर्वकपणे देखभाल करीत असतो. तरीसुद्धा तुला माझ्याकडून काय पाहिजे ते सांग". असें राजाचे बोलणे ऐकून तो ब्राह्मण जनमेजयाला अतिआदरपूर्वकपणे विनंति करतो किं, "अहो नृपश्रेष्ठ, मी जे काम आता सांगणार आहे ते खरे तर तुझेच आहे पण माझा सुद्धा त्यात उद्देश आहेच. तू विसरला आहेस किं, तुझ्या पित्यास तक्षकांने चावून चावून मारले आहे, त्याचा वचपा तू केव्हां काढणार? आता ती वेळ आली आहे हे राजा, किं, तू त्या तक्षकाला शिक्षा करावीस. जा, आणि त्याच्या त्या कृत्याबद्दल त्याला मारून टाक. ह्या तक्षकांने बऱ्याच ऋषीनासुद्धा त्रास दिला आहे. उदाहरणार्थ, काश्यप जे वैद्यांचे प्रमुख जेव्हा तुमच्या जन्मदात्यांस वाचवण्यासाठी येत होते त्यांना पळवून लावले, असें करून तू, हे नृपश्रेष्ठ, माझ्यावर सुद्धा तुझी कृपा होईल. हल्लीच ह्या हरामखोर तक्षकाने मलासुद्धा माझ्या कामात व्यत्यय आणून त्रास दिला आहे. असा तो इतर बऱ्याच चांगल्या लोकांना त्रास देत असला पाहिजे, तेव्हा त्याचा कायम बंदोबस्त तू करावास असें मला सुचवायचे आहे".

सौती पुढे सांगतो, जनमेजय हे ऐकून तक्षकावर फारच रागावतो, उतंकाच्या प्रभावी वक्तव्यामुळे तो असा काही भडकतो जणूकाय, अग्नीमध्ये लोणी टाकावे. राजाला त्याच्या पित्याच्या मृत्यूची आठवण फारच दुःखी

करते. उतंकाच्या समोरच राजा त्याच्या मंत्र्यांकडे त्या घटनेबद्दलची सर्व माहिती मागवतो.

अशारितीने हा महाभारतातील आदिपर्वा मधील पौष्य भाग येथे संपतो.

## - आदिपर्व भाग चौथा –

## (पौलोमा पर्व)

उग्रश्रव सौती, लोमहर्षाचा मुलगा, सर्व पुराणांचा जाणकार, निमिषारण्यात बारा वर्ष होत असलेल्या शौनक, आडनांव कुलपति, ह्यांनी सुरु केलेला यज्ञाच्या प्रसंगी सर्व महान ऋषींच्या समोर महाभारत सांगण्यासाठी उभा असतो.

सर्व पुराणांचा अभ्यास भक्तिपूर्वकपणे केलेला, सौती हात जोडून उभा असतो. सौती पुढे बोलू लागतो किं, मी उतंक ऋषीची माहिती तुम्हाला सांगितली. ज्याच्या हुसकावण्यामुळे जनमेजय राजा सर्पसंहारक यज्ञ करण्यास तयार झाला आहे. आता ह्याच्या पुढे आपण सर्व ऋषीवर्य आणखीन काय ऐकू इच्छिता माझ्या कडून ते सांगावे. ते ऐकून ते ऋषीवर सौतीला सांगतात, "अरे, लोमहर्षाच्या सुपुत्रा, आम्हाला तुझ्याकडून सर्वच कथा ऐकावयाच्या आहेत व आम्ही त्यासाठी फार आतूर आहोत. शौनक ऋषी तूर्तास, यज्ञाच्या कामांत गुंतलेले आहेत, त्यांना ह्या सर्व देव व असुरांच्या गोष्टी चांगल्या प्रकारे माहीत आहेत. ते मनुष्य, गंधर्व व नाग ह्यांना चांगल्याप्रकारे जाणतात. ते पुण्यप्रभावी, शब्दाचे पक्के व सर्व शास्त्रे व अरण्यके जाणणारे असें आहेत, तरी सुद्धा, अरे सौती, ते आपले यज्ञाचे काम

उरकून आल्यावर व त्यांच्या स्थानावर बसल्यावर तू तुझे पुराण सांगावेस असें आम्हा सर्वांना वाटते".

"तू त्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन आम्हा सर्वांना त्या कथांबद्दल अवगत करावेस".

त्यावर सौती त्यांना सांगतो, "मला त्याची हरकत नाही. जेव्हां ते ज्ञानी द्विज आपल्या स्थानांवर बसतील तेव्हां मी सर्व कांहीं, त्यांच्या शंकांचे समाधान करीत, सांगण्यास तयार आहे".

यथावकाश, ते ज्ञानी द्विज, शौनक, येऊन आपल्या स्थानांवर जेथे सौतीची बैठक आहे त्या समोर बसतात. त्यांच्या भोवती अनेक ज्ञानी, संत व तपस्वी महंत, ऋद्विक व साधक बसलेले आहेत. सर्व जण स्थानापन्न झाल्यावर सौती सांगू लागतो,

## आदिपर्व भाग पांचवा

## (पौलोमा पर्व पुढे चालू)

शौनक ऋषी सौती कडे पहात बोलतात, "माझ्या बाळा सौती, लोमहर्षाच्या सुपुत्रा, तुझ्या पित्याने पूर्वी हे सर्व पुराण व महाभारत कृष्ण-द्वैपायनच्या बरोबर सर्वांना सांगितले आहे. तू कधी ह्याचा अभ्यास केला आहेस? ह्या अतिप्राचीन कथांमध्ये पुरातन शहाण्या लोकांची माहिती आहे. ती आम्ही पुन्हा पुनः ऐकत असतो. प्रथम मला त्यातील भृगु घराण्याचा इतिहास ऐकायला आवडेल. तेव्हां तू तो सांग. आम्ही सर्वजण तो एकचित्ताने ऐकण्यास उत्सुक आहोत". ते ऐकल्यावर सौती आदरपूर्वकपणे सांगतो, "वैशंपायनादि ऋषींनी जे ज्ञान मिळवले ते त्यांच्याकडून मी शिकलो आहे. तेंच मी पुन्हा पुनः इतरांना सांगत आहे. माझ्या पित्यांनेसुद्धा तेंच केले होते. ह्या भृगु घराण्याचा इतिहास ज्याची स्तुती प्रत्यक्ष इंद्र आणि सगळे देव, मरुत करतात, तोंच अहो मुनीवरांनो, मी आता सांगणार आहे, जो पुराणात दिला आहे".

महान ऋषी भृगु बद्दल असें बोलतात किं, त्याचा जन्म, प्रत्यक्ष ब्रह्माने वरुणासाठी यज्ञ केला होता त्या अग्नीतून झाला आहे. त्या पहिल्या भृगुला एक मुलगा होता. त्याचे नांव होते च्यवन.

भृगुचे त्याच्या मुलावर फार प्रेम होते. अशा च्यवनाला एक फारच सद्‌गुणी मुलगा असतो ज्याचे नांव प्रमति व त्याच्या मुलाचे नांव होते ॠॠ ज्याची आई असते, घृताची जी स्वर्गातील एक सुंदर नर्तकी असते. ॠॠला त्याच्या पत्नीपासून म्हणजे, प्रमद्वरा पासून, एक मुलगा होतो ज्याचे नांव आहे शुनक. अहो शौनक, हा शुनक, जो अति सद्‌गुणी असा तुमचा महान पूर्वज आहे हे आपल्याला माहीत असेलच. त्याने कायम संन्यासाश्रम स्वीकारला होता. त्याचे वेदांचे ज्ञान अतुलनीय होते. एवढे ऐकल्यावर शौनक ॠषी शौतीला विचारतात, "अरे सुतपुत्रा, आता तू भृगुच्या मुलाबद्दल सांग. त्याचे नांव च्यवन असें का ठेवले होते? मला सर्व कांहीं सांग",

सौती पुढे सांगू लागतो, भृगुॠषीची बायको, जिचे नांव होते, पौलोमा, जिच्यावर तो जीवापाड प्रेम करीत असतो, ती पोटाशी म्हणजे गर्भवती होते. त्या काळात भृगु एकदा त्याचे यज्ञविधी करण्यासाठी तिला सोडून दूर गेलेला असतो. अशावेळी, एक राक्षस ज्याचे नांव आहे पुलोम भृगुच्या दारी येतो. पुलोम घरात असलेल्या पौलोमास पहातो. तिचे लावण्य पाहून पुलोम राक्षस त्याचे भान हरपतो व त्याची मर्यादा ओलांडतो. येथे पौलोमा त्या राक्षसाला एक पाहुणा असें समजून त्याचे आदरतीथ्य करू लागते. त्याला घरात असलेली फळे, कंदमुळे, मांस इत्यादि खाण्यास देते. राक्षस मात्र त्याचा गैरअर्थ काढतो व तिच्याशी लगट करण्याचा प्रयत्न करू लागतो. मनातल्या मनात तो समजतो, चला माझा उद्देश साध्य करण्याची

हींच वेळ आहे, जोवर भृगुऋषी नाही तोवर आपण हिला पळवून नेले पाहिजे.

त्यानंतर तो राक्षस तिला उचलून पळून जाण्याचे ठरवतो. वस्तुतः त्या काळाच्या नियमांनुसार तिचा विवाह रितसरपणे भृगुशी झालेला असतो पण राक्षस त्याचा विचार न करतां असें पाऊल उचलतो.

पुलोम पौलोमीला जबरदस्तीने नेऊन तिच्याशी लग्न करण्याचा विचार करीत असतो. तसें करतांना तो त्या घरात इतरत्र पहातो तेव्हां त्याला तेथे भृगुऋषीने चेतवलेला पवित्र अग्नी दिसतो. पुलोम त्या अग्नीला विचारतो, "अरे पवित्र अग्नी, काय ही बाई भृगुची खरोखरची बायको आहे कां? तू देवांचे मुख आहेस तेव्हां तू खरे सांगिलते पाहिजेस". तुला माहीत आहे किं, प्रथम मीच ह्या स्वर्गीय सुंदरीशी विवाह करणार होतो पण तिच्या बापाने त्या खोटारड्या भृगुला ती दिली हे खरे आहे किं नाही? मला संताप होतो किं, ह्या अप्रतिम लावण्यवतीचा विवाह भृगुशी झाला आहे.

एवढे सांगून सौती पुढे बोलतो, "पुलोम राक्षस त्या पवित्र अग्नीस पुन्हा पुनः तेंच तेंच विचारत रहातो. परंतु, राक्षसाला घाबरून तो पवित्र अग्नी कांहीं काळ गप्प रहातो. त्यावर पुलोम राक्षस अग्नीला विचारतो, "अरे अग्नीदेवा, तू सर्वच प्राणीमात्रांत असतोस तू त्यांना आतून ओळखत असतोस, तेव्हां तुझ्याबद्दल आदर बाळगून मी विचारतो तेव्हां त्यांचे उत्तर तुला द्यावे लागेल. जर तू उत्तर नाही दिलेस तर मी ह्या सुंदरीला ह्या कुटीतून पळवून नेईन. ही सुंदरी माझी बायको आहे हे तू मान्य कर".

एवढे बोलून मग सौती पुढे सांगतो, तो सात ज्वाळांनी तेजाळणारा अग्नी तेव्हां नाईलाज झाल्यासारखा, सांगतो, "अरे पुलोमा, जरी तू प्रथम हिला मागणी घातली होतीस तरी अखेरीस, भृगु व हिचा विवाह माझ्या साक्षीने रितसरपणे झाला आहे तेव्हां ती फक्त भृगुचीच अर्धांगिनी आहे हे तू समजले पाहिजेस. मी खोटे बोलणार नाही. कारण जर तसें मी केले तर मला भृगुऋषीच्या शापाला सामोरी जावे लागेल. अरे श्रेष्ठ अशा राक्षसा, तुला माहीत आहे किं, खोटे फारकाळ चालत नाही तेव्हां मी फक्त खरे तेंच सांगत आहे". ते ऐकून राक्षस अतिशय नाराज होतो.

## आदिपर्व भाग सहावा (अग्नीला शाप)

## (पौलोमा पर्व पुढे चालू)

सौती पुढे जमलेल्या ऋषीगणांस उद्देशून सांगतो, "अहो श्रेष्ठ ब्राह्मणांनो, अग्निदेवाचे ते बोलणे ऐकून पुलोम राक्षस त्या भृगुच्या पत्नीस पळवून नेण्याच्या उद्देशांने रानडुक्कराचे रुप घेतो व पौलोमांस तोंडात अलगदपणे धरून तेथून वाऱ्याच्या वेगांने पळ काढतो. त्या धसमुसळेगिरीने पौलोमाच्या गर्भात असलेल्या भृगुच्या मुलांस त्रास होतो आणि परिणामतः ते अर्भक तिच्या गर्भातून बाहेर निसटून पडते. सूर्यासारखा चमकणारा तो अर्भक त्याच्या आईच्या हातातून सुद्धा निसटतो व खाली पडतो. ते पडत असतांना त्याच वेळी राक्षस पुलोमची पौलोमावरील पकड सैल होते व तीसुद्धा खाली पडते व त्याच वेळी त्या राक्षसाची राख होते. हे सर्व भृगुचा जन्मदाता ब्रह्मा पहात असतो. त्याला ह्या सर्व गोष्टीचे त्यामुळे अतिदुःख होते व तो रडू लागतो. त्याच्या त्या रडण्यामुळे जे अश्रू खाली पडतात त्याची एक वधुसरा नदी होते व त्या नदीचे पाणी वहात वहात पौलोमा जेथे पडते तेथे पोहोचते. तिच्या जवळ तिचे बाळ असते. ते अशारितीने च्यवन म्हणजे, "निसटून पडलेले", म्हणून त्याचे नांव निसटून पडलेला असा, च्यवन झाले.

ब्रह्मा त्याच्या मुलांस, भृगुस, ते सांगतो तेव्हां अतिक्रोधी होऊन भृगु विचारतो त्याच्या पत्नीस किं, कोणी राक्षसाला सांगितले किं तू माझी

बायको आहेस कारण एर्हवी त्या राक्षसाला तू माझी पत्नी आहेस हे समजण्याचे कांहीं कारण नव्हते. तेव्हां पौलोमा सांगते,"घरातील पवित्र अग्नीनी मी तुझी अर्धांगिनी आहे हे सांगितले. ते ऐकल्यावर तो राक्षस मला घेऊन मादी करकोच्च्यासारखा ओरडत उडाला. जेव्हां त्या राक्षसांने तुझ्या बाळाचे तेज पाहिले तेव्हां त्याच्या पकडीतून मी सुद्धा निसटले व खाली पडले आणि तो स्वतः सुद्धा खाली कोसळला व त्याची राख झाली".

सौती पुढे सांगतो, "आपल्या बायकोचे हे कथन ऐकून भृगु अतिसंतप्त होतो. त्या रागाच्या भरात भृगुऋषी त्या घरातील पवित्र अग्नीस शाप देतो. अरे, अग्नी तुझ्या ह्या कृत्यासाठी मी तुला शाप देतो किं, तू वाटेल ते खाशील.

अशारितीने हा आदिपर्वातील सहावा भाग "अग्नीला शाप" नांवाचा येथे संपतो.

# आदिपर्व भाग सातवा

# (पौलोमा पर्व पुढे चालू)

सौती पुढे सांगतो, शापाने व्यस्थ झालेला अग्नी भृगुला सांगतो, असें घाईत काय शाप देतोस. अरे ब्राह्मणां, मला असा कसा शाप देतोस, मी फक्त खरे तेंच सांगितले, जेव्हा कोणी कांहीं विचारतो तेव्हां खरेतेंच सांगावयाचे असते तेंच मी केले तर त्यात काय चुकले किं तू मला शाप द्यावास. जेव्हा एकाद्या साक्षीदारास जाब विचारला जातो तेव्हां त्याला खरे तेंच सांगावयाचे असते. तसें न केल्यास तो साक्षीदार दोषी ठरतो व त्याचे सात पिढ्याचे मागील व पुढील वंशज नाश पावतात हे तुम्हाला माहित नाही कां? मीसुद्धा तुला शाप देऊ शकतो परंतु, मी तसे करणार नाही कारण, मी तुझा आदर करतो. ह्यासाठी आता जरा मी काय सांगतो ते तू ऐक, मी अनेक प्रकारच्या यज्ञात हजर असतो. घरातील पवित्र अग्नी पासून मोठ मोठ्या यज्ञात मी असतो. विवाह विधी, मुंजीबंधन इत्यादी सर्वच ठिकाणी मी असतो जेथे पवित्र कार्ये केली जातात. मी देवांचे व पितरांचे मुख आहे व म्हणून ते जे खातात ते सर्व मला खावयास देतात. आणि मी जे खाईन ते त्यानासुद्धा खावे लागते. वेदांत दिलेल्या प्रमाणे, देव व पितरांना पाण्याचे अर्ध्य देतात ते मलाच घ्यावे लागते. दर्श व पूर्णदर्श विधी जे देव व पितरांसाठी केले जातात ते सर्व माझ्या माध्यमातूनच केले जातात. त्यांना ते ते खांवे लागते जे मला

दिले जाते अशा परिस्थितीत जर मी कांहीही खाल्ले तर कसें चालेल? लोणी, तूप असें सुद्ध खाद्य त्यासाठी मी स्वीकारत असतो. म्हणून मला देव व पितरांचे मुख समजले जाते. त्यामुळे मी कांही अयोग्य कसे खाऊन चालेल? एवढे बोलून अग्नी इतर कांहीं न बोलता सर्व ठिकाणांहून गायब होतो.

त्याच्या अशारितीने गायब होण्याने सर्वत्र गोंधळ उडतो. त्यामुळे चिंतातूर झालेले ऋषीगण देवांकडे गेले व तक्रार करू लागले. अग्नीच्या अशा गायब होण्यामुळे ते त्यांची नित्यकर्मे करू शकत नाहीत त्या बद्दल ते बोलत होते. भृगुने दिलेल्या शापाबद्दल ते बोलत होते. आता काय करावे असें ते देव व पितरांना विचारू लागले. शेवटी मामला ब्रह्मदेवाकडे गेला. काळाचा अपव्यय न करतां त्वरित हा प्रश्न सोडवावा अशी विनंति ते करू लागले. अशामुळे जे नवीन प्रश्न पुढे उपस्थित होतील त्याचा विचार करण्यास ते सांगू लागले. अग्नीच्या गायब होण्यामुळे देव व पितर उपाशी राहू लागले व ही परिस्थिती चालू देण्यासारखी नाही हे ब्रह्मदेव समजला. जर शापानुसार अग्नी सर्वच अपवित्र गोष्टी स्वाहा करू लागला तर त्याचा परिणाम अनिष्ट होईल हे ब्रह्मा समजले.

ब्रह्माने अग्नीला सुचवले किं, ह्यापुढे तू प्राण्यांच्या पोटात रहाशिल व तेथे तू सर्व प्रकारचे पदार्थ पचवण्यास मदत करशील. तेथे तू ज्वाळाने दिसणार नाहीस. सूर्याच्या अग्नीने जसें सर्व कांहीं शुद्ध होते तसेंच तुझ्या स्पर्शांनेसुद्धा सर्व गोष्टी जठरात शुद्ध होतील.

ब्रह्मदेव अग्नीचे सांत्वन करतात किं, अरे अग्नी तू सर्व शक्तिमान आहेस. तू ऋषी भृगुच्या शापाचा सन्मान करून यज्ञासाठी अयोग्य असलेल्या परंतु, जगण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी जठराग्नीत स्वीकारशील. त्यानंतर पवित्र अग्नी पुनः यज्ञासाठी उपलब्ध झाला व देव आणि पितरांचे स्वाहा स्वीकारू लागला. सर्व काही पुर्वव्रत झाले. अशी आहे च्यवन ऋषीच्या जन्माची व राक्षस पुलोमाच्या नाशाची कहाणी. येथे आदिपर्वातील सातवा भाग संपला.

# आदिपर्व भाग आठवा

# (पौलोमा पर्व पुढे चालू)

सौती पुढे सांगतो, यथावकाश च्यवन, भृगुचा मुलगा, ह्याचा विवाह सुकन्या नांवाच्या मुलीशी होतो व त्याना एक सुपुत्र होतो. त्याचे नांव प्रमती असते. प्रमती तेजस्वी असतो. पुढे त्याचे लग्न घृताची नांवाच्या अप्सरेशी होते. त्या दोघांना एक पुत्र होतो. त्याचे नांव ऋऋ. पुढे त्या ऋऋचे लग्न प्रमद्वरा नांवाच्या अप्सरेशी होते. त्यांना योग्य वेळी एक मुलगा होतो त्याचे नांव शुनक. एवढे सांगून सौती थोडा थाबतो व नंतर बोलतो, अहो ब्राह्मणांनो, आता मी तुम्हा सर्वांना सांगणार आहे, ह्या ऋऋच्या तेजाची गोष्ट.

सौती सांगत रहातो, फार वर्षापूर्वी एक महान ऋषी होऊन गेले. त्यांचे नांव होते स्थुलकेशी. फार मोठे तपस्वी होते. सर्व प्राणीमात्रांबद्दल सद्भावाने ते वागत असत. त्या काळात गंधर्वांचा राजा, विश्ववसु, अप्सरा मेनकेच्या बरोबर प्रेम संबंधाने जोडला गेला होता.

अरे ऋऋच्या वंशातील शौनका, पुढे ऐक, योग्य वेळी मेनकेला एक बालक होते. त्याला ती मोठ्या दुःखी अंतकरणाने एका नदीच्या काठांवर असेंच टाकून जात असते. त्या नदीच्या किनारी ऋषी स्थुलकेशी तपस्या

करीत होते त्यांना ते बालक सांपडते. स्थुलकेशी त्या बालकाला घेऊन आपल्या आश्रमात आणतो. त्याला समजते किं, ते बालक एक कन्यारत्न आहे. स्थुलकेशी त्या लहान मुलीचे लालनपालन करतात. स्थुलकेशी त्या कन्येचे सौंदर्य, स्वभाव व इतर गुण समजून तिचे नांव प्रमद्वरा असें ठेवतो. आपल्या स्वताच्या कन्येप्रमाणे तो ऋषी त्या मुलीचे सर्व धार्मिक संस्कार जे पवित्र नियमांनुसार आवश्यक असतात ते पूर्ण करतो. ऋषीपुत्र ऋऋ एकदा प्रमद्वराला स्थुलकेशीच्या आश्रमात गेला असतां पहातो व तो तिच्याकडे आकृष्ट होतो. तो आपल्या गुरुबंधूंच्या मदतीने आपल्या पित्याकडे खुबीने कळवतो किं, तो प्रमद्वराच्या प्रेमात पडला आहे. यथावकाश प्रमती, ऋऋचे पिता व भृगुचे पुत्र, स्थुलकेशीला भेटून प्रमद्वराचा हात आपल्या ऋऋसाठी मांगतो. स्थुलकेशी मोठ्या आनंदाने त्याला मान्यता देतात. नक्षत्र पाहून मुहूर्त ठरतो, पूर्वा फाल्गुनीच्या उदय काळाचा व त्याप्रमाणे विवाह होण्याचे निश्चित होते. विवाह होण्याच्या आधी कांहीं काळ एकदा प्रमद्वरा आपल्या आश्रमातील मैत्रीणींसोबत वनात फुले वेचण्यासाठी पहाटे गेली असतांना दैवयोगानुसार तिचा पाय जमिनीवर गवतात बसलेल्या सापावर पडतो व तो साप तिला डंसतो व प्रमद्वरा मूर्च्छित होते व जमिनीवर पडते. त्या सापाच्या विषामुळे तिची अंगकांती हळू हळू काळवट होत जाते व तिचे सौंदर्य त्यामुळे कोमेजून जाते. केस विसकडलेल्या स्थितीत ती तशीच तिच्या मैत्रीणींच्या समोर निपचित पडलेली असते. अशा अवस्थेत ती पडलेली पाहून तिच्या मैत्रीणींनी एकच टाहो फोडला व सर्वत्र गोंधळ उडाला. अशी ती प्रमद्वरा त्या स्थितीतसुद्धा एका वेगळ्या सौंदर्याने खुलून दिसत होती. एकादे सुंदर

उमललेले कमळ मातीत पडलेले असावे अशी ती प्रमद्वरा तेथे मातीत पडलेली होती. ही वार्ता प्रमतीच्या आश्रमात जशी पोहोचली तशी सर्व ऋषीगण तेथे धावून आले. त्यांत होते, स्थुलकेशीच्या आश्रमातील स्वस्त्यत्रेय, महाजन, कुशिक, संखमेखल, उद्दलक, कथ आणि स्वेता असें ख्यातनाम जमले त्यांच्या नंतर ऋषी, भारद्वाज, कौनकुत्स्य, अर्ष्टीसेन, गौतम, प्रमती स्वतः आणि ऋऋ तेथे एकत्र आले. ते प्रमद्वराच्या निःचेष्ट देहा भोवती बसून ह्यापुढे काय करावे ह्याचा विचार करू लागले. त्या शिवाय इतर आश्रमवासीसुद्धा घोळका करून तिच्या भोवती गर्दीकरून उभे होते. जसे वेळ जात होती तसें प्रमद्वराच्या शरीरात सापाचे वीष भिनत होते व त्यामुळे ती अधिकाधिक काळी पडत होती हे पाहून ऋऋ तेथून कोणालाही समजणार नाही अशारितीने निघाला.

पौलोमा पर्व आठवे येथे संपले.

## आदिपर्व नववा भाग

## (पौलोमा पर्व पुढे चालू)

थोडावेळ विश्रांति घेऊन नंतर सौती पुढे सांगू लागला. असें तेजस्वी ब्राह्मण तेथे प्रमद्वराच्या मृत देहाभोवती जमले असतांना ॠॠ मात्र एकटा दुःखाने व्यथित असा वनात निघून जातो. तो दुःखाने स्वतःशी बोलत रहातो, केवळ दुःख करण्याशिवाय दुसरे काय आपण करू शकतो? ॠॠ पुढे स्वगत करतो, जर माझी तपस्या खरी असेल तर माझी प्रमद्वरा त्यातून उठून उभी राहील. हि माझ्या तपस्येची परीक्षा आहे. त्यात तो ध्यानमग्न असतांना स्वर्गातून कोणी दूत तेथे येऊन ॠॠपुढे उभा रहातो. तो दूत त्याला सांगतो, अरे ॠॠ, तुझ्या ह्या त्रागा करण्याने कांहींही साध्य होणार नाही. तू प्रमद्वराची नियति बदलू शकत नाहीस. एकदा मेला किं, तो कायमचा गेला असें समजून तू तुझा दुःखावेग आवर.

ह्या गंधर्व व अप्सरेच्या मुलीचे आयुष्य तेवढेच होते तेव्हां उगाच क्लेश करून घेऊ नकोस. तरीसुद्धा तुला एक गोष्ट सांगतो, देवांनी प्रमद्वरेच्या जीवंत होण्याचा एक मार्ग ठेवला आहे तो तुला सांगतो. तसें जर तू केलेस तर तुझी प्रेयसी पुनः जीवंत होईल. हे ऐकून ॠॠ आतूर होवून त्या दुतांस काकुळतीने विचारतो, सांग स्वर्गीय दुतां, तो कोणता उपाय आहे. ते ॠॠचे आर्जव ऐकून तो यमदूत त्याला सांगतो किं, जर तू तुझे अर्धे आयुष्य

प्रमद्वराला अर्पण केलेस तर ती त्या विषबाधेतून मुक्त होऊन पुनः जीवंत होईल.

सौती हे कथन करीत असतांना जमलेले ऋषीगण व तेथे जमलेले इतर लोक ऋऋच्या दुःखात मग्न झालेले दिसले. ऋऋ त्वरित हे मान्य करतो व त्या दूतांस सांगतो किं, धर्मराजांस माझा निरोप द्यावा किं, मी ऋऋ, माझ्या उर्वरित आयुष्यातील अर्धे प्रमद्वरेला देण्यास तयार आहे असें बोलून ऋऋ आपल्या अर्ध्या आयुष्याचे अर्ध्य तेथेंच सोडतो. ते घेऊन तो दूत यमलोकी निघून जातो.

तेथे सर्वजण आश्र्चर्यचकीत होतात कारण, प्रमद्वरा झोपेतून उठावी अशारितीने उठून बसते. आश्रमवासीयांना ऋऋने आपले अर्धे आयुष्य प्रमद्वरेला दान केले आहे हे माहीतच नसते. कांहीं चमत्कार झाला असें समजून ते रहातात व ऋऋसुद्धा त्याबद्दल कांहीही कोणालाही सांगत नाही. सौती सांगत रहातो, दोनही आश्रमाचे लोक ठरवतात किं आता ह्या दोघांचे लग्न त्वरित करावे. त्या प्रमाणे ऋऋ व प्रमद्वरा ह्याचे लग्न सुमुहूर्त पाहून प्रमती व स्थुलकेशी उरकतात.

तरीसुद्धा ऋऋ मात्र त्या सापाच्या ह्या कृत्यामुळे इतका क्रुद्ध झालेला असतो किं तो एक पण-प्रतिज्ञा घेतो किं तो सर्व सापवंशाचा नायनाट करील. जेव्हां केव्हां त्याला कोणी साप, नाग इत्यादि त्या वंशाचे दिसत ते तो मारून टाकीत असें.

एकदा ऋऋ एका निबिड अरण्यातून जात असतांना त्याला एक भलामोठा दुंदुभ वंशाचा साप वाटेत आडवा पसरलेला असा पडलेला दिसतो. त्याला पाहून ऋऋचा राग जागृत होतो व तो त्याच्या हातातील काठी त्या दुंदुभाला मारण्यासाठी उगारतो. ते पाहून तो वृद्ध दुंदुभ ऋऋला विचारतो, हे ब्राह्मणा, मी तुला कांही पिडा दिली नसतांना तू मला मारण्यासाठी एवढा उत्सुक कां झाला आहेस?

येथे आदिपर्वातील नववा भाग संपला.

# आदिपर्व भाग दहावा

# (पौलोमा पर्व पुढे चालू)

सौती पुढे सांगतो, संतापलेला ऋऋ त्याला उत्तर देतो, माझ्या प्रिय पत्नीला एक साप चावला व ती मृत झाली तेव्हां पासून मी एक व्रत घेतले आहे किं, जेव्हां केव्हां मला साप दिसेल तेव्हां त्याला मारून टाकीन.

पुढे सौती सांगतो, तो वृद्ध दुंदुभ त्याला सांगतो, अरे तरुण ब्राह्मणा, मी त्यातला साप नाही. माझ्या वंशाचे साप चावत नाहीत व त्यांना वीषसुद्धा नसते. ते केवळ नांवापुरते सर्प असतात. म्हणून तू तुझ्या पणातून माझ्या वंशाच्या सापांचा समावेश करू नकोस. ते ऐकून ऋऋ विचार करू लागतो. त्याला त्या दुंदुभचे बोलणे पटण्यासारखे वाटते. ऋऋ त्याला मारण्याचा विचार सोडून देतो. त्यानंतर तो दुंदुभ ऋऋला सांगू लागतो किं, तो दुंदुभ प्रत्यक्षतः कोण आहे. तो त्याची कथा सांगू लागतो. असें सांगून त्यानंतर सौती थोडावेळ थांबून पुनः कथाकथन सुरु करतो.

दुंदुभ सांगू लागतो, बऱ्याच वर्षापूर्वी मी सुद्धा तुझ्यासारखा एक ऋषी होतो, माझे नांव सहस्रपद होते. माझ्या मित्राच्या शापामुळे मी असा झालो. त्यावर ऋऋ त्याला विचारतो, असें काय झाले किं, तुझ्या मित्राने

तुम्हाला असा भयंकर शाप दिला? आणि असें किती काळ तुम्ही ह्या अवस्थेत रहाणार अहात?

अशारितीने आदिपर्वाचा दहावा भाग येथे संपतो.

# आदिपर्व भाग अकरावा

# (पौलोमा पर्व पुढे चालू)

सौती त्याचे कथाकथन पुढे चालू ठेवतो. दुंदुभ ऋऋला सांगतो, माझ्या एका मित्राला तो यज्ञ करीत असतांना खोटा साप दाखवून घाबरवले होते. त्याचे नांव होते, खगम. तो माझा मित्र अध्यात्मिक दृष्ट्या फार उच्च दर्जाचा होता व त्याच्या वाणीत विलक्षण सामर्थ्य होते. त्यावेळी त्या माझ्या मित्राने मला शाप दिला किं, मी दुदुभ नाग होईन. त्याच्या त्या शापामुळे मी फार घाबरलो व त्याला विनवण्या करू लागलो किं, त्यांने मला त्याच्या शापातून मुक्त करावे. त्यानंतर मी त्याची क्षमा हात जोडून व पाया पडून मागितली व ती फक्त एक मस्करी होती, असें समजावले. त्यावर तो मित्रसुद्धा समजला किं, असा शाप जरा जास्त वाटतो परंतु, तो त्याचा एकदा दिलेला शाप मागे घेऊ शकत नव्हता. तेव्हां त्याने उःशाप दिला कीं, कांहीं काळानंतर प्रमतीचा मुलगा ऋऋ नांवाचा ऋषी येईल त्याच्या स्पर्शाने तू पुनः पूर्ववत होशिल. दुंदुभी ऋऋला आश्वासन देतो किं, तो जसा पुर्ववत होईल तसें कांहीं ऋऋच्या भल्याची गुप्त माहिती तो ऋऋला देईल. एवढे बोलल्यावर त्या दुंदुभ सापाचे कांहीं क्षणात पुनः माणसात रुपांतर होते. तो दुंदुभ आता, सहस्रपद त्याला सल्ला देतो कीं, तू ब्राह्मण आहेस म्हणून तू कधीही कोणाला मारण्याचा विचार करता नये. ब्राह्मण नेहमी सर्वांशी प्रेमळ

व क्षमाशिल असला पाहिजे कारण जर तो रागीट राहीला तर तो अनेकांचे अमर्याद नुकसान करण्याची शक्यता असते. वेदांनीच असा आदेश ब्राह्मणांना दिला आहे. ब्राह्मणाने वेद व वेदांत चांगल्या प्रकारे शिकले पाहिजे. मारणे, शासन करणे, शिक्षा करणे ही क्षत्रियांची कर्तव्ये आहेत ती ब्राह्मणांनी करू नयेत. अरे ऋत्रृ, आता मी सांगतो आहे ते नीट लक्षात ठेव. तू जाणतोस किं, राजा जनमेजयाच्या सर्पयज्ञात सर्व सापांचा नाश करण्याचा उद्देश आहे व ते अयोग्य आहे. सुदैवाने द्विज अष्टीक जे वेदशास्त्र संपन्न आहेत ते फार मोठे तपस्वी आहेत ते हा यज्ञ होऊ देत नाहीत. ते तुला पुढे समजेल. अशारितीने आदिपर्वातील अकरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग बारावा

# (पौलोमा पर्व पुढे चालू)

सौती पुढे सांगत असतो, ऋऋ विचारतो, "अहो, श्रेष्ठ द्विजानो, राजा जनमेजय असा सर्पांचा नाश करण्याचा यज्ञ करण्यास कां तयार झाला"? माझा दुसरा प्रश्न असा कीं, त्या सर्पनाशक यज्ञातून सर्पांना शेवटी कोणी वाचवले व कसें? मी हे सर्व समजून घेण्यासाठी उत्सुक आहे. ऋषी सहस्रपद त्याला सांगू लागतो.

सहस्रपद पुढे ऋऋला आश्वासन देतो, अरे ब्राह्मणा, हे अष्टीक कोठून आले ते तुला ब्राह्मणाच्या तोंडून समजेल. असें बोलून सहस्रपद अंतर्धान पावला. सौती नंतर सांगत रहातो, सहस्रपद अंतर्धान पावल्यामुळे ऋऋ गोंधळतो व इकडे तिकडे त्याला शोधण्यास सुरुवात करतो. रानावनात खूप शोध घेतल्यावर थकून तो जमिनीवर कोसळतो. थोड्या काळानंतर तो उठतो त्याला सहस्रपदचे बोलणे आठवते. त्याच्या बोलण्यामुळे त्याच्यात जो मनाचा गोंधळ उडलेला असतो तो अजून संपलेला नसतो. शेवटी तो ठरवतो किं त्याबद्दल आपल्या पित्यास, प्रमतीस विचारावे. कदाचित् सहस्रपदने जो ब्राह्मणाचा उल्लेख केला तो आपल्या पित्याचा असू शकतो. असा विचार करून ऋऋ तेथून थेट घरी पोहोचला व पित्यास त्याने ह्या अष्टीकाची माहिती विचारू लागला.

अशारितीने आदिपर्वातील  पौलोमा पर्वाचा बारावा व शेवटचा भाग संपला.

# आदिपर्व भाग तेरावा

# (अष्टीक पर्व सुरु)

एवढे ऐकल्यावर ऋषी शौनक विचारतात, कथाकथनकार सौती तू आम्हाला सांग, तो वाघासारखा राजा, जनमेजय, यज्ञ करून सर्व सापांचा नाश करण्यास कां उद्युक्त झाला त्याची खरी कहाणी सांग. तू आणखीन सांग, हे अष्टीक जे मोठे तेजस्वी तपस्वी होते ते सापांना यज्ञाच्या भडकलेल्या अग्नी पासून वाचवण्यासाठी कां आले? जनमेजय राजा कोणाचा मुलगा होता. तो कोणाचा अवतार होता?

सौती त्यावर सांगतो, अष्टीकांची कहाणी फार मोठी आहे. मी ती सगळी तुम्हाला सांगणार आहे. हे योग्य आहे व मी ती सर्व विलक्षण कहाणी ज्या ऋषी बद्दल आहे ज्याचे नांव अष्टीक आहे, ते सर्व तुम्ही ऐकू इच्छिता.

सौती त्यावर सांगतो, हि कथा प्रथम कृष्ण-द्वैपायन ऋषींनी सांगितली आहे त्याला ब्राह्मण मंडळी पुराण कथा असें मानतात. ती कथा माझे पिता, लोमहर्षन, जे कृष्ण-द्वैपायन म्हणजेच व्यासमुनीचे शिष्य, ह्यांनी नैमिषारण्यात रहाणाऱ्या ऋषींपुढे त्यांच्या विनंतीनुसार कथन केली आहे.

सौती पुढे सांगतात, मी त्या कथनाच्या वेळी हजर होतो. अहो शौनकजी, जसें आपण विचारत अहात मी तशीच ती कथा पुनः येथे कथन करणार आहे.

द्विज अष्टीकचे पिता, प्रजापति एवढेच समर्थवान होते. ते शुक्ल ब्रह्मचारी राहीले होते सर्व आयुष्यभर. घोर तपस्या व अनन्यचिंतनात ते आपला सर्व समय व्यतीत करीत असतं. खऱ्या तपस्व्याला शोभेल असें ते मिताहारी होते. त्यांनी त्याच्या सर्व वासना शुक्ल औदासिन्याच्या साधनेने काबूत ठेवलेल्या होत्या. ते त्यांच्या जीवाच्या शरीर संवर्धनार्थ होत असलेल्या कोणत्याही क्रियेत ढवळाढवळ करीत नसत. त्या महान तपस्व्याचे नांव होते जरत्कारू. त्याचे कुळ होते ययवरस. त्या कुळांत अनेक ऋषी झाले आहेत. उत्तम गुणी, शब्दाचे पक्के, घोर तपस्या करणारे, असें जरत्कारू एकदा देशपर्यटनासाठी निघाले. तो अनेक देश त्याकाळात फिरला व अनेक पवित्र नद्यांत त्यांने स्नान करण्याने पुण्य मिळवले. दिवसा तो प्रवास करी व रात्री विश्रांति घेत असें. मोठ्या ताकदीने तो कठीण, घोर तपस्या करीत त्याचा प्रवास करीत होता. जसें कदाचित् कोणी करू शकत असेल. जरत्कारू केवळ प्राणवायू घेऊन रहात असें. त्यांनी निद्रा पूर्णतया सोडून दिली होती. एकाद्या तेजस्वी अग्नीप्रमाणे तो वाटत असें. एके ठिकाणी त्याला त्याचा एक पूर्वज पाय वर व डोके खाली अशा अवस्थेत एका भुयारात टांगलेल्यासारखा दिसला. त्याला पाहून जरत्कारू त्याला विचारू लागला, "तू कोण आहेस? असा विरणाच्या वाखांने (तंतूंचा गुच्छ) उलटा टांगलेला असा तू काय करतो

आहेस"? "ते धागे पहा, दोनही बाजूंने उंदराने कुरतडलेले आहेत, हे सर्व काय आहे"?

ते ऐकून तो जरत्कारूचा पूर्वज सांगतो, "अरे मुला, आम्ही तपस्या करणारे ऋषी आहोत. आमच्या कुळाला ययवरस असें म्हणतात. आम्ही सदैव तपस्येत गढून गेलेले असल्यामुळे आमचा वंश क्षीण होऊन नष्टप्राय झाला आहे. आमच्या कुळात एक वंशज अजून आहे ज्याचे नांव आहे, जरत्कारू. त्याने आम्हाला कृपया वचन द्यावे किं, तो हा वंश वाढवण्यासाठी कांहीं प्रयत्न करील व हे घोर तपस्येचे वेडे व्रत सोडेल. त्यांने लग्न करावे व ह्या वंशाचा दिवा जीवंत ठेवण्याचा प्रयत्न करावा. जर वंशच नाही राहीला तर ह्या तपस्येला काहीं अर्थ उरत नाही. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक मग ती कितीही उत्तम असो वाईटच असतो, आणि म्हणूनच आम्ही अशारितीने वटवाघळासारखे उलटे टागलेले रहात आहोत". एवढे सांगून तो जरत्कारूचा पूर्वज त्याला विचारतो, "अरे ब्राह्मणा तू कोण आहेस"?

ते ऐकून जरत्कारूला फार वाईट वाटते व तो अश्रू ढाळू लागतो. ते पाहून तो पूर्वज त्याला विचारतो, "अरे ब्राह्मणा, माझे हे विधान ऐकून तू असा कां रडू लागला आहेस? आमच्या बद्दल तुझ्या मनात कां सहानुभूती उत्पन्न झाली आहे"? त्यावर जरत्कारू त्या पूर्वजाला अभिवादन करून सांगतो, "तुम्ही माझेच आजोबा किंवा खापरपणजोबा कदाचित् असाल. कारण आपण ज्या तुमच्या वंशजाचा आता उल्लेख केला तो मीच जरत्कारू आहे. अहो माझ्या पूर्वजानो, सांग मला असें मी काय केले तर तुमची

परिस्थिती सुधारेल"? ते ऐकून तो जरत्कारूचा पूर्वज त्याला सांगतो, "अरे कितीही मोठी तपस्या व घोर साधना केली तरी त्याचा कांहीं उपयोग नसतो जर त्यामुळें वंश संपत असेल. म्हणून पुढच्या पिढीला जन्म देणे व ती वाढवणे हे तितकेच महत्वाचे आहे किंबहुना, कांहीं वेळा जास्त महत्वाचे आहे कारण, ह्या विश्र्वाचा कारभार त्याशिवाय चालू शकणार नाही. म्हणून गृहस्थाश्रम सर्वात महत्वाचा मानला आहे हे आपण तपस्वी बुद्ध्या दुर्लक्षितो, ते योग्य नाही. गृहस्थाश्रम जीवासाठी प्रधान आहे व तपस्या आत्म्यासाठी, प्रत्येक तपस्व्याने जीवाच्या गरजांकडे दुर्लक्ष करण्यामुळे ही चुक होत असते. एक सामाजिक कर्तव्य म्हणून प्रत्येक साधकांनी वासनांत न गुंतता जीवाची (जीव म्हणजे देहाची कारक चैतन्य प्रेरणा, ती आत्म्यापेक्षा वेगळी असते. जीव देहाबरोबर उत्पन्न होतो व देहाबरोबर नष्ट होतो. आत्म्याचे तसें नसते.) गरज पूर्ण केली पाहिजे कारण, त्यामुळें ब्रह्माची सेवा घडते".

एवढे सांगून तो पूर्वज जरत्कारूला काकुळतीने विनंती करतो किं, त्यांने आता हे वैराग्य सोडून गृहस्थाश्रम स्वीकारावा. त्याच्या त्या बोलण्यामुळे प्रभावित झालेला जरत्कारू त्याला आश्र्वासन देतो किं, "मी संभोगसुखासाठी लग्न करणार नाही परंतु, जसे तुम्ही सांगितले तसें मी घराण्याच्या भल्यासाठी शास्त्रार्थानुसार (शास्त्रार्थ म्हणजे, सर्व ऐहिक सुख केवळ जीवाच्या समाधाना प्रित्यर्थ करणे व आत्म्याने त्यांत अजिबात न गुंतणे असें जीवन) एक बायको लग्नाची करून वंश वाढवीन. त्यासाठी जर कोणी माझे स्नेही माझ्याच वंशाची स्त्री मला भेट देतील तर तिच्याशी मी लग्न

करीन. परंतु, येथे प्रश्न असा उत्पन्न होतो किं, माझ्या सारख्या भिकाऱ्याला कोणता शहाणा बाप त्याची कन्या दान करील? तसें झाले नाही तर मी इतर वंशाची मुलगी पत्नी म्हणून स्वीकारावयास तयार होईन व आपली इच्छा पूर्ण करीन. तुम्हाला ह्या त्रासातून कांहींही करून कायमचे मुक्त करीन, अशारितीने जरत्कारू आपल्या पूर्वजास आश्वासन देतो.

आदिपर्वाचा तेरावा भाग अष्टीक पर्वाचा संपला.

# आदिपर्व भाग चौदावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती त्या जमलेल्या श्रोतृगणांस सांगतो, त्यानंतर जरत्कारू, महान तपस्वी व सत्त्वशिल साधक, योग्य अर्धांगिनी शोधण्यासाठी पुढे देशाटन करू लागतो. त्याला दुर्दैवाने सुयोग्य अर्धांगिनी मिळत नाही. असाच एके दिवशी तो निराश मनांने आपल्या पूर्वजाचे शब्द आठवत वनात फिरत अस्पष्ट आवाजात विधात्याकडे याचना करतो किं, त्याला योग्य उपवर कन्या कोणीतरी भेट द्यावी. ती जरत्कारूची याचना वासुकीच्या कानांवर पडते व तो त्याला आपली बहिण देण्याची तयारी दाखवतो. सुरुवातीला जरत्कारू त्या मागणीस नाकारतो कारण, ती कन्या जरी एरवी सुयोग्य होती तरी ती त्याच्या घराण्यातील नव्हती.

तो महान तेजस्वी ब्राह्मण वासुकीला विचारतो, "अरे सज्जना, तू कृपया तुझ्या बहिणीचे नांव काय ते सांग". त्यावर वासुकी त्याला सांगतो किं, त्याच्या बहिणीचे नांव आहे, जरत्कारु, तिला सर्वजण त्याच नांवांने बोलवतात. मी माझी गुणवान, सुडौल अशी सुरेख बहिण तुला देत आहे तिचा तू अर्धांगिनी म्हणून स्वीकार करावास. खरे पहाता, तिला मी तुझ्यासाठीच ठरवून ठेवले आहे. म्हणून कांहीं दुसरा तिसरा विचार न करतां

तू तिचा पत्नी म्हणून स्वीकार करावास. ती विनंति जरत्कारू मान्य करतो व विधीनुसार त्या दोघांचा वाङनिश्चय होतो. पुढे ते विवाहबद्ध होतात.

अशारितीने  आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा चौदावा भाग संपतो.

# आदिपर्व भाग पंधरावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती त्यानंतर सांगत असतो, ब्रह्माचे ज्ञान असलेला जाणून असतो किं, सापांच्या मातेने दिलेल्या एका पूर्व शापामुळे ज्यात ती तळतळाट व्यक्त करते कीं, अग्नीदेव तुम्हा सर्व सांपांना जाळून टाकील, त्याचा परिणाम म्हणून, राजा जनमेजयांस हा सर्पसंहारक यज्ञ करण्याची बुद्धी झाली. आता त्या तळतळाटाला काटशह देण्यासाठीच उद्देशपूर्वकपणे वासुकीने ह्या दोन जरत्कारूंचा विवाहयोग घडवून आणलेला असतो.

त्या विवाहातून त्या उभयतांना एक तेजस्वी बालक जन्मते, त्याचे नांव ते अष्टीक असें ठेवतात. अष्टीक जन्मापासूनच ज्ञानी व परम न्यायी प्रवृत्तीचा असतो. तो आपल्या आई वडीलांतील भेद त्याच्या ज्ञानांने मोडून टाकतो व त्यांना एकत्र रहाण्यास प्रवृत्त करतो.

बऱ्याच काळानंतर, पांडव कुळातील कोण्या एका राजाच्या सर्पसंहारक यज्ञापासून अष्टीक आपल्या मातेच्या कुळातील म्हणजे नांगांना सोडवतो. तसेंच आपण स्वतः बापाच्या पोटी जन्म घेऊन त्या ययवरस कुळास वाचवतो.

जरत्कारू, त्याच्या सत्त्वशिल जीवन पद्धतिमुळे व वेदाच्या ज्ञानामुळे सर्व ऋषींना प्रिय होतो, तसेंच स्वतः मुलांला जन्म देऊन तो त्याच्या पूर्वजांच्या ऋणांतून कायम मुक्त होतो व अनेक यज्ञ देवांना संतुष्ट करण्यासाठी करून शेवटी बरीच वर्षे धार्मिक कार्य करीत स्वर्गात प्रयाण करतो. त्याच्या पाठी त्याचा मुलगा अष्टीक असतो. अशी आहे अष्टीक ऋषीची कथा.

एवढे सांगून सौती मोठ्याने ओरडून शौनक ऋषीस विचारतो आणखीन काय तुम्हाला माझ्या कडून ऐकावयाचे आहे ते सांगा.

अशारितीने आदि पर्वातील पंधरावा भाग, अष्टीक पर्व, संपले.

# आदिपर्व भाग सोळावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

शौनक सौतीला विचारतो, "अहो सौती, ह्या महान ज्ञानी अष्टीकाबद्दल आणखीन माहिती सांग. आम्हा सर्वांना ते सर्व ऐकण्याची फार आतुरता आहे. तुझी विवेचन करण्याची पद्धत फरच गोड आहे. तुझे शब्दोच्चार किती स्पष्ट आहेत, आम्हा सर्वांना तुझे निरुपण फारच रोचक वाटते. तुझ्या पित्याची अशावेळी आठवण येते. तुझे पिता नेहमीच अशी आख्याने देण्यास आतुर असतं. तुझे पिता जसें सांगावयाचे तसेंच तू सुद्धा सांगावेस असे वाटते".

अशी स्तुति ऐकून सौती प्रसन्न होऊन बोलतो, "अहो वयोवृद्ध तात, मी तुमची इच्छा पूर्ण करीन. कारण, ह्या कथा मी स्वतः माझ्या वडिलांच्या तोंडून ऐकल्या आहेत, तर त्या तशाच येथे तुम्हा सर्वांना पुन्हा सांगेन". असें बोलून पुढे सौती सांगू लागतो, "ऐका ब्राह्मणांनो, सुवर्णयुगात प्रजापतिला दोन कन्या झाल्या होत्या, त्यांची नांवे होती, कद्रू व विनता. पुढे त्यांचा दोघींचा विवाह काश्यप मुनीशी झाला. काश्यप मुनीला त्या दोघींपासून खूप वैवाहीक सुख मिळाले त्यामुळे उतराई म्हणून तो एकदा त्यांना विचारतो, "मी तुमच्यावर संतुष्ट आहे तर तुम्हाला मी काय द्यावे ते मांगा".

आपला पती आपल्यावर प्रसंन्न होऊन कांहीं देण्याचे बोलत आहे हे समजल्यावर त्या दोघी आनंदाने उत्तेजित होतात. कद्रू प्रथम तिची मागणी सांगते, ती काश्यपाला विनंति करते किं, तिला हजार सर्पवंशी अपत्ये व्हावीत जे सर्व प्रकारे उत्तम असतील. ती मांगणी काश्यप मान्य करतो. आता पाळी असते, विनताची. ती मांगते किं, तिला असें दोन मुलगे पाहिजेत जे सर्व शक्तिमान असतील. तिची मांगणीसुद्धा काश्यप मुनी मान्य करतो. काश्यप त्यांना त्यांच्या मागण्यानुसार जे योग्य ते गर्भांकूर देतो व पुढील तपस्येसाठी वनात निघून जातो.

सौती सांगत असतो, "अहो अवतारी पुरुषांनो यथावकाश, कद्रूला एक हजार अंडी होतात व विनताला दोन मोठी अंडी होतात. त्या दोघींच्या सेविकां ती अंडी वेगवेगळ्या पात्रांत ती उबदार रहातील अशा बेतांने ठेवतात. पांचशे वर्षे त्यावर जातात व कद्रुची एक हजार अंडी फोडून त्यातून एक हजार नागांची पिले बाहेर येतात.

ते पाहून विनता थोडी खट्टू होते व आपल्याला झालेल्या अंड्यांतून अजून कां कांहीं बाहेर येत नाही असें म्हणून ती आवेगांने त्यातील एक अंडे फोडते. ती पहाते किं, त्यातील गर्भ अर्धवट वाढ झालेला आहे, त्याचा वरील भाग पूर्ण वाढलेला होता व खालील भाग अजून तयार झालेला नव्हता. तो गर्भ त्यामुळे विनतावर रागांवतो व तिला बोलतो, तू मला पूर्ण वाढ होण्या आधी काढलेस म्हणून मी तुला शाप देतो किं, तू दुसरे अंड पूर्ण विकसित होईपर्यंत तुझ्याच बहिणीची गुलामगिरी करशील व जेव्हां ते दुसरे अंड फोडून जो येईल तो तुला मुक्त करील. म्हणून असा अधीरपणा न करतां तू ह्या

दुसऱ्या अंड्याची चांगली निगा राख. असें बोलून तो गर्भ आकाशात उडून सूर्याकडे जातो.

सौती मोठ्याने ओरडून सांगतो, अहो ब्राह्मणांनो, तो सूर्याचा सारथी होता तो नेहमी प्रभातकाळी आकाशात दिसतो. त्यानंतर पुढील पांचशे वर्षे गेल्यावर दुसरे अंडे फुटते व त्यातून सर्प खाणारा गरूड बाहेर येतो. अहो भृगुवंशाच्या सिंहा, तो गरूड सूर्य प्रकाश दिसतांच उडून आपल्या मातेस, विनतांस सोडून जातो. त्या नवजात गरूडाला फार भूक लागलेली असते व म्हणून तो सर्प शोधण्यासाठी आकाशात भरारी मारतो.

अशारितीने आदिपर्वाचा सोळावा भाग, अष्टीक पर्व, येथे संपतो.

# आदिपर्व भाग सतरावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती म्हणाला, अहो वैराग्यानो, त्यावेळी त्या दोघी एक सुंदर घोडा त्यांच्याकडे येत असतांना पहातात. त्याचे नांव होते उचैश्रवस, ज्याची पुजा देवसुद्धा करीत असत. उचैश्रवस घोडा समुद्रमंथनाच्या समयी समुद्रातून बाहेर आला होता. दैविक, रुबाबदार, चिरतरूण, जणूकाय विधात्याची किमया असा हा घोडा ज्याचा जोम कधीही थकत नाही, जो सर्व उत्तम लक्षणांनी युक्त आहे. ते ऐकून शौनक ऋषी विचारतात, "अहो उग्रश्रव सौती, लोमहर्षाच्या मुला, आम्हाला सांग, देव व दानव मिळून समुद्रमंथन करण्यास कां उद्युक्त झाले? आणि असे काय घडले किं, असा दमदार घोडा त्या मंथनातून बाहेर आला".

सौती त्यावर सांगू लागला, "ऐका, देव काळात एक मेरु नांवाचा खूप उंच पर्वत होता. त्याच्या पृष्टभागावरून सूर्यकिरण चमकत असत. अप्रतिम स्वाभाविक सौंदर्याने मढलेला असा हा मेरू पर्वत सर्व देव, गंधर्व व दानवांचा गळ्यातील ताईत होता. पापकर्म करणाऱ्या कोणालाही त्याच्या जवळ जाता येत नसें. भयंकर हिंस्र प्राणी मेरू पर्वतावर संचार करीत असत. त्यावर अनेक स्वयंप्रकाशित वनस्पती वाढत होत्या. मेरूची उत्तुंग शिखरं

गगनाला भिडत होती. सामान्य माणसे जी पापकर्मात रमतात, ती त्याचा साधा विचारसुद्धा करू शकत नव्हती. सुंदर झरे, विलोभनीय वृक्ष ह्यांच्या मधून शिळ घालणारे वारे वाहत असत. अनेक स्वर्गीय दैवते त्या पर्वताच्या शिखरांवर व त्यांतील गुहांमध्ये वस्ती करत असतात. ज्यानी तपस्या केली आहे व जे सत्त्वशिल जीवन जगत होते त्या सर्वांना अमृत मिळविण्याची इच्छा असते. ते नारायणाला समजते व त्याबद्दल ते ब्रह्मदेवास सांगतात. अमृत खोल महासागरात आहे, ते काढण्यासाठी समुद्राचे कांही करून मंथन करावे लागेल, त्याशिवाय अमृत वर येणार नाही. अमृता बरोबर अनेक औषधी व विविध रत्न जी अमुल्य आहेत व सर्वांना उपयोगाची आहेत तीसुद्धा मिळतील.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा भाग सतरावा संपला.

# आदिपर्व भाग अठरावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती सांगू लागला, मंदार नांवाचा एक प्रचंड पर्वत आहे. त्याची उंच शिखरं नेहमीच ढगानी वेष्टीलेली असतं. हा सर्व पर्वतात सर्वश्रेष्ठ नगाधिपति होता. तो सर्व बाजूंनी एकमेकांत गुंतलेल्या वेली व इतर वनस्पतीने डवरला होता. असंख्य पक्षी त्यांच्या गुंजारवाने त्याच्या भोवतीचे वातावरण निनादत असतं. प्रचंड हिंस्र श्वापदं मंदार पर्वतावर वावरत असतं. देव, अप्सरा आणि किन्नर मंदार पर्वताला सदोदीत क्रिडा करण्यासाठी येत असतं. त्याची उंची अकरा हजार योजनं एवढी होती आणि खाली सुद्धा तसांच खोल जमिनीत घुसलेला होता. देव ठरवतात किं, मंदारला उभे चिरून त्यापासून समुद्र मंथनासाठी एक रवी करावी. परंतु, त्यांना त्यात यश मिळत नाही. मग, ते विष्णू व ब्रह्मदेवाकडे जातात. त्यांना विनंती करतात किं, कांहीं करून मंदारची रवी करण्यास आपण मदत करावी.

एवढे सांगून मग सौती पुढे बोलतो. अहो भृगुवंशातील शौनका, विष्णू व ब्रह्मदेव त्याला अनुमति देतात व विष्णू, अनंत, जो नागांचा राजपुत्र असतो, त्याला हि कामगीरी करण्यास सांगतात. अनंत त्यानुसार मंदारचे दोन उभे तुकडे करतो व त्याची रवी करण्यास सुरुवात होते. त्यामुळे, मंदार

पर्वतावर रहाणाऱ्या असंख्य जीव व वनस्पती इतस्ततः फेकल्या जातात. देव समुद्राच्या किनाऱ्यावर येतात व समुद्राला विनंती करतात, हे सागरा, आम्ही तुझे पाणी ढवळून काढू इच्छितो त्यासाठी तुझी परवानगी मागत आहोत. त्यावर सागर त्या गोष्टीला अनुमती देतो व म्हणतो त्यातून जे मिळेल त्यातील माझा हिस्सा मला मिळाला पाहिजे. ते देव मान्य करतात. त्यावर सागर त्यांना सांगतो, "ह्या ढवळण्यामुळे मला जो त्रास होणार आहे तो मी माझा हिस्सा मला मिळणार असेल तर सहन करण्यास तयार आहे". त्यानंतर देव समुद्रात बसलेल्या कासवांच्या राजांस भेटतात व मंदार पर्वताची रवी धरून ठेवण्यास त्यांनी सहाय्य करावे अशी विनंति करतात. त्यालासुद्धा तो कासवांचा अधिपती मान्यता देतो. एवढे नियोजन झाल्यावर इंद्र मंदार पर्वताची रवी त्या कासवावर उभी धरण्याची व्यवस्था करतो.

एवढे झाल्यावर देव व दानव वासुकीला रवी घुसळण्याच्या दोरखंडाचे काम करण्यासाठी विनंती करतात. वासुकिच्या तोंडाकडे दानव धरतात व देव त्याची शेपटी ओढतात. अशारितीने सागरमंथनाला सुरुवात होते.

त्या खेचाताणीमुळे वासुकीच्या तोंडातून ज्वाळा जोरांनी निघू लागतात. त्याचा फार त्रास दानवांना होतो व ते चिडतात. त्या उलट मंदार पर्वतावरील झाडांची सुगंधी फुलं व इतर चांगल्या गोष्टींचा देवांवर वर्षाव सुरु होतो व त्यामुळे ते आनंदी होतात. हेसुद्धा दानवांना रुचत नाही. आपल्यालाही कांहीं मिळेल अशा आशेने राक्षस व दैत्य प्रथम देवांना सामील

होण्याचा प्रयत्न करतात परंतु, देव तो प्रस्ताव स्वीकारत नाहीत म्हणून मग ते दानवांना सामील होतात.

मंथन मोठ्या जोरांने होत असतांना समुद्रातून प्रचंड आवाज निघत असतात व असें होत असतांना समुद्रातून उंच उडणाऱ्या पाण्याच्या तुषारांची ढगे नभात पसरत होती. अनेक लहान मोठे जलचर त्या घुसळण्याच्या क्रियेमुळे त्यात सांपडून मारले जात होते. वरुणलोकातील बरेच जीव त्यात घुसळले जात होते. मंदार पर्वत जोरांने गोल फिरत असल्यामुळे अनेक प्रचंड वृक्ष त्यांच्या मुळापासून उखडले गेले व समुद्रात फेकले गेले. हे वृक्ष एकमेकांवर घासले गेल्यामुळे उष्णता उत्पन्न होत होती व त्याकारणांने सर्वत्र आगी लागल्या होत्या. त्यामुळे निर्माण होणाऱ्या काळया धुरांने सभोवारचे आसमंत काळेकूट्ट झाले होते. संपूर्ण मंदार पर्वत अशा आगीतून निघणाऱ्या ज्वाळा व काळी धुरांची ढगे ह्यांचा बनला आहे कां असे वाटत होते. त्या भयावह आगीत बरेच हत्ती, वाघ, सिंह व असें बरेच जीव मारले गेले. त्या आगीची मंथन कार्यात आवश्यकता नाही व तो अग्नी थांबवला गेला पाहिजे म्हणून विष्णूनी इंद्राला पाऊस पाडून तो भयानक अग्नी विझवण्यास सांगितले.

बराच काळ घुसळण्याची क्रिया चालू असतांना मंदार पर्वतातील जे औषधी वृक्ष समुद्रात पडले व पाण्यात घुसळले गेले त्यांच्यातून बाहेर आलेल्या राळ, औषधी द्रव्ये व चीक ह्यांच्यामुळे सागराचे पाणी औषधी झाले व ज्या देवांनी ते प्राशन केले त्यांनी अमृत प्याल्यासारखे वाटू लागले. परंतु, खरे अमृत अजून बाहेर आलेले नसते. अखेरीस अशी वेळ येते कीं, सगळे देव

ब्रह्मदेवाला भेटतात व विनंति करतांत किं, ते थकले आहेत व आणखीन घुसळणे त्यांना शक्य नाही, अमृत कांहीं मिळाले नाही. तेव्हा आपण अमृतचा शोध घेण्याचे सोडून द्यावे कां? ते ऐकून ब्रह्मदेव नारायणाला विचारतात, देवांना जास्त शक्ति आपण द्यावी कां? त्यावेळी राक्षस, असूर व दैत्य देवांना मिळून काम करण्याचा प्रस्ताव मांडतात परंतु, देव तो स्वीकारत नाहीत. शेवटी नारायण त्या देवांना अधिक शक्ति देतात व घुसळण्याची क्रिया पुन्हा सुरु होते. थोड्यावेळांनी एक मंदपणे चमकणारा चंद्र समुद्रातून हळू हळू बाहेर येऊ लागतो. त्यानंतर लक्ष्मी देवता शुभ्र वस्त्र परिधान केलेली समुद्रातून बाहेर येते. त्यानंतर सोम व उचैश्रवस नांवाचा शुभ्र घोडा बाहेर येतात. त्यानंतर स्वर्गीय रत्न कौस्तुभ बाहेर येतो व तो विष्णूला दिला जातो. अशारितीने एक एक करून ही रत्ने बाहेर येऊ लागल्यामुळे देवांचा हुरुप वाढतो व ते जोरांने घुसळण्याच्या कामाला लागतात. त्यानंतर दैवी धनवंतरी सागरातून बाहेर येतो. धनवंतरीच्या हातात शुभ्र रंगाचा कलश असतो व त्यात अमृत असते. ते पाहून दानव, असूर, दैत्य व राक्षस एकच कोलाहल करून त्याचे स्वागत करतात. ते ओरडून जाहिर करू लागतात किं, बाकीची रत्ने देव व देवतांनी (विष्णू, इंद्र इत्यादि) घेतली आहेत तेव्हां हे त्यांच्यासाठीच आहे. त्यानंतर त्या घुसळत असलेल्या सागरातून प्रचंड आकाराचा ऐरावत (अनेक सोंडी असलेला हत्ती) बाहेर येतो. त्याचे अवाढव्य दात पाहून सर्व अचंबित झाले. ऐरावत येतांच देवांचा राजा इंद्र पुढे येतो व त्याला स्वीकारतो. घुसळण्याची क्रिया चालूच असते. त्यातून काळकूट

नांवाचे विष आता समुद्रातून बाहेर येते. काळकूट सर्व आसमंतात झपाट्याने पसरू लागते व त्यामुळे सर्व संबंधित घाबरून जातात. तिन्ही जगं (आदिदैवतांचे जग, अदृष्य जग व दृष्य जग) थक्क होतात. आता काय करावे असा प्रश्न त्यांना पडतो. पृथ्वी जणूकाय पेटली आहे अशाप्रकारे सर्वकडे धूर पसरतो. त्या भयंकर काळकूटाचा दुर्गंध सर्वकडे पसरतो.

अशावेळी सर्वांना महादेवाची आठवण येते कारण फक्त महादेवच केवळ त्या काळकूटाचा बंदोबस्त करू शकतो हे ते सगळे जाणून असतात. त्यावेळी दैत्य व राक्षस जे महादेवाची नित्य भक्ति करत ते त्याला विनंती करतात किं, हे काळकूट देवांनी इतर रत्नांप्रमाणे स्वीकारावे परंतु, महादेव त्याकडे दुर्लक्ष करतात कारण, ही विनंती एका षड्रीपूंनी (मत्सराने) बाधीत होती. ब्रह्मदेव महादेवाकडे जाऊन विनंति करतात किं, कृपया महादेवा तूम्हीच फक्त ह्या जगाला ह्या काळकूटापासून वाचवू शकता. त्या विनंतीला मान देऊन महादेव ते सर्व काळकूट पिऊन टाकतात. ज्या काळकूटाने संपूर्ण जग नष्ट केले असते ते महादेव पितात व त्याच्या विषामुळे महादेवाच्या गळयात ते बसते व त्याचा कंठ नीळा होतो. तेव्हांपासून महादेवाला निलकंठ असें नांव मिळते.

ह्या सर्व अजब गोष्टीं दानव, असूर, दैत्य व राक्षसांना नाराज करतात. त्यांना फक्त दोनच गोष्टींमध्ये रस असतो व त्या मिळविण्यासाठी ते देवांशी लढण्यास तयार होतात. त्या दोन गोष्टी असतात, लक्ष्मी व अमृत. त्यातील अमृत दानव धनवंतरीच्या हातातून हुसकावून घेतात.

ह्या तिघांना कोणत्याही रित्या हरवणे देवांना शक्य नाही हे जाणून विष्णू त्यांना त्यांच्या वासनांत अडकवण्यासाठी आपली माया (भ्रम शक्ति) वापरण्याचे ठरवतात. विष्णू एका भ्रामक सुंदरीचे रुप घेतात व त्यांच्या (दानव, दैत्य व राक्षस) पुढे जातात. अपेक्षेप्रमाणे ते (दानव, दैत्य व राक्षस) त्या मोहक सुंदरीच्या मागे लागतात. त्या नादात ते आपला उद्देश विसरतात व त्या सुंदरीच्या मागे मागे धावू लागतात. ती त्यांना तो अमृताचा कलश तिला देण्याची प्रेमपूर्वक विनंती करते व ते तो कलश तिला देतात. त्या बरोबर ती सुंदरी आपले मायावी रुप टाकून देते व विष्णू तो अमृताने भरलेला कलश देवांना देतो. दानव, दैत्य व राक्षस आपली फसवणूक झाली हे समजतात व देवांशी दोन हात करण्याच्या तयारीस लागतात.

अशारितीने आदि पर्वातील अष्टीक पर्वाचा अठरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकोणीसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती सांगत रहातो, त्यानंतर अतिउत्तम शस्त्रास्त्रानी सज्ज असें ते दानव, दैत्य व राक्षस देवांवर हल्ला करण्यासाठी निघतात. देव समजतात किं, आता आपल्याकडे फार थोडा समय आहे व तेवढ्या वेळात जर आपण अमृत प्राशन करून अमर नाही झालो तर हे तिघे आपल्याला मारून टाकतील. त्यामुळे भयभित झालेले देव घाईघायीत ते अमृत पिऊ लागतात. त्या घाईघायीत देवांना कळणार नाही अशाप्रकारे एक दानव, राहू, देवांत घुसून अमृत पिण्यास सुरुवात करतो. ते अमृत राहूच्या कंठापर्यंत पोहोचले तेव्हढ्यात सूर्य व सोम राहूला ओळखतात व नारायणाला सांगतात. तत्क्षणी नारायण आपले सुदर्शन चक्र फेकून राहूचे शिर त्याच्या धडापासून वेगळे करतो असें किं, ते अमृत त्याच्या देहात पोहोचत नाही. राहूचे प्रचंड शिर जे जोरजोरांने किंचाळत असते व जे एकाद्या पर्वतासारखे वाटत होते, उंच आकाशात भिरकावले जाते. राहूचे धड जमिनीवर कोसळते व त्या धडाक्याने सगळी पृथ्वी थरथरते. त्या घटनेपासून राहूचे भांडण सूर्य व सोम ह्यात चालू आहे आणि म्हणूनच दर ग्रहणाच्या समयी राहू, सूर्य व चंद्रास ग्रासत असतो. राहू सूर्याला व चंद्राला शाप देतो कीं, त्याचे अंश असुरांना द्वापारयुगात साथ देतील.

त्यानंतर सुंदर स्त्रीचे सोंग टाकलेला नारायण आपल्या अनेकविध शस्त्रांनी त्या तिघांवर आक्रमण करतो. त्या हल्ल्याने ते तिघे थरकापतात. त्या समुद्र किनारी, विविध शस्त्रांनी लढल्या गेलेल्या लढाईत, दानव, दैत्य व राक्षस असें तिघे मोठ्या प्रमाणात घायाळ होतात व रक्त ओकतात. त्यांच्या डोक्यावरील सोनेरी शिरस्त्राणें जमिनीवर इतस्ततः पडली होती. त्यांची शरीरें सर्वत्र विखरून पडलेली दिसत होती. त्यांच्या लाल रक्तांने माती रक्तरंजित झाली होती. सूर्य उगवतांच दोनही बाजूंचे योद्धे आपापली शस्त्रे घेऊन पुन्हा लढण्यास पुढे सरसावत होते. आणि एकमेकांना त्यांच्या तीक्ष्ण शस्त्रांनी घायाळ करीत होते. कांहीं दीर्घ शस्त्रांच्या लांबीनुसार अंतर राखून लढत होते व कांही जे मुष्ठीयुद्ध करीत होते ते एकमेकांना भिडून मारत होते. ते आसमंत त्यांच्या ओरडाओरडीने व किंचाळयाने भरून गेले होते. त्याला मार, त्याला भोसक, त्याना फेकून दे अशा आज्ञा येथून तेथून ऐकू येत होत्या. संपूर्ण परिसर भयंकर झाला होता. युद्ध ऐन जोरात असतांना नर व नारायण त्या युद्धात प्रवेश करतात. आता लढाईचे पारडे त्यांच्या युद्धात भाग घेण्याने देवांच्या बाजूला झुकले. नारायणाच्या सुदर्शन चक्रातून बाहेर पडणारे अग्नी सर्वत्र विनाशाचे लक्षण प्रतित करीत होते. असें झाल्यावर दैत्यांनीसुद्धा त्यांच्या अंतिम ताकदीचा उपयोग करण्यास सुरुवात केली. त्यांनीसुद्धा अवकाशात भरारी मारून उंच नभात गरगर फिरणारे अशनी जे एकाद्या प्रचंड पर्वतांसारखे होते, ते पकडून खाली पृथ्वीवर फेकण्यास सुरुवात केली. त्यामुळे पृथ्वीवरील जंगले, पशु पक्षी, इतर जीवजीवाणू नष्ट होऊ लागले

जणूकाय युगाचा अंत आला आहे असें वाटू लागले. ते प्रचंड अशनी खाली येतांना एकमेकांवर आपटून कानठळ्या बसवणारे आवाज करीत होते. त्यांच्या मातीत पडण्याने हवेत उंचवर माती उडून आकाशात त्यांची ढगे पसरली होती.

हे आता फार झाले असें ठरवून अखेरीस दिव्य अशा नरांने, दानव व असूर आणि शंकराचे गण, जे सुद्धा त्या युद्धात त्या बाजूने सामील झाले होते, त्यांच्या मध्ये उभे राहून, त्याच्या हातातील सोन्याचे टोक असलेल्या बाणांनी आकाशातून येणाऱ्या प्रचंड अशनींना भेदण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्या अशनींचे बारीक तुकडे होऊन सर्वत्र पडू लागले. अशारितीने त्यांची धूळ झाल्यामुळे त्यांच्यापासून जे आघात होऊन देवांचे व इतरांचे नुकसान होत असें ते थांबले.

असें युद्ध करून आपल्याला अमृत मिळणार नाही हे ते समजले व आता ते पृथ्वीच्या उदरांत शिरले व पाण्यात आश्रय घेऊन राहीले. हे पाहून देव समजले किं, त्यांचा विजय झाला आहे. देवांनी मंदार पर्वताचे मनःपूर्वक आभार मानले व त्याची शकले पुनः जोडून त्याला पुर्ववत केले. आनंदाने ओरडत देव आपल्या देवलोकांस परतले. त्या आधी तो अमृताचा कलश इंद्र व इतर देव नारायणाकडे सुरक्षिततेसाठी सुपूर्द करतात.

येथे एक प्रश्न उपस्थित होतो किं, सागरमंथनात देवांनी इतरांना सामील केले व त्यांच्या कडून काम करून घेतले परंतु, जेव्हां फल प्राप्तीची वेळ आली तेव्हां त्यांना नारायणांने कां मदत केली नाही? त्यावर शौनक

ऋषी इतर मुनींना प्रबोधन करतात कीं, देव षड्रीपूंच्या आहारी न जाता आपली कामे करतात म्हणून ते नारायणांस प्रिय होते व हे इतर जण (दानव, दैत्य, राक्षस, असूर) षड्रीपूंच्या आहारी जाऊन आपली कामे करतात म्हणून त्यांना अमृत व लक्ष्मी मिळू नये अशी नारायणाची इच्छा होती. त्या विवेचनानी ते समाधानी झाले.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा एकोणीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग विसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

त्यापुढे सौती सांगतो, अशारितीने मी अमृत मंथनाची सर्व कथा तुम्हाला सांगितली आहे. त्यात कसा तो तेजस्वी घोडा, ज्याचे नांव उचैश्रवस आहे तो समुद्रातून बाहेर आला तेसुद्धा सांगितले.

ह्या उचैश्रवस घोड्याबद्दल काश्यपाची बायको कद्रू हीला विशेष कुतुहल निर्माण होते व ती आपल्या बहिणास, विनताला विचारते, "अग विनता, माझ्या प्रिय बहिणी, तू मला सांग, ह्या उचैश्रवस घोड्याचा रंग कोणता आहे"? त्यावर विनता सांगते, "त्यात काय मोठे तू विचारलेस, अग, त्याचा वर्ण शुभ्र आहे".

हे ऐकून कद्रू बोलते, "चल विनता, ह्यावर आपण पैज लावूया, कारण माझ्या मते त्या घोड्याची शेपटी काळ्या वर्णाचा आहे. तो पूर्णपणे शुभ्र नाही".

पुढे कद्रू विनताला आव्हान देते किं, काय ती कद्रूचे विधान खोटे ठरवू शकेल? जर ती हरली तर ती माझ्याकडे गुलामी करील व जर मी हरले तर मी विनताकडे गुलामी करेन. तेवढे बोलून त्या दोघी भगिनी आपापल्या

निवासी गेल्या. दोघीनी स्वताच्या मनांत निश्चय केला होता किं, त्या दुसऱ्या दिवशी उचैश्रवसची शेपुट तपासणार.

कद्रू आपल्या कारस्थानी स्वभावानुसार आपल्या एक हजार सर्प बालकांस सांगते किं, त्यांनी केसासारखे बारीक होऊन उचैश्रवसाच्या शेपटीवर असें बसावे कीं, ती शेपटी काळी भासेल. असें केल्याने कद्रू पैज जिकेल व गुलाम होण्याची पाळी तिच्यावर येणार नाही. परंतु, ते प्रामाणिक सर्प तिच्या विनंतीस मान्य करीत नाहीत. त्यामुळे चिडून कद्रू त्यांना शाप देते. "जेव्हां पांडव वंशातील राजा जनमेजय सर्पनाशक यज्ञ करील तेव्हां त्या यज्ञाचा अग्नी तुम्हा सर्वांना भस्म करील. तो शाप, जो विधीलेखात होता, त्या बाल सर्पांचा पिता काश्यप ऋषी ऐकतो. आपल्या अपत्यांवरील प्रेमामुळे तो ऋषी इतर देवांना त्या शापाच्या यथायोग्यते बद्दल चौकशी करतो व त्यांचे मत विचारतो, त्यावर ते सांगतात किं, हे साप त्यांच्या मातेचा दंश करण्याचा गुण वाढवत आहेत व त्यामुळे बऱ्याच वेळा विनाकारण अनेक लोक त्यांच्या दंशामुळे मरतात, तेव्हा ही शिक्षा जी त्यांच्याच आईने दिली आहे ती इतर प्राण्यांच्या दृष्टीने योग्यच आहे असे मत दिले. एवढे सांगून ते सर्व देव निघून गेले.

ते ऐकून काश्यप आवेगांने उद्गारतो, अरे माझ्या बाळांनो, तुमच्यात जबरी विष आहे व तुम्ही देहांनी सुद्धा अवाढव्य आहात असें तुम्ही तिच्या शापांने नष्ट होणार हे विधीलिखीत आहे तेव्हां मी त्यात कांहींही बदल करू शकणार नाही. काश्यपाचे ते दुःखद उद्गार ऐकून प्रजापतीला वाईट वाटते व

तो काश्यपाला सर्व प्रकारच्या विषापासून मुक्ति मिळवण्याचे तंत्र शिकवतो. अशारितीने ऋषी काश्यप पहिले वैद्य होतात.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीकपर्वाचा विसावा भाग येते संपतो.

# आदिपर्व भाग एकविसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती पुढे सांगतो, अहो तपस्वी शौनक, जेव्हां रात्र संपते व सूर्याची किरणे पसरतात, त्या दोन बहिणी कद्रू व विनता, मोठ्या उत्सुकतेने आपली गुलामगीरीची पैज काय सांगते ते पहाण्यासाठी लगबगीने उचैश्रवस घोड्याकडे प्रस्थान करतात. त्याकडे जाण्यासाठी त्यांना समुद्र पार करावा लागतो.

तो अफाट पसरलेला सागर ज्याच्या खोलीचा मोजमाप नाही, ज्याच्या लाटा विराट अशा किं, त्यात असंख्य मांसे, मगरी, अनेक विशाल प्राणी जे मोठ्या देवमाशालासुद्धा गिळंकृत करू शकतात असें तरंगत असतात. राक्षसासारखे दिसणारे काळेकभिन्न असे मांसे ज्यांच्यामुळे त्या सागरावरून जांताना एकाद्याला भिती वाटावी. अनेक विध रत्नांनी भरलेला असा तो समुद्र ज्याची देवता आहे, वरुण आणि जेथे नागवंशाच्या लोकांची मोठी वस्ती कायम असते. अशा समुद्राला सर्व लहान मोठ्या नद्या येऊन मिळतात. ज्यात भूगर्भातील अग्नी सतत पेटत असतो, जो असुरांचा मित्र ज्याची भिती सर्व प्राणिमात्रांना वाटते असे ते असुर तेथे वास करीत असतात. जगातील सर्वात मोठा पाण्याचा साठा असा तो समुद्र जो सर्व देवांना पुज्य आहे. ज्याच्यातून अमृत मिळते, ज्याच्या खाऱ्या पाण्याने सर्व पापे धुऊन टाकता येतात. पहाण्यास विलोभनीय, अंधारात काळा चमकणारा व दिवसा नीळा वाटणारा ज्याला खरोखरीच स्वताचा असा रंग नसलेला असा तो

सागर त्या तरून जाण्याचा प्रयत्न करणार होत्या. जो त्याच्यातील खाऱ्या पाण्याने सर्व भूमि पुनः पुन्हा धुऊन टाकून शुद्ध करीत असतो. ज्याच्या पाण्याच्या लाटांचे गरजणे सर्वांना भयभीत करते. ज्यात असंख्य भोवरे वाऱ्याच्या जोरामुळे उत्पन्न होत आहेत. अशा सर्व गोष्टींमुळे तो समुद्र सर्वांना घाबरवून टाकत असतो. जेव्हां त्याच्यात मोठ्या लाटा हवेत उंच उडतात तेव्हां असे वाटावे किं, जणूकाय तो त्याच्या अगणित हातांने कोणाला तरी बोलावत आहे. जो चंद्राच्या कलांनुसार वागतो, ज्याच्यात वासुदेवाच्या पाङ्चजन्य शंखूचे वंशज कायमपणे रहात आहेत, आणि ज्याचे अथांग पाणी माधवाच्या कुर्म अवताराच्या वेळी जेव्हा तो त्यात बुडलेल्या पृथ्वीस बाहेर काढतो, मोठ्या प्रमाणात घुसळले जाते. ज्याचा तळ अत्री ऋषीला शंभर वर्षे प्रयत्न करूनही शोधून काढता आला नाही. ज्याच्यात कमळधारी विष्णू योगमुद्रेत निद्रीस्त आहे. अध्यात्मिक शांततेचे प्रतिक अशी ती निद्रा विष्णू त्यात अनुभवत असतो. जेथे मैनक आणि दानव, राक्षस आणि दैत्यांनी समुद्रमंथनाच्या नंतर देवांशी झालेल्या लढाईत अखेरचा आसरा घेतला, ज्याचे पाणी यज्ञात जसें लोणी देतात तसें वरव अप्सरेस शांत करण्यासाठी वापरले गेले. जो सर्व नद्यांचा स्वामी आहे. कद्रू व विनता त्यावरून जातांना त्यांना त्या सागरात येऊन मिळणाऱ्या हजारो प्रचंड नद्या त्याच्याकडे मोठ्या रुबाबात शिरतांना दिसतात. तो अथाग सागर ते पाहून जणूकाय आनंदाने त्यांचे असंख्य लाटांच्या रुपाने स्वागत करीत आहे. त्या सागराच्या अफाटपणाची त्या दोघींना सतत जाणीव व्हावी असें त्याचे एकंदर रुप होते.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा एकवीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग बावीसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती सांगत असतो, शेवटी कद्रूची सर्प मुलं असें ठरवतात किं, आपण आपल्या मातेची इच्छा पूर्ण करण्यातच आपल्या सर्वांचे अंतिम हित आहे. असें केल्यांने ती तिने दिलेला शाप मागे घेईल अशी ते अपेक्षा करीत असतात. कारण, एरवी ते व त्यांचे पुढे निपजणारे वंशज अग्नी खाऊन टाकील. ते सर्व बोलतात, चला आपण बारीक केसाचे रुप घेऊन त्या घोड्याच्या शेपटावरील केसांवर चिकटून बसू म्हणजे त्याची शेपूट काळी भासेल. असें बोलून ते तत्क्षणी उच्चैश्रवसाच्या शेपटावर जाऊन बसतात.

येथे त्या दोघी बहिणी ज्याचा पिता दक्ष प्रजापति आहे, त्याचा सागरावरील प्रवास, आकाशातून होत असलेला, अजून करीतच असतात. उच्चैश्रवस घोडा सागराच्या पैलतरावरील भूमीवर असल्याने तो प्रवास करण्यावाचून त्यांना पर्याय नसतो.

त्या दोघी तो अथांग सागर पहात असतात. एकाद्या अफाट भांड्यात पाणी साठवून ठेवले आहे असे ते दिसत होते. एरवी शांत वाटणारा तो समुद्र त्यावर वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे थोडा हलत आहे असें त्यांना वाटत होते. त्यातील मासे अधून मधून उंच उड्या मारून पुन्हा त्या पाण्यात पडत

होते असें त्या पहातात. त्यात लहान माशांबरोबर मोठे मगरीसारखे प्राणी दिसत होते.

त्यांना माहीत होते किं, त्यात अगणित रत्ने व मौल्यवान गोष्टीं भरलेल्या आहेत. त्यात नागवंशाचे लोक रहातात हेसुद्धा त्या जाणून असतात. तो सर्व नद्यांचा स्वामी आहे तेसुद्धा त्यांना माहीत असते. त्या विशाल जलाशयांत सतत पेटणारा अग्नीसुद्धा आहे तसेच तो असुरांचे वस्तिस्थान आहे हे त्या जाणून असतात. त्या सागरातील पाणी कधीच नांसत नाही म्हणून ते नेहमीच शुद्ध असते. हे त्याचे वैशिष्ट त्यांना माहीत असते. त्यात अनेक सुगंधी वनस्पती व अमृत असते तसेंच अमुल्य रत्ने असतात तेसुद्धा त्यांना माहीत असते.

समुद्राचे पाणी खारे असले तरी ते इतके शुद्ध असते किं, त्याच्या मदतीने सर्व अपवित्र गोष्टी शुद्ध करतां येतात. त्यावर अनेक पवित्र देवतांचा संचार असतो, ज्यांची पुजा केली जाते. त्यातूनच अमृत साठवलेले आहे हे सगळे त्यांना माहीत असते. चहोबाजूस तो आकाशाला क्षितीजीला भिडलेला असा भासतो हे त्या प्रत्यक्ष पहात असतात. अशा विलक्षण सागरावरून त्या चटकन पैलतीरी येतात.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा बावीसावा भाग संपतो.

# आदिपर्व भाग तेविसावा

## (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती सांगत रहातो, अशारितीने प्रवास जलद उरकून त्या दोघी उचैश्रवसाच्या जागी पोहोचतात. त्या दोघीही प्रथमच त्या वायूवेगांने प्रवास करणाऱ्या स्वर्गीय घोड्यास पहात असतात. त्याचे शरीर चंद्राच्या किरणांप्रमाणे शुभ्र दिसते परंतु, त्याची शेपुट काळीशार भासते. ते पाहून कद्रू ओरडून विनताला सांगते किं, ती पैज जिकली आहे व ठरल्याप्रमाणे आतापासून विनता तिची दासी झाली आहे. विनतासुद्धा त्या घोड्याची शेपूट काळी आहे असे पहाते व आपण पैज हरलो हे मान्य करते. आपण पैज हरलो त्याचे तिला फार वाईट वाटते परंतु, तिच्याच अंड्यातून अपरिपक्व बाहेर पडलेल्या गर्भाने दिलाला शाप तिला आठवतो व ती गप्प बसते, त्या शापाच्या उःशापानुसार दुसऱ्या अंड्यातून तिचा दुसरा गर्भ परिपक्व होऊन बाहेर येईल तोवर तिला ही गुलामगीरी करावी लागणार असते. कद्रू जेव्हढी कपटकारस्थानी असते तितकीच तिची बहिण विनता निर्मळ व सत्त्वशिल असते. येथे कपट कारस्थानीपणाने निर्मळ सत्त्वशिलतेवर मात केलेली असते.

विनता त्या अंड्यातून तिचे दुसरे अपत्य केव्हां बाहेर येते त्याची आतूरतेने वाट पहात असते. यथावकाश जसें ती आणखीन पांचशे वर्षे पूर्ण होतात तेव्हां ते अंडे स्वताहून कोणाच्याही मदतीशिवाय फोडून विनताचा

दुसरा मुलगा बाहेर येतो. तो असतो, तेजस्वी गरूड. त्याच्या पसरलेल्या पंखांत जणू सर्व जग धरले आहे असें वाटत होते. तो विलक्षण गरूड त्याच्या मर्जीने कोणताही आकार घेऊ शकत होता. आणि त्याला पाहिजे तेथे उडून जाऊ शकत होता. त्याची शक्ती तो कितीही कमी अथवा जास्त करू शकत होता. एकादा अग्नीचा गोळा असावा असां तो भडकलेला दिसत होता. युगांत होतो तेव्हां जसें सर्वत्र ज्वाळांचा प्रकाश पसरतो तसा त्याच्या अंगातून येणाऱ्या ज्वाळा वाटत होत्या. त्याचे प्रत्येक पिस ज्वाळेसारखे वाटत होते. त्याच्या डोळयाची चमक अशी होती किं, जणूकाय विजांचा लखलखाट आहे.

जन्म झाल्यावर लवकरच त्याची वाढ होत गेली व तो आकारांने खूपच विशाल दिसू लागला. त्यानंतर त्यांनी त्याची पहिली भरारी आकाशात मारली व तो उडू लागला. त्याला पाहून सर्व देव देवता अचंबित झाल्या व त्यापासून संरक्षण मिळावे म्हणून विभवासाकडे (अग्नीकडे) विनवण्या करू लागल्या.

आदराने वाकून ते त्या अग्नीकडे जाऊन प्रार्थना करतात, "अहो बळवान अग्नी, तू असा वाढत राहिलास तर आम्ही सर्व जळून जाऊ तेव्हां कृपया तू तुझा आकार आवरावास".

हे ऐकून अग्नी देव हसून त्या देव देवतांना सांगतो, "अरे असुरांचा पराभव करणाऱ्या देव देवतांनो, हा मी नाही हा महान शक्तिमान असा गरूड आहे. तो माझ्या इतकांच प्रबळ आहे हे खरे पण तो विनताचा मुलगा आहे.

त्याच्या अफाट तेजांमुळे तुमचा गैरसमज झाला आहे. तो काश्यप ऋषीचा सामर्थ्यवान मुलगा आहे. तो नागांचा विनाश करणारा आहे. तो तुमचे भले करणारा व राक्षस, दानव व दैत्यांचा नाश करणारा आहे. त्याला घाबरू नका. चला माझ्याबरोबर या", आणि ते व इतर ऋषी त्याच्याकडे गेले. त्याला थोड्या दूरूनच ते न्याहाळू लागले.

त्यानंतर देव त्या गरूडाला उद्देशून बोलतात, "अरे सर्व मंत्रशास्त्र जाणणाऱ्या ऋषी, जो यज्ञातील मोठा हिस्सा घेतो, जो सदैव तेजाने चमकतो, जो सर्व पक्षांचा स्वामी आहे, जो सर्व अचेतन व चेतन गोष्टींचा अधिकारी आहे, असा तू, जो सर्व निर्माण करतो व नष्टसुद्धा करतो, तू हिरण्यगर्भ आहेस. तू सर्व प्रजापतींना उत्पन्न केले आहेस. तूंच इंद्र आहेस, तूंच हयग्रीव (घोड्याचे तोंड असलेला विष्णूचा अवतार) व त्याचा बाण (त्रिपुराला जाळून टाकण्यासाठी जो बाण महादेवानी फेकला तो) म्हणजे तूंच विष्णू आहेस. तूंच विश्वदेव आहेस. तूंच विष्णूचे मुख आहेस, तूंच चारमुख असलेली पद्मजा आहेस. तूंच शहाणपण आहेस, तूंच अग्नी आहेस, तूंच सर्व वस्तुमात्रांना आश्रय देणारी देवता आहेस. तूंच ज्ञान व तूंच माया (अज्ञान) आहेस. तूंच विश्वातील सर्वत्र पसरलेली उर्जा आहेस, तूंच सर्व देवांचा अधिपती आहेस, तूंच सत्य आहेस, तूं निर्भय आहेस, तू नित्य आहेस, तूंच निर्गुण ब्रह्म आहेस, तूंच सूर्याची उर्जा आहेस, तूंच विश्वातील बुद्धिमत्ता आहेस, तूंच आम्हा सर्वांचा संरक्षण कर्ता आहेस. पवित्र सागर हे तुझेच एक रुप आहे, तूंच पावित्र्य आहेस, तूंच प्रकाश आहेस, तूंच सर्व उत्तम गुणांचा

कारक आहेस. तूंच सर्व असलेल्या व नसलेल्या गोष्टींचा कारक आहेस. तूंच अजिंक्य आहेस. सूर्य ज्याप्रमाणे सर्व गोष्टी दृष्य करतो तसे तूसुद्धा आमच्यासाठी करावेस. तूं अग्नीसारखा चमकतोस व जसें सूर्य सर्व कांही भाजून काढतो तसें तू सुद्धा करतोस. अरे सर्व शक्तिमान गरूड देवा, तूं आकाशात उडतोस तसेंच आमचे संरक्षण आमच्या शत्रूंपासून करावेस अशी प्रार्थना करतो. तुझ्या तेजाचे काय वर्णावे. तूंच आशिर्वाद देणारा व तूंच शाप देणारा आहेस, तुझ्या तेजांने आम्ही देव देवता पार घाबरलो आहोत. त्यामुळे ते सर्वजण इतस्ततः आपापल्या रथांतून पळत आहेत. तू कृपाळू आहेस तेव्हां तू आमचे संरक्षण कर. तू महान काश्यप ऋषींचा मुलगा आहेस म्हणून तूं आमच्यावर न रागवता आम्हाला सांभाळशील अशी अपेक्षा करतो. अरे गरूडा तूं असा कां थरथरतो आहेस! तुझ्या ओरडण्याने सर्व दहाही दिशा, आकाश, पृथ्वी व स्वर्ग थरथरत आहेत. अशा तुझ्या वागण्यामुळे आमचा धीर सुटला आहे. तुझे शरीर अग्नीसारखे दिसत आहे. तू साक्षात यमदेव वाटतो आहेस. तूं आमच्यावर कृपा कर व आमचे जीवन सुखी कर".

अशा रितीने, हर प्रकारे गरूडाची स्तुती ते करतात व त्याला शांत करतात. त्यामुळे संतुष्ट होऊन तो आपले प्रचंड रुप आवरते घेतो व लहान होतो.

अशाप्रकारे आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा तेवीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग चोविसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती सांगतो, तो गरूड एवढी स्तुती ऐकून स्वताच्या देहाकडे पहात रहातो व त्याच वेळी तो सुदर पिसे असलेला पक्षी आकारांने लहान होत जातो. गरूड त्यावेळी बोलतो, कोणीही मला घाबरू नये. माझ्या अवाढव्य आकाराला भिऊन जर तुम्ही घाबरत असाल तर मी माझा आकार व शक्ती कमी करीत आहे.

तो स्वताच्या सामर्थ्याने कोठेही जाऊ शकणारा, आकाशात स्वैरपणे फिरणारा, त्याच्या चाहत्यांना सदैव मदत करणारा, अरुण (सकाळ) पाठीवर घेऊन आकाशात पुढे जाणारा, शेवटी आपला पिता, काश्यप ह्यांच्या घरी पोहोचतो. तेथून तो लिलया अफाट समुद्र ओलांडून आपल्या मातेच्या बाजूला पूर्वेला येतो व तेथे अरुणला सूर्य उगवण्या आधी ठेवून देतो. जेव्हां सूर्य आपल्या भयंकर उष्णतेने सर्वकांहीं भस्म करणार असतो. शौनक विचारतात, "अरे सुता, परंतु, महान सूर्य त्याच्या उष्णतेने सर्वकांही जाळण्याचा निश्चय कां करतो? असें काय देवांनी केले किं, सूर्य सर्व जग भस्मसात करण्याचा निर्णय घेतो? त्याचा राग कोणावर होता"?

सौती सांगतो, "अहो निष्पाप शौनका, त्याचे असें झाले, एक दानव, राहू त्याचे नांव, चोरून देवांत शिरून अमृत पिण्याचा प्रयत्न करत असतो.

त्याला सूर्य व चंद्र हातोहात पकडतात, तेव्हांपासून राहूचे त्या सर्व देवांशी वैर होते. कारण, नारायण त्याचे शिर त्याच्या धडापासून वेगळे करतो. त्यावरून वचपा काढण्यासाठी तो राहू सुर्याला गिळण्याचा प्रयत्न करतो. राहूला पकडून देण्यामुळे सूर्याने नाहक राहूशी वैर पत्करले व त्याबाबत कोणीही देव त्याचे साधे कौतुकही करीत नाहीत. राहूपासून संरक्षण देण्यासाठी कोणीही देव पुढे येत नाही. ह्याचा राग सूर्याला असतो. त्या रागापोटी सूर्य पश्चिमेस जाऊन एका डोंगरावरून आग ओकण्यास सुरुवात करतो. ते पाहून श्रेष्ठ ऋषी देवांना भेटून विचारणा करतात, हे काय, अशा रात्री एवढी उष्णता कशी उत्पन्न झाली. नंतर ते सर्व जण एकत्रपणे ब्रह्माला विचारतात, ही भयंकर उष्णता कोठून आली आहे. सूर्य अजून उगवलेला नाही तेव्हा ही परिस्थिती, अशाने जगाचा नाश होईल. अहो ब्रह्मदेवा, जर सूर्य उगवला तर काय होईल? ब्रह्मदेव म्हणतात, तुमचे म्हणणे खरे आहे. तो रागावला आहे सर्व देवांवर व म्हणून तो सर्व जगाची राखरांगोळी करणार आहे. ते होणार हे मला माहीत होते म्हणून मी त्याची व्यवस्था आधीपासूनच करून ठेवलेली आहे. काश्यपाचा मुलगा अरूण जो एवढा प्रचंड आहे किं, तो उगवणाऱ्या सूर्याच्या पुढून रहाणार आहे. कारण त्याची व्यवस्था सूर्याचा सारथी म्हणून मी केली आहे. त्या व्यवस्थेमुळे जगाचे संरक्षण सूर्याच्या उष्णतेपासून होईल. ह्यामुळे सर्व जग, ऋषीमुनी व स्वर्ग असें सर्व त्या विनाशापासून वाचतील. हा अरूण विनताचा पहिला मुलगा व गरूडाचा मोठा भाऊ आहे. गर्भाची पूर्ण वाढ होण्या आधी तो त्याच्या मातेच्या चुकीमुळे अड्यातून बाहेर येतो म्हणून तो अपंग आहे त्यासाठी तो नेहमी

आपल्या भावाच्या पाठीवरून प्रवास करतो. सूर्य जसा तप्त तसांच अरूण शीत आहे.

सौती पुढे सांगतो, अरूण, ब्रह्मदेवाच्या आदेशानुसार काम करतो. अरूणाच्या आडून सूर्य आकाशात उगवल्याने त्याची उष्णता जगाला जाणवत नाही. सूर्य कां रागावला होता व अरूण, गरूडाच्या भावाला सूर्याचा सारथी कां केले होते, ह्याबद्दलच्या तुमच्या प्रश्नाचे उत्तर मी तुम्हाला आता सांगितले आहे.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा चोविसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग पंचविसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती पुढे सांगत असतो, तो महाशक्तिमान गरूड जो कोठेही लिलया पोहोचत असें, त्याच्या आईकडे जी समुद्राच्या पैलतीरी असते तेथे येतो. तेथे त्याची आई पैज हरल्यामुळे गुलामगिरीच्या जोखंडात अडकलेली अशी रहात असते.

एकदा कद्रू तिच्या बहीणीस, विनताला, जी तिच्यापुढे झोपलेली असते, स्वताच्या लेकरांसमोर, सांगते, "प्रिय विनते, तुला माहीत आहेकां, किं, तेथे समुद्रात एक अतिसुदर विलोभनीय असे बेट आहे. जेथे नागलोक रहातात. तेथे मला माझ्या मुलांसह जावेसे वाटते. तेव्हां तू तुझ्या मुलास (गरूडास) आम्हा सर्वांना तेथे घेऊन जाण्यास सांग". ते ऐकून विनता गरूडाला त्या सर्वांना त्याच्या पाठीवरून तेथे घेऊन जाण्यास सांगते. उंच आकाशातून तो जातांना सूर्याच्या तापाचा त्रास त्या सर्पांना होऊ लागतो. ते पाहून कद्रू इंद्राची स्तुती करून विनंती करते, "हे देवांच्या राजा, मी तुझ्यापुढे वाकून नमन करून ही तुझी  स्तुती करते, तूं वेत्राचा बळी घेतलास, तूं नामुचीचा बळी घेतलास, तूं हजार नेत्र असलेला व सांचीचा प्रियकर आहेस. कृपया तुझ्या आदेशांने भरपूर पर्जन्य होऊन माझ्या लेकरांना सूर्याच्या तापापासून मुक्ती दे. तू सर्व देवतांत श्रेष्ठ आहेस. तूं आम्हा सर्वांचा रक्षणकर्ता

असा पुरंदर आहेस. तूं पाऊस पाडू शकतोस, तूंच वायू, आकाशातील ढगं, पृथ्वीवरील अग्नी आणि आकाशातील विजेचा लखलखाट आहेस. तुझ्यामुळे आकाशात ढगे पुढे सरकत असतात. तूंच तो महान ढगराज आहेस ज्याच्या पसरण्याने युगाचा अंत होतो. तूंच सर्वांना घाबरवून टाकणारा ढगांचा गडगडाट आहेस. तूंच ह्या जगाचा कर्ता व नाशकर्ता आहेस. तूं अजिंक्य, तूं जगाला उजेड देणारा, अदिती, विभावसू आणि इतर विलक्षण चिजा आहेस. तूं देवांचा राजा आहेस, तूंच हजार अक्ष असलेला विष्णू आहेस. तूंच सर्व गोष्टींचे उगमस्थान आहेस. तूंच अमृत आहेस. तूंच सर्वांना आवडणारे सोम आहेस. तूंच वेळ आहेस, त्यातील बला (मिनीट), तूंच क्षण (चार मिनीटे), तूंच शुक्ल पक्षातील पंधरवडा आहेस, आणि कृष्णपक्षातील पंधरवडासुद्धा आहेस. तूंच काळ, कष्थ आणि तृति (ही काळाची विविध परिमाणे आहेत) आहेस. तूंच वर्ष, मोसम, महिने, रात्री व दिवस आणि तूंच ह्या पृथ्वीवरील विविध प्रदेश आहेस. तूंच सूर्याला उगवायला व मावळायला कारण आहेस. तूंच तो महासागर आहेस ज्यात गर्जना करणारे भलेमोठे मांसे इतर माशांना खात वावरत आहेत. तूंच सर्वांना ज्ञात असलेला व ध्यानस्त ऋषींना प्रिय, ज्याची स्तुती करण्यास ते थकत नाहीत, असा आहेस. यज्ञ करणाऱ्या लोकांना संतुष्ट करणारा सोम प्राशन करणारा इंद्र आहेस. वासनांध भ्रष्ट ब्राह्मण त्यांचे इप्सित साध्य करण्यासाठी तुझी आळवणी करतात. तूंच सर्व शक्तिमान म्हणून यज्ञ करणारे वेदांत व वेदांगांत तुझे गान गातात. म्हणून सर्व ब्राह्मण वेद व वेदांगे ह्यांचा अभ्यास नित्य करतात.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा पंचविसावा भाग संपतो.

# आदिपर्व भाग सव्विसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती पुढे सांगतो, कद्रूच्या ह्या अशा स्तुतिसुमनाने संतुष्ट झालेला देवांचा राजा, इंद्र त्याच्या किमयेने त्या आसमंतात पाण्याने भरलेली निळी ढगं वाढवतो व सर्वत्र विजांचा कडकडाट व लखलखाट सुरु होऊन मुसळाधार पावसास सुरुवात होते. इंद्र त्या सर्व ढगांना सांगतो अरे ढगांनो तुमच्यातील जीवनदानी पाणी तुम्ही सर्वत्र ओता. असा आदेश मिळाल्यानंतर ती ढगे एकमेकांशी पाणी ओतण्याची जणू चढाओढ लावतात. असें वाटावे किं, जणूकाय युगांत आला आहे. त्या गरजणाऱ्या ढगांमुळे व विजांच्या लखलखाटाने चमकणारे आकाश असें व्याप्त झाले कीं, त्यांच्या आड सूर्य असा झाकला गेला किं, सर्वत्र रात्रीसारखा अंधार झाला. अशारितीने इंद्राच्या कृपेने जो मुसळधार पडू पाऊस लागला त्यामुळे नाग अतिशय आनंदीत झाले. पृथ्वी सगळी पाण्याने भरली. इतके पाणी झाले किं, ते पृथ्वीच्या गर्भात शिरले. अशारितीने कद्रूची सर्प लेकरे सुरक्षितपणे रमनैक (रमणीक) नांवाच्या बेटावर पोहोचली.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा सव्विसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग सत्ताविसावा

## (अष्टीक पर्व पुढे चालू)

कद्रूची नागमुलं त्या पाण्याच्या शिडकाव्याने अति आनंदीत होतात. ती सर्व गरूडाच्या पाठीवरून त्या बेटावर उतरतात. विधात्याने ते बेट केवळ मकरांसाठी राखून ठेवलेले असते. तेथे त्यांना तो अजब खारा समुद्र दिसतो. तेथे त्यांना पावसाच्या पाण्याने भिजलेले एक सुंदर वन दिसते. त्या वनातील झाडांवर सुंदर फळे व सुगंधी फुलं डवरलेली ते पहातात. भोवती सुदर वाडे व बागा ते पहातात. आजूबाजूची तळी स्वच्छ पाण्याने तुडूंब भरलेली आसतात. त्यात सुंदर कमळं शोभून दिसत होती. त्यांना तेथे केवळ मलय पर्वतावर वाढणारी अनेक उंच गगनचुंबी झालेले वृक्ष दिसतात. वाऱ्याच्या झुळूकीने सर्वत्र पसरणारी सुंदर फुलं देणारे इतर वृक्ष ते पहातात. ते वन गंधर्वांना अतिप्रिय होते. अनेक प्रकारची फुलपाखरं व मधमाशा तेथे फुलांवर बागडत होत्या. एकंदर वातावरण सुप्रसन्न होते. कोणालाही आनंद होईल असें ते सर्व पवित्र होते. त्यामुळे कद्रूची लेकरे फारच खूष दिसत होती. तेथे पुष्कळ बागडल्यावर ते सर्प वनिताच्या मुलांस, गरूडांस सांगतात किं, त्यांने त्यांना आणखीन दुसऱ्या अशाच विलेभनीय बेटावर न्यावे. अरे आकाशात घिरट्या

मारणाऱ्या आमच्या भावा, गरूडा, तुला अशी बरीच ठिकाणे माहीत असतील तर त्याप्रमाणे आम्हाला तू त्या ठिकाणी न्यावेस. त्यावर गरूड आपल्या मातेस विचारतो, "आई, मी कां म्हणून ह्यांच्या ह्या अशा फालतू आदेशांचे पालन करावे"? त्यावर त्याची आई त्याला सांगते, "अरे माझ्या सर्व शक्तिमान बाळा, मी तुला काय सांगू, माझ्या कमनशिबामुळे हे सर्व होत आहे. मी कद्रूच्या छलकपटामुळे तिची गुलाम (दासी) झाली आहे". असें सांगून ती त्या पैजेची सर्व कहाणी गरूडाला सांगते. त्यानंतर ती त्याला तिच्याच अपक्व गर्भाने (अरूण) दिलेला शाप सांगितला व पुढे म्हणाली किं, त्याच्या उःशापानुसार तूंच फक्त मला ह्यातून मुक्त करू शकतोस. ते सर्व ऐकून अतिदुःखी झालेला शक्तिमान गरूड विचार करू लागतो.

त्यानंतर थोडे थांबून सौती पुढे सांगू लागतो, गरूड त्या त्याच्या मावस भावांना विचारतो, "अरे माझ्या मावस भावांनो, ह्यातून काय मार्ग आहे". तेव्हां ते सांगतात कीं, "जर तू आम्हाला अमृत आणून दिलेस तरच ह्या शापातून तुझ्या आईची व तुझी सुटका होईल".

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा सत्ताविसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग अठ्ठावीसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती बोलतो, सापांचे ते बोलणे समजून गरूड त्याच्या आईला सांगतो, "मी जाऊन अमृत घेऊन येतो. त्या आधी मला कांहीं खावे लागेल कारण मला भूक लागली आहे. त्याबद्दल मला सांग. विनता उत्तर देते, ह्या सागरात मध्ये निषादांचे पवित्र वस्तीस्थान आहे. तेथे जाऊन तूं पाहिजे तेवढे निषाद (भिल्ल) खाऊन घे. आणि मग अमृत आणण्यासाठी जा. परंतु, कधीही ब्राह्मणाला खाण्याचा साधा विचारसुद्धा करू नकोस. तो अग्नीसारखा तेजस्वी असतो. त्याला राग आला तर तो सूर्यासारखा तप्त होतो. किंवा त्याचा राग जालीम वीषासारखा किंवा धारदार हत्यारासारखा असतो. ब्राह्मण सर्व प्राण्यात सर्व श्रेष्ठ असतो. अशा सर्व कारणांसाठी ब्राह्मणाला तू खाऊ नकोस. म्हणून त्याचा फक्त आदर करावयाचा असतो. रागातसुद्धा त्याचा बळी द्यावयाचा नसतो. तपस्या करणारा ब्राह्मण जे करू शकतो ते अग्नी किंवा सूर्य करू शकत नाही. खरा ब्राह्मण ओळखण्यासाठी मी तुला त्याची खरी लक्षणे कोणती ते सांगते ते तू नीट समजून घे. ब्राह्मणाला सर्वात पहिला जन्मलेला असे समजतात. म्हणजे जे चार वर्ण सांगितले आहेत त्यातील ब्राह्मण वर्ण पहिला आहे. त्यावर गरूड तिला विचारतो, आई मला सांग, ब्राह्मण कसा दिसतो. त्याचे स्वरूप कसे ओळखावयाचे? काय तो अग्नीसारखा चमकतो?

कां तो अति शांत असतो? अशी कोणती शुभ लक्षणे त्याच्या अगावर असतात किं, त्यामुळे मी त्याला ओळखू शकेन. विनता त्याला सांगते, जर तो खरा ब्राह्मण असेल तर तो तू खाल्यावर तुझ्या कंठाला माशाच्या काट्यासारखा चावेल व कदाचित् भडकलेल्या ज्वाळेसारखा तुला आंतून भाजेल. तू रागातसुद्धा त्याला मारता कामा नये. खरा ब्राह्मण तू जर खाल्लास तर त्याला तू पचवू शकणार नाहीस. विनताला आपल्या मुलाच्या अफाट सामर्थ्याची कल्पना होती तरी रिवाजानुसार ती त्याला आशिर्वाद देऊन निरोप देते. कद्रूच्या सापांनी फसवल्यामुळे ती फार दुःखी असते. विनता त्याला कसा आशिर्वाद देते ते सांगतो, असें बोलून सौती सांगतो,

"वाऱ्याची देवता, मरूत, तुझ्या पंखांचे संरक्षण करो, सूर्य व सोम तुझ्या सर्व मणक्यांचे संरक्षण करो, अग्नी तुझ्या डोक्याचे संरक्षण करो, आणि वसू तुझ्या संपूर्ण शरीराचे संरक्षण करोत. मी तुझ्या भल्यासाठी येथे प्रार्थना करीत बसणार आहे. आता जा, माझ्या बाळा", असें ती माऊली त्याला निरोप देते. आपल्या मातेचे ते शब्द ऐकल्यावर गरूड त्याचे विशाल पंख पसरून आकाशात भरारी मारतो. त्याच्या प्रचंड ताकदीमुळे तो लवकरच निषादांच्या प्रदेशात येतो. यमासारखा भुक लागलेला तो गरूड निषादांना खाण्याच्या तयारीत असतांना उतरतांना त्याच्या विशाल पंखांमुळे आकाशात धूळीचे ढग तयार होतात. सागराचे पाणी उचंबळते व परिसरातील वृक्ष हादरतात. निषादांना पकडण्याच्या उद्देशांने तो त्यांच्या नगराकडे जाणारा रस्ता त्याच्या विशाल चोंचींने उचलतो. त्या बरोबर तेथे असलेले असंख्य

निषाद उडून पटापटा त्या सर्प खाणाऱ्या गरूडाच्या तोंडात पडू लागतात. पुरेसे निषाद खाल्यावर तो त्याची मोठी चोंच बंद करतो जसें, कोळी मांसे जाळयात अडकल्यावर त्याचे जाळे आवरते घेतो.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा अठ्ठाविसावा भाग संपतो.

# आदिपर्व भाग एकोणतिसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती पुढे सांगत रहातो, विनताने सांगितले असतांनासुद्धा चुकीने तो शक्तिमान गरूड एका ब्राह्मणाला व त्याच्या पत्नीला खातो. खाल्ल्यावर थोड्याच वेळांत तो ब्राह्मण त्याच्या गळयाचा जळत्या कोळशासारखा दाह करू लागतो. तसें झाल्यावर गरूडाला आपली चूक समजते व तो त्या ब्राह्मणाला विनंती करतो, "अरे ब्राह्मणा, तू कृपया माझ्या घशातून बाहेर ये. कारण मी पाप करणाऱ्या ब्राह्मणालासुद्धा खाऊ इच्छित नाही". त्यावर तो ब्राह्मण त्याला सांगतो, "अरें गरूडा, तू माझ्या निषाद वंशातील पत्नीस खाल्ले आहेस म्हणून मी तिला बाहेर काढण्यासाठी तुझ्या घशात शिरलो आहे. तरी तूं त्या माझ्या पत्नीस न खाता परत कर. कारण, तुझ्या जठराग्नीने अजून तिला पचवलेले नाही". असें बोलणे झाल्यानंतर ते उभयता पतिपत्नी गरूडाच्या उदरातून बाहेर येतात. पुढे सौती त्या जमलेल्या ऋषींना सांगतो, "तो ब्राह्मण व त्याची निषाद वंशाची बायको गरूडाची स्तुती करतात, त्यानंतर तो स्वर्गीय पक्षी त्याची विशाल पंखं पसरून उडतो व आकाशात निघून जातो. त्यानंतर गरूड त्याचा पित्यास भेटतो व तेथे काश्यप ऋषी त्याचे कौतुक करतात. त्यांच्या सर्व प्रश्नांचे तो गरूड यथोचित उत्तरे देतो. काश्यप ऋषी त्याला विचारतात, "अरे माझ्या बाळा तू कसा आहेस,

सर्वकांहीं क्षेमकुशल आहेना? तुला पुरेसे खाद्य मिळते कां? माणसांच्या जगात तुझ्यासाठी पुरेसे खाद्य सांपडते कां"? त्या प्रश्नांवर गरूड उत्तर देतो, "माझी आई बरी आहे. तसेंच माझा भाऊ आणि मी सुद्धा बरे आहोत. परंतु, बाबा, मला नेहमी पुरेसे खाद्य मिळत नाही. त्याकारणांने मी बऱ्याच वेळा असंतुष्ट असतो. तूर्त मला माझ्या मावस भावंडांनी अमृत आणण्यास सांगितले आहे. ते मी त्यांना दिले किं, माझी आई त्यांच्या दास्यत्वातून मुक्त होईल. माझी आई मला सांगते कीं, मी हवे तेवढे निषाद खावे. मी आता पर्यंत हजारोनी ते खाल्ले आहेत. परंतु, त्यांनी माझी भूक थांबत नाही. त्यासाठी अहो माझ्या जन्मदात्या, मला दुसरे कोणते तरी असें खाद्य सांगा किं, ते खाल्याने माझी भूक शांत होईल. आणि मी अमृत आणण्यासाठी सक्षम होईन". ते ऐकून त्याचा पिता, काश्यप सांगतात, हा तलाव फार पवित्र आहे. त्याची ख्याति स्वर्गातसुद्धा आहे. त्यात एक भलामोठा हत्ती आहे. तो चेहरा खाली करूनच असतो. आणि तो सतत एका प्रचंड कासवांस, जो त्याचा वडिल बंधू आहे, खेचत असतो. त्याच्या वैराची कहाणी मी तुला आता सांगतो, जे वैर त्याच्या गेल्या जन्मापासूनचे आहे. ती कहाणी समजल्यावर तुला कळेल कीं, कां हे दोघे येथे आहेत.

फार वर्षापूर्वी एक थोर ऋषी होता. त्याचें नांव होते विभत्वसु. तो भलताच रागीट होता. त्याला एक धाकटा भाऊ होता. त्याचें नांव होते, सुप्रीतिक. हा धाकटा भाऊ, सुप्रीतिक त्याच्या मोठ्या भावाबरोबर त्याच्या संपत्तीचा वाटा ठेवण्यास तयार नसतो. सुप्रीतिक सदोदीत संपत्तीच्या

वाटण्या कराव्यात म्हणून वाद घालत असे. कांहीं काळ सुप्रीतिकाची कटकट सहन केल्यावर वैतागून एक दिवस विभत्वसु त्याच्या धाकट्या भावास सांगतो, "अरे सुप्रीतिका, आपल्या पूर्वजांची संपत्ति वाटून घेण्याचा मूर्खपणा कांहींजण करीत असतात. जर वाटणी झाली तर मग ते एकमेकांशी भांडू लागतात. त्याचा इतर पाताळयंत्री शेजारपाजारचे, फायदा घेतात व त्यांचे शत्रूत्व कसें वाढेल ते पहात रहातात. असे होऊ नये म्हणून शास्त्रात पूर्वजांची मिळकत कधीही वाटावयाची नाही व ती संपत्ति फक्त वडिल भावाकडेंच ठेवावी, असें सांगितले आहे. तरीसुद्धा तू आपल्या पूर्वजांची संपत्ति वाटून घेण्याचा दुराग्रह करीत आहेस म्हणून मी तुला शाप देतो कीं, तू पुढच्या जन्मी हत्ती होशिल". ते ऐकून त्याचा धाकटा भाऊ, सुप्रीतिक, विभत्वसूला शाप देतो कीं, "तू पुढच्या जन्मी पाण्यात रहाणारा कासव होशिल". अशारितीने केवळ भौतिक संपत्तिसाठी ते दोघे मूर्ख, हत्ती व कासव होऊन रहात आहेत. असें सांगून काश्यप गरूडाला दाखवतात कीं, तो पहा सुप्रीतिक हत्ती आपल्या दिशेने येत आहे व तो पहा त्या पलिकडून विभत्वसु पाण्यातून बाहेर येऊन सुप्रीतिकाला आव्हान देत आहे. गरूड पहातो ते दोघेही प्रचंड आकाराचे असतात. सुप्रीतिक सहा योजने उंच आहे व त्याच्या दुप्पट लांबी आहे, तसेंच विभत्वसु कासव तीन योजने उंच व परिघाने दहा योजने आहे. ते त्यांच्या प्रचंड आकाराचे अभिमानी असून त्यांच्या ह्या परस्पर वैरामुळे त्यांची नीच प्रकारच्या प्राण्यात गणना होत आहे. ते एकमेकांवर पाण्यात शिरून दंगा करीत असल्यामुळे समुद्राचे पाणी हिंदकळत होते.

एवढे सांगून पुढे काश्यप ऋषी आपल्या बाळाला सांगतात किं, "असे पहा, त्यांचे वैर व्यर्थ आहे तेव्हां तू त्या दोघांना खाऊन टाक व तुझी भूक मिटव. असें केल्यास तुला अमृत आणण्यासाठी जी ताकद पाहिजे ती मिळेल. एवढे बोलून काश्यप ऋषी त्याला आशिर्वाद देतात किं तो त्या कामात यशस्वी होवो. माझे आशिर्वाद तुला आवश्यक आहेत कारण तुला अमृत आणण्यासाठी देवांशी लढावे लागणार आहे. त्या लढाईत तुला अनेक ऋषींच्या शुभेच्छा, यजू, यज्ञातील पवित्र अर्ध्य आणि उपनिषदातील सामर्थ तुझी शक्ति वाढवण्यात उपयोगी येतील.

गरूड, वडिलांनी सांगितल्या प्रमाणे त्या सागराच्या किनाऱ्यावर पहातो ते तेथे विविध पक्षी विहार करीत होते, पाणी निर्मळ होते व ते दोघे तेथे भाडत होते. तो अजस्र गरूड आपल्या पित्याच्या आज्ञेप्रमाणे त्या दोघाही भांडणाऱ्याना एकेका पंजात पकडतो व आकाशात उड्डाण करतो. त्यांना घेऊन तो अलम्व नांवाच्या पवित्र ठिकाणी जाऊन कोठे उतरावे ते पहात असतो. तेथे अनेक दिव्य वृक्ष होते. त्याच्या येण्याने त्यांची पाने सळसळू लागली. वृक्ष थरथरू लागले. ते दिव्य कल्पतरू घाबरून गेले कीं त्यांना वाटले आता त्यांच्या फांद्या मोडतात कीं काय. ते पाहून गरूड दुसऱ्या जास्त मोठ्या वृक्षाकडे उडाला. तेथे तो पहातो कीं, एक फारच भव्य वटवृक्ष उभा होता ज्याच्या फांद्या कित्येक योजने दूरवर पसरलेल्या होत्या. त्याला सोने व चांदीची फळे लगडलेली होती. त्याच्या फांद्यावर कित्येक प्रकारची रत्ने लागलेली होती. त्याच्या फांद्या इतक्या लांब होत्या किं, त्या समुद्राच्या

पाण्यात घुसलेल्या होत्या. तो वटवृक्ष गरूडाला बोलतो कीं, ये, माझ्या फांद्यांवर बैस आणि ते दोघे खाऊन टाक. ते ऐकून गरूड त्या वटवृक्षाच्या एका विशाल फांदीवर जाऊन बसतो. त्याबरोबर त्या झाडावर रहाणारे कित्येक प्राणी इतस्ततः पळतात. कित्येक लहान फांद्या मोडतात.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा एकोणतीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग तिसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती सांगतो, त्या महाशक्तिशाली गरूडाच्या स्पर्शाने त्या वटवृक्षाची एक मोठी फांदी तुटली. ती खाली कोसळेल असें वाटले म्हणून गरूडांने ती चोंचीने धरून ठेवली. त्यावर तो पहातो ते त्या फांदीच्या खालच्या बाजूस वलखिल्य ऋषी उलटे टांगून घेऊन तपस्या करीत आहेत. जर ती फांदी खाली पडली तर ते सर्व ऋषी चिरडून मरतील ह्या कल्पनेने गरूड चिंताक्रांत झाला. त्याच वेळी गरूड त्याच्या दोन पायांत तो सुप्रीतिक हत्ती व कासव विभत्वसु पकडून उडत होता. गरूडाची ती करामत पाहून वलखिल्य ऋषी आश्चर्यचकीत झाले व त्यांनी गरूड हे नांव विनताच्या मुलास दिले. गरूड म्हणजे प्रचंड ओझे पेलणारा असा अर्थ आहे.

ते दोन प्राणी व ती अवाढव्य फांदी घेऊन तो पक्षीराज आकाशात उडाला. आकाशातून जातांना ते विविध प्रदेश पहातात. फांदीला खालून पकडून असलेले वलखित्य ऋषी सुरक्षितपणे कोठे व कसे उतरावयाचे ह्या विचारात गरूड गढून गेला असतांना त्याला गंधमदन नांवाचा विस्तीर्ण पर्वत दिसतो. तेथे तो त्याचा पिता काश्यप वैराग्य साधनेत गढून गेलेला दिसला. काश्यपाने सुद्धा आपल्या मुलांस पाहिले. त्याचे सौंदर्य, शक्ती, सामर्थ्य आणि वाऱ्याच्या कां मनाच्या वेगांने त्याचे आकाशातून जाणे ह्या सर्व गोष्टींचे त्यांना फार कौतुक वाटले. कधीही कोणाला सहजासहजी कल्पनासुद्धा करतां

येणार नाही असें हे सर्व जसे एकाद्या ब्राह्मणाचे असावे असें होते. अशा सामर्थ्यवानाला कोणतीही देवता, दानव, दैत्य किंवा राक्षस हरवू शकणार नाही ह्याबद्दल शंका नसावी. तो गरूड सूर्या सारखा तळपत होता, यमासारखा भयावह दिसत होता. चुटकी सरशी तो एकादा डोंगर फाडून टाकेल किंवा समुद्र पिऊन टाकेल असें त्याचे स्वरूप दिसत होते.

गरूडाला आपल्यापाशी येतांना पाहून काश्यप ऋषी त्याला सांगतात, "माझ्या बाळा, कृपया कोणतीही घाई न करता वलखिल्य ऋषी जे केवळ सूर्याचे किरण शोषून त्यावर जगतात, त्यांना सुरक्षित ठिकाणी उतरवण्याचे आपले काम सावधानतेने पूर्ण कर. कारण जर ते चिडले तर तुझा नाश करण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये आहे हे जाणून वाग. आणि जर तू त्यांना सुरक्षितपणे योग्य जागी उतरवलेस तर त्यांच्या आशिर्वादामुळे तुझे इप्सित पूर्ण करण्यात तुला मोठी मदत होईल". पुढे हिमवत पर्वतावर गरूडाने त्या सर्व वलखिल्य ऋषींना त्यांने सुरक्षितपणे उतरवले. त्यामुळे ते ऋषी संतुष्ट झाले व त्यांनी गरूडास शुभेच्छा दिल्या.

सौती सांगत रहातो, ते वलखिल्य ऋषी, काश्यप त्याला सांगतात, आपली पापं तपस्या करून धुऊन टाकून पुढील प्रगतीसाठी हिमवत पर्वत रांगांत तपस्येसाठी निघून जातात. वलखिल्य ऋषींना निरोप देऊन झाल्यावर गरूड तोंडात धरलेल्या भल्यामोठ्या फांदीमुळे अडखळत्या आवाजात आपल्या पित्यास विचारतो, तात, आता ही भलीमोठी फांदी मी कोठे टांकू? कृपया मला असा निर्मनुष्य प्रदेश सुचवा जेथे ही टाकल्याने

कोणाचेही नुकसान होणार नाही. ते ऐकून काश्यप ऋषी त्याला सांगतात, असा एक प्रदेश आहे जेथे डोंगर दऱ्या असून नेहमी बर्फ पडलेला असतो त्यामुळे तेथे जाण्याचा साधा विचारसुद्धा कोणी करत नाही. ते ऐकून गरूड ती फांदी घेऊन त्या निर्जन प्रदेशाकडे कुच करतो. चोंचीत ती फांदी व पायांत ते दोन बंधू असा तो अनेक योजने दूर असलेल्या त्या प्रदेशाकडे झेपावतो. थोड्याच वेळांत तो तेथे पोहोचते व तेथे ती फांदी तो टाकतो. पडतांना ती फांदी मोठा आवाज करते. त्याच्या आवाजाने व पंखांच्या प्रचंड फडफडण्यामुळे तेथील माती उडते व आकाशात धुळीचे वातावरण उत्पन्न करते. तेथील वृक्षाची फुलं सर्वत्र विखूरली गेली. तेथे असलेली भव्य पर्वत शिखरं त्या धसक्याने कोलमडून मातीच्या दरडी जोरांने खाली कोसळल्या. त्यामुळे त्यावरील असंख्य झाडे, वेली ज्यांना सोनेरी फुलं होती व त्या मातीतील रत्ने इतस्ततः पसरून त्या अंधारात चमकू लागली. त्यानंतर तो आलिशान गरूड त्यातीलच एका शिखरावर बसून निवांतपणे त्या दोघा भावांना, एक हत्ती व दुसरा कासव, खाऊन टाकतो. अशारितीने पोट भरल्याने संतुष्ट झालेला तो गरूडराज, आकाशात उंच भरारी मारतो व अमृताच्या शोधासाठी निघतो. त्या प्रसंगी विविध अशुभशकून देवांच्या लोकांत घडू लागतात. कारण आता गरूड त्यांच्यावर अमृत मिळविण्यासाठी चाल करून जाणार असतो, हे निश्चित असते.

इंद्राचे वज्र जे विजेच्या लखलखाटा प्रमाणे चमकत असें ते मंद झालेले दिसले. भर दिवसा आकाशातून अशनि प्रचंड ज्वाळा सोडत पृथ्वीकडे

झेपावत होते. वसु, रुद्र, आदित्य, साध्य, मरुत, आणि इतर देवांची शस्त्रास्त्रे एकमेकांशी लढून त्यांची शक्ति गमावत होती. असें कधींच झाले नव्हते, अगदी देव व असुरांच्या युद्धातसुद्धा. आकाश निरभ्र असूनही त्यातून प्रचंड गडगडाटांचा आवाज येत होता. देवाधीदेव, महादेवांच्या गळयातील माळा निस्तेज झाल्या होत्या. जोरांने वाहणारे वारे आसमंतात धुळीची वादळे उडवीत होती व विशेष म्हणजे रक्ताचा पाऊस (लाल रंगाचे पाणी) पडू लागला होता. ही अशुभ चिन्हे पाहून देवांचा राजा इंद्र व विष्णू जाऊन बृहस्पतिंना भेटतात आणि विचारतात, "हे काय होत आहे, अशी अशुभ लक्षणे कां दिसत आहेत? आम्हाला कोणी युद्धास आव्हान देणार असेल असें वाटत नाही".

त्यावर बृहस्पति सांगतात, "अहो देवांच्या अधिपतींनो, तुमच्या चुकींमुळे आणि बेपर्वाईमुळे तसेंच महान तपस्वी वलखिल्य ऋषींच्या तपोसामर्थ्यामुळे काश्यप ऋषीं व विनता ह्यांच्या सुपुत्र, जो आकाशाचा स्वामी आहे, ज्याच्या सामर्थ्यापुढे तुम्ही कमी ठरता, ज्याला कांहींही अशक्य नाही, असा गरूड तुमच्याकडून अमृत काढून घेण्यासाठी येत आहे".

सौती पुढे सांगतो, "इंद्र हे ऐकून अमृताच्या कलशाचे संरक्षण करणाऱ्यांना आज्ञा करतो किं, "ऐका मंडळीनो, एक सर्वशक्तिमान पक्षी अमृत आपल्याकडून जबरदस्तीने काढून घेण्यासाठी येत आहे. त्यासाठी मी तुम्हाला ताकीद देतो कीं, त्याला कोणत्याही परिस्थितीत अमृत मिळता कामा नये.

बृहस्पति देवांनी सांगितले आहे कीं, त्याची ताकद अपरंपार आहे म्हणून आपण सर्वांनी आता अमृताचे संरक्षण करण्यासाठी सर्व शक्तीने सज्ज झाले पाहिजे".

इंद्र स्वतः त्याच्या गडगडाटणाऱ्या वज्रासह सज्ज होतो. सर्व देव हे ऐकून अचंबित होतात परंतु, कांहीं उणे राहू नये म्हणून आपापल्या परीने अमृताचे संरक्षण करण्यासाठी सज्ज होतात. धारदार शस्त्रे, आग ओकणारी आयुधे, अनेक काटे असणाऱ्या गदा, मोठ्या कुर्हाडी, अग्नीबाण, अशी विविध शस्त्रे घेऊन ते गरूडाची वाट पहात असतात. सर्व तयारी उत्तम असते. त्याशिवाय अजब सामर्थ्य असलेली चमत्कारी रत्ने जडवली आहेत असे अंगस्त्राण व शिरस्त्राण अंगावर घालून ते गरूडाशी मुकाबला करण्याच्या तयारीत असतात. त्यांच्या त्या तेजस्वी आयुधांच्या चमकण्यामुळे आकाश सूर्य असतांना जसें प्रकाशित होते तसें उजळून निघाले होते.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा तिसावा भाग संपला.

## आदिपर्व भाग एकतिसावा

## (अष्टीक पर्व पुढे चालू)

एवढे ऐकल्यावर शौनक ऋषी कांहीं प्रश्न विचारतात, "अरे सुतपुत्रा, काश्यप जे बोलतात कीं, इंद्राची चूक, बेपर्वाई, ती कोणती चूक व बेपर्वाई, ते जरा नीट समजावून सांग. वलखिल्य ऋषींच्या तपस्येमुळे गरूडाचा जन्म झाला हे कसें व काश्यप स्वतः ब्राह्मण असतांना त्यांचा मुलगा क्षत्रिय पक्षी कसा"? "गरूड अजिंक्य कसा व तो कोणत्याही प्रकारे न मरणारा हे कसे? हा आकाशाचा स्वामी कोठेही जाऊ शकणारा व पाहिजे तेवढी ताकद वाढवू शकणारा हे कसे? आणि जर अशी माहिती पुराणांत असेल तर तिच्याबद्दल मला सांग".

सौती त्यावर शौनकांना उत्तर देतो कीं, हे सर्व खरोखरच पुराणांत दिले आहे. कृपया, द्विजश्रेष्ठ शौनक, मी थोडक्यात ते सगळे समजावून सांगतो. पुराणात दिल्यानुसार, फार प्राचीन काळी जेव्हां बृहस्पतिचा मानस मुलगा काश्यप ऋषी पुत्र व्हावा म्हणून एक यज्ञ आरंभितो व त्यात त्याला इंद्र, बरेचसे देव, गंधर्व, वलखिल्य आणि इतर सिद्ध देवता मदत करण्यासाठी येतात. त्यात इंद्राची नेमणूक यज्ञासाठी संमिधा आणण्यासाठी होते. एकाद्या डोंगरा एवढी ती संमिधा आणतांना तो (इंद्र) थकत नाही. परंतु, ती आणतांना तो वाटेत पहातो कीं, एक पळसाचे पान, बरेच छोटे आंगठ्या एवढे

ऋषी, एकत्रितपणे उचलून आणत आहेत. त्याने पाहिले कीं, ते छोटेसे ऋषी बरेच दिवस कांहीं न खाल्याप्रमाणे अगदी हाडकुळे झालेले दिसत होते. ते एवढे कमजोर होते किं, जेव्हां ते वाटेत गाईच्या पावलामुळे तयार झालेल्या डबक्यात अडकून रहात व त्या इवल्याशा डबक्यातील पाण्यामुळे ते पूर्णपणे भिजत असतं, ते पाहून स्वताच्या शक्तिचा गर्व असलेला इंद्र त्यांना छद्मीपणे हसतो. अशारितीने तो त्या छोट्या आकाराच्या ऋषींचा घोर अपमान करून पुढे जातो. तसेंच तो त्यांना डिवचण्यासाठी मुद्दाम त्यांच्या डोक्यावरून जातो. अशाप्रकारे विनाकारण अपमानित झाल्याने संतापलेले ते ऋषी (वलखिल्य) इंद्राला अद्दल घडावी म्हणून एक यज्ञ आरंभितात. ते समजल्यावर इंद्र घाबरतो.

पुढे ऐकां भृगु वंशी शौनका, सत्त्वशिल, वचनाचे पक्के असें वलखिल्य ऋषी त्यांच्या यज्ञात उत्तम शुद्ध लोण्याचे अर्ध्य देऊन उत्तम रित्या मंत्रांचे उच्चारण करून तो यज्ञ संपन्न करत असतात. ते त्या यज्ञाद्वारा विधात्याकडे याचना करतात कीं, आमच्यावर कृपा करून आणखीन एक इंद्र तयार करावा जो ह्या सध्याच्या इंद्रापेक्षा जास्त शक्तिमान असेल. आमच्या तपस्येला एवढे यश मिळू द्यावे. ह्या यज्ञाची वार्ता इंद्राला मिळते. तो अतिशय भयभीत होतो व काश्यप ऋषींकडे मदतीसाठी याचना करतो. इंद्राचे म्हणणे पूर्णपणे ऐकल्यावर प्रजापति काश्यप वलखिल्य ऋषींच्या कडे जातात. त्यांना विचारतात, अहो ऋषींनो तुमचा यज्ञ कामयाब झाला आहे कां? त्यावर ते सत्यवादी ऋषी काश्यपाला आदरपूर्वक सांगतात किं, तुम्ही जसें ठरवाल

तशाप्रकारे तो सिद्ध होईल. एवढे ऐकल्यावर प्रजापति पुत्र काश्यप मोठ्या प्रेमांने त्यांचा राग कमी व्हावा अशारितीने त्यांना विधात्याची रचना समजावून सांगण्याचा प्रयत्न करतात.

अहो वलखिल्य ऋषींनो, हा इंद्र ब्रह्माच्या इच्छेनुसार काम करत असतो. तो तिनही जगांचा स्वामी असें विधीत ठरले आहे. तुम्ही तुमच्या रागाप्रित्यर्थ आणखीन एक दुसरा इंद्र तयार करून त्यात कांहीं बदल करणे उचित नाही. तुमचा राग मी समजू शकतो, परंतु, तेवढ्यासाठी असें करून ब्रह्माच्या कारभारात ढवळाढवळ करणे तुमच्या सारख्या तपस्व्याना शोभत नाही.

त्यासाठी तुम्ही एक पंखधारी इंद्राची मागणी करावी जो ह्या इंद्राला त्याच्या कामात मदत करील.

वलखिल्य ऋषी त्या काश्यपास सांगतात, आमचा यज्ञ एका इंद्रासाठी आहे मग तो पंखधारी असला तरी चालेल. म्हणून ह्यापुढे तुमच्या विचारानुसार जे योग्य तेच व्हावे. वलखिल्यना ज्ञात होते कीं, काश्यप ऋषींला पुत्रप्राप्तीची अभिलाषा आहे तेव्हां ते सर्व सांगतात कीं, हा नवीन इंद्र तुमच्या पोटी होवो.

सौती नंतर सांगतो, त्याचवेळी दक्ष प्रजापतिची मुलगी विनता जी काश्यपाची बायको असते तिची तपस्या आता पूर्ण झाल्याकारणांने स्नान उरकून व संभोगासाठी योग्य अशी होऊन ती आपल्या पतीला आपली इच्छा सांगते. त्यावर काश्यप तिची इच्छा पूर्ण होईल असा आशिर्वाद देतांना तिला

सांगतो, वलखिल्य ऋषींच्या इंद्रप्राप्तीच्या व माझ्या पुत्रप्राप्तीच्या अशा दोन यज्ञांमुळे, दोन आदिनायकांसारखे पुत्र होतील असा दुवा ते देतात. त्याप्रमाणे तिला दोन पुत्र, अरूण व गरूड, होतात. विनताच्या अधीर स्वभावामुळे अरूण अर्धवट तयार झालेला म्हणून अपंग बनतो व नंतर गरूड जन्मतो.

त्यानंतर काश्यप इंद्राला सांगतात, "तो पंखधारी इंद्र, सर्वांकडून पुजला जाईल. तुला हे दोन भाऊ असतील. त्यांच्या सहाय्याने तूं जगाचा कारभार पहाशिल पण त्यासाठी तुला एक वचन द्यावे लागेल किं, तूं तुझ्या शक्तिच्या मस्तीत ब्रह्माची साधना करणाऱ्या कोणाचाही अपमान करणार नाहीस. इतरांचा उपहास करण्यासाठी तुला तुझे सामर्थ्य विधात्याने दिलेले नाही ह्याची तू सदैव जाणीव ठेवून ह्यापुढे तूं तुझे वर्तन संयमीत ठेवशिल".

सौती पुढे सांगतो, त्यानंतर मी आधी सांगितल्याप्रमाणे अरूण व गरूड ह्यांचे जन्म होतात. आता ह्यापुढे, अहो भृगुवंशी शौनका, गरूडाची लिली मी सांगणार आहे ती ऐक.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा एकतिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग बत्तिसावा

## (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती पुढे बोलतो, अहो श्रेष्ठ ब्राह्मणांनो, देव युद्धासाठी अशारितीने तयार झालेले असतांना गरूड, पक्षीराज, त्या देवांच्या समोर येऊन ठेपला. त्याचे ते अवाढव्या रुप पाहून सर्व देव गर्भगळीत झाले. अमृताचे संरक्षण करणाऱ्यात जे ब्राह्मण होते ते व इतर सर्वजण एकत्र येऊन त्या पक्षीराजाशी त्यांच्या विविध आयुधांनी लढू लागले. प्रचंड धनासाम युद्ध झाल्यावर दिसले कीं, सर्वकडे ते मेलेले धरतीवर पडलेले होते. गरूडांनी त्याच्या पंख, चोंच व पंजे ह्यांनी त्यासर्व योद्ध्यांना चारीमुंड्या चीत केले होते. आकाशाचा तो राजा त्याचे विशाल पंख असें फडफडवत होता कीं, त्यामुळे जमिनीवरील धूळ वातावरणात सर्वत्र पसरून सगळीकडे अंधःकार झाला, कोणीही कोणाला त्यामुळे पाहू शकत नव्हते. त्यामुळे ते गरूडा ऐवजी एकमेकांशींच लढू लागले. अमृताचे संरक्षण करणारे मर्त्य पहारेकरी त्या अंधारामुळे गरूडाला पाहू शकत नव्हते. त्याचप्रमाणे गरूडांने स्वर्गाचा परिसरसुद्धा ढवळून काढला. सगळीकडे जखमी झालेले देव आपल्या जखमा पहात जमिनीवर पडलेले दिसत होते. त्या अंधाराला बाजूला करण्यासाठी इंद्राने वायूदेवास फुंकर मारण्यास सांगितले असें किं, त्यामुळे हवेत पसरलेली धूळ दूर ढकलली जाईल व सर्वकांहीं दिसू लागेल. वायूच्या प्रभावामुळे अखेरीस

ती धूळ दूर झाली व आसमंत पहाणे शक्य झाले. जसें दिसू लागले तसें देव व यक्ष नव्या जोमांने गरूडावर चाल करून गेले. गरूडाने प्रचंड गर्जना केली व तो पुनः एकदा आकाशात उंच उडाला असां कीं, आकाशात एक अवाढव्य ढग पसरले असावे. जणू युगांत आला असें वाटले. आकाशातून गरूड पहातो कीं, इंद्रासह सर्व देव आपापली शस्त्रे घेऊन त्याच्याशी लढण्यास सज्ज आहेत.

दुधारी तलवारी, लोखंडी काटेरी गदा, चमकणारे बाण, सूर्यासारखी तेजस्वी चक्रायुधे, त्यांच्या हातात आहेत असें त्यानी पाहीले. मोठ्या शिताफीने तो त्या देवांवर तुटून पडला. देव मोठ्या ताकदीने त्याच्याशी लढत होते परंतु, विनतेचा सुपुत्र त्यांना तितक्याच खंबीरपणे तोंड देत होता. देवांच्या शरीरातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. साध्य, गंधर्व रणांगण सोडून पूर्वेकडे पळू लागले. वसू व रुद्र दक्षिणदिशेकडे पळाले, आदित्य पश्चिमेकडे व अश्विनी बंधू उत्तरेकडे पळाले. शक्तिमान असूनही ते पळत होते व पळता पळता मांगे वळून पहात होते कीं, गरूड त्यांचा पाठलाग तर करीत नाहीं ना!

गरूडाचा मुकाबला होत होता, अश्र्वक्रंदांसी, रैनुक, धीरोदत्त क्रथनक, तपन, उलूक, श्र्वसनक, निमेष, प्रारुज आणि पुलिन अशा सामर्थ्यवान यक्षांशी. विनताचा सुपुत्र मात्र यत्किंचितही न डगमगता त्यांच्यावर चाल करून जात होता. त्यांना मारत होता. महादेवासारखे त्याचे संहारक कार्य चालू होते. जसें शंकर युगांति जगाचा संहार करतो तसे ते

वाटत होते. ते मारलेले व घायाळ झालेले यक्ष पाहून एकाद्या काळया ढगातून रक्ताचा वर्षाव होत आहे असे वाटत होते. गरूडाने त्यांचा जीव घेतला होता. सर्व विरोध संपुष्टात आला आहे असें दिसल्यावर गरूड जेथे अमृत ठेवले होते त्या ठिकाणी गेला व तो पहातो कीं, अमृताच्या भोवती प्रखर अग्नीच्या उंच उंच उडणाऱ्या आकाशाला भिडणाऱ्या ज्वाळा आहेत. जोराने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे त्यांची आग इतकी होती कीं, त्यापुढे सूर्य कांहींच नाही. त्या आगीला विझविण्यासाठी गरूडांनी त्याची तोंडं वाढवून त्यांची संख्या नव्याणणव केली व त्या नव्याण्णव तोंडाने त्याने मोठमोठ्या नद्यांतील पाणी पिऊन घेतले व ते पाणी तोंडात घेऊन तो तेथे आला व त्या ज्वाळांवर त्या पाण्याचा भडीमार करून ती आग विझवली. तरी त्यातून धग होतीच. त्यातून आत जाण्यासाठी गरूड अतिसुक्ष्म स्वरूप धारण करतो. म्हणजे अमृताजवळ जाता यावे.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा बत्तिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग तेहतिसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती सांगत असतो, तो पक्षीराज ज्याचे शरीर सोनेरी सूर्यासारखे चमकत होते. तो त्या जागी जेथे अमृत ठेवले होते तेथे जोरात शिरतो, जसें वादळ महासागरात शिरते. तेथे पोहोचल्यावर गरूड पहातो किं, त्या जागे भोवती एक प्रचंड चक्र वेगांने फिरत होते. असें कीं, त्या चक्राच्या जोराने फिरण्यामुळे जे कोणी तेथे जाण्याचा प्रयत्न करील त्याचे शतशः तुकडे व्हावेत. देवांच्या मेस्त्रीने ते खुबीने बनवले होते. गरूड त्यातून आत जाण्याचा मार्ग शोधतो. थोडावेळ विचार करून तो ठरवतो व क्षणार्धात सुक्ष्म रूप घेतो आणि त्या फिरणाऱ्या चक्राच्या आरांमधील जागेतून आत शिरतो. तेथे पोहोचल्यावर तो पहातो कीं, अमृत ठेवले होते त्याच्या भोवती दोन अक्राळविक्राळ नाग आग ओकत वळवळत फिरत होते. त्याच्यातील जालिम विष त्याला जाणवते. सदैव रागात असल्यासारखे अधून मधून ते फुत्कार टाकत होते. डोळे विजेप्रमाणे लखलखत होते. त्या नांगांच्या डोळयावर पापण्या नव्हत्या कारण ते कधींच झोपत नसत. ते पाहून कोणीही त्यांच्या जवळ जाण्याची हिंमत करू नये. गरूड त्यांच्या जवळ जातो व पंखांच्या फडफडाने आजूबाजूची धूळ त्या नागांच्या डोळयाकडे फेकतो. त्यामुळे त्या नागांना कांहीं दिसेंनासे होते. डोळयाना पापण्या नसल्यामुळे ते क्षणभर

हवालदिल होतात. ते हेरून त्या आंधळया झालेल्या नागांवर तो हल्ला करतो. क्षणार्धात तो त्या नागांचे शतशः तुकडे करून टाकतो. आत शिरून तो अमृत भरलेला कलश, घेऊन बाहेर येतो. त्यानंतर तो, बाहेर निघण्यासाठी, ते चक्र तोडून टाकतो व मार्ग मोकळा करतो. त्याला ते अमृत पिण्याचा मोहसुद्धा होत नाही हे विशेष असते. थोड्या वेळांत तो अमृताचा कलश घेऊन मार्गी लागतो. त्याच्या आकाशातून जाण्यामुळे सूर्यसुद्धा झाकला जातो. आकाशातून जात असतांना गरूड व विष्णू (नारायण) एकमेकांना भेटतात. गरूडाचे अमृत न पिता मातेसाठी घेऊन जाण्याचे नारायणाला विशेष कौतुक वाटत असते. त्यामुळे विनताचा तो मुलगा नारायणाच्या मर्जीत असा बसतो किं, ते आदिपरमेश्वर त्याला सांगतात कीं, "अरे विनताच्या सुपुत्रा, मी तुला तीन आशिर्वाद देऊ इच्छितो तरी तुझा इच्छा काय आहेत ते सांग". गरूड त्याची पहिली इच्छा सांगतो, "परमेश्वरा, माझे स्थान तुमच्यावर असले पाहिजे. त्यानंतर दुसरी इच्छा सांगितली, मी अमर व पूर्णपणे निरोगी असेन, तेसुद्धा अमृत न पिता". ते ऐकून नारायण म्हणाले, त्यानी त्या दोन इच्छा मान्य केल्या आहेत. ते ऐकून गरूडांनी त्यांना विनंती केली कीं, "तिसरी इच्छा अशी आहे कीं, तो आशिर्वाद नारायणांनीच सांगावा". ते ऐकून नारायण म्हणतात, "अरे गरूडा, तू माझे वाहन व्हावे अशी माझी इच्छा आहे". असें सांगितले. नारायणाच्या ध्वजावर गरूडाचे स्थान त्यामुळे निश्चित झाले.

झपाट्याने वाऱ्याला मागे टाकत तो पक्षीराज आपल्या अपेक्षित ठिकाणी उडत असतो. त्यावेळी इंद्र त्याचे वज्र त्याच्यावर फेकतो. ते पाहून गरूड हसतो. तो इंद्राला ओरडून सांगतो, "अरे इंद्रा, मी तुझ्या वज्राचा सन्मान करतो कारण, ते दधीची ऋषीच्या हाडांपासून तयार केलेले आहे. मी तुझासुद्धा आदर करतो पण मी फक्त एक पिस तुझ्या वज्राच्या हल्ल्यामुळे सांडले आहे. मला अजिबात कांहीं त्रास झालेला नाही".

ते पाहून सर्व प्राणी खूष झाले व त्या सुंदर पिसाकडे पहात त्यानी गरूडाला नांव दिले, "सुपर्ण".

ते पाहून इंद्र गरूडाला सांगतात, "अरे पक्षीराज, मी तुझ्या सामर्थ्याने अतिशय प्रभावित झालो आहे. मला कृपया सांग, तुझ्या ह्या सामर्थ्याची कांहीं मर्यादा आहे कां"? "मी तुझ्याशी सदैव मैत्री असावी अशी इच्छा करतो आहे".

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा भाग तेहतिसावा संपला.

# आदिपर्व भाग चौतिसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती सांगतो, गरूड त्यानंतर म्हणाला, "अहो पुरंदर, आपल्या मैत्रीला माझी मान्यता आहे. तू मला माझ्या ताकदीबद्दल विचारतो आहेस म्हणून त्याबद्दल मी आता तुला, असंख्य यज्ञाच्या धन्या, सांगतो. खरे तर, कोणीही स्वताची स्तुती करू नये पण येथे मी जे खरे आहे ते सांगत आहे. त्याला तू माझी स्तुती असें समजू नयेस. परंतु, तू मला माझ्या ताकदीबद्दल विचारतो आहेस म्हणून ते सांगतो. एक लक्षात  ठेव अरे शक्रा, किं, माझी ताकद एवढी आहे कीं, मी माझ्या एका पिसावर साऱ्या पृथ्वीला पेलू शकतो. ज्या पृथ्वीवर हे सर्व पहाड, त्या सगळया नद्या व समुद्र आहेत एवढेच नाहीतर तू सुद्धा आहेस. माझे बळ इतके आहे कीं, न थकता मी सर्व चर व अचर असलेल्या ह्या जगाशी लढू शकतो".

सौती नंतर सांगतो, अहो शौनक, गरूडाने असें आपल्या शक्तिचे वर्णन केल्यावर इंद्र, जो जगाचा अधिपति आहे, ज्याच्याकडे जगाचे ज्ञान आहे असा तो त्याला सांगतो, "तू सांगतोस तसे आहे तर, तुला कांहींच अशक्य नाही. म्हणून कृपया अरे गरूडा, माझ्या प्रामाणिक व खऱ्या मैत्रीचा स्वीकार कर व जर तू जे सांगतोस त्याप्रमाणे पहाता तुला हे सोम कांहीं कामाचे नाही. म्हणून ते तू मला परत कर. कारण, तू ज्यांना ते देण्याचा विचार करतो

आहेस ते आम्हाला त्याचा वापर करून विरोध करणारे आहेत हे समजून तू माझे म्हणणे समजून घे". इंद्राचे असें बोलणे ऐकल्यावर गरूड त्याला सांगतो, हे अमृत नेण्यामागील  एक उद्देश आहे. मी हे अमृत कोणालाही पिण्यासाठी देणार नाही. तू सांगतोस तर हा अमृताचा कलश मी खाली ठेवीन परंतु, त्याच क्षणी तू तो उचलून पळून जाऊ शकला पाहिजेस. पण त्यासाठी तू मला एक आश्वासन दिले पाहिजेस. ते ऐकल्यावर इंद्र त्याला जे आश्वासन पाहिजे ते देण्याचे वचन देतो. इंद्र त्याला आदरपूर्वकपणे सांगतो, "अरे अंडजा, मी तुला जे आश्वासन पाहिजे ते देईन पण असें चटकन कलश पळविण्याचे प्रयोजन काय"?

तेवढे बोलणे झाल्यावर गरूड त्या इंद्राला आपल्या मातेची व्यथा सांगतो. तो सांगतो माझ्या आईला माझ्याच वडील भावांने त्याच्या जन्माच्या वेळी एक शाप दिला आहे त्यामुळे ती दास्यत्वात गेली आहे, दिलेल्या वचनानुसार मी हे अमृत नागांच्या समोर ठेवीन व ते हा कलश उचलण्या आधी तू तो पळवलास तर आपल्या दोघांचा उद्देश साध्य होतो. इंद्राला ते पटते व तो गरूडाचा निरोप घेऊन निघून जातो.

गरूड त्यानंतर मोठ्या गतिने आपल्या आईकडे झेपावतो. तेथे तो त्या नागांना मोठ्या आनंदाने सांगतो किं, "हा पहा अमृताने भरलेला कलश, मी तो कुश गवताच्या गादीवर ठेवतो म्हणजे मग तुम्ही तो शास्त्रार्थानुसार अर्घ्य देऊन घ्यावा. तुम्ही मला दिलेल्या वचनाप्रमाणे आता माझी आई

तुमच्या गुलामगिरीतून मुक्त झाली पाहिजे. कारण, मी तुम्हाला दिलेले वचन पूर्ण केलेले आहे, तुम्ही तुमचे पूर्ण करावे".

त्याप्रमाणे नाग एकदिलांने सांगतात कीं, ज्याअर्थी तू तुझे वचन पूर्ण केले आहेस त्याअर्थी तू जसें म्हणतोस त्याप्रमाणे तुझी आई आमच्या दास्यत्वातून मुक्त झाली. असें बोलून ते आपल्या शास्त्रानुसार अर्ध्य देण्याच्या तयारीला लागतात. ते ती तयारी करीत असतांना इंद्र तेथे येतो व कुश गवतावर ठेवलेला अमृताने भरलेला कलश उचलून पळून जातो. जेव्हां नाग तेथे येतात तो ते पहातात कीं, अमृताचा कलश इंद्र पळवून नेत आहे. वचनाप्रमाणे अर्थात् विनता गुलामगिरीतून मुक्त झालेली असते. नाग त्या कुश गवतावर पडलेले अमृत चाटू लागतात व त्या कुश गवताच्या धारदार पात्यांमुळे त्यांची जिभ फाटून तिचे दोन भाग होतात. कुश गवतसुद्धा अमृताच्या स्पर्शाने पवित्र होते. म्हणून त्या नंतर कोणत्याही पवित्र कार्यासाठी कुश गवतांने पाणी शिंपण्याची (हे अमृत शिंपण्यासारखे आहे) रीत प्रचलित झाली.

गरूड आपल्या मातेस घेऊन उडाला व आपल्या मातेला आनंद देण्यासाठी तो त्यापुढे साप खाऊ लागला.

जे कोणी हे आख्यान पवित्र ब्राह्मणांपुढे गाईल तो मरणानंतर स्वर्गाला जाईल. गरूडाच्या कर्तृत्वाची गाथा गाणारा पूण्यवान ठरेल. (गरुड पुराणाची सुत्र कथा ह्यात आहेत.)

अशारितीने आदिपर्वातील  अष्टीक पर्वाचा चौतिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग पस्तिसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

एवढे ऐकल्यावर शौनक ऋषी सौतीला विचारतात, "अरे सुतपुत्रा, तूं आतापर्यंत आम्हाला सांगितले आहेस किं, नागांना त्यांचीच आई शाप देते व विनताला तिच्याच मुलांनी शाप दिले होते. तू हे सुद्धा आम्हाला सांगितले आहेस कीं, काश्यप आपल्या दोनही भार्यांस, कद्रू व विनता, पुत्रप्राप्तीचा आशिर्वाद देतो. तू आम्हाला विनताच्या दोन मुलांची नांवेसुद्धा सांगितली आहेस पण तूं अजून कद्रूच्या नागमुलांची नांवे सांगितली नाहीस तर ती सांग. आम्हाला माहीत आहे कीं, ती बरीच आहेत पण निदान जे प्रमुख आहेत त्यांची तरी नांवे सांगावीस ".

सौती त्या प्रश्नावर त्यांना सांगतो, "अहो ऋषीवर्य, ज्यांची संपत्ति आहे तपस्या, अशा तुमच्या विनंतिनुसार मी कांहीं प्रमुख नागांची नांवे सांगतो. ती ऐका". शेष पहिला जन्मला. त्यानंतर वासुकी. त्यानंतर ऐरावत, तक्षक, करकोटक, धनंजय, कलकेय, सर्पात मणी, पुरनई, प्मजारक, इलपत्र, वामन, नील, अनील, कल्मश, सवल, आर्यक, उग्र, कलसपोतक, सूरमुख, दधीमुख, विमलपिंडक, अप्त, करोटक, संख, वलिसिखाई, निष्ठंक, हेमगुह, नहुष, विंगल, वह्याकर्ण, हस्तिपाद, मुद्गलपिंडक, कम्वल, अश्ववतर, कलियक,

वृत्त, समवर्तक, पद्म, महापद्म, शंखोमुख, कुशमंडक, क्षेमक, पिंडरक, करवीर, पुष्पदंशत्रक, विल्वक, विल्वपंडर, मुशिकद, शंखशिरस, पुर्नभद्र, हरिद्रक, अपराजित, ज्योतिक, श्रिवह, कौरव्य, ध्रृतराष्ट्र, शंखपिंड, विरजस, सवाहू, सलपिंड, प्रभाकर, हस्तिपिंड, पिथरक, सुमुख, कौनपाशन, कुथर, कुंजर, कुमुद, कुमुदाक्ष, तित्री हलिक, कर्दम, वाहूमुलक, कर्कर, अकर्कर, कुंदोदर आणि महोदर.

अशी आहेत त्यातील महत्वाचे नाग व त्यांची नांवे, अहो श्रेष्ठ अवतारी शौनक. इतरांची नांवे मी तुम्हाला ऐकण्यात कंटाळा येईल म्हणून सांगत नाही.

ह्या नागांची मुल व त्यांची मुलं अशी संख्या आज अगणित आहे. अहो, मुनीश्रेष्ठ ह्या जगात असलेल्या सर्वच नागांची नावे कोणीच खात्रीने सांगू शकणार नाही.

अशारितीने आदिपर्वातील  अछटक पर्वाचा पस्तिसावा भाग संपला.

# आदिपर्व छत्तिसावा भाग

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

शौनक बोलतात, माझ्या प्रिय बाळा, तू त्या अनेक शक्तिमान व कधीही न हरणाऱ्या नागांची नांवे सांगितली आहेस. परंतु, तू सांग, त्या शापाची माहिति त्यांना समजल्यावर ते काय करतात. सौती सांगतो, त्यातील कठोर तपस्वी शेष आपल्या आईला सोडून मोठी तपस्या करतो, केवळ हवेवर तो रहातो, अशी तपस्या तो करीत गंधमदन, बद्री, गोकर्ण, पुष्कर आणि हिमवत (हिमालय) अशा ठिकाणी यात्रा करतो. त्या पवित्र ठिकाणी तो बराच काळ रहातो. त्यातील कांही तेथील पाण्यासाठी ख्यातनाम होते व कांहीं तेथील जमिनीसाठी. कठोर व्रतस्थ तपस्या करीत आपल्या भोगइंद्रियांवर शुक्ल औदासिन्याच्या व्रतांने पूर्ण नियंत्रण ठेवून तो योगी झाला होता. ते सर्व, ब्रह्मदेव पहात होते.

एकदा ब्रह्मदेव एक संन्यासी ज्यांनी डोक्यावर बटांची शेंडी ठेवली आहे, जो चिंध्या परिधान करून आहे, ज्याचे शरीर प्रखर तपामुळे कृश झाले आहे पहातात. त्याला विचारतात, अरे घोर तपस्या करणाऱ्या शेषा, तू फक्त स्वताचा विचार करतो आहेस, जरा इतर प्राणिमात्रांच्या भल्याचासुद्धा तूं विचार करावास. तुझ्या ह्या अशा कठोर तपस्येमुळे इतर प्राणिमात्रांना क्लेश

होत आहे त्याचा जरासा विचार तू करावास! मला सांगशिल कां, कीं, असे घोर तप तू कोणत्या उद्देशाने करीत आहेस?

शेष त्यावर उत्तर देतो, अरे देवाधिदेवा माझी सगोत्र भावंडं कपटी व कारस्थानी आहेत. मी त्यांच्यासह राहू इच्छित नाही. तुझ्या कृपेने ही माझी इच्छा पूर्ण व्हावी. त्याशिवाय ते भाऊ एकमेकांशी सदैव विनाकारण भांडत असतात ते एकमेकांचा द्वेष करतात, म्हणून मी ही तपस्या आरंभिली आहे. मला माझ्या ह्या अशा भावंडांची तोंडे पहाण्याचीसुद्धा इच्छा नाही. ती कपट कारस्थानी भावंडे माझी मावशी विनता व तिची मुलं ह्यांच्या बद्दल यत्किंचितही सद्भाव दाखवत नाहीत. माझे मावशीपासूनचे आणखीन दोन भाऊ आहेत. त्यातील एक आकाशाचा राजा आहे. अनेक आशिर्वाद प्राप्त झालेला ऋषी काश्यपांचा तो मुलगा आहे, त्या अनेक उत्तम गुण असलेल्या भावांचासुद्धा ते द्वेष करतात. त्यापासून मुक्त होण्यासाठी मी हे घोर तप करीत आहे. मला माझे हे शरीर सोडावयाचे आहे म्हणजे त्या मार्गाने माझी माझ्या दुर्गुणी भावंडांपासून नंतरच्या (मृत्यूनंतरच्या) जीवनातून सुद्धा मुक्तता होईल. एवढे बोलून शेष थांबला. ते ऐकल्यावर ब्रह्मदेव त्याला सांगतात कीं, "मी तुझ्या भावंडांना चांगला ओळखतो. त्यांने जी पापे त्यांच्या आईशी व तुझ्या आईशी केली आहेत ती सुद्धा मी जाणतो. परंतु, त्यावर उपायसुद्धा मी तयार केला आहे. तुला तुझ्या कुकर्मी भावांच्या पापासाठी चिंता करण्याची आवश्यकता नाही".

एवढे बोलून त्यानंतर ब्रह्मदेव शेषाला विचारतात, "अरे शेषा सांग, तुला माझ्याकडून कोणता आशिर्वाद पाहिजे"?

पुढे ब्रह्मदेव बोलतात, "मी तुझ्या तपस्येने प्रभावित झालो आहे, तुझे चित्त सदैव असेंच पुण्यमय राहो, म्हणून मी तुला आशिर्वाद देतो कीं, ह्यापुढे तू ही पृथ्वी समतोल राहील अशी सांभाळशील. माणसांच्या पापकर्मांमुळे तिचा तोल जाऊन ती भरकटण्याची शक्यता असते तसें तुझ्यामुळे होणार नाही अशी मी तुझ्याकडून अपेक्षा करतो".

ते ऐकून आनंदीत झालेला शेष ब्रह्मदेवाला विनंति करतो, "अहो विश्र्वनिर्मात्या परमेश्र्वरा, मी ते काम तुमच्या इच्छेनुसार करण्यास तयार आहे, त्यासाठी तुम्ही ही पृथ्वी माझ्या माथ्यावर ठेवावी".

ते ऐकून प्रसंन्नतेने ब्रह्मदेव त्याला सांगतात कीं, "शेष तू पृथ्वीच्या खाली जा. ती स्वतःच तुला तिच्याखाली जाण्यासाठी वाट देईल. असें केल्याने तू सदैव माझ्या कृपाछत्राखाली रहाशिल".

सौती त्यानंतर सांगतो, "ते ऐकून तो नागांचा राजा ब्रह्माने दाखवलेल्या एका रंध्रात शिरतो. त्यातून तो पलिकडील टोकाला पोहोचतो आणि पृथ्वीला स्वताच्या माथ्यावर उचलून घेतो. त्याच्या भोवती तो क्षीरसागर असल्याचे पाहतो".

त्यानंतर ब्रह्मदेव शेषाला सांगतात, "अरे शेषा तूंच यमदेवाचा अवतार आहेस. तू जी ही पृथ्वी तुझ्या डोक्यावर धारण केली आहेस त्यावर मी व सर्व देव आणि इंद्रसुद्धा बसलेले आहोत. शेषा तू धन्य झालास".

सौती पुढे सांगतो, "शेष म्हणजेच अनंत, सर्व नागांचा नृप, ज्याच्या सामर्थ्याला तोड नाही, पृथ्वीखाली रहातो. ब्रह्मदेवाच्या आज्ञेनुसार तो सर्व पृथ्वीचा भार एकटा स्वताच्या माथ्यावर पेलत आहे. शेवटी ब्रह्मदेव असा आदेश देतात कीं, आकाशाचा राजा, गरूड, शेषाला त्याच्या पृथ्वीचा भार पेलण्याच्या कार्यात मदत करील.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा छत्तिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग सदोतिसावा

## (अष्टीक पर्व पुढे चालू)

शेषाची प्रतिक्रीया काय ती सांगितल्यावर सौती वासुकीची कोणती प्रतिक्रीया होती ते सांगू लागतो.

"सर्व सर्पांत श्रेष्ठ अर्थात वासुकी, तो शाप ऐकून तो त्याच्या इतर बुद्धिमान भावंडांचा सल्ला घेण्याचे ठरवतो. त्यात ऐरावत व इतर असतात. ते अशा परिस्थितीत काय करणे योग्य ते ठरवण्याचा त्यातून प्रयत्न करतात.

वासुकी त्यांना सांगतो, आपण त्यात निष्पाप असूनही अडकलो आहेत तरी आपणा सर्वांना ह्या शापामागील उद्देश चांगलाच ठाऊक आहे. तरी त्यातून कसें निसटायचे ते पहावे लागेल. प्रत्येक शापातून निसटण्याचा कांहीं न कांहीं मार्ग असतो परंतु, मातेच्या शापातून सुटका नसते हे आपण सर्व जाणून अहात. विशेष म्हणजे तो शाप नित्य व अंतिम असा आहे. ते पहाता माझे हृदय पिळवटले जाते आहे. मला समजत नाही, विधात्याने असा शाप देण्यापासून आपल्या आईला अडवले कां नाही. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, आपला नाश निश्र्चित होणार आहे. पण त्यातून कांहीं युक्तिचा मार्ग आहे कां ते पहाण्याचे आपण चालू ठेवले पाहिजे. आपण सगळे हुशार व दूरदृष्टी असलेले आहोत त्यासाठी योग्य सल्लामसलत करुन कांहीं मार्ग निघतो कां ते पहावे. जसें, अग्नीला पटवून एकाद्या अप्राप्य गुहेत लपवून

ठेवले तर मुळात अग्नीच नसल्यावर यज्ञ कसा होणार! अशा युक्तिने आपण आपला नाश थांबवू शकतो का?

सौती पुढे सांगत होता, अशारितीने कद्रूच्या सर्व मुलांच्या सभेत वासुकी बोलत असतो. वासुकी सर्वांना कांही सुचत असेल तर सुचवावे असे आवाहन करतो. एक धूर्त साप सुचवतो, आपण उच्च प्रतिच्या ब्राह्मणांचे सोंग घेऊन जनमेजयाला हा यज्ञ न करण्यासाठी पटवू शकतो. दुसरा साप सुचवतो, आपण जनमेजयाचे मर्जीतील सल्लागार बनून त्याला सर्वच बाबींवर सल्ला देण्याचे काम करावे व त्यात जेव्हां तो आपल्याला हा यज्ञ करण्याबाबत विचारेल तेव्हां, हा सर्पनाशक यज्ञ कसा सर्वांना घातक आहे ते पटवण्याचा प्रयत्न करावा कां! त्यामार्गांने आपण हा यज्ञ टाळू शकतो. अशा यज्ञामुळे ह्या व दुसऱ्या (अदृश्य) जगाला अशा यज्ञामुळे कसे कायमस्वरुपी नुकसान होईल ते पटवायचे. एक अतिशहाणा साप सुचवतो, आपण हा यज्ञ करण्याच्या कामात गुंतलेल्या पुजाऱ्यांना व इतरांना चावून मारून टाकावे म्हणजे असा यज्ञ होण्याचेच टळेल कारण सर्वच आपल्या जीवाला जपतात व मरण्याला भितात. त्यावर कांहीं सत्प्रवृत्त साप आक्षेप घेतात व सांगतात अशाने वैदिक ब्राह्मणांचा नाश करण्याचे पातक आपल्यावर येईल ते बरोबर नाही. अशामुळे सत्प्रवृत्ती नष्ट होईल ते जगासाठी योग्य नाही. आणखीन एक साप सुचवतो, आपण पावसाची ढगं बनून यज्ञाच्या जागी असा पाऊस पाडावयाचा कीं, तो यज्ञ पेटूच शकणार नाही. एक साप सुचवतो आपण अमृताचा कलश पळवून नेऊ, त्यामुळे एकच गोंधळ उडेल व यज्ञावरून लोकांचे लक्ष हटेल. आणखीन एक शहाणा साप सुचवतो, आपण सर्वांना

चावायला लागून त्याद्वारा एकच घबराट पसरवून हा यज्ञ मोडून काढू. एकजण सुचवते, आपण ऋद्विज बनून यज्ञ करण्याचे सोंग घ्यावे व नेमक्या प्रसंगी आपली दक्षिणा म्हणून सापांना अभय मागावे. आणखीन एक सुचवतो जेव्हां राजा शिकारीला जाईल तेव्हां त्याला आपण पाण्यात नेऊन कैद करावे म्हणजे यज्ञ होण्याचे टळेल. दुसरा एक सुचवतो, आपण जनमेजय राजाला चावून मारून टाकू जसें त्याच्या बापाला मारले म्हणजे सर्वच संपेल, मुळावरच घाव घालूया.

वासुकी हे सर्व ऐकल्यावर त्या सर्व जमलेल्या सापांस सांगतो, आपल्याला जे योग्य वाटेल ते करावे. अनेक मार्गांने हे साध्य करता येईल असें मला दिसते पण त्यातील उत्तम परिणामकारक मार्ग कोणता ते समजत नाही. पण जे कांहीं करावयाचे ते जलदी करावे. माझे मत विचाराल तर मी सांगेन किं, तुम्ही सुचवलेले मार्ग मला उचित वाटत नाहीत. माझ्यामते आपण आपले डोके त्यावर चालवण्यापेक्षा आपल्या ऋषीतुल्य पित्याचा सल्ला घेणे चांगले ठरेल. तेंच काय ते उत्तम सुचवतील.

आपल्या वंशाच्या हिताचा आपल्याला विचार केला पाहिजे. तुम्ही सुचवलेली अनेक त्या दृष्टीने योग्य दिसत नाहीत. माझ्या व माझ्या वंशाच्या हिताचा विचार केवळ आपले पिताच करू शकतील असें मला सुचवावेसे वाटते. त्यासाठी मी चिंतीत आहे कारण, जर अयोग्य निर्णय घेतला तर त्याचे दुषण मलाच लागेल कारण आपण जाणतांच कीं, मी तुमचा नायक आहे.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा सदोतिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग अडतिसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती पुढे सांगतो, अशारितीने ती सभा झाली व बहुतेक सर्पांनी आपले विचार त्यात मांडले. शेवटी समारोप करण्याची वेळ आली. तेव्हां वासुकी त्या जमलेल्या त्याच्या भावंडांस सांगतो कीं, आता ह्या सभेचा समारोप करण्याचे काम आपला एक बुद्धिमान व दूरदृष्टी असलेला भाऊ इलपत्र ह्याला कांहीं सांगावयाचे आहे, ते आपण शांतचित्ताने ऐकावे.

त्यानंतर इलपत्र बोलण्यासाठी उठतो. सर्वांना नेहमीचे अभिवादन केल्यानंतर तो सांगतो कीं, माझ्या भावंडानो, जेव्हां आपल्या आईने शाप दिला तेव्हा मी तिच्या मांडीवर खेळत होतो व म्हणून मी त्या घटनेचा साक्षीदार आहे. त्या वेळी ब्रह्मदेवसुद्धा तेथे उपस्थित होते. एक गोष्ट आपण सर्वामनी ध्यानात घेतली पाहिजे किं, हा शाप विधिलिखीत होता. तो टाळणे केवळ अशक्य आहे. अगदी जनमेजय किंवा पांडवांचा कोणी इतर वंशज तो न करण्याचा विचार करेल असें सुद्धा शक्य नाही. म्हणजे तो यज्ञ होणारच. आपण जे कर्म करतो त्याची प्रतिक्रीया येणारच हे एक नैसर्गिक सत्य आहे तेंव्हा हा यज्ञ टाळण्याचा प्रयत्न करण्याच्या ज्या कल्पना येथे माझ्या भावंडांनी मांडल्या त्या व्यर्थ आहेत. आपण जी पाप केली आहेत ती आपल्यावर उलटून येत आहेत तेव्हां त्याला तोंड देणे हांच एकमेव मार्ग आहे.

तेथे असलेले देव कद्रूच्या ह्या शापामुळे व्यथित झालेले मी पाहिले आहे. आपल्याच मुलांना असा शाप देणे एकाद्या आईस कसें शक्य होते? असें ते विचारत होते. ते देव ब्रह्मदेवाला विचारतात, तुम्ही त्या शापाता अनुमोदन ताबडतोब दिले ते कसें? (कोणत्याही शापास अथवा आशिर्वादास ब्रह्माची अनुमति असल्याशिवाय तो फळत नाही असा संकेत आहे.)

त्यावर ब्रह्मदेव बोलतात, "सापांची संख्या झपाट्याने वाढत आहे तसेंच त्याच्यातील विषाचे प्रमाणसुद्धा वाढत आहे. हे एकंदर इतर प्राण्यांच्या दृष्टीने घातक आहे. ते विनाकारण कोणालाही चावतात ते योग्य नाही. त्यामुळे त्यांची संख्या कमी करण्यासाठी ह्याशिवाय दुसरा मार्ग मला दिसत नाही. परंतु, सरसकट सगळे मरणे सुद्धा योग्य नाही विशेष करून जे निरुपद्रवी आहेत ते जगले पाहिजेत. त्यासाठी जेव्हां तो नाशाचा क्षण येईल तेव्हां नेमके ते निरपराध सर्प कसें वाचतील त्याचीसुद्धा व्यवस्था मी करून ठेवली आहे. त्याकाळी सर्पवंशात एक सत्पुरुष जन्म घेईल. ययवरस वंशातील श्रेष्ठ ऋषी, जरत्कारू ज्याचे संयमन निर्दोष आहे व ज्यानी श्रेष्ठ दर्जाची तपस्या पूर्ण केली आहे, तो सत्त्वशिलता, प्रामाणिकपणा, ब्रह्मचर्य, तपस्वीता, निष्पाप, सत्यवादी हे सहा गुण परिपूर्णपणे आचरणात आणतो. तो आपला वंश वाढवण्याच्या इच्छेने लग्न करील ते एका सर्पिणीशी. जी वासुकीची बहीण असेल. त्या दोघांना एक सुपुत्र होईल असा किं, जो उच्च दर्जाचा ऋषी असेल, त्याचे नांव असेल अष्टीक. तो हा यज्ञ थांबवेल अशाप्रकारे कीं, जे साप निर्दोष आहेत ते त्या संहारातून सहीसलामत निसटतील".

इलपत्र पुढे सांगतो, "ब्रह्मदेव त्यावर पुनः तथास्तू असा आशिर्वाद देतात व स्वगृही प्रयाण करतात. अहो वासुकी, मला माहीत आहे कीं, तुला एक बहीण आहे जिचे नांवसुद्धा जरत्कारु आहे. म्हणून आम्हा सर्वांना ह्या गंडांतरातून मुक्ती मिळवून देण्यात आपण मदत करावी. जरत्कारू लग्न करू इच्छितो तेसुद्धा त्याच्या वंशाच्या उद्धारासाठी व म्हणून तो श्रेष्ठ ऋषी, त्याला कोणी बायको दान करतो कां, ते विचारत फिरत आहे. पुढे तुला जरत्कारू भेटेल तेव्हां तू त्याला तुझी बहीण दान करावीस. हा विवाह होणार व म्हणून मला आपल्या सर्वांची ह्यातून सुटका होणार असें निश्चितपणे दिसत आहे. एवढे सांगून इलपत्र आपले भाषण संपवतो.

अशारितीने आदिपर्वातील  अष्टीक पर्वाचा अडतिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकोंचाळीसावा

## (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती पुढे सांगतो, अहो अवतारी महात्म्यानो, इलपत्रचे ते छोटे पण अर्थपूर्ण भाषण ऐकून बहुतेक सज्जन सर्प आनंदी होतात. त्यानंतर वासुकी आपल्या छोट्या बहिणीची, जरत्कारुची, विशेष काळजी घेऊन तिला वाढवू लागतो.

त्यानंतर फार काळ गेला नव्हता आणि असुर व देव समुद्रमंथनाचे प्रयोजन करतात. त्या कामात त्यांना घुसळणीचा दोर म्हणून वासुकी मदत करण्यासाठी तयार होतो. समुद्रमंथन यथासांग यशस्वी झाल्याच्या आनंदात ते देव ब्रह्मदेवास विनंति करतात कीं, आदिपरमेश्वरा, ह्या वासुकीने मोठी मदत आम्हाला समुद्रमंथनात केली आहे हे आपण जाणता आहात. आता आमची पाळी आहे किं, आम्ही त्याच्यासाठी कांहीं करावे. असा मित्र वासुकी व त्याचे बांधव त्यांच्याच आईने दिलेल्या शापामुळे मोठ्या अडचणीत सांपडला आहे. तरी आपण जाणता आहात कीं, आपल्या मंजूरीशिवाय कोणताही शाप कार्यरत होत नाही तरी आपल्या ह्या सामर्थ्याचा उपयोग करून वासुकीला व त्याच्या सत्पात्र भावंडांस अभयदान करावे. आपल्या कृपेने हे शक्य आहे. तरी महादेवा, तुम्ही ते करून आम्हा देवांवर कृपा करावी कारण वासुकी आमचा परममित्र आहे.

ते ऐकून ब्रह्मदेव उत्तर देतात, "अहो मर्त्य देवांनो, तुम्ही जे मांगता ते मला पुरते समजले आहे. आता सापांच्या राजांने इलपत्राने जे सुचवले आहे त्या प्रमाणे करावे म्हणजे जरत्कारू व जरत्कारु ह्या उभयतांचे लग्न होईल व सर्पांचा रक्षणकर्ता अष्टीक जन्माला येईल. तो सर्व सत्पात्र सापांना त्या यज्ञापासून अभय मिळवून देईल. ययवरस वंशातील थोर तपस्वी जरत्कारू जन्मला आहे व तो आपली तपस्या पूर्ण करून तयार झाल्यावर वासुकी योग्यवेळी त्याला आपली बहीण लग्नात देईल असे पहावे".

असें ब्रह्मदेवाचे उद्गार ऐकल्यावर वासुकी आपल्या सर्व सापांना ताकीद देतो कीं, त्यांनी जरत्कारूच्या हालचालीवर नजर ठेवून रहावे व जेव्हां तो पत्नीच्या शोधाला निघेल तेव्हां त्याची खबर वासुकीस कळवावी. पुढचे काम वासुकी उरकेल.

अशारितीने आदिपर्वातील  अष्टीक पर्वाचा एकोणचाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग चाळीसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

शौनक सौतीला विचारतात, "अरे सुता, मला सांग किं, ह्या महान ऋषीचे नांव जरत्कारू असें कां होते. ह्या नांवाला कांहीं उत्पत्ती आहे कां? असेल तर ती सांग".

त्यावर सौती सांगतो, "जर म्हणजे कमर, आणि करू म्हणजे फार मोठा. ह्याची कमर फार मोठी होती म्हणजे तो फार जाडा होता परंतु, तपस्या व अनुष्ठाने करून तो अगदी कृष झाला, त्याचप्रमाणे वासुकीची बहीणसुद्धा तशीच जाडी होती म्हणून तिचे नांवसुद्धा तेंच होते. ते ऐकून शौनक ऋषी गालातल्यागालात  हसले. सौतीला म्हणाले, "हे असे आहे कां"?.

शौनक त्यानंतर म्हणाले, "मी आतापर्यंतचे कथन ऐकले आहे, आता तूं मला सांग अष्टीकचा जन्म कसा झाला".

शौनकांकडून अशी आज्ञा झाल्यावर शास्त्रात जसें सांगितले आहे त्यानुसार सौती पुढील वृतांत सांगू लागतो. वासुकी सर्व सापांस आज्ञा करतो किं, ते जरत्कारूवर लक्ष ठेवतील व त्याला केव्हां लग्न करण्याची इच्छा होते ते पहातील आणि जर असें आढळले तर ते वासुकीला त्याबद्दल सुचना

करतील. म्हणजे मग वासुकी त्याच्या लहान बहिणीचे कन्यादान जरत्कारूला करतील. सर्व सर्प त्या कामात गुंततात परंतु, जरत्कारू सच्चा तपस्वी होता व त्याचे भोगइंद्रियावर स्वाभाविक नियंत्रण होते त्यामुळे सुखोपभोगांसाठी तो लग्नाच्या विचारात आढळत नव्हता. अशा स्थितीत तो ऋषी अस्थिपंजर अशा अवस्थेत सर्व जग फिरत होता. पुढे जरत्कारूला त्याचा पूर्वज भेटतो व त्याच्याकडून त्याची व्यथा ऐकल्यावर जरत्कारू आपला ब्रह्मचर्याचा मानस सोडून वंश वाढवण्यासाठी लग्न करण्यास तयार होते हे सर्व आपण आधी पाहिले आहेच. असें सांगून नंतर सौती तेथे जमलेल्या ब्राह्मणांस सांगतो कीं, त्या आधी मुळात जनमेजयांस हा सर्पसंहारक यज्ञ करण्याची इच्छा ज्या घटनेमुळे झाली ती घटना पहावी असें मला वाटते तर ती अशी,

एकदा परिक्षित नांवाचा राजा जो पांडवांच्या कुळातील होता शिकारीस जातो. अनेक वन्य प्राणी मारत मारत तो मध्य वनात जातो व एका सांबरास बाण मारतो. ते सांबर बाणासह वेगांने वनांत पळून जाते. त्याच्या मागें परिक्षित राजासुद्धा आपले धनुष्य व बाण घेऊन धावत निघतो. परिक्षित राजा वनात सर्वत्र भटकून त्या बाण लागलेल्या सांबरास शोधत फिरत असतो जसें शंकर महादेव वनांत शिकार करतांना फिरत असें. परिक्षित राजाची ख्याती असतें किं आजपर्यंत त्याने मारलेला बळी कधीही पळून गेलेला नव्हता. हे कसे गेले त्याचे परिक्षितला आश्र्चर्य वाटत होते. त्या त्वेषात परिक्षित राजा त्या सांबाराच्या मागे धावत निघाला. बऱ्याच पाठलागानंतर ते सांबर कोठे गायब झाले ते त्याला समजले नाही. शोधत शोधत तो त्या रानात खूप आंत शिरलेला असतो. तो राजा आता थकून

गेलेला असतो. त्याला तहान लागलेली असते. तेथे त्याला एक ऋषीची पर्णकुटी दिसते. तेथे तो गाईच्या आचळांतून वाहणारे फेसाळ दूध आधाशा सारखा घटा घटा पितो. तृप्त झाल्यावर तो तेथे शांतपणे बसलेल्या समीक ऋषीस, जो एकटक कोठेतरी नजर लावून बसलेला असतो, त्यास विचारतो, "मी परिक्षित राजा, सम्राट अभिमन्यूचा पुत्र येथे शिकार करण्यासाठी आलो असतांना एका सांबरास माझा बाण लागला व ते वनांत कोठेतरी गायब झाले आहे. तुम्ही ते सांबर पाहिले कां"? असे राजाने त्या ध्यानस्थ ऋषीस विचारले. त्या ऋषीने कांहींच उत्तर दिले नाही. पुनः पुन्हा विचारूनही तो ध्यानस्थ ऋषी कांहींच बोलला नाही. त्यामुळे राजा वैतागला व चिडून तेथे मरून पडलेला साप बाणाच्या टोकांनी उचलून त्या ध्यानस्थ ऋषीच्या खाद्यावर त्या ऋषीची चेष्टा करण्यासाठी ठेवला. ऋषी त्या स्थितीत ते सर्व पहात होते व सहन करीत होते कारण, ते मौनव्रताने बांधले गेले होते. एवढे झाले पण त्या ऋषीने राजास शाप सुद्धा दिला नाही. जणूकाय कांहीच झाले नाही. ते पाहिल्यावर सावकाशपणे राजाच्या ध्यानात आले कीं, हा मुनी व्रतस्थ आहे व म्हणून तो कांहीं बोलणे अशक्य आहे. ते लक्षात आल्यावर राजाला वाईट वाटले. त्याचा राग निवळला. समीक मुनी तसांच बसलेला होता व राजा कंटाळून आपल्या राजधानीकडे निघून गेला. तो क्षमाशिल ऋषी समजला कीं, तो राजा त्याचे कर्तव्य करीत होता त्यामुळे त्याच्यावर राग काढणे उचित नव्हते. राजाने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर न देणे हे अपराधासारखे कृत्य होते त्यासाठी त्या राजांने केवळ एक मृत साप माझ्या खांद्यावर ठेवला त्याबद्दल रोष करणे उचित नाही असें तो मुनी समजत

होता. मुनी त्याच्या ध्यानसाधनेत गढून गेला. पुनः त्या राजाला माहीत नव्हते कीं, हा मुनी कोण आहे म्हणून, जरी त्याचा अपमान झाला होता तरी मोठ्या मनांने त्यांने राजाला माफ केले होते.

त्या ऋषीस एक पुत्र होता. त्याचे नांव श्रृंग्नी होते. श्रृंग्नी आपल्या गुरूच्या आज्ञेत राहून घोर तपस्या करीत असें. सभोवतीच्या सर्व प्राणिमात्रांवर तो सहानुभूतिने वागत असें. त्यावेळी तो कांहीं कामासाठी कोठे बाहेर गेला होता. तो आला तसें त्याचा गुरुबंधू, एका दुसऱ्या ऋषीचा मुलगा, नांव कृष त्याला ही घटना हसत हसत सांगतो कीं, त्याच्या बापाच्या खांद्यावर कोणी राजाने मृत साप ठेवला. वयाने लहान परंतु, तेजस्वी व तपस्या करण्यात श्रेष्ठ असा श्रृंग्नीला जेव्हां हे समजले तेव्हां फार रागावला. त्या घटनेमुळे रागावलेला श्रृंग्नी कृषला सांगतो अशा गोष्टी सांगत जाऊ नकोस. परिस्थिती पाहून बोलत जा. अशा गोष्टी सांगण्या सारख्या नसतात. त्यावर कृष बोलतो, तुझ्या बापाच्या खांद्यावर कोणी मृत साप ठेवतो व तुला त्याबद्दल कांहींच कसें वाटत नाही? कृष पुढे म्हणतो, त्याला विशेष नवल वाटले कारण, श्रृंग्नीच्या वडलांना सुद्धा त्यात कांहींच गैर वाटले नाही.

अशारितीने आदिपर्वातील  अष्टीक पर्वाचा चाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकेचाळीसावा

## (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती पुढे सांगतो, आपल्या पित्याचा अशारितीने अपमान झाल्याचे श्रृंग्रीस सहन होत नाही. कृषकडे पहात श्रृंग्री मृदू स्वरात विचारतो, माझे तात अशारितीने खांद्यावर मृत सर्प घेऊन कां बसले आहेत ते सांग. त्यावर कृष सांगतो, अरे एक राजा आला होता जेव्हां तू येथे नव्हतास. तो राजा ज्याचे नांव परिक्षित असे आहे, शिकारीच्या निमित्ताने आला होता. त्यांने तो मृत सर्प तुझ्या पित्याच्या खांद्यावर ठेवला. श्रृंग्री विचारतो, असें काय माझ्या पित्याने केले कीं, त्या राजाने असे कृत्या करावे ते तुला माहीत आहे कां? ते सांग म्हणजे मी तुला माझ्या तपस्येची ताकद दाखवतो.

परिक्षित राजा जो राजा अभिमन्यूचा मुलगा आहे तो शिकारीसाठी ह्या वनात आला होता. त्याने एका सांबरास बाण मारला परंतु, ते मरून न पडता त्या बाणासकट पळून गेले. त्याला शोधण्यासाठी परिक्षित राजा आपल्या आश्रमात आला, तेव्हां त्यांने तुझ्या पित्यास एकटक ध्यानस्थ बसलेले पाहिले व त्यांना त्या सांबराबद्दल विचारले. तुझे तात मौनव्रतात असल्यामुळे ते कांहींही उत्तर देऊ शकत नव्हते. राजाने विचारलेल्या प्रश्नास उत्तर न देणे हा अपराध आहे हे तूं जाणतोसच. त्यामुळे परिक्षित राजाने रागावून एक शिक्षास्वरूप तो मृत सर्प बाणाच्या टोकांवर उचलून तुझ्या

पित्याच्या खांद्यावर ठेवला. तुझे पिता ध्यानस्थच राहिले व त्यांनी त्या राजास क्षमा केली असावी कारण अजून ते तसेंच मृत सापाला खांद्यावर घेऊन बसलेले आहेत. राजा मात्र त्यानंतर आपल्या ठिकाणी हस्तिनापूरी निघून गेला.

सौती एवढे सांगून थोडावेळ थांबून मग पुढे सांगू लागला, श्रृग्नीने हा त्याच्या वडलांचा व पर्यायाने स्वताचा अपमान असें समजून परिक्षित राजाला शाप दिला.

श्रृग्नीने हातात पाणी घेऊन ते पाणी आसमंतात फेकून शाप देतो किं, अरे महापापी राजा, माझ्या ब्राह्मण, सन्यस्थ तपस्वी वयोवृद्ध पित्याचा घोर अपमान करण्याबद्दल मी तुला शाप देतो कीं, येत्या सात दिवसांत तक्षक सर्प तुला यमसदनास पाठविल. कारण त्यांने असें कृत्य करून ब्राह्मणांना व स्वताच्या कुरू वंशाचे नांव बदनाम केले आहे. त्यासाठी मी माझ्या तपोसामर्थ्याने तक्षकाला ह्यासाठी उद्युक्त करतो.

सौती पुढे सांगतो, असा शाप देऊन श्रृग्नी आपल्या पित्याच्या जागी जातो व पहातो कीं, त्याचा पिता अजूनही तसांच तो मृत सर्प खांद्यावर घेऊन ध्यान करीत आहे. ते पाहून त्याला संताप व दुःख अनावर झाले व तो लहान मुलगा बापाच्या पायाजवळ बसून अश्रू ढाळू लागला. दुःखावेगांत तो आपल्या जन्मदात्यास बोलतो, तात, आपला अशारितीने अपमान करणाऱ्या त्या नीच राजास मी माझ्या तपोसामर्थ्याने शापीत केले आहे. मला खात्री

आहे कीं, माझा शाप कार्यरत होईल व तो हलकट राजा जो कुरू कुळालासुद्धा लांछन आहे येत्या सात दिवसांत तक्षकाच्या दंशाने मरून जाईल.

ते ऐकल्यावर त्याचे पिता आपले मौनव्रत सोडून त्याला बोलतात, "माझ्या बाळा, मला तुझे हे कृत्य अजिबात आवडलेले नाही. एका संन्याशाला असें आततताईपणे कोणालाही, पुढचा पाठचा विचार न करतां, आपल्या तपोसामर्थ्याने मारणे शोभत नाही. तो राजा त्याचे क्षत्रिय कार्य करीत होता. राजाला प्रतिसाद न देण्याची शिक्षा त्यांने मला केली, ते त्याचे कृत्य योग्य होते. तो आपला राजा आहे. तो आपले संरक्षण करतो. त्याला मारणे म्हणजे धर्माला मारणे असें होते हे तुझ्या लक्षात कसें नाही आले? जर राजाच अशा क्षुल्लक कारणांसाठी मारला जाऊ लागला तर राज्य कसे चालणार. आपण आपली तपस्या व इतर पवित्र कार्ये निश्चिंतपणे करत असतो करण तो आपले संरक्षण करीत आहे. म्हणून आपल्या सारख्या तपस्व्याने अशा साधारण चुकांकडे दुर्लक्ष करावयाचे असते. राजा म्हणजे धर्म व जर धर्माला मारले तर तो धर्म आपल्याला मारील ही नैसर्गिक प्रतिक्रिया तुझ्या लक्षात कशी नाही आली? तुला माहीत आहे कीं, हा परिक्षित राजा एक गुणी व तत्त्वशिल शासक आहे आणि तरीसुद्धा तू असें कृत्य केलेस ह्याचे मला फार वाईट वाटते. असा चागला राजा मेल्याने सर्व जन एकाद्या पोरक्या मुलासारखे होतील. तो गुणी राजा मृगया करीत थकलेला भागलेला उपाशी असा आला होता. त्याचे साधे स्वागत सुद्धा आपण केले नाही व उलट तूं त्याला एवढ्या क्षुल्लक कारणासाठी मारण्याचा शाप दिला आहेस हे फार वाईट झाले आहे. मनु

सांगतो, एक चागला राजा दहा वैदीक ब्राह्मणांपेक्षा मोठा असतो. त्याने जे वर्तन माझ्याशी केले ते केवळ माझ्या मौनव्रताबद्दलच्या अज्ञानामुळे होते म्हणून ते सर्वस्वी क्षम्य होते म्हणून मी त्याच्यावर रागावलो नाही व तूं मात्र बेजबाबदारपणे त्याला शाप देऊन मोकळा झालास! हे तुझे वर्तन निखालस बालिश आहे. त्या राजाला शाप देण्याचा तुला बिलकूल अधिकार नव्हता, अशाने तू तुझा अध्यात्मिक र्हास करून घेशील. आपले तपोसामर्थ्य असें वाया घासवू नकोस".

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा एकेचाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग बेचाळीसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती त्यानंतर सांगतो, पित्याच्या ह्या रोषपूर्ण दोषारोप बोलण्यामुळे श्रृग्नी व्यथीत होतो व बोलतो, "माझे हे कृत्या अधीरपणाचे, बेजबाबदारपणाचे असो, ते आता माझ्याकडून घडले आहे, तुम्हाला आवडणारे नसेलही परंतु, एकदा दिलेला शाप मांगे घेण्याची क्षमता माझ्यात नाही. मी कधीच असत्य बोललेला नाही. म्हणून माझा शाप फळणारच हे निश्चित". ते ऐकून समीक मुनी त्याला सांगतात, "मला माहीत आहे कीं, तू फार शक्तिमान झाला आहेस. तू सत्यवादी आहेस, तू कधीही खोटे बोलत नाहीस, म्हणून तू दिलेला शाप फळणारच हे मी चांगलेच जाणतो. एक गोष्ट लक्षात ठेव कीं, जरी तू मोठा झालास तरी अशा बाबींबाबत माझा विचार ऐकून मगच वागावेस असे मला सांगावेसे वाटते. तू अजून अशा गोष्टींबाबत अपक्व आहेस. शापासारख्या गोष्टी तुझ्या वयाच्या स्नातकांनी अमलांत आणावयाच्या नसतात हे लक्षात घे. असा अविचार जगाला घातक ठरू शकतो. तू अजून तुझी साधना पूर्ण केलेली नाहीस, तू अजून सहा सद्गुण (सत्त्वशिलता, प्रामाणिकपणा, ब्रह्मचर्य, तपस्वीता, निष्पाप आणि सत्यवादी, म्हणजेच षड्दोष मुक्ती) पूर्णपणे आत्मसात केलेले नाहीस म्हणून तू शाप देण्यास पात्र नाहीस".

समीक मुनी पुढे श्रृग्रीला समज देतात कीं, असें चिडणे व अविचाराने राग दाखवणे खऱ्या तपस्व्यास शोभत नाही. तू माझा पुत्र आहेस म्हणून सांगतो, तू कधीही रागावणार नाहीस कारण, क्रोध हा एक दोष आहे व त्याचे समर्थन होत नाही. क्रोध उत्पन्न झाला किं, प्रथम त्याचे कारण किती रास्त आहे ते पहाण्यास शिक. खऱ्या साधकांस शोभेल असें तू वागावेस. राग शांत ठेवण्यासाठी तू ह्यापुढे फक्त फलाहार करावास. मी नेहमी पहातो किं, तू जरा जास्तच गोमांसाहार करीत असतोस. असा फलाहार खाल्यास तुझा क्रोध कमी होईल व तुझे अध्यात्मिक सामर्थ्य कमी होणार नाही. ज्या ब्राह्मणाला आपले षड्रीपू (काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर) नियंत्रित करतां येत नाहीत त्यांनी फळे व उकडलेली कंदमुळं खावयाची असतात. ज्यांचे षड्रीपू संयमित आहेत त्यानीच फक्त मांसाहार करावयाचा असतो. क्रोधाप्रमाणे सर्वच सहा दोष माणसाची संयमक्षमता कमी करतात, म्हणूनच त्यांना षड्रीपू असें म्हणतात. तू ब्राह्मण आहेस म्हणून हे सर्व तू चांगलेच समजून घे. तू असे केलेस तर ब्राह्मणाला शोभतील असे क्षमाशिल, दयाळू, शांत हे गुण तुझ्यात तयार होतील, एरवी तू ब्राह्मण रहाणार नाहीस. समीक मुनी हे सांगत असतांना कृष ते ऐकत असतो. तो नम्रपणे पुढे होऊन ऋषींना विचारतो, ज्ञानमणी, मी ह्या संदर्भातील कांहीं प्रश्न विचारू इच्छितो तरी त्यासाठी आपली अनुमती द्यावी. समीक मोठ्या प्रेमाने अनुमती देतात. तेव्हां कृष विचारतो मत्स्याहार व पक्षी आहार ह्यां बद्दल थोडे निवेदन करावे. त्यावर संतुष्ट झालेले समीक त्या दोहोंकडे पहात सांगतात कीं, मत्स्याहार व

पक्षी खाणे शाकाहारासारखेंच कमी उर्जा देणारे असल्यानें त्यांचा विपरित परिणाम अध्यात्मिक प्रगतीवर होत नाही. त्याच प्रमाणे दुग्धाहार व दुग्धजन्य पदार्थांचा आहार मांसाहारा सारखाच अति उर्जा देणारा असल्यामुळे ब्राह्मणांनी त्याचा मिताहार करावा. कृष विचारतो, आपण आता सांगितले कीं, ज्यांचे षड्रीपू संयमित आहेत त्यांनी मांसाहार करण्यास हरकत नाही हे काय, ते जरा नीट समजावून सांगाल तर कृपा होईल. कृषचे असें नेमस्त बोलणे ऐकून समीक पुन्हा आनंदीत होतात व त्याच्याकडे पहात सांगतात, वस्तुतः मांसाहार उर्जा (मानसिक शक्ति) मिळविण्यासाठी अत्युत्तम असतो परंतु, त्यापासून मिळणारी उर्जा संयमित करणे सोपे नसते. त्यासाठी विशेष मनोनिग्रह व अध्यात्मिक पोक्तता असावी लागते, शुक्ल औदासिन्याने ते साध्य करता येते. ते सर्व असेल तर मांसाहार केल्यास जी शक्ति ब्राह्मणास प्राप्त होते ती विलक्षण सामर्थ्याची असते. ज्यांच्यामध्ये तो मनोनिग्रह व अध्यात्मिक पोक्तता नाही अशा श्रृग्नीसारख्या पोरकटाने केलेला मांसाहार त्याचे व पर्यायाने सभोवारचे नुकसान करणारे ठरते जसें आता ह्या शापामुळे होणार आहे. एवढे सांगितल्यानंतर समीक पुनः श्रृग्नीकडे पहात बोलतात, शांतचित्त राहूनच तू तुझे काम करावयास पाहिजे. माणसातील आत्म्याचे खरे शत्रू हे सहा दोष असतात व जर तू त्यांत अडकलास तर तुझे भवितव्य धुसर होईल. सर्वांचे भले करण्याचे विचार ब्राह्मणाच्या वागण्यात असणे महत्वाचे असते हे सर्व लक्षात ठेवून तू तुझी वर्तणूक ठेवली पाहिजेस. मी स्वतः हे नियम पाळत असल्यामुळे राजाकडे जाऊन मी त्याला तू दिलेल्या शापाची माहीती देणार आहे. त्या शापापासून मुक्ति कशी मिळवता येईल ते पहावे

लागेल. राजाचे वागणे जरी अयोग्य होते तरी त्यावरची अशी प्रतिक्रीया एका ब्राह्मणाला शोभत नाही हे मी राजाला सांगून, त्याच्या कडे तुझ्या अपक्व, बालिश वागण्याबद्दल दिलगीरी व्यक्त करणार आहे.

हे सर्व कृष ऐकत असतो व त्याला अजून एक प्रश्न विचारावा असें वाटते म्हणून तो पुनः प्रश्न विचारण्यासाठी अनुमती मांगतो. समीक त्याला अनुमती देतात तेव्हां तो विचारतो, तात, आपण आत्ता म्हणालात कीं, माणसातील आत्मा, ह्याचा अर्थ समजावून सांगाल कां? समीक त्यावर हसून बोलतात, अरे आपल्यात जीव व आत्मा असें दोन कारक काम करीत असतात. त्यातील जीव देहाच्या संवर्धनार्थ आणि संरक्षणार्थ काम करतो व आत्मा माणसाच्या अध्यात्मिक उत्कर्षासाठी काम करीत असतो. जीव देहाबरोबर उत्पन्न होतो व देहाबरोबर नष्ट होत असतो. आत्मा म्हणजे आपण, तो ह्या देहात राहून अध्यात्मिक उत्कर्ष साधण्याचे काम करीत असला पाहिजे. जे सहा विकार (काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर) आपण पाहिले ते वस्तुतः जीवाला मदत करण्यासाठी विधात्याने आपल्यात स्वाभाविकपणे उत्पन्न केले आहेत, त्यांत वस्तुतः आत्म्याने दखल घ्यावयाची नसते पण ती चुक नेहमी होते जसे श्रृग्नीच्या कडून झाले. कृष विचारतो, आता सांगा तपोनिधी, ह्या सहांचे नेमके प्रयोजन कसे? प्रश्न आवडल्यासारखे समीक हसतात व उत्तर देतात, काम, क्रोध, मद आणि मत्सर देहाच्या संरक्षणार्थ उपयोगी यावेत अशी अपेक्षा आहे व लोभ आणि मोह जीवाच्या संवर्धनार्थ ह्या मायेत अडकवून ठेवण्यासाठी आहेत. परंतु, जेव्हां आत्मा ह्यात

अडकतो तेव्हा ह्यापैकी कांहीही होत नाही उलट अहंकाराची पुष्ठी करण्यासाठी ते वापरले जातात व अध्यात्मिक र्हासास कारणीभूत होतात, जसें श्रृग्नीच्या बाबत घडले. कृष न राहून पुनः एक आणखीन प्रश्न विचारण्याची संमती मांगतो, त्याला संमती समीक ऋषी देतात. तेव्हां तो विचारतो, गुरुजी मला सांगा, मत्स्याहार व पक्षी आहार ह्याचे प्रभाव आपल्या विवेकांवर कसे होतात? समीक सांगतात, माशांत तीन प्रकार असतात, त्वचाधारी, खवलधारी व कवचधारी असें ते आहेत. त्यातील खवलधारी व कवचधारी सामान्य शाकाहाराप्रमाणे समजावेत. मात्र त्वचाधारी मांसाहाराप्रमाणे समजावेत. मांसाहारात लहान प्राण्याचे मांस मोठ्या प्राण्याच्या मांसापेक्षा कमी उर्जा देणारे म्हणून शाकाहारासारखे समजावे. पक्षांमध्येसुद्धा लहान पक्षी कमी उर्जा देणारा व मोठ्या आकाराचे जास्त उर्जा देणारे समजावेत. जसजशी ब्राह्मणाची अध्यात्मिक उर्जा वाढत जाते तसे त्याला पोषक प्रमाणात जास्त उर्जा देणारा आहार करावा लागतो. ज्या ब्राह्मणाने सहा गुण (सत्त्वशिलता, प्रामाणिकपणा, ब्रह्मचर्य, तपस्वीता, निष्पाप, सत्यवादी) संपादन केले आहेत त्यांने मांसाहार करणे चांगले पण आपला श्रृग्नी आताच हट्टाने गोमांस खात आहे, त्यामुळे हे अरिष्ट उभे ठाकले आहे.

[टीपः वाचकानो, ह्या संवादातून एक गोष्ट स्पष्ट होते किं, जैनांच्या शाकाहाराचे कारण व हिंदूंच्या शाकाहाराचे कारण ह्यांत भिन्नता आहे. जैन शाकाहार करतांत कारण, त्याद्वारा ते अहिंसा तत्त्वाचे पालन करतात. त्यात

अध्यात्मिक उर्जेच्या (मानसिक शक्ति) नियमनाचा संबंध नसतो. हिंदूंमध्ये अध्यात्मिक उर्जेचे नियमन करतां यावे ह्यासाठी सुरुवातीला शाकाहार व क्रमाने जशी अध्यात्मिक उर्जा नियमित होईल तसें जास्त सामर्थ्यासाठी मांसाहार करावा असें सांगितले आहे.]

[टीपः प्राचीन काळी ब्राह्मणाला स्वसंरक्षणासाठी मनःशक्तिची आवश्यकता असें. ही मनःशक्ति हेंच त्याचे शस्त्र असें. त्याद्वारा शाप देऊन तो त्याचे संरक्षण करीत असें. किंवा कोणी मदत केली तर त्याला आशिर्वाद देऊन त्याची उतराई ते करीत असत. हे मनोबळ कमावण्याची साधना व मोक्षोर्थी साधना ह्यांत फरक असतो. मनोबळाची साधना जीवासाठी असते तिला जीवाची अध्यात्म साधना असें सुद्धा म्हणतात, व मोक्षार्थी साधना आत्म्यासाठी असते. कारण, मन हे जीवाचे इंद्रिय आहे. वैदीक काळी जीवाच्या अध्यात्म साधनेला फार महत्व होते. त्यासाठी मांसाहार महत्वाचा होता.]

अशारितीने तो उद्बोधक संवाद झाल्यावर तो महान वैरागी, निश्र्चयाचे पक्के असे समीक, आपल्या पट्ट शिष्यास, गौरमुखास, परिक्षित राजाकडे पाठवतात, त्याला ते सांगतात कीं, प्रथम राजाचे क्षेमकुशल विचार व नंतर परिस्थिती पाहून हा शापाचा विषय काढ. गौरमुखसुद्धा एक तेजस्वी संन्यासी व तपस्वी होता. त्याचे आगमन राजाच्या निवासी झाल्यावर त्याचे यथोचित स्वागत होते. तेथे थोडावेळ विश्राम केल्यावर तो राजाला त्याच्या

गैरकृत्यामुळे कोणते संकट त्याच्यावर उभे ठाकले आहे त्याची कल्पना त्याच्या गुरुंने सांगितल्याप्रमाणे, राजाच्या मंत्रीमंडळासमोर देतो.

गौरमुख राजाला सांगतो, आपण, आपल्या राज्यात रहात असलेल्या एका उच्चकोटीच्या समीक नावांचा ऋषीच्या आश्रमात गेला होतात. तेथे तुम्ही त्याच्या खांद्यावर एक मृत साप आपल्या बाणाच्या टोकावर उचलून रागाच्या भरात ठेवलात. जेव्हां ते त्यांच्या ध्यानसमाधीत होते. ऋषीने आपल्याला माफ केले आहे कारण, ते कृत्य आपण अनवधानाने केले होते असें माझे गुरु समीक ऋषी समजतात. परंतु, त्यांचा मुलगा मात्र तुमच्या त्या कृत्यामुळे क्रोधीत झाला व त्यांनी आपल्याला एक शाप दिला आहे. त्यानुसार येत्या सात दिवसांत आपल्याला तक्षक साप चावून मारेल असें आहे. हा शाप त्यांने त्याच्या पित्याच्या संमतीशिवाय दिला आहे. त्या शापाला उःशाप नसल्याने मला माझ्या गुरुंने आपल्याला सावध करण्यासाठी पाठवले आहे. स्वतः तपस्या करणारा तो परिक्षित राजा हे ऐकून व्यथीत झाला. त्याला त्याच्या कृत्याची आठवण आली व आपण असें अक्षम्य कृत्य कां केले त्याचा त्याला अतीव पश्चात्ताप झाला. तेवढे झाल्यावर राजा गौरमुखला आदरपूर्वक निरोप देतो. त्यात राजा समीक ऋषीची शतशः क्षमा मांगतो व त्यांचे आशिर्वाद माझ्यासाठी तुम्ही (गौरमुख) मिळवावेत अशी प्रार्थना करतो.

राजा समजतो कीं, आता फार वेळ हाताशी नाही व त्यासाठी आपल्या संरक्षणार्थ जे कांहीं करणे आवश्यक आहे ते सर्व करण्याचे आदेश तो

त्याच्या आमात्यांस देतो. तक्षकापासून संरक्षण मिळावे म्हणून एका खांबावर राहील असे एक घर बांधले गेले व तेसुद्धा सात दिवसाच्या आत, ते अतिदक्ष पहारेकऱ्यांच्या देखरेखीत होते. विष बाधा झाल्यास त्वरित इलाज करणे शक्य व्हावे म्हणून उत्तम वैद्य व मांत्रिक तैनातीत ठेवले गेले. एवढी व्यवस्था करून त्या परिस्थितीत तो राहून आपला कारभार पाहू लागला. त्याच्याकडे कोणाही अनोळखी माणसास प्रवेश नव्हता. अशी सर्व व्यवस्था असतांना शेवटी सातवा दिवस उगवतो. त्यावेळी ब्रह्मज्ञ काश्यप ऋषी राजाला कांहीं कमी राहू नये म्हणून स्वतः तेथे तक्षकाच्या दंशापासून वाचवण्या साठी जाण्याचे ठरवतात व वेळ कमी राहीला असल्यामुळे त्वरित निघतात.

तक्षक त्याच्या दिव्य दृष्टीने त्यांना लगबगीने परिक्षित राजाच्या निवासी जातांना पहातो. तक्षक एका वृद्ध ब्राह्मणाचे रुप घेऊन काश्यपाकडे जातो व विचारतो, अहो ऋषीवर्य, इतक्या घाईने तुम्ही कोठे जात अहात? काश्यप त्याला सांगतात, सापांचा राजा तक्षक, आज कुरु वंशाच्या परिक्षित राजाला दंश करणार आहे, त्या दंशापासून  वाचवण्यासाठी मी जात आहे. ते ऐकून तक्षक त्यांना सांगतो, "मी तक्षक आहे. माझ्या दंशापासून तू त्या राजाला वाचवू शकणार नाहीस". त्यावर काश्यप ऋषी त्याला आव्हान देतात किं, ते तक्षकाच्या दंशापासून राजाला निश्चित वाचवतील.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा बेचाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग त्रेचाळीसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती सांगत असतो, काश्यपाकडून असे उत्तर मिळाल्यावर तक्षक त्यांना आव्हान देतो, "जर तुम्हाला असें वाटते कीं, तूं मी चावलेल्या कोणालाही वाचवू शकता तर मी आता ह्या वडाच्या झाडाला चावतो, तू त्याला वाचवून दाखव". असें बोलून तक्षक त्या वडाच्या झाडाला चांवतो व त्याबरोबर ते झाड पेटते व तत्क्षणी जळून जाते. तक्षक काश्यपांना सांगतो, "आता ह्या जळलेल्या झाडाला तूं तुझ्या मंत्राने पुनः जीवंत करून दाखव". काश्यप ते आव्हान स्वीकारतो व त्या झाडाची राख एकत्र गोळा करून त्यावर संजीवनी मंत्राचा प्रयोग सुरु करतो. थोड्याच वेळात त्यातून अंकूर बाहेर येतो व मग दोन पाने आणि यथावकाश पूर्ण झाड उभे रहाते. हे पाहिल्यावर तक्षक समजतो किं, काश्यपापुढे त्याचे विष कुचकामी आहे. मग तो दुसरा डाव खेळण्याचे ठरवतो. तक्षक काश्यपाला सांगतो कीं, "हे झाड जीवंत करणे व राजाला जीवंत करणे ह्यात मोठा फरक आहे कारण, राजाला शाप एका ऋषीने दिला आहे व म्हणून माझ्या विषात त्यावेळी एक वेगळी शक्ति असेल, काय तू त्या शापाला उलटवू शकतोस? समजा तूं माझे विष शापामुळे अधिक शक्तिमान झालेले असल्याने तू उतरवू शकला नाहीस तर

जगात तुझी जी ख्याति आहे कीं, तू मोठा वैद्य आहेस, तपस्वी आहेस ती नष्ट होईल व तुझी नाचक्की होईल. काय तुला अशारितीने नाचक्की होणे आवडेल"? काश्यप विचारात पडलेला असतांना, तक्षक काश्यपाला विचारतो, "आपण राजाला कां वाचवण्यासाठी जात अहात"? तक्षकाचे बोलणे ऐकून विचारी झालेला काश्यप ऋषी ताबडतोब ध्यानात जातो व पहातो किं खरोखरच परिक्षित राजाचे आयुष्य संपत आले आहे त्याचा अर्थ तक्षकाचे विष काश्यप उतरवू शकणार नाही! हे ध्यानात आल्यावर काश्यप सांगतो कीं, त्याला राजा मोठी बिदागी त्याबद्दल देणार आहे. किती बिदागी राजा देणार असें तक्षक विचारतो. काश्यप त्याला ती रक्कम सांगतो. त्यावर तक्षक त्याला त्याच्या दुप्पट बिदागी काढून देतो व सांगतो, "आता तुम्ही तुमच्या निवासी जावे, राजाकडे जाण्याचे कारण नाही". काश्यप आता त्या पैशाचा मिंधा झाला होता व म्हणून तो परत निघून जातो. काश्यपाच्या अशा वागण्याने त्याची महान वैद्य म्हणून असलेली ख्याति कायम रहाते. अशारितीने यशस्वीरित्या काश्यपाची बोळवण केल्यावर तक्षक योग्य मुहूर्तावर एका वैदिक ब्राह्मणाचे रुप घेऊन हस्तिनापुर राजधानीत प्रवेश करतो. तेथे त्याला समजते किं, राजा अतिशय सुरक्षितरित्या एका गुप्त जागी रहात आहे व त्याच्या भोवती सापांची विषं काढणारे निष्णात मांत्रिक व वैद्य आहेत. ते समजल्यावर तक्षक ठरवतो कीं, आता मायेच्या भ्रमशक्तिचा प्रयोग करूनच राजापर्यंत जावे लागेल. तक्षक त्याच्या कांहीं विश्वासातील सापांना संन्याशांच्या रुपांत राजाकडे कांहीं फळे, फुलं, कुश गवत व पाण्याने भरलेला पवित्र कलश घेऊन पाठवण्याचे ठरवतो. तक्षक त्या सापांना सांगतो, "तुम्ही

कांहीं खास कामासाठी आला अहात व राजाला प्रत्यक्ष भेटणे अत्यावश्यक आहे असें रक्षकांना सांगा. तुम्ही ब्राह्मणांच्या वेषात असल्यामुळे तुम्हाला विरोध होणार नाही परंतु, कांही असे वागू नका कीं, त्यांना तुमचा संशय येईल. काम काय असें विचारले तर सांगा, ह्या भेटवस्तु त्यांच्या संरक्षणार्थ काश्यप ऋषीनी पाठवल्या आहेत". पुढे सौती सांगतो, तक्षकाने दिलेल्या सुचनांप्रमाणे ते साप संन्याशाचे सोंग घेऊन राजाच्या दालनात प्रवेश करतात व राजाला ती फळं, फुलं, कुश गवत व पाण्याचा कलश अर्पण करतात. तो महान राजा त्या भेटवस्तु स्वीकारतो. राजा त्या संन्याशाच्या सोंगातील सापांस जाण्याची आज्ञा करतो व ते जातात. त्यानंतर राजा आपल्या आमात्यांना बोलावतो व सांगतो काश्यप ऋषींनी ही फळं पाठवली आहेत तेव्हां तुम्ही सर्व माझ्या बरोबर यावे व आपण सर्व ही खावीत. त्यातील एका फळात तक्षक एका किड्याच्या रुपात बसलेला असतो. नेमके तेंच फळ राजा खाण्यासाठी उचलतो व खाण्यास सुरुवात करतो.

अहो शौनक, मी तुम्हाला काय सांगणार, राजाने त्या फळात चांवा घेतल्याबरोबर त्यातून एक भयंकर दिसणारा किडा बाहेर येतो. काळे डोळे व तांबट रंगाची कांति असलेला तो किडा तक्षकच होता. त्या किड्याला पाहिल्यावर राजा समजतो किं, त्याचा मृत्यू पुढे उभा आहे. तो उद्वेगांने उद्गारतो, "माझ्या कुकर्माचे फळ मला मिळत आहे. एका सत्पुरुषाचा, समीक ऋषींचा, मी अपराधी आहे, मला मृत्यूदंड मिळणे क्रमप्राप्त आहे व ते होत आहे". असें म्हणून राजा त्या किड्याला उचलून आपल्या मानेवर ठेवतो.

तक्षक त्याचे सापरुप धारण करतो व राजाच्या गळयाभोवती घट्ट विळखा घेऊन राजाचा गळा आवळून टाकतो. ते करतांना तक्षक एक मोठी आरोळी मारतो. राजाचा मृत्यू होतो.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा त्रेचाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग चव्वेचाळीसावा

# (अष्टीक पर्वा पुढे चालू)

सौती सांगतो, राजाला त्या तक्षकाच्या वेटोळयात निपःचित पडलेला पाहून सर्व आमात्य घाबरून जातात. त्यांना दुःख आवरत नाही. तक्षकाचे ओरडणे ऐकून ते इतस्ततः पळून गेले. पळून जाताना ते त्या तक्षकाला निळया आकाशात विळखे घेत घेत निघून जातांना पहातात, त्याचा रंग नारंगी दिसतो. त्यानंतर ज्या एकखांबी घरात राजाचा मृत्यू झाला ते घर एकदम पेटते.

राजाच्या कलेवरावर उत्तरक्रिया यथासांग केल्या जातात. त्यानंतर नेहमीच्या रिवाजानुसार राजाचा लहान मुलगा, जनमेजय ह्याला नवीन राजा म्हणून घोषित करतात. त्याला सर्व शत्रुघ्न अशी पदवी देतात. राज्या कारभाराचे ज्ञान उपजत बुद्धीत असल्याप्रमाणे राजा जनमेजय कारभार पाहू लागतो. सर्व शत्रूंना तो वठणीवर आणतो. त्याचा विवाह काशीनृप, जो कुरील घराण्याचा कुलदिपक होता, सुवर्णवर्मा ह्यांच्या कन्येशी, तिचे नांव वपुश्तमा, करण्याचे ठरवले जाते. त्या विवाहातून जनमेजयाला खूप सुख मिळते. आपल्या पत्नीबरोबर तो अनेक सुंदर फुलं असलेली वने व सुंदर जलचर विहार करतात अशी जलाशये पहातो. त्याच्या आनंदाला तोटा नसतो. पूर्वीच्या काळी पुरुरव राजांने उर्वशीबरोबर जसे सुख मिळवले तसे

जनमेजय राजा वपुश्तमा बरोबर अनुभवतो. वपुश्तमा अतिशय गौरवर्णाची व एकाद्या अप्सरेसारखी सुंदर असते. तिलासुद्धा ह्वा तसा पति मिळाल्याने ती पूर्ण समाधानी झालेली असते.

अशारितीने आदिपर्वातील  अष्टीक पर्वाचा चव्वेचाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग पंचेचाळीसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

त्याकाळी महान तपस्वी जरत्कारू आपले जगभ्रमण करीत होता. दिवसा चालावयाचे व रात्र झाली किं, आराम करावयाचा असा त्याचा परिपाठ होता. भ्रमण करतांना तो विविध खडतर तपस्या करीत असें ज्या कोणी सामान्य तपस्वी करण्याचे धाडस करणार नाही. पवित्र नद्यांत जसें मिळेल तसें तो स्नान करीत असें. असा हा मुनी हवा खाऊन जगत असें. त्याला कोणतीही इच्छा नसल्यामुळे तो पूर्ण समाधानी असें जीवन जगत होता. कांहींही खात नसल्यामुळे त्याचे शरीर कृश होत होते. अशा परिस्थितीत तो एका ठिकाणी त्याचा एक पूर्वज एका खड्यात उलटा टांगून ध्यान करीत असलेला पहातो. विरणाच्या तंतूनी त्याचे पाय बांधलेले असतात. ते तंतूसुद्धा एक भलामोठा उंदीर, जो त्या खड्यात रहात असतो तो, कुरतडत असतो असें तो पहातो. ते पूर्वज कांहींही खाण्यासाठी नसल्याने उपाशी पोटी अशा अति दुःखदायक परिस्थितीत लोंबकळत होते परंतु, त्यांची मोक्षाची इच्छा मात्र तीव्र होती. अशा त्याच्याच पूर्वजांची दया येऊन जरत्कारू त्यांच्या जवळ जाऊन नम्रपणे त्यांना विचारतो, "आपण कोण अहात? आणि अशारितीने उलटे टांगून तपस्या कां करता अहात"? तो त्यांना सांगतो, "हे पहा तुम्ही ज्या एका तंतूवर टांगलेले अहात तो तंतू एक उंदीर

कुरतडत आहे व तो तंतू केव्हाही तुटून तुम्ही त्या खड्यात पडाल. आपल्याला असें दयनीय अवस्थेत पाहून माझे तुमच्या बद्दलचे कुतुहल जागृत झाले आहे. मला सांगा, जर मी कांहीं व्रत केले तर तुमची अशा परिस्थितीतून सुटका करू शकेन कां? माझ्या तपस्येने जे पूण्य जमा झाले आहे त्यातील कांहीं दिल्याने तुमची ह्यातून सुटका होईल कां?

तुमची ह्या अवस्थेतून सुटका करण्यासाठी मी माझी सर्व तपस्या दान करण्यास तयार आहे". एवढे ऐकल्यावर एक पूर्वज त्याला सांगतो, "अरे तेजस्वी आदरणीय ब्रह्मचाऱ्या, तू खरोखरच आमची ह्यातून सुटका करू इच्छितो आहेस कां? अरे ब्राह्मणा, तू आम्हाला कांहींही करून ह्यातून सोडवू शकणार नाहीस. कारण, आमच्याकडे सुद्धा बरीच तपस्या व त्यापासून प्राप्त होणारे पूण्य आहे परंतु, त्याचा कांहीं उपयोग नाही कारण, हा प्रश्न वेगळयाच स्वरूपाचा आहे. आम्हाला फक्त एकच मनुष्य ह्यातून सोडवू शकतो. तो आमचा एक वंशज आहे. आमची अशी अवस्था झाली आहे कारण, आम्ही जगाच्या नियमाकडे आपल्या तपस्येच्या भरात राहून दुर्लक्ष केले. जगाच्या नियमानुसार माणसांने कितीही तपस्या करून पूण्य जमवले तरी जर तो पुत्रप्राप्ती करत नसेल तर ते पुण्य व ती तपस्या व्यर्थ असते. कारण तो स्वर्गात जाण्याऐवजी पाताळात जातो. पाताळातून त्याला पुन्हा पृथ्वीवर जन्म घ्यावा लागतो, त्याला शांति मिळत नाही कारण त्यांने ब्रह्माचा नियम मोडला. ब्रह्माचे नियम मोडणारा मग तो कितीही श्रेष्ठ तपस्वी असो पाताळात जाऊन पडतो. ह्या एका चुकीमुळें कित्येक ऋषी आज तपोसिद्ध

असूनही पाताळात खितपत पडलेले आहेत. आम्ही आमच्या तपस्येच्या नादांत पुत्रप्राप्तीकडे दुर्लक्ष केले म्हणून आमची ही अवस्था झाली आहे. प्रपंच करणे हे ब्रह्माची सेवा करण्यासारखे असते. जो प्रपंचात न अडकता तो निस्वार्थ बुद्धीने करतो तो स्वर्गात जातो. हे तुला माहीत नाहीं कां? त्यामुळे आता आम्हाला तो तंतू तुटल्यावर पाताळात जांवे लागणारच! तू हा जो तंतू पहातोसना तो आमच्या एका वंशजाचे प्रतिक आहे. तो आमचा वंशजच केवळ आम्हाला ह्यातून वाचवू शकतो. त्यावर जरत्कारू त्यांना विचारतो, कोण आहे तो तुमचा एकुलता एक वंशज, मी त्याला पुत्रप्राप्ती करण्यास आग्रह करीन जेणे करून तुमची अशा स्थितीतून सुटका होईल. मला त्या तुमच्या उरलेल्या वंशजाचे नांव सांगा. हे ऐकून ते पूर्वज त्याला सांगतात, त्या एकुलत्या एक वंशजाचे नांव आहे, जरत्कारू! दुर्दैवाने तो सुद्धा आमच्याप्रमाणे प्रपंचात न पडता तपस्या करीत आहे. जर तो प्रपंचात जाऊन पुत्रप्राप्ती करील व आमचा ययवरस वंश वाढवील तरच आमचा उद्धार होईल. जर तुला आम्हाला कांहीं मदत करावयाची असेल तर त्याला भेटून हे सांग व जर तो प्रपंचात जाऊन पुत्रप्राप्ती करण्यास राजी झाला तरच ह्यातून आमची सुटका होईल एरवी नाही. तू जो उंदीर तंतू कुरडतांना पहात आहेस तो काळ आहे व काळ कोणालाही माफ करीत नाही. गोष्टी जेव्हाच्या तेव्हा झाल्या नाहीत तर त्यांचे परिणाम भोगावेच लागतात. आमचा एकुलता एक वंशज कांहीं न खाता तपस्या करीत आहे त्यामुळे तो खंगत आहे तसांच हा तंतू सुद्धा खंगत आहे. जर त्यांनी प्रपंच केला नाही व तो तसांच मेला तर तोसुद्धा आमच्याबरोबर पाताळात पडणार आहे हे अजून त्याला माहित

नाही. ह्या जगाच्या रहाटीसाठी मोक्ष प्राप्तीपेक्षा वंश वाढवणे जास्त महत्वाचे असते कारण, जर वंश वाढला नाही तर जगाचा नाश होईल व ते विधात्याला चालणार नाही. वंश वाढवण्यासाठी प्रपंच करणे कोणत्याही तपस्येने होणाऱ्या पूण्य प्राप्तीपेक्षा कमी महत्वाचे नसते. ह्यासाठी जर तुला तो भेटला तर त्याला हे सर्व समजावून सांग व प्रपंचात जाण्यासाठी तयार कर. त्यासाठी त्याने शक्यतर स्वताच्या कुळातील मुलगी दान घ्यावी तर ते करावे व जर स्वताच्या कुळातील नाही मिळाली तर इतर कोणत्याही वंशाची करावी. असें जर तो करील तरच आमची सुटका होईल. एका सच्च्या मित्राप्रमाणे तू जर हे केलेस तर आमच्या सद्भावना तुला पुढे तरतील. परंतु, मुला तू कोण ते तू अजून सांगितले नाहीस, ते सांग. एवढे संभाषण झाल्यावर जरत्कारू त्या पूर्वजाला विचारतो, आताच तुम्ही म्हणालात किं, केवळ पुण्य प्राप्तीने मोक्ष मिळत नाही व वंश नष्ट झाल्याने पुण्यवानसुद्धा पाताळात जातात हे कसें काय? ते ऐकून तो पूर्वज जरत्कारूला सांगतो, जगाच्या संवर्धनार्थ वंश वाढत ठेवणे आवश्यक असते. अहंकाराचा नाश केल्याने मोक्ष प्राप्ती होते. परंतु, माणसाचे कर्तव्य केवळ अहंकार सोडण्याने पूर्ण होत नाही. त्या बरोबर जगाची रहाटी चालू ठेवणे हे सुद्धा त्याचे कर्तव्य असते. आम्ही नेमके हेंच विसरलो व त्यामुळे आमची ही अवस्था झाली आहे. प्रपंच सांभाळणे व अहंकार सोडणे (अहंकार विरहीत प्रपंच करणे ह्यालाच कर्मयोग असें म्हणतात) अशी दुहेरी कसरत माणसाकडून विधाता अपेक्षित असतो हे आम्हाला फार उशीरा ध्यानात आले ती चूक तू करू नकोस. एक गोष्ट नेहमी लक्षात असूं दे किं, आपण सर्व विधात्याला उत्तर देण्यास बांधलेले असतो.

कोणाचीही त्यातून सुटका नाही होत. अशा रितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा पंचेचाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग शेहेचाळीसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती त्यानंतर सांगतो, ते ऐकून जरत्कारू अचंबित होतो त्याला फार वाईट वाटते कीं, केवळ आपल्या ह्या कठोर व्रतस्थ जीवनामुळे माझे पूर्वज अशा हालाखीच्या अवस्थेत रहात आहेत व त्यांना सांगतो अहो, तपस्व्यानो, माझ्या आजोबांनो, पणजोबांनो व खापरपणजोबांनो, मीच तो तुमचा एकुलता एक वंशज जरत्कारू आहे. मला आज्ञा करा किं, मी काय करावे जेणेकरून तुमची सुटका होईल.

ते ऐकून पूर्वज आनंदाने म्हणतात पहा काय योगायोग आहे कीं, "तू नेमका आमच्या येथे भटकत भटकत आला आहेस. हा केवळ दैव योगच म्हणावा कीं, ही ब्रह्माची लिलान". त्यावर ते जरत्कारूला विचारतात, "अरे मुला, तू लग्न कां करीत नाहीस"? जरत्कारू बोलतो, "माझ्या पवित्र पूर्वजांनो, आता पर्यंत मी ब्रह्मचर्य श्रेष्ठ समजत होतो परंतु, तुमच्या बरोबर झालेल्या बोलण्यातून मला माझी चूक समजली आहे व मी केवळ वंश वाढवण्यासाठी प्रपंचात शिरण्यास तयार आहे. मी लग्न करण्यासाठी तयार आहे परंतु, प्रश्न असा आहे किं, माझ्यासारख्या निष्कांचन बैराग्याला कोण आपली कन्या दान करील. आपण सांगता त्या प्रमाणे शक्यतर माझ्या वंशाची व ती न मिळाल्यास इतर जातीची मुलगी स्वीकारून प्रपंच सुरु करीन. मी

पुत्र प्राप्तीसाठी प्रयत्न करीन व आपल्याला अपेक्षित सद्गती मिळवून देईन, त्याबद्दल आता आपण निश्चिंत रहावे".

असें सांगून पुढे सौती बोलतो, जरत्कारू असें आश्वासन आपल्या पितरांस देऊन पुनः जगभर फिरून कोणी आपल्याला बायको देते कां ते विचारत राहीला. अहो, शौनक मुनी, जरत्कारू त्यावेळी वय होऊन गेलेला असल्यामुळे त्याला कोणी आपली कन्या दान करण्यास तयार नव्हते. त्यामुळे जरत्कारू विफल मनाने रानात जाऊन मोठ्या मोठ्याने रडून आकांत करून स्वगत बोलू लागला किं, "मला कोणी बायको देतो कां"? असें तो प्रत्येक वेळी तिनदा हाक मारीत होता. तरी कोणीही त्याच्या आकांतास साद देत नव्हते. तरी तो हिंमत न हरता बायको मिळविण्याचा प्रयत्न तसांच चालू ठेवतो. आपल्या पूर्वजांचे कल्याण करण्यासाठी तो अक्षरशः वाटेल ते करण्यास तयार होता. जरत्कारू रानांत एकटाच ओरडत असतो, तुम्ही कोणतेही प्राणी असा मला चालेल, तुम्ही चर असा अथवा अचर असा, दृष्य असा अथवा अदृष्य असा, माझ्या पूर्वजांच्या सुटकेसाठी मी तुमची कन्या माझी भार्या म्हणून स्वीकारण्यास तयार आहे. मला त्यांच्यासाठी एका पुत्राला जन्म देणे अनिवार्य आहे. मी असा दरिद्री व दुःखी सर्व जगाला विनंती करतो किं, कृपया मला एक स्त्री दान करा. ज्या कोणाकडे अशी उपवर कन्या आहे त्यांनी मला भेटावे. मग ती कशीही असो. ह्या त्याच्या किंकाळया वासुकीच्या हस्तकांपर्यंत पोहोचतात. ते जरत्कारूचा पाठलाग करू लागतात. येथे वासुकीला ती वार्ता समजते. ताबडतोब वासुकी आपल्या धाकट्या बहिणीस

दागदागिन्याने सजवून त्या वनात जातो जेथे जरत्कारू बायकोसाठी टाहो फोडत असतो. जरत्कारूला भेटून तो त्याला आपली बहीण कन्यादानाने देतो. परंतु, अहो, भृगुच्या वंशजा, शौनका, जरत्कारू तिला तत्क्षणी स्वीकारत नाही. तो वासुकीला त्याच्या बहीणीचे नांव काय असें विचारतो. तो वासुकीला सांगतो कीं, तो तिला सांभाळण्यास आर्थिक दृष्ट्या असमर्थ आहे.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा भाग शेहेचाळीसावा संपला.

# आदिपर्व भाग सत्तेचाळीसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती नंतर सांगतो, ते ऐकल्यावर वासुकी ऋषी जरत्कारूला बोलतात, अहो महान ब्राह्मणा, ही कन्या तुझ्याच नांवाची आहे. ती माझी बहीण आहे. तुझ्यासारखीच ती वैराग्यपूर्ण आहे. तिच्या पालनपोषणाची तुम्ही काळजी कृपया करू नका. ती माझी जबाबदारी असेल. कृपया तिचा पत्नी म्हणून आपण स्वीकार करावा. तुमच्यासाठीच मी तिला वाढवले आहे. हे ऐकून ऋषी म्हणाले, असें असेल तर हे आपल्यामध्ये निश्चित झाले कीं, तिच्या पालनपोषणाची जबाबदारी माझ्यावर नाही. तसेच, ती असें कांहींही करणार नाही जे तिने करू नये असें मला वाटते. जर तिने असें कांहीं केले तर मी तिला सोडून देईन, सौती बोलत रहातो, जसें साप वासुकी तिच्या पालनपोषणाची जबाबदारी स्वीकारतो, जरत्कारू त्याच्या घरी जाण्यास तयार होतो. त्यानंतर तो ऋषी रितसरपणे जरत्कारुचा हात धरतो व शास्त्रसंम्मत विधींनुसार तिला आपली धर्मदत्त भार्या म्हणून आपलेसे करतो. त्यानंतर ते उभयता एका छान सजवलेल्या दालनात आपले लग्न संपन्न करण्यासाठी प्रवेश करतात. तेथे जरत्कारू ऋषी कांही काळ आपल्या नववधूबरोबर रहातो. तेथे तो आपल्या पत्नीकडून एक वचन घेतो कीं, असें कांहींही ती करणार नाही अथवा बोलणार नाही जे त्याला आवडणार नाही.

आणि जर तिने ते वचन मोडले तर तो तिला सोडून देईल. ती अट ऐकून वासुकीची बहीण चिंताक्रांत होते पण तरीसुद्धा ती त्याची अट मान्य करते व बोलते, "तथास्तु".

अशारितीने त्याचा विवाह संपन्न होतो व ती पतिव्रता आपल्या पतिची काळजी घेण्याचे काम करू लागते. अशारितीने कांहीं दिवस जातात व ती जरत्कारूच्या मुलाचा गर्भ धारण करते.

तो गर्भ तळपत्या अग्नीसारखा तेजस्वी असतो. तो तेजस्वी गर्भ चंद्र जसा कला कलांनी वाढत जातो तसा वाढत असतो. अशाच एका सायंकाळच्या वेळी जरत्कारू आपल्या बायकोच्या मांडीवर डोके ठेवून निजला असतां, तो थकलेला दिसत होता, अशा प्रसंगी सूर्यदेव पश्चिमेच्या क्षितिजाकडून मावळता मावळता, त्यांच्या दालनात शिरतो. ते पाहून वासुकीच्या बहीणीस समजत नाही कीं, तिने नेमके काय करावे. आपल्या नवऱ्याला उठवावे तर तो त्याच्या समाधीत आहे. असें केल्याने त्याचा पुण्यक्षय होईल त्याची तिला चिंता वाटत होती. माणसाचा पुण्यक्षय होणे हे सर्वात मोठे पाप असते. काय करावे ते तिला समजत नव्हते, जर त्याला उठवले तर तो रागावेल, आणि जर नाही उठवले तर संध्याकाळची प्रार्थना चुकेल व ते सुद्धा पुण्याचा क्षय करणारे आहे. शेवटी न राहून ती त्याला उठवण्याचा प्रयत्न करते, त्यासाठी ती त्याच्या तोंडाला हात लावून बोलते, "अहो ऋषीवर, संध्यासमय समीप आला आहे तेव्हां उठावे व आपली संध्याकाळची प्रार्थना हातपाय धुऊन करण्यास लागावे". ते ऐकून जरत्कारूचे

ओठ थरथरू लागले व तो तिला बोलतो, "नागवंशाच्या माझ्या पत्नी, तू मला माझ्या झोपेतून उठवण्याचा प्रयत्न करून माझा अपमान केला आहेस कारण, तू माझी ध्यानसमाधी मोडली आहेस. त्यामुळे मी ह्यापुढे तुझ्यासोबत राहू शकणार नाही. मी जेथून आलो तेथे निघून जाईन. तू सुंदर आहेस, तुझी मांडी सुंदर आहे, मला माहीत आहे कीं, सूर्य माझ्या इच्छेशिवाय मावळतीला जाऊ शकत नाही. आपल्या अटीप्रमाणे मी तुझ्यासह ह्यापुढे रहाणार नाही. जेथे अपमान होतो तेथे माझ्या सारख्या तपस्वी माणसांने रहावयाचे नसते. ते ऐकून वासुकीची बहीण, जरत्कारु घाबरून थरथरा कांपू लागली. "अहो ब्राह्मण, मी तुमचा अपमान करण्यासाठी तुम्हाला उठवण्याचा प्रयत्न करीत नव्हते. तुमच्या पुण्याचा क्षय होऊ नये एवढ्यासाठी मी आपल्याला उठवत होते. त्याला आपण अपमान समजणे योग्य होणार नाही".

रागाच्या भरात तो महान ऋषी आपल्या पत्नीचा त्याग करण्याच्या उद्देशाने तिला बोलतो, "मी माझ्या संबंध आयुष्यात कधीही खोटे बोललो नाही. तेव्हां मी तुला सोडून जाणार कारण, तसे आपल्यामध्ये ठरले आहे. माझे क्षण तुझ्यासह फार चांगले गेले हे मी कबूल करतो. मी गेल्यावर त्याबद्दल तू तुझ्या बंधूस सांग. माझ्या जाण्याने तू दुःखी होऊ नकोस".

वासुकीची बहीण त्यावर काळजीत पडली. ती त्याला बोलते, "माझा कांहींही दोष नसता हे असें तुमचे वागणे अयोग्य आहे". ती ते बोलतांना थरकांपत होती त्यातून तिची भिती व दुःख व्यक्त होत होते.

तिच्या डोळ्यांतून अश्रू वहात होते. दोनही हात जोडून ती ऋषीला विनंति करते, "तुम्ही पुण्याच्या मार्गाने जाणारे अहात तेव्हां असें करणे उचित नाही. मीसुद्धा तपस्वीनी आहे. माझ्या आप्तांच्या भल्यासाठी मी आपल्याशी लग्न केले आहे. तो उद्देश अजून साध्य झालेला नाही अशा स्थितीत आपण मला सोडून जाणे रास्त ठरत नाही. अशारितीने तुम्ही गेल्याचे समजले तर मी माझ्या भावाला काय जाब देऊ"?

"आमच्याच आईच्या शापातून सुटका व्हावी म्हणून आपले लग्न झाले तो गर्भ अजून पूर्ण वाढलेला नाही. माझ्या आप्तांचे संपूर्ण भवितव्य त्या गर्भाच्या वाढण्याशी निगडीत आहे. त्यासाठी मी आपल्याला विनंति करते कीं, मला क्षमा करावी व आपला मला सोडून जाण्याचा मानस त्याग करावा. आपण जाणतां कीं, मी निर्दोष आहे, ते जाणूनसुद्धा तुम्ही असें जाल तर ते तुमच्या नांवाला शोभणार नाही. असें झाले तर तुमच्याशी माझे लग्न लावण्यामागील उद्देशच व्यर्थ होईल".

तिचे ते बोलणे ऐकून ऋषी त्या प्रसंगाला उचित असें सांगतात, "अहो महाभाग्यवान, अशा माझ्या जरत्कारु, तुझ्यामध्ये आपला गर्भ जो अग्नीसारखा तेजस्वी आहे, व्यवस्थितपणे वाढत आहे व तो यथावकाश जन्म घेईलच त्याबद्दल तू व तुझे आप्त ह्यांनी निश्चिंत रहावे कारण तो एक महान ऋषी असून तो सर्व वेदांचा ज्ञाता आहे. तो तुझ्या व माझ्या वंशाना जरूर

वाचवेल. असें बोलून जरत्कारू अधिक घोर तपस्या करण्यासाठी तेथून निघून जातो".

अशारितीने आदिपर्वातील  अष्टीक पर्वाचा सत्तेचाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग अठ्ठेचाळीसावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती पुढे सांगतो, अहो, शौनक, ज्यांची संपत्ति आहे त्यांचे वैराग्य, ऐका पुढे असं होते कीं, जरत्कारू  गेल्यावर ताबडतोबच वासुकीची बहीण तिच्या भावाकडे जाते व जे घडले ते सर्व सविस्तार सांगते. ते ऐकून सर्पांचा राजा चिंतित होतो. तो त्याच्या बहीणीच्या पेक्षा स्वतालाच जास्त अभागी समजतो कारण, ज्या कारणांनी तो विवाह रचला होता तो उद्देश आता अडचणीत आला होता. तो त्याच्या बहीणास विचारतो, "ज्या उद्देशाने तुझा विवाह त्याच्याशी केला होता त्याबद्दल तू काय सांगू शकतेस"?

जरत्कारु सांगते कीं, ह्याबद्दल मी त्यांना विचारले होते तेव्हां ते मला बोलले किं, त्याच्या संबंधातून एक गर्भ तयार झाला असून तो व्यवस्थितपणे तिच्या उदरात वाढत आहे. जातांना तिचा पति तिला सांगतो कीं, तो गर्भ एका महान ऋषीचा असून तो तिच्या व त्याच्या वंशांचा उद्धार करणार आहे. तो तुझ्या वंशाला त्या शापापासून मुक्ति देईल तसेच त्याच्या ययवरस कुळाचाही उद्धार करेल. जसें ब्रह्मदेवांने सर्व देवांपुढे पूर्वी सांगितले आहे. म्हणून तू काळजी अजिबात करू नकोस, आपल्या लग्नाचा उद्देश साध्य होणार आहे तरी त्या बद्दल तूं निश्चिंत रहावेस.

ते ऐकून वासुकी आपल्या बहीणास सांगतो, "तुला माहीत आहे तुझा नवरा कसा विक्षिप्त आहे, त्याच्या पाठी जाऊन त्याला परत येण्यासाठी विनवण्या केल्यातर कदाचित तो आपल्याला एकादा आणखीन शाप देऊन परिस्थिती जास्तच बिघडवून टाकेल. म्हणून मी आता त्याच्या मागे जाणार नाही. तरी जर तो सांगतो ते खरे असेल तर कांही बिघडले असे समजण्याचे कारण मला दिसत नाही".

"माझा पति कधीच खोटे बोलणार नाही म्हणून मला असें वाटते किं, त्यांनी जे सांगितले किं, माझ्या उदरात आमचा बाळ वाढत आहे ते सत्य असणार. अशा वेळी कोणी खोटे बोलेल असे संभवत नाही". असें सांगून, जरत्कारु वासुकीचे समाधान करते.

पुढे ती बोलते, "माझा पति अधिक घोर तप करण्यासाठी अज्ञातवासांत गेला आहे म्हणून मला आता त्याच्या जाण्याचे दुःख वाटत नाही. कारण मीसुद्धा त्याच्या सारखी तपस्विनी आहे".

असें संभाषण त्या भावंडांचे झाल्यावर वासुकी खूष झाल्यासारखे दिसते. तो आपल्या बहीणीचे अनेक प्रकारे कौतुक करतो. चांगल्या भेटवस्तू तिला देतो. अशाप्रकारे आपला आनंद दाखवतो.

जरत्कारुच्या उदरातील गर्भ चंद्राच्या कला जशा वाढतात तसा सावकाशपणे वाढत रहातो. यथावकाश तो जन्म घेतो. एक स्वर्गीय सौंदर्य असलेला तो बाळ सर्व सापांचा आवडता होतो. कारण त्याच्या आगमनानें दोनही कुळांचा उद्धार होणार असतो.

तो वासुकीच्या घरातच मोठा होतो. त्याला शिकवण्यासाठी भृगुचे पिता, च्यवन ऋषींची नेमणूक केलेली असते. अति बुद्धिमान व अनेक उत्तम गुणांनी परिपूर्ण असा तो त्या जरत्कारू दांपत्याचा पुत्र वाढत असतो. जात्याच तो वासनापासून पूर्ण उदास व संतप्रवृत्तिचा असा असतो. त्याचे नांव अष्टीक ठेवले गेले कारण, त्याच्या पित्याने आपल्या पत्नीचा त्याग करतांना उद्गार काढलेले असतात, अष्टीक, कोणीतरी, तो वजनाने भारी असतो. त्याची काळजी त्याचा मामा वासुकी घेत असतो व त्यामुळे तो सापांतच मोठा होत असतो. त्याचे एकंदर रुप महादेवासारखे दिव्य, पवित्र असते. अष्टीक सर्व नागांच्या गळयातील ताईत असें झालेले असते.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा अठ्ठेचाळीसावा भाग संपतो.

# आदिपर्व भाग एकोणपन्नासावा

## (अष्टीक पर्व पुढे चालू)

शौनक विचारतात, सौती आता मला सांग जनमेजय राजाने त्याच्या आमात्यांकडे त्याच्या पित्याच्या मृत्यूबद्दल (स्वर्गारोहणाबद्दल) काय चौकशी केली. सौती त्यावर उत्तर देतो, आता ब्राह्मणानो, जनमेजय राजाने काय विचारले व त्याला काय उत्तरे मिळाली ते सांगतो.

जनमेजय विचारतात, तुम्हाला माझ्या पित्याच्या मृत्यूबद्दल काय माहिती आहे ती मला सांगा. तो महान राजा कसा मेला ते सांगा. माझ्या पित्याच्या आयुष्यातील सर्व घटनांचा आढावा घ्या म्हणजे मला सर्व कांहीं समजेल. ते समजले किं, मी जगाच्या भल्यासाठी कांही उपक्रमाची घोषणा करीन. जर तुम्ही मला ते सर्व सांगितले नाही तर कांहीं करणार नाही. हे ऐकून आमात्य महाशय बोलतात, "आपण आपल्या ख्यातनाम पिताश्रींच्या जीवनाची माहिती विचारत आहात व त्यानंतर त्याचे देहावसान कसे झाले तेसुद्धा आपल्याला समजून घ्यावयाचे आहे हे समजले".

"तुझा पिता अतिसद्गुणी व उच्च दर्जाचा आसामी होता. प्रजेचा हितासाठी तो सदैव झटत असें. प्रजेचे संरक्षण हा त्यांच्या जीवनाचा मुख्य उद्देश होता. न्याय व पूण्यप्रभाव ह्याचा ते साक्षात्कार होता.

तो राजा असा होता कीं, समाजातील चारही वर्ण आपापले काम प्रामाणिकपणे करीत होते ते त्याच्या प्रभावामुळे. तो राजा पृथ्वीची सेवा करण्यात मग्न असें. तो अजातशत्रू होता व त्याने कधी कोणाचा द्वेष केला नाही. त्याचे सामर्थ्य अप्रतिम होते. प्रजापति जसें सर्व प्राणिमात्रांशी समानतेने वागत असतं तसांच हा राजा, तुझे पिताश्री, सर्व प्राणिमात्रांशी सारख्याच प्रेमाने वागत असतं".

"सगळे चारही वर्णाचे प्रजाजन सुखी व समाधानी होते त्यांच्या राज्यात. वृद्ध, पोरकी मुलं, विधवा, अपंग अशा सर्वजणांची तो काळजी घेत असें. स्वताच्या अपत्याप्रमाणे तो त्यांची काळजी घेत असें. श्रीमंत, वैभवसंपन्न असा तो राजा सत्यवादी, सव्यसाची, शिस्तबद्ध, शरद्वत गुरुचा शिष्य होता. लोकांना तो राजा माधवासारखा प्रिय होता".

"सर्वांना प्रिय असलेला तुझा पिता अभिमन्यूचा पुत्र उत्तराच्या पोटी जन्मला होता जेव्हां कुरु वंश नष्टप्राय झाला होता. म्हणून त्याचे नांव परिक्षित (वंशाचा शेवटचा अशा अर्थी) असें ठेवले होते. सर्व शास्त्रे व तंत्रांचा जाणकार, राजाच्या कर्तव्याचा ज्ञाता असा सर्व गुणसंपन्न तुझा पिता होता. त्याचा त्याच्या वासनांवर पूर्ण संयम होता, तसेच तो बुद्धिमानसुद्धा होता. त्याची स्मरणशक्ती तीव्र होती, राजकारणशास्त्र, नितीशास्त्र, अशा सर्वच विषयात तो तरबेज होता. त्यांने त्याच्या मृत्यूपर्यंतच्या काळात एकंदर साठ वर्षे राज्य केले होते. त्यांच्या दुःखद मृत्यूनंतर तुमची राजगादीवर नेमणूक

झाली. तुमची नेमणूक तुमच्या बालपणी झाली आहे. तुम्हीसुद्धा तुमच्या पिताश्रीप्रमाणे सर्व प्राणिमात्रांचे संरक्षण करीत अहात".

हे ऐकल्यावर जनमेजय बोलतात, "आमच्या घराण्यात गेल्या पिढ्यातून असा एकही राजा जन्मला नाही ज्याने प्रजेचे हित संरक्षण केले नाही. विशेषकरून माझ्या पिताश्रींचे उदाहरण पहाता येईल. तरीसुद्धा त्यांचा अंत कसा झाला ते समजून घेण्यास मी उत्सुक आहे". त्याबद्दलाचा सर्व वृतांत आपण मला विषद करावा.

पुढे सौती सांगतो, अशारितीने आदेश मिळाल्यामुळे राजाचे आमात्य जे नेहमीच राजाच्या हिताच्या गोष्टी करतात ते राजाला परिक्षित राजाच्या अंत समयीची सर्व माहिती सांगतात. ती अशी, "आपले पिताश्री प्रजेचे संरक्षण व स्वास्थ्य ह्याकडे सदैव लक्ष देत असतं. अशात त्यांना शिकार करण्याचा छंद लागला. त्यांना त्यांचे पूर्वज पंडु ह्यांच्या प्रमाणे निष्णात शिकारी होण्याचा त्यांचा मानस होता. त्याकरतां त्यांनी जास्त काळ शिकारीत घालवण्याचे ठरवले होते. त्याकारणांनी आपल्या पिताश्रींनी सर्व राज्यकारभार आमच्या हाती सुपूर्द केला होता".

"असेंच एकदा शिकारीवर असतांना परिक्षित राजा एका सांबराला बाण मारतात पण तो लक्ष्यावर लागूनही तो सांबर वनात पळून गेला. राजा त्याच्या मागे धावत गेला पण तो राजाला कोठेंच सांपडला नाही कारण, हातात असलेला धनुष्य व बाणांचा भाता ह्यांच्या भारामुळे तो पाहिजे तसा पाठलाग करू शकला नाही, आणि ते सांबर त्याच्या हातून निसटला.

त्याशिवाय राजेसाहेबांचे वयसुद्धा झाले होते, ते त्यावेळी ऐंशी वर्षांचे होते त्यामुळे ते पाठलाग करण्यामुळे थकून गेले. थकवा व तहान ह्यामुळे ते अस्वस्थ झाले होते, त्यांचा विवेक धुसर झाला होता. अशा अवस्थेत ते असतांना त्यांना वनात एक ऋषी ध्यानस्थ बसलेले दिसतात. तो महान ऋषी मौनव्रतात आहे हे मात्र त्यांच्या ध्यानात आले नाही, केवळ थकव्यामुळे राजांचा विवेक कमी झाला होता. त्यांने त्या डोळे उघडे ठेवून त्राटकात मग्न असलेल्या ऋषीस प्रश्न विचारला कीं, त्यांनी असें एक सांबर पाहिले कां ज्याला बाण लागला आहे. पुनः पुन्हा विचारूनही तो  व्रतस्त ऋषी त्याचे मौन न सोडता तसांच बसून होता त्यांने कांहींच उत्तर दिले नाही. राजाचा विवेक सांपला होता व त्याला उत्तर न देणाऱ्या त्या ऋषीस शासन करण्याच्या मानसातून, राजा तेथे जवळच पडलेला एक मृत सर्प त्याच्या बाणाच्या टोकांने उचलून त्या श्रेष्ठ ऋषीच्या खांद्यावर ठेवतो. राजाच्या विवेकाचा अभाव झाल्यामुळे त्याला तो एक महान तपस्वी आहे हे ध्यानात आले नाही व असा प्रमाद तुमच्या पिताश्रींच्या हातून झाला. राजाने त्या महान ऋषीचा घोर अपमान केला होता. खांद्यावर मृत साप ठेवला तरी तो त्राटकांत रमलेला ब्राह्मण शांत होता व त्यांने कोणतीही नाराजी सुद्धा व्यक्त केली नाही. ते तसेंच त्यांच्या ध्यानात मग्न होते.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा एकोणपन्नासावा भाग संपला.

# आदिपर्व भाग पन्नासावा

## (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती पुढे सांगत असतो, आमात्य राजाला नंतर सांगतात, तो राजाधिराज थकलेल्या अवस्थेत, भुकेला असा त्याच्या निवासी परत येतो. राजा त्यांनी जे बदकर्म केले होते ते पूर्णपणे विसरून आपल्या नित्य कामांत गुंतून गेला.

तो महान मुनी ज्याचे नांव समीक होते त्यांच्या आश्रमात अनेक स्नातक विद्याभ्यासासाठी निवासी होते. त्यांबरोबर समीक ऋषींचा एक पुत्र श्रृग्नी सुद्धा रहात असें. तो लहान होता परंतु, त्याचे तपोसामर्थ्य मोठे होते तसांच तो शिघ्रकोपीसुद्धा होता. तो त्याच्या घोर तपस्येत रहात असें, तो दररोज त्याच्या पित्याकडे जाऊन त्यांची पुजा करीत असें. पित्याने आदेश दिल्याकारणांने तो त्या दिवशी आपल्या पित्याच्या आश्रमात आला होता. आश्रमात आल्यावर त्याला त्याच्या पित्याचा अवमान राजांने कसा केला ते त्याच्या त्या आश्रमातील सवंगड्यांकडून समजते. आपल्या पित्याची कांहीं चूक नसता राजा कां असें वागला हा त्याचा प्रश्न होता. एवढ्या मोठ्या ऋषीचा जर असा अपमान होणार असेल तर तो राजा जगण्यास लायक नाही असा विचार श्रृग्नी करत होता. तो म्हणतो. ज्याच्या आश्रयाने आम्ही त्याच्या राज्यात रहातो तो राजाच जर अशारितीने केवळ मौन करणाऱ्या तपस्व्याचा अपमान करणार असेल तर त्या राजाला जगण्याचा अधिकार

नाही. असें मनात धरून तो बालक ऋषीपुत्र श्रृग्नी तुमच्या पिताश्रीस शाप देतो. जरी वयाने लहान होता तरी त्याचे तपोसामर्थ्य मोठे होते. त्याने आवेगांने हातात पाणी घेतले व पंचमहाभूतात अर्ध्य सोडत तो मोठ्याने आदेश देतो, "माझ्या तपोसामर्थ्याचा प्रभाव पहा, माझ्या आदेसानुसार तक्षक येत्या सात दिवसांत परिक्षित राजाला, ज्या नीचांने माझ्या पवित्र तपस्वी, निरपराध पित्याच्या गळयात मृत साप हारासारखा घातला, दंश करेल व त्यामुळे तो राजा यमसदनास जाईल".

अशारितीने रागात शापवाणी बोलून तो लहान बालक, श्रृग्नी आपल्या पित्याच्या जवळ जाऊन रडू लागला. तो पित्यास त्याने दिलेल्या शापाची वार्ता सांगतो. ते ऐकून तो तपस्वी ऋषी आपल्या सुसंस्कृत पट्टशिष्याला तुमच्या वडलांकडे पाठवतो. त्या पट्टशिष्याचे नांव गौरमुख होते. तो शिष्य राजाकडे आल्यावर थोडी विश्रांति घेऊन मग सांगतो किं, राजाच्या प्रमादामुळे चिडलेल्या त्याच्या मुलांने शाप दिला आहे, तो शापसुद्धा त्याने सांगितला. गौरमुखांने ऋषीचा मानस काय ते सुद्धा सांगितले व जरी ऋषीने राजाला त्याच्या प्रमादाबद्दल क्षमा केली असली तरी त्याच्या नासमज मुलांने त्याच्या तपोसामर्थ्याचा वापर करून राजाला शाप दिला आहे. त्या शापाला उःशाप शक्य नाही. म्हणून राजांने प्रसंगाचे गांभिर्य लक्षात घेऊन आवश्यक ती व्यवस्था करावी.

ते समजल्यावर परिक्षित राजाने तक्षकाच्या विषाला उलटवणारे मंत्र जाणणारे मांत्रिक व वैद्य इत्यादिंची व्यवस्था असलेल्या अशा एका गृहात

रहाण्याची व्यवस्था केली. काश्यप ऋषींना ते समजले तेव्हां ते राजाला मदत करण्यासाठी येण्यास निघाले. परंतु, तो तक्षक, सापांचा राजा, त्यांना वाटेत अडवून विचारतो, कोठे चालला अहात काश्यप मुनी? मुनीवर सांगतात कीं, ते राजाला तक्षकाच्या विषापासून वाचवण्यास जात आहेत. त्यावर तक्षक, जो एका ब्राह्मणाच्या सोंगात असतो, काश्यपाला सांगतो कीं, तोच तक्षक आहे असे बोलून नंतर तो काश्यपाला आव्हान देतो किं, जर तो त्यांने चावलेल्या कोणालाही पुनर्जीवित करू शकतो तर ह्या वडाच्या झाडाला मी चांवतो ते मेल्यावर तू पुन्हा जीवंत करून दाखव. असें बोलून तक्षक त्या बाजूला असलेल्या वडाच्या झाडांस कडकडून चांवतो व त्या बरोबर ते झाड पेट घेते व जळून जाते. त्या झाडावर बसलेला एक वनवासी सुद्धा जो त्यांना लपून पहात असतो, त्या बरोबर जळून जातो. त्याची राख होऊन बाजूला पडते. काश्यप मुनी त्या राखेवर आपल्या मंत्रांचा प्रयोग करून ते वडाचे झाड पुनः जीवंत करतात. त्याबरोबर तो वनवासी सुद्धा जीवंत होऊन लपून रहातो. ते पाहिल्यावर आपली मात्रा काश्यपापुढे चालत नाही हे लक्षात आल्यावर तक्षकांने दुसरी क्लुप्ती वापरण्याचे ठरवले. तो विचारतो राजाला माझ्या विषापासून वाचवण्यामागील उद्देश काय? काश्यप सांगतात, अर्थात् दक्षिणा, तेव्हां तक्षक त्याला दुप्पट दक्षिणा देऊन परत जाण्यास सांगतो व ती दुप्पट दक्षिणा घेऊन तो मुनी निघून जातो.

अशारितीने तक्षक त्याचा मार्ग मोकळा करून आमच्या राजाला त्याच्या दालनात कपटाने भिडून चांवतो व त्यामुळे तुझा बाप मरतो. आम्ही

केलेली कोणतीही संरक्षणाची व्यवस्था तक्षकाला अटकाव करू शकत नाही. ही आहे आपल्या आधीच्या राजाच्या मृत्यूची कथा.

एवढे सांगून ते आमात्य राजाला सांगतात किं, त्यानंतर तुमची नवीन राजे म्हणून नेमणूक झाली.

आपल्या पिताश्रींच्या मृत्यूची कथा ऐकून व उतंक ऋषीचा आदेश पाहून आपण काय करावे ते ठरवणार आहात.

पुढे सौती सांगतो, जनमेजय राजा आमात्यांना विचारतो, "तुम्ही मला जी वडाच्या झाडाची राख झाल्याची कथा सांगितली ती वनात घडली मग तुम्हाला कशी समजली? जर काश्यप आले असतें तर माझे बाबा तक्षकाच्या विषाने मेले नसते. आणि जर असें झाले असते तर त्या तक्षकाची सर्वत्र अपकिर्ती झाली असती. तो सर्वांचा चेष्टेचा विषय बनून राहिला असता. पुढे जनमेजय राजा त्याच्या मंत्र्यांस सांगतो तक्षकाला मी शिक्षा करणार पण त्या आधी मला समजले पाहिजे कीं, तुम्हाला त्या वडाला काश्यपानी जीवंत केले हे कसे समजले? ते जर समजले तरच मी हा सर्पसंहारक यज्ञ करीन.

त्यावर आमात्य राजाला सांगतात, "त्याचे असें झाले किं, जेव्हां काश्यप व तक्षक त्या वनात बोलत होते त्यावेळी ज्या वडाच्या झाडाला तक्षक चांवला त्याच झाडावर एक वनवासी त्या झाडाच्या सुकलेल्या काटक्या काढण्यासाठी चढला होता तो त्यांचे संभाषण ऐकत होता. तक्षक त्या झाडाला चांवला तेव्हां ते वडाचे झाड जळाले त्याबरोबर तो

वनवासीसुद्धा जळून गेला होता व काश्यपांनी त्यांच्या मंत्रसामर्थ्याने जसें ते झाड जीवंत केले तसा तो इसमसुद्धा जीवंत झाला होता. त्यांनेच हे सर्व कथानक आम्हाला सांगितले म्हणून समजले. एवढे बोलून आमात्या राजाला विचारतात, आता काय करावयाचे त्याबद्दलच्या सुचना आपण कृपया कराव्यात. सौती पुढे सांगतो, जनमेजय राजा हे सर्व वृतांत ऐकून विषण्ण मनाने दुःखी झालेला, रडू लागला. आपल्या वडलांना वाचवता आले असते पण ते झाले नाही त्याबद्दल त्याला दुःखावेग आवरता आला नाही व तो मोठ्यानो ओरडला. जनमेजय राजा त्या दुःखी अवस्थेत कांहीं विचार करतो व आपल्या मंत्र्याना सांगतो, "मी तुमच्या कडून माझ्या पित्याच्या मृत्यूची माहिती ऐकली, आता माझा निश्चय काय ते सांगतो, माझ्या पित्याला मारणाऱ्या तक्षकाचा नाश जेवढा लवकर करतां येईल तेवढ्या लवकर केला पाहिजे, त्याला शासन झालेंच पाहिजे. तक्षकांने माझ्या पित्यास जाळून टाकले त्यात श्रृग्री केवळ निमित्तमात्र होता. मुख्य दोषी तक्षक आहे कारण, त्यांने काश्यप ऋषींना कपटाने परत पाठवले व माझ्या पित्याचा मृत्यू त्यामुळे झाला म्हणून तक्षक हांच एकमेव माझ्या बापाचा मारेकरी ठरतो. उतंक ऋषीला सुद्धा त्यांनेच फसवले म्हणून आता मी तक्षकावर सूड उगवून माझ्या बापाच्या मृत्यूचा वचपा काढणार आहे. असें केल्याखेरीज मला शांति नाही. त्यामुळे माझ्यासह ऋषी उतंक आणि तुम्ही सर्व  समाधानी होणार असें मी समजतो".

अशारितीने आदिपर्वातील  अष्टीक पर्वाचा पन्नासावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकावन्नावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती पुढे सांगतो, राजा जनमेजय त्याच्या मंत्र्यांना आपला निश्चय सांगतो कीं, त्या तक्षकाचा व त्याच्या वंशाचा नाश करण्याचा उपक्रम त्यांने हाती घेण्याचे ठरवले आहे, त्यावर त्याचे सर्व मंत्री त्याला अनुमोदन देतात. त्यानंतर त्या कामासाठी आवश्यक असलेले ऋद्विक (ऋग्वेदानुसार यज्ञ करणारे ब्राह्मण) त्यांने आमंत्रित करण्याचे ठरविले. राजा त्याच्या सल्लागारांना विचारतो, पुराणात अशा यज्ञाचा उल्लेख आहे कां? त्यावर एक सर्पयज्ञ असल्याचे त्याच्या निदर्शनात आणले जाते. असा यज्ञ देवांनीच योजला आहे व तो आपणच करणार असा संकेतसुद्धा आहे असें राजाला सांगितले जाते, ते ऐकून जनमेजय राजाचा उत्साह द्विगुणित होतो व त्या यज्ञाच्या कामास प्रारंभ करण्याची आज्ञा राजा देतो. पुराणातील त्या संदर्भानुसार तक्षकाचा मृत्यू जनमेजयाच्या कडूनच होणार असें सांगितले आहे. हे ऐकून राजा त्या यज्ञासाठी कोणती तयारी करावयाची त्याबद्दलच्या चौकशा सुरु करतो. वेदशास्त्रात प्रवीण असलेले ऋद्विक बोलवले जातात.

यज्ञासाठी एक जागा निश्चित केली जाते व तेथे होमकुंड बांधण्यास सुरुवात होते. सर्व तयारी केल्यावर एक अघटीत घटना होते. ते असें, यज्ञकुड उभारण्याचे काम करणारा एक तज्ज्ञ जो खानदानी अशा सुतकुळाचा असतो,

त्याचे नांव लोहीताक्ष असते, जो त्याच्या कामात निष्णात असतो व त्याचे ह्या विषयाचे ज्ञान वादातित आहे, तो राजाला सांगतो कीं, "हे राजा, ज्या मातीवर व ज्या समयी ह्या यज्ञकुंडाचे प्रयोजन केले गेले तो मुहूर्त पहाता असें दिसते किं, हा यज्ञ अपेक्षे प्रमाणे सिध्दीस जाणार नाही. ग्रह रचना असे दाखवते किं, एक ब्राह्मण हा यज्ञ होऊ देणार नाही"! हे ऐकून राजा त्या यज्ञाच्या संरक्षणार्थ नेमलेल्या पहारेकऱ्यांस आज्ञा देतो कीं, त्या भागात राजाच्या परवानगी शिवाय कोणाही प्रवेश करू शकणार नाही.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा एकावन्नावा भाग संपला.

# आदिपर्व भाग बावन्नावा

## (अष्टीक पर्व चालू)

सौती सांगतो, त्यानंतर सर्पसंहारक यज्ञ यथासांग प्रारंभ होतो. शास्त्रात सांगितल्याप्रमाणे यज्ञाचे पुरोहित, जे अशा कामात निष्णात होते ते, यज्ञाचे कार्य सुरु करतात. काळे वस्त्र परिधान केलेले व आगीच्या धगीमुळे लाल डोळे झालेले ते यज्ञ पुरोहित साजूक तुपाची धार यज्ञातील अग्नीत सोडत मंत्रोच्चार करीत असतात. त्यामुळे सर्व सर्पांच्या हृदयाचे ठोके धडधडत होते, आणि त्या यज्ञकुडातील अग्नीत ते एकामागोमाग एक असें जाऊन पडू लागले. त्यांचा आकांत सर्वदूर ऐकू येत होता. एकमेकांना आपल्या वेटोळयात पकडून वळवळत ते नाइलाज झाल्या सारखे त्या यज्ञकुडाकडे खेचले जात होते. कांहीं काळे, कांहीं पिवळे, कांही लाल अशा विविध वर्णाचे ते साप मोठमोठ्यानो किंचाळत त्या यज्ञकुडाकडे जात होते. कांहीं वृद्ध कांहीं तरुण व कांही लहान असा सर्वच वयांचे ते त्यात होते. त्यातील कांहीं साप फार मोठे होते व कांहीं बारीक होते असें विविध आकाराचे ते साप यज्ञकुडातील आगीत भस्मसात होण्यासाठी खेचले जात होते. हजारोंच्या संख्येने ते साप त्या अग्नीत बळी दिले गेले. बळी गेलेल्यात कांहीं हत्तीच्या सोंडीसारखे होते तर कांहीं घोड्यासारखे दिसत होते. त्यांच्यातील जहाल विषाचे फवारे उडत होते. त्यांच्याच मातेच्या शापामुळे ते अशारितीने अग्नीत भस्मसात होत होते.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा बावन्नावा भाग संपला.

# आदिपर्व भाग त्रेपन्नावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

शौनक सौतीला विचारतात, मला सांग त्या यज्ञासाठी कोणते मोठे विद्वान ऋषी ऋद्विक म्हणून आमंत्रित केले गेले होते? तसेंच मला सांग कोण सदस्य होते त्या भयंकर यज्ञासाठी? हे सर्व आम्हाला तपशिलवार सांगा म्हणजे, अशा सर्पसंहारक यज्ञात कोणांचा हातभार होता ते समजेल. सौती त्यावर बोलतो, ठीक आहे, मी त्या सर्व ऋद्विक व सदस्यांची नांवे सांगतो. ब्राह्मण चंदवर्गव प्रमुख होत्री होते, ते अशा कामासाठी ख्यातनाम होते व ते च्यवनाच्या घराण्यातील होते. त्यांचे वेदाचे ज्ञान निंसंशय होते. दुसरे वृद्ध ब्राह्मण कौत्स, ते उद्गत्री म्हणजे वेदांतील ऋचा बोलणारे होते. जेमिनी ब्राह्मण होते, सर्णगर्व आणि पिंगल अध्वर्यू, व्यास त्यांच्या शिष्य व पुत्राबरोबर आले होते, उद्दलक. प्रमातक, स्वेतकेतू, पिंगल, असित, देवल, नारद, पर्वत, अत्रेय, कुंडजाथर, ब्राह्मण कालघात, वत्स्य, वृद्ध श्रुतश्रवस जे सदैव जपात मग्न असतं आणि जे त्यांच्या वेदाच्या ज्ञानाबद्दल ख्यातनाम आहेत. कोहल, देवशर्मा, मुग्दल, सामसौरव आणि इतर बरेच ब्राह्मण सदस्य म्हणून आले होते.

जसें ऋद्विक यज्ञकुंडात साजूक तुपाची धार लावतात तशी ते भयंकर वीष असलेले साप, जे सर्वांना त्यांच्या विषाने घाबरवत ते, त्या यज्ञकुंडात येऊन पडू लागले.

त्या अग्नीत त्याच्यातील चरबी व मांस करपत असल्यामुळे सर्वत्र त्याची दुर्गंधी पसरली होती. यज्ञकुंडातून ती चरबी व मेद वितळल्यामुळे त्याची नदी वहावी असे ते त्या कुडातून बाहेर वाहत होते.

हे होत असतांना, ह्या यज्ञाची खबर समजल्याने घाबरलेला तक्षक, सर्पांचा राजा, इंद्राच्या दरबारात हा यज्ञ थांबवण्यासाठी कांहीं कारवाई करावी अशी मागणी करण्यासाठी गेला. सर्वकांहीं ऐकल्यावर इंद्र त्याला आश्रावासन देतो किं, त्याला ह्या यज्ञामुळे कांहीं धोका होणार नाही. त्यांने तक्षकाला सांगितले कीं, ब्रह्मदेवांने इंद्राला असें आश्वासन दिले आहे. म्हणून तक्षकांने काळजी करू नये. अशाप्रकारे आश्वासन मिळाल्यावर तक्षक इंद्राच्या घरात रहाण्यास जातो.

सौती पुढे सांगतो जरी तक्षकाला अभय मिळाले तरी वासुकी मात्र चिंतेत होता कारण त्याच्या कुटूंबातील बरीच यज्ञात नष्ट झाली होती व आणखीन नष्ट होण्याच्या मार्गावर होती. तो दुःखाने व्यथित झाला होता. त्यांने त्याच्या बहीणास, जरत्कारुला बोलावून सांगितले किं, त्याचे शरीर जळत आहे. ह्या संहारामुळे तो अतिदुःखी झाला असून बेहोष होण्याइतपत परिस्थिती झालेली आहे. मला अशी भिती वाटते कीं, ह्या यज्ञकुडात माझासुद्धा बळी जाईल किं, काय असे वाटते. ज्या अर्थी हा यज्ञ सर्व सापांचा

नाश करण्यासाठी आहे, त्यात माझासुद्धा क्रम लागेल. ते होऊ नये म्हणून मी तुला विनंति करतो किं, तुझ्या मुलाला, सांग किं, त्याचे नातेवाईक मरणाच्या दरवाज्यात पडले आहेत त्यांना त्याने त्यांच्या तपोसामर्थ्याने वाचवावे. हे मी तुला सांगतो कारण, असें करण्यास मला ब्रह्मदेवांने सांगितले आहे. तुझा पुत्र जो वेद चांगले जाणतो त्याला मदत करण्यास सांग. त्याला सर्व ज्ञानी व वडीलधारे फार मानतात तो कांहीतरी करून हे गंडांतर दूर करील असें वाटते.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा त्रेपन्नावा भाग संपला.

# आदिपर्व भाग चौपन्नावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

सौती सांगतो, त्यानंतर वासुकीची बहीण जरत्कारु आपल्या लाडक्या मुलांस बोलावते व वासुकीने जसे तिला पढवले तसें सांगते, "माझ्या बाळा, आता ती वेळ आली आहे ज्यासाठी मी तुझ्या पित्याशी लग्न केले. आता तुला तुझे काम करण्याची वेळ आली आहे". ते ऐकून अष्टीक, कुतुहलाने आपल्या आईस विचारतो, "काय कारण होते ज्यासाठी तुझा माझ्या वडीलांशी विवाह माझ्या मामाने लावला? मला सांग माते, मी काय केले पाहिजे". ते ऐकून जरत्कारु विचलित न होता त्याला सांगण्यास सुरुवात करते, कारण, तिलासुद्धा तिच्या वंशाचा अशाप्रकारे नाश होणे मान्य नव्हते. ती सांगू लागते, "माझ्या गुणी बाळा, नीट ऐक, सर्व सापांची माता कद्रु, हीने तिच्याच मुलांना रागाच्या भरात शाप दिला किं, ते जळून मरतील. ती असा शाप देते किं, "तुम्ही माझे ऐकले नाही व उच्चैश्रवस घोड्याच्या शेपटाच्या केसांना बिलगून ती शेपूट काळी दाखवण्याचे नाकारले म्हणून शाप देते कीं, जनमेजयाच्या यज्ञात तुम्हाला वायू जाळून टाकील व तुम्ही सर्व नरकात जाल". त्यावेळी ब्रह्मदेव तेथे हजर होते व त्यावर ते तथास्तू  असेसुद्धा बोलले. ते बोलणे वासुकीने म्हणजे तुझ्या मामाने ऐकले. त्या शापातून सुटका व्हावी म्हणून देवांकडून संरक्षणाची अपेक्षा केली. कारण, देवांना अमृत

मिळवून देण्यात तुझ्या मामाने मोठीच मदत केली होती. त्याकारणांने देव व स्वतः विष्णू वासुकीच्या उपकाराची जाणीव ठेवून होते. वासुकींने त्यांना विचारले किं, हा शाप कसा व्यर्थ करता येईल?

विष्णू वासुकीला सांगतात कीं, जर जरत्कारू ऋषी त्याच्याच नांवाच्या बायकोबरोबर लग्न करील व त्यांना एक पुत्र होईल तो पुत्र तुम्हाला ह्या शापापासून मुक्तता देईल. ते ऐकल्यावर तुझ्या मामाने माझे नांव जरत्कारु ठेवले व जेव्हां ऋषी जरत्कारू, जो तुझा बाप आहे, लग्न करण्याची इच्छा करील तेव्हा मला त्याला लग्नात देण्याचे ठरवतो. अशारितीने माझा व तुझ्या वडलांचा विवाह संपन्न झाला. त्यातून तुझा जन्म झाला आहे. माझ्या बाळा आता ती  वेळ आली आहे, आता तू तुझ्या घराण्याचे संरक्षण करावयाचे आहे. ते तूं करशील नां"? असे एवढे बोलून अष्टीकची आई थांबते. "जर तू ते नाही केलेस तर माझा तुला जन्म देण्याच उद्देश व्यर्थ जाईल. आता सांग तू काय करणार आहेस"?

सौती पुढे सांगतो, ते त्याच्या आईचे उद्गार ऐकून अष्टीक त्याच्या आईस बोलतो, "माते मी तुझी इच्छा पूर्ण करीन. मामांना सांग कांहीं काळजी करू नका. मी त्या शापापासून सर्व सापांची मुक्तता करीन. अशा प्रसंगी कोणीही खोटे बोलत नाही. मी राजा जनमेजयाच्या त्या यज्ञ ठिकाणी जाऊन राजाचे मन जिंकीन व हा यज्ञ बंद करीन. माझा ह्याबद्दलचा निर्णय ठाम आहे त्याबद्दल तीळमात्र शंका बाळगू नये".

ते ऐकून वासुकी अष्टीकास बोलतो, माझ्या मातेच्या शापामुळे माझे हृदय पिळवटले गेले आहे. सर्व जग माझ्या भोवती गरगरा फिरत आहे असें वाटते. ते ऐकून अष्टीक त्याला आश्वासन देतो किं, माझ्यावर विश्वास ठेवा. मी हे काम करूनच येईन. त्या यज्ञाच्या आगीला अजिबात घाबरू नका. अशी शिक्षा जणुकाय जगाच्या अंतीचा भडका असावा. पण मी तो विझवून टाकीन त्याबद्दल खात्री बाळगा.

सौती पुढे सांगत असतो, एवढे बोलणे झाल्यावर तो महान ब्राह्मण, अष्टीक यज्ञाच्या ठिकाणी जाण्यास निघतो. तेथे गेल्यावर तो पहातो कीं, यज्ञाच्या प्रांगणात कोणालाही प्रवेश दिला जात नव्हता. मोठे मोठे सदस्य व स्वाध्यायी तेथे जमले होते परंतु, त्यांनासुद्धा आंत प्रवेश नव्हता. ज्यांना प्रवेश मिळाला ते यज्ञकुंडाच्या प्रांगणात प्रवेश करतांना राजाची स्तुती करणारी कवनं मोठ्यामोठ्यानी गांत होते. ऋद्विक व सदस्य त्या स्तुती गाण्यात सामील होत होते.

अशारितीने आदिपर्वातील  अष्टीक पर्वाचा चौपन्नावा भाग संपला.

# आदिपर्व भाग पंचावन्नावा

## (अष्टीक पर्व पुढे चालू)

तेथे यज्ञकुंडाच्या परिसरात प्रवेश केल्यावर अष्टीक ओरडून सांगतो, सोम व वरूण आणि प्रजापति ह्यांनी असांच एक बळीचा यज्ञ पूर्वी प्रयाग स्थळी केला होता. त्यात हजारो गोवंशांचा बळी त्यांने दिला होता प्रजापतिला संतुष्ट करण्यासाठी. परंतु, अहो राजश्री, भरतवंशाचे श्रेष्ठी, परिक्षित राजांचे सुपुत्र, तुमचा हा यज्ञ त्या प्रमाणेच उत्तम आहे. शक्र (इंद्र) राजांने असेंच शंभर बळीचे यज्ञ केले होते. त्यात अगणित हरण, सांबर असें श्वापद बळी दिले होते देवांना संतुष्ट करण्यासाठी परंतु, तुमचा हा यज्ञ त्या यज्ञाच्या पेक्षा हजारपट चांगला आहे. ते सर्व आपल्या भल्यासाठी केले जात आहे. यमाने केलेले बळीचे यज्ञ हरीमेध, त्यात माणसांचे हजारो बळी दिले गेले होते. तसेंच राजा रतिदेव, ह्यांचा बळीचा यज्ञ, मयदेशातील राजा चसविंदू तसेंच वैश्रवनाचा बळीचा यज्ञ ज्यात अगणित गाईंचा बळी दिला गेला होता असें अनेक आहेत त्यांच्याशी ह्या तुमच्या यज्ञाची तुलना करता येईल. त्या सर्व यज्ञांमुळे आपले भले होओ. अजमिदचा राजा नृग, दशरथाचा मुलगा युधिष्ठीर ह्यांने केलेला यज्ञ, सत्यवतीचा पुत्र कृष्ण-द्वैपायन अशाने केलेला यज्ञ ज्यात स्वताच कृष्ण-द्वैपायन ह्यांनी मुख्य पुरोहिताची भूमिका केली होती, अशा सर्वांचे बळीचे यज्ञ ह्यांची आठवण यावी असा हा यज्ञ आहे.

तेथे ज्यानी ऋद्विकांचे, सदस्यांची कामं केली तेंच येथे आहेत हे विशेष. वृत्राचा बळी घेणारा ज्याचे तेज सूर्यासारखे आहे, ज्याने दिलेल्या भेटी ज्या कधी संपतच नाहीत. कृष्ण-द्वैपायनाकडे शिकलेल्या ऋद्विकांसारखे कोठेही नाहीत असें ऋद्विक येथे आहेत. तो यज्ञ ज्यात विभवसु व चित्रभानु सारखा अग्नी धडधडत आहे व काळा धूर सोडत आहेत, देवांना दिलेले साजूक तुपाचे अर्ध्य स्वीकारत आहेत. ह्या जगात असा राजा जो सर्व प्रजेची पित्यासारखी काळजी घेतो जो त्यागी आहे, आपण यम किंवा वरुणासारखे आहात. साक्षात न्यायदेवता आहात. हातात चमकती बिजली धारण केलेल्या शक्रासारखे अहात. सर्व प्रजेचे संरक्षक अहात. ह्या जगात तुमच्या सारखा महान पुरुष होणार नाही, आणि असा बळीचा यज्ञ कोणीही करू शकणार नाही. खत्वंग, नभग, दिलीप आणि ययाति, मंधत्री ह्याच्या सारखे तुम्ही अहात. तेजामध्ये सूर्यासारखे अहात. शब्दाचे पक्के, अगदी जणू भिष्म! वाल्मिकी सारखे सुप्त शक्ती असलेले, वसिष्ठासारखे रागांवर नियंत्रण असलेले, इंद्रासारखे राजेश्वर अहात. नारायणासारखे प्रभावी अहात. यमासारखे न्याय देण्यात कार्यक्षम अहात, आपण भगवान श्रीकृष्णासारखे गुणवंत अहात. तुम्ही वसूंच्या भवितव्याचे धनी आहेस. तुम्ही सर्व त्यागमूर्ती अहात. तुम्ही दामोदरासारखे शक्तिमान अहात. आपण जमदाग्नी पुत्र परषुरामासारखे सर्व धर्मग्रंथाचे व शास्त्रांचे ज्ञाते अहात. सामर्थ्यात तुम्ही औरव आणि तृतीसारखे अहात. शत्रूच्या मनात भगिरथासारखे तुम्ही भिती उत्पन्न करता.

सौती सांगतो, अशारितीने, जनमेजय राजाची, त्याच्या बळीच्या यज्ञाची, त्यात काम करणाऱ्या ऋद्विक व सदस्यांची भरपूर स्तुती करून अष्टीक थांबला. जनमेजय राजा त्या ब्राह्मण अष्टीकाची सर्व लक्षणे तपासतो व त्याचे तेज पाहून पुढील शब्द बोलतो.

अशारितीने आदिपर्वातील  अष्टीक पर्वाचा भाग पंचावन्नावा संपला.

# आदिपर्व भाग छप्पन्नावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

अष्टीकाची स्तुतीसुमनं ऐकून राजा जनमेजय मनोमन अतिसंतुष्ट होऊन बोलतो, हा ब्राह्मण जरी एक लहान मुलगा दिसत असला तरी एकाद्या वृद्ध ऋषीसारखे त्याचे शहाणपण व अभ्यास पाहून मी संतुष्ट झालो आहे. ह्या प्रसंगी मी ह्या लायक ब्राह्मणाला आशिर्वाद देऊ इच्छितो आहे. तरी त्यासाठी सर्व ब्राह्मणांनी मला परवानगी द्यावी. ते ऐकून यज्ञाचे सदस्य बोलतात, आपण म्हणता ते खरे आहे असा ब्राह्मण राजाच्या कौतुकास पात्र आहे. अशा ब्राह्मणाची कोणतीही इच्छा राजाने पूर्ण करावयास हरकत नसावी. पण त्या आधी एक महत्वाचे काम राहीले आहे ते पूर्ण झाले पाहिजे. तक्षक केव्हाही येऊन ठेपेल त्याची व्यवस्था प्रथम करावी व नंतर ह्या गोष्टी पहाव्यात. सौती पुढे सांगत रहातो, राजा मात्र अष्टीकने केलेल्या स्तुतीमुळे प्रभावित झाला होता. म्हणून, त्या प्रभावी ब्राह्मणाचे कौतुक करणे, तक्षकाला बळी चढवण्यापेक्षा जास्त महत्वाचे समजत होता. राजा त्या ब्राह्मणाला, अष्टीकाला, विचारतो, काय आशिर्वाद पाहिजे.

यज्ञाचे होत्री त्यामुळे नाराज होते. ते राजाला सांगतात, महाराज, तक्षकाचा बळी अजून झालेला नाही तेव्हां तो झाला पाहिजे कारण अहो

राजश्री, तक्षक आपला शत्रू आहे त्याने आपल्या पिताश्रींची हत्या केली आहे तरी ते उरकल्यानंतरच हा आशिर्वाद देण्याचा उपक्रम संपन्न करावा असें आम्हाला वाटते.

ते ऐकल्यावर राजा जनमेजय म्हणतो, खरे आहे, तक्षकाचा बळी हे सर्वात जास्त महत्वाचे काम आहे. तो माझा एक क्रमांकाचा शत्रू आहे. त्यानंतर तो होत्रींना विनंती करतो किं, कृपया यज्ञाचे कार्य अधिक वेगांने करावे म्हणजे तक्षकाचा बळी त्वरित साध्य होईल. अहो राजश्री धर्मग्रंथातील संदर्भानुसार आणि यज्ञाची देवता जे सांगते त्याप्रमाणे तूर्त तक्षक इंद्राच्या संरक्षणात आहेत.

यज्ञाच्या भयांने तो इंद्राकडे संरक्षण मागण्यास गेला, इंद्राच्या अनेक धूर्त कारवायांत तक्षक मदत करीत असल्यामुळे इंद्र व सर्व देव तक्षकाच्या उपकाराखाली दबले गेले आहेत त्यामुळे तक्षकाला त्यांनी स्वर्गात धरून ठेवले आहे. इंद्राने तक्षकाला आश्र्वासन दिले आहे कीं, इंद्राच्या घरात अग्नी तक्षकाला जाळू शकणार नाही असें पुराणाचे ज्ञानी असलेले महान सुत्रधार लोहीताक्ष, राजाला व तेथे असलेल्या सर्व सदस्यांस व ऋद्विकांस सांगतात.

सौती पुढे सांगतो, हे ऐकून राजा जनमेजय अतिशय अस्वस्थ होतो. तो तेथे हजर असलेल्या सदस्यांस व ऋद्विकांस त्यानी त्यांचे काम ठरल्याप्रमाणे करीत रहावे असे आदेश देतो. ते ऐकून ते सदस्य व ऋद्विक यज्ञात पुन्हा साजूक तुपाचे अर्ध्य देऊन यज्ञाला सुरुवात करतात. ते पाहून इंद्र

स्वतः तेथे प्रकट होतात. त्याच्या रथाभोवती सर्व देव गोळा झालेले दिसत होते आणि आवतीभोवती मोठाली ढगं होती. अहो शौनक, तो नजारा देखणा होता. त्याशिवाय स्वर्गीय नर्तिका व गायक त्यांच्या वाद्यांसह तेथे आपले स्वर्गीय गायन गात होते. तक्षकसुद्धा घाबरलेला इंद्राच्या उपवस्त्रात छोट्या किड्याच्या रुपात लपून सर्वकांहीं पहात होता. तो इतरांना दिसत नव्हता.

इंद्राला त्याच्या लव्याजम्याने आलेले पाहून राजा आणखीनच संतापतो. राजा जनमेजय रांगाने तेथे जमलेल्या ब्राह्मणांस आज्ञा देतो कीं, आपले कार्य चालू ठेवावे व जर इंद्र वाटेत आला तर त्यालासुद्धा यज्ञात बळी देऊन टाका. कोठल्याही परिस्थितीत तक्षकाचा बळी झालाच पाहिजे.

सौती पुढे सांगतो, राजाची ती आज्ञा इंद्राला समजते तो आकाशातून खाली येतो त्याचवेळी होत्री यज्ञात तुपाचे अर्ध्य सोडतात व तक्षकाचे नांव घेतात. त्याबरोबर इंद्र तक्षकाला यज्ञाकडे फेकून देतो आणि स्वतः स्वर्गात पळून जातो. मंत्रांच्या प्रभावामुळे तक्षक यज्ञाच्या अग्नीत खेचला जातो. तक्षकाचा बळी जाणार हे निश्चित असते! अशारितीने जनमेजयाचा शत्रू बळी गेला असें समजून ऋद्विक राजाला सांगतात, महाराज आता आपल्या यज्ञाचा मुख्य उद्देश संपन्न झाला आहे तेव्हां, आता आपण ह्या नवोदित ब्राह्मणास मनाप्रमाणे आशिर्वाद देऊ शकता.

ते ऐकून राजा जनमेजय आनंदात अष्टीकाला बोलतो, "अरे अतुलनीय देखण्या ब्राह्मणा, मी तुला तुझ्या योग्यतेचा आशिर्वाद देऊ

इच्छितो. तर आता तू सांग, मी तुला काय द्यावे? जरी तू असें कांहीं मांगितले जे देणे अवघड आहे तरी ते मी तुला देणारच".

त्याचवेळी ऋद्विक राजाला सांगतात, "पहा राजा, तक्षक तुमच्या पूर्णपणे कह्यात येत आहे. तो आकाशातून प्रचंड ओरडत खाली कोसळत आहे. ते सर्व आपल्या मंत्राच्या प्रभावाखाली होत आहे". इंद्राने त्याला फसवले हे समजून तक्षक व त्याच्या बरोबरचे सर्व साप जोर जोरांने किंचाळत यज्ञाच्या अग्नीत पडत होते. तक्षक बेहोष अवस्थेत जोर जोरांने श्वास घेत खाली येत असतो. आता तो तक्षक यज्ञकुंडात पडणार एवढ्यात तो लहान ब्राह्मण, अष्टीक, राजाला सांगतो, "अहो राजा जनमेजया, जर तुम्हाला मला खरोखरच दुवा द्यावयाचा असेल तर प्रथम हा यज्ञ ताबडतोब आटोपता घ्यावा व निरपराध सर्पांचा नाश करणे थांबवावा". त्या ब्राह्मणाचे ते मागणे ऐकून राजा व्यथित झाला व म्हणाला, "अहो ब्राह्मणा, तुला जे कांहीं सोने, चांदी, रत्नं असें पाहिजे ते मांग पण हा सर्पसंहारक यज्ञ थांबवण्याची मागणी करू नकोस. हे ऐकून अष्टीक राजाला बोलतो, "राजश्री मला सोने, चांदी, रत्नं असें कांहींही नको आहे पण माझी मागणी फक्त हा संहारक यज्ञ आटोपता घ्यावा अशीच आहे कारण, राजा, माझे आईच्या बाजूचे आप्त ह्या वंशातील आहेत व त्यांना अभय मिळवून देणे माझ्यासाठी सर्वात जास्त महत्वाचे आहे".

पुढे सौती सांगतो, अष्टीक जनमेजयास विनंती करतो, "अहो परिक्षित सुपुत्रा, माझी एकच मांगणी आहे व ती हा यज्ञ थांबवावा अशी आहे व त्याचे कारणसुद्धा मी आपल्याला सांगितले आहे".

राजा त्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून पुनः अष्टीकाला दुसरे कांहीं मांगण्यास सांगतो. त्याप्रसंगी तेथे जमलेले सर्व ऋद्विक व सदस्य एकमतांने राजाला सुचवतात कीं, राजाने त्या बालक ब्राह्मणाची विनंति मान्य करावी.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा छप्पन्नावा भाग संपला.

# आदिपर्व भाग सत्तावन्नावा

# (अष्टीक पर्व पुढे चालू)

शौनक ऋषी सौतीस विचारतात, अरे सुतपुत्रा सौती, मला सांग त्या सर्व सापांची नांवे जे यज्ञात बळी दिले गेले. सौती त्यावर सांगतो, ऋषीवर मी तुम्हाला काय सांगणार, अक्षरशः असंख्य सर्पांचा बळी त्या यज्ञात दिला गेला. त्या सर्वांची नांवे मला सांगता येणार नाही परंतु, कांहीं महत्वाची नांवे मी सांगू शकेन ती ऐकावीत. वासुकीच्या कुटूंबातील नांवे प्रथम सांगतो, निळे, लाल, शुभ्र असे विविध रंगाचे व आकाराचे, कांहीं प्रचंड व जहाल वीष असलेले असहायपणे त्या यज्ञात त्याच्याच आईच्या शापामुळे आहुति दिल्यासारखे जळून जात होते.

कोटीस, मनस, पुम, गल, पल, हल्मक, पुच्छल, कौनुप, चक्र, कालवेग, प्रकलन, हिरण्यवहू, चरक, कष्कक, आणि कालदंतक हे वासुकीच्या घरातील होते.

अहो ब्राह्मण, शौनक, इतर बरेच साप ज्यांचे आकार विचित्र होते व जे फार विषारी होते व जे तक्षकाच्या कुटूंबातील होते ते सुद्धा यज्ञात जळून गेले. त्यांची नांवे पच्छंदक, मंडालक, पिंडक्षेत्री, रवेनक, उचोछिख, चरव, भंगस, विल्वतेजस, विरोहन, सिली, शलकर, मुक, सुकुमर, प्रवेपन, मुद्गर, शिसूरोमन, सुरोमन आणि महाहनु हे तक्षकाच्या घरातील बळी गेले.

पर्वत, परिजात, पंडर, हरिन, कृष, विहंग, सरभ, मेद, प्रमोद आणि सौहतापन हे ऐरावताच्या परिवारातील  होते.

आता ऐका कौरव्य परिवारातील कोण मेले. एरक, कुंडल वेणी, वेनिस्कंद, कुमारक, वहुक, श्रींगवेरा, धुर्तक, प्रतर आणि अस्तक.

ध्रुतराष्ट्र परिवारातील शंकुकर्ण, पिथारक, कुथर, शुखन, शेचक, पुर्नानगद, पुर्णमुख, प्रहस, शकुनी, धारी, कुथर, शुखन, शेचक, अमहत्थ, कुमाथक, सुशेन, व्यय, भैरव, मुंडवेदंग, पिसंग, उद्रपरक, ऋशभ, वेगवत, पिंडारक, रक्तांग, सर्वसरंग, समृद्ध, पथ आणि वसक, वराहक, विरनक, सुचित्र, छित्रवेगिका, परासर, तरूनक, मनिष्कंध आणि अरुणी.

अहो ब्राह्मण, अशी ती नांवे होती मुख्य सर्पांची. ते सर्व त्यांच्या कर्तबगारी बद्दल सुप्रसिद्ध होते. त्यांची मुलं, त्यांची मुलं असें असंख्य ते सर्व यज्ञात जाळले गेले.

कांहीं तीन तोंडाची, कांहीं सात व कांहीं दहा तोंडाची होती. जणूकाय त्यांचा युगांतच झाला.

कांहीं एवढे मोठे जसे मोठे डोंगरच. कांहीं फार वेगाने प्रवास करू शकणारे होते. कांहीं आपलं रुप त्यांच्या इच्छेनुसार बदलू शकत होती. आपले बळ ते त्याच्या इच्छेनुसार वाढवू शकत होते. असें सर्व साप त्यांच्याच मातेच्या शापामुळे जळून गेले होते.

अशारितीने आदिपर्वातील  अष्टीक पर्वाचा सत्तावन्नावा भाग संपला.

# आदिपर्व भाग अठ्ठावन्नावा

# (अष्टीक पर्वाचा शेवट)

सौती सांगतो, आता ऐका एक छानसा प्रसंग जो अष्टीकच्या बाबत घडला. त्याचे असे झाले, राजा जनमेजय अष्टीकला त्याची इच्छा पूर्ण करण्याबाबतचा आशिर्वाद देणारच होता पण त्याप्रसंगी तक्षक इंद्राने फेकून दिल्यानंतर आकाशातच लोंबकळत होता. यज्ञाच्या दिशेने तो जोरात येत असतो. पण तो फारच घाबरलेला होता. यज्ञकुंडात ऋद्विकांनी अर्ध्यसुद्धा तक्षकाच्या नांवाने दिले होते परंतु, तो तक्षक यज्ञकुंडात पडत नाही. शौनक विचारतात, असें कसें होईल, कदाचित मंत्र योग्यप्रकारे उच्चारलेले नाहीत कां? सौती सांगतो, तो तक्षक आकाशातून खाली येत असतांना अष्टीकाने तिनदा पुटपुटले होते, "थांब" "थांब" "थांब". त्यामुळे तो तक्षक खाली येऊ शकत नव्हता. तसांच अधांतरी अडकला होता. राजा त्याच्या सदस्यांना पुनः पुन्हा तक्षकाला खाली खेचण्याचा आदेश देत होता. परंतु, तो खाली येईना. तेव्हां सदस्य व ऋद्विक राजाला विनंति करतात कीं, राजेसाहेब आपण अष्टीकाचे मांगणे एकदाचे मान्य करावे. "हा यज्ञ ताबडतोब थांबवावा". अष्टीकावर कृपा करावी. अहो सुत तुझे शब्द खरे होवोत. ते ऐकून अष्टीक आनंदीत झाला. अशारितीने परिक्षिताच्या मुलांने आरंभिलेला यज्ञ संपतो. तसे झाले असले तरी राजा जनमेजय फार आनंदात होता. सदस्य व ऋद्विक

आणि इतर ब्राह्मण त्यांना समाधानकारक दक्षिणा मिळाल्यामुळे खुष झाले होते, म्हणजे सर्वच संबंधित मंडळी यज्ञ थांबल्याने संतुष्ट होती. सुत लोहीताक्ष जो यज्ञकुंड बांधण्याचे काम करतो तोसुद्धा त्या योगांने समाधानी होतो. त्याला बऱ्याच गोष्टी राजा दान करतो. हे सर्व झाल्यानंतर लोहीताक्ष यज्ञाच्या शास्त्रशुद्ध पद्धतीने समारोपाची तयारी करतो.

अष्टीकाला राजा निरोप देतांना त्याच्या पुढच्या यज्ञासाठी आवेदन सांगतो. त्याने सदस्य व्हावे म्हणून आग्रह करतो. पुढच्या अश्व यज्ञाचे आमंत्रण देतो! ते आवेदन अष्टीक स्वीकारतो व आपल्या घरी मोठ्या आनंदात जातो. घरी आल्यावर तो त्याच्या आई व मामाचे पाय धुतो व जे घडले ते सांगतो. ते ऐकून सर्व सर्पांचे भय नाहीसे होते.

सर्व साप अष्टीकावर इतके खूष होतात कीं, ते त्याला विचारतात, "अष्टीका, आम्ही काय करावयाचे म्हणजे तुला आनंद होईल ते सांग, आम्ही ते करू. आम्हाला तुझ्यामुळे जीवनदान मिळाले आहे त्या बदल्यात हे करणे योग्य होईल. अष्टीक त्यांच्याकडून एक दुवा मांगतो कीं, "जर तुम्हाला खरोखरच कांहीं करावयाचे असेल तर ह्यापुढे जे कोणी माझ्या ह्या कामाची कहाणी गातील, त्यांना कोणीही साप दंश करणार नाही". ते ऐकून ते उपकृत नाग त्यावर तथास्तु, असें बोलून तसेंच आश्वासन देतात. त्यापुढे आणखीन एक आश्वासन वासुकी देतात कीं, जे कोणी अष्टीक, अर्तिमन व सुनिथा ह्यांना आठवतील त्यानासुद्धा कोणीही साप दंश करणार नाही. पुढे अष्टीक सांगतो

जर कोणी ते वचन मोडेल तर त्या सापांचे फणे फाटतील व तो विषहीन होईल.

सौती पुढे सांगतो, तो श्रेष्ठ ब्राह्मण, ते त्या सापांच्या राजाने दिलेले वचन ऐकून संतुष्ट झाला. तो महान ब्राह्मण, अष्टीक, त्याचे सापांना वाचवण्याचे कार्य केल्यानंतर यथावकाश आपली मुलं, नातवंडं पृथ्वीवर ठेवून स्वर्गाला जातो.

सौती नंतर सांगतो, मी आपल्याला अष्टीकाची पूर्ण कथा सांगितली जशी ती घडली. ती कथा ऐकून ऐकणाऱ्यांची सापांची भिती नाहीशी होते असें समजतात.

सौती सांगत असतो, अहो भृगु वंशी शौनक, तुमच्या पूर्वज प्रमतिने जशी ती त्याच्या चौकस मुलांस, ऋऋस, सांगितली तशीच मी सांगितली आहे, आणि जशी मी ऐकली तशीच ती येथे सांगितली आहे. अहो शौनक ब्राह्मण, ही कथा ऐकून पुण्य प्राप्ती होते आणि ती काय आहे असें तुम्ही मला विचारले होते जेव्हां मी तुम्हाला दुंदुभीची कथा सांगितली. मला आशा आहे, त्याने आपले ह्याबद्दलचे कुतुहल पूर्ण झाले असेल.

अशारितीने आदिपर्वातील अष्टीक पर्वाचा अठ्ठावन्नावा भाग संपला.

- आदिपर्व खंड पहिला समाप्त -

भाषांतरकाराचा परिचय



मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रंथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यमाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणाऱ्या कथा

जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल देत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षें मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईंदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबऱ्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे

ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकऱ्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चाने शेतकऱ्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे, माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें

शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विचारांमुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून

काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर तो ब्लॉग बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बऱ्याच गटांना आवडत नाही. बऱ्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच

नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकाऱ्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ २०१८

ashokkothare@gmail.com

ashokkothare@yahoo.co.in

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहेकडे लक्ष नका रडणाऱ्यां . पुर्वी पुस्तकाच्या एका .मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता .देऊ .पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी .आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं वर्षाला .अर्धाकोटी डाऊनलोड होतातवाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड . व्हट्स अप .करतात, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीतखेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासू .सुसाट सुटलित .न ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशातटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या रॉके . .वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हाआपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना . त्यांचे ई मेल पत्ते .यात ओढा, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवातुम्ही फ़क्त दहा व .ाचक आणाच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची तुम .आणि ते दहाहजार .ते शंभर आणतील . आपल्याला .आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत .जाहिरात करा तेच .आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट .टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही मराठी भाषेची ताकद जगाला दाख .आमची ताकदवू.

ई साहित्यची पुस्तके

www. esahity. com वरून डाऊनलोड करा .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा .

किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहेते .download करा .

हे सर्व मोफ़त आहे.